म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.

# उत्तर कांड

## रमेश मंत्री

REFBK-0024938

6 MAR 1988
9 OCT 1991
5 JUN 1988
12 OCT 1991
2 JUL 1989
19 AUG 1992
26 JUL 1989
4 SEP 1993
20 AUG 1989
25 AUG 1990
28 AUG 1991
27 AUG 1993

१६१

२८८३८
१५/५/८६

2 JUL 1987 4 MAR 1987 1 MAR 1987
17 MAY 1987

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

11 JUN 1986
15 JUN 1986
22 JUN 1986
0 JUN 1986
JUL 1986
7 JUL 1986
17 DEC 1986

30 JUL 1986
27 AUG 1986
10 SEP 1986
4 SEP 1986
28 SEP 1986
22 OCT 1986
(क. मा. पद्ध.)
DEC 1986

18 JAN 1987
15 APR 1987
24 DEC 1986

161

६५२

२४९३८
१५।५।८६

सार्व. ग्रं. संग्रहालय
२४९३८
१५।५।८६

18 JAN 1987
15 APR 1987
24 DEC 1986

# उत्तरकांड

रमेश मंत्री

REFBK-0024938

इंद्रायणी साहित्य
पुणे

प्रकाशक
श्याम दयार्णव कोपर्डेकर
इंद्रायणी साहित्य
२७३, शनवार पेठ
पुणे ४११ ०३०

मुद्रक
प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

प्रकाशन दिनांक
८ मार्च १९८६

मुखपृष्ठ
अनंत सालकर

© सौ. रजनी मंत्री

किंमत : ४० रुपये

उत्तर प्रदेशातील ज्येष्ठ साहित्यिक

**श्रीमती महादेवी वर्मा**

**श्री. अमृतराय**

आणि

**श्री. अमृतलाल नागर**

**यांना—**

# रमेश मंत्री यांचे साहित्य

**विनोद :**

१) साखरेची चित्रे २) वाटाण्याच्या अक्षता ३) खसखसीचा मळा ४) कोल्हापुरी चिवडा ५) साखरपेरणी ६) एका हाती टाळी ७) बायकोचा राग ८) सह्याद्रीची चोरी ९) दहीहंडी १०) जनू बाडे ११) रुखवत १२) कागदी वाघ १३) चोरवाटा १४) विनोदाचा अमरकोश १५) ताजा कलम १६) कोल्ह्याची द्राक्षे १७) हास्यधारा १८) थट्टामस्करी १९) सूर्याची पिले २०) पळसाला पाने पाच २१) स्वल्पविराम २२) हलके-फुलके २३) आपलेच दात आणि दुसऱ्याचे ओठ २४) निवडक मंत्री २५) हसवाहसवी २६) विनोदी महाराष्ट्र २७) वाघाचा पुलावा २८) जॅकपॉट २९) हास्यपूर्णा ३०) हजार हास्यक्रिया ३१) बायकोवर दात ३२) साप्ताहिकी ३३) हास्यरुचिरा ३४) हेमामालिनीचा हंगामा ३५) मावशी हरवली ३६) तिरकस तिरदाजी ३७) एलिझाबेथ टेलर आणि मी ३८) गमत काय झाली ३९) गालावरच्या खळ्या ४०) जपानी आटापीटा

**नाटक आणि नाटिका**

४१) वरातीमागून घोडे ४२) करीन ती पश्चिम ४३) नवऱ्याला हवी मैत्रीण ४४) हनिमून झालाच पाहिजे ४५) शहाणीला भेटला दीडशहाणा ४६) चंदेरी ४७) शेजाऱ्यावर प्रेम करा ४८) चटकचांदणी ४९) हासविता धनी ५०) पुरुषांना आवडतात बायका ५१) मृगजळ ५२) लक्षाधीश ५३) ज्ञानाचे इंजेक्शन ५४) विदूषक कॉलेज ५५) लांबनाक्याचा देश ५६) बोल बोल म्हणता ५७) भोपळे राजा (बालनाट्य)

**कादंबरी** ५८) तुमच्या पायी ठेविले मन ५९) महानगर ६०) अक्षर ६१) उत्तरकाल ६२) बारा लाखात जगाची सफर ६३) स्वप्नसुंदरी ६४) मुंबई ते बांडुंग ६५) सोलकढीचा सुपरमॅन ६६) धृतराष्ट्र

**प्रवासवर्णन** ६७) थंडीचे दिवस ६८) नवरंग ६९) क्षणाचा प्रवासी ७०) सुखाचे दिवस ७१) ओ कलकत्ता ७२) सुखाच्या रात्री ७३) सागरकन्या ७४) बहारीचे दिवस ७५) सूर्यपुत्रांचा देश ७६) तरंगणारे शहर ७७) दिशांतर ७८) उत्तरकांड ७९) सुंदर सातारा

**ललित गद्य** ८०) विझणारी आग ८१) हे अद्भुत जग

**कथा** ८२) अखेरची शिकार

**प्रबंध** ८३) वृत्तपत्रव्यवसाय.

**बालवाङ्मय** ८४) सजीवचा वाढदिवस ८५) मुलाची जागतिक राजधानी ८६) एक रुपयात हत्ती ८७) वाघाची फजिती ८८) हत्तीकाका घरी आले ८९) मोठी आई

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# श्रेष्ठ सांस्कृतिक वारसा

उत्तर प्रदेश हे भारतातील एक अत्यंत महत्त्वाचे राज्य आहे राजधानी दिल्लीचा अपवाद केला, तर ते सर्वांत महत्त्वाचे असे राज्य आहे त्याचे दोन लक्ष चौऱ्याण्णव हजार चौरस किलोमीटर हे क्षेत्रफळ भारतातील सर्व राज्यात सर्वांत मोठे आहे या राज्याची लोकसंख्या जपानच्या लोकसंख्येएवढी म्हणजे अकरा कोटीहून अधिक आहे जनता पक्षाच्या राजवटीतील मोरारजी देसाईंचा पंतप्रधान पदाचा अल्पकाळ सोडला, तर स्वतंत्र भारताच्या सदतीस वर्षांपैकी सर्व काळ याच राज्यातील पंतप्रधानांनी देशावर हुकमत गाजविली आहे. धार्मिक दृष्टया हिंदूंना पवित्र अशी अनेक महत्त्वाची तीर्थक्षेत्रे याच उत्तरप्रदेशात आहेत बद्रीनाथ, केदारनाथ, हरद्वार, हृषिकेश, वृंदावन, मथुरा, काशी, अयोध्या, प्रयाग, चित्रकूट, ब्रह्मावर्त, हस्तिनापूर, कुरुक्षेत्र वगैरे भगवान बुद्धांनी प्रथम उपदेश जेथे केला, ते सारनाथ याच राज्यात आहे तेथे अद्याप बुद्धकाळातील अवशेष आहेत महाभारतात ज्या घराण्यांचे उल्लेख आहेत, ती कुरू, पांचाल आणि यदू ही घराणी याच उत्तरप्रदेशातील रामायणातील बऱ्याच महत्त्वाच्या घटना याच भागात घडल्या उत्तर प्रदेश हे आर्यसंस्कृतीचे माहेरघर या भागाला अवध (अयोध्याचा अपभ्रंश) म्हणतात

गंगा आणि यमुना या प्रचंड नद्यांच्या खोऱ्यातील सुपीक जमिनीवर प्राचीन काळापासून आक्रमणे झाली आहेत आर्य प्रथम स्थायिक झाले ते याच खोऱ्यातील सजल व सुफल जमिनीवर. चौथ्या शतकात हा भाग मगधाच्या गुप्त साम्राज्यात होता हर्षवर्धनाने सातव्या शतकात याच राज्यातील कनौज हे आपले राजधानीचे ठिकाण केले अकराव्या शतकात गझनीच्या महमदाने या समृद्ध भागावर आक्रमण करून प्रचंड प्रमाणावर लुटालूट केली त्यानंतर बाराव्या शतकात महमद घोरीने

या भागात मुसलमानाची सत्ता बळकट केली बुंदेल वगळता बाकीच्या प्रदेशावर दिल्लीच्या बादशहाचा अमल सुरू झाला पुढे जौनपूरचे शर्की स्वतत्र झाले आणि त्यानी दिल्लीपर्यंत आपल्या राज्याचा विस्तार करण्याची आकाक्षा बाळगून प्रत्यक्ष प्रयत्नही केले पण बाबराच्या अबाढव्य सैन्यापुढे जौनपूरचे शर्की तोकडे पडले आणि हा भाग पुन्हा दिल्लीच्या हुकमतीत आला मात्र अठराव्या शतकात दिल्लीचे मुसलमान सम्राट दुर्बळ झाले, तेव्हा अयोध्येचे सुभेदार स्वतत्र झाले मराठ्याचा उज्ज्वल इतिहास घडविणाऱ्या पहिल्या बाजीरावानी बुदेलखडातही प्रवेश केला १७५१ मध्ये मराठ्यानी आग्र्याची सुभेदारी मिळविली, पण पानिपतच्या लढाईत मराठ्याचा दारुण पराभव झाला त्या काळी उत्तरेत गेलेल्या शेकडो महाराष्ट्रीय कुटुबाचे वशज अजूनही उत्तर प्रदेशात आहेत

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात इग्रजांनी या भागात आपले आसन पक्के केले १८५७ च्या स्वातंत्र्य-समरात झाशीची राणी, बिठूरचे नानासाहेब पेशवे आणि अयोध्येचे तालुकेदार यानी पराक्रमाची शर्थ केली अलाहाबाद शहरावर तर सहा दिवस भारतीयांचा अमल चालला होता पण इग्रजांनी आधुनिक शस्त्रे आणि प्रचड माणूसबळ याच्या जोरावर स्वातत्र्यसैनिकांचा हा लढा दडपून टाकला

ब्रिटिशांच्या काळात हा भाग सयुक्त प्रात या नावाने प्रसिद्ध होता भारत स्वतत्र झाल्यावर १९५० मध्ये उत्तर प्रदेश हे राज्य अस्तित्वात आले ज्या ताज-महालाच्या सौंदर्याची कीर्ती जगभर पसरली आहे, तो त्याच राज्यात आहे सूरदास तुलसीदास, कबीर अशा ज्येष्ठ संताची परपरा या राज्यास मिळाली आहे तसेच मुस्लिम सम्राटाच्या ऐन वैभव काळातील साहित्य, शिक्षण, हस्तकला, चित्रकला अशा अनेक क्षेत्रांतील दिग्गज याच भागात होऊन गेले आणि आजही या परपरा या राज्याने टिकविल्या आहेत गझल, शेरशायरी, कव्वाली, मुजरा या क्षेत्रातील निष्णात याच राज्याने भारताला दिले वाल्मीकी आणि मिर्झा गालीब अशा भिन्न प्रवृत्तींच्या कविराजाचा वारसा चालविणारे हे राज्य बनारस हिंदू विश्वविद्यालय हे अशियातील सर्वांत मोठे विश्वविद्यालय या राज्यात आहे प नेहरूचे घर असलेले अलाहाबाद आणि सर्व हिंदूचे सर्वांत पवित्र तीर्थक्षेत्र काशी ज्या भागात आहे, असे हे उत्तर प्रदेश राज्य

अशा अनेक कारणासाठी उत्तर प्रदेशला जावे अशी माझी फार वर्षांची इच्छा होती त्यापैकी हृषिकेश, केदारनाथ व बद्रीनाथ ही धार्मिक स्थळे मी पूर्वीच पाहिली होती पण अलाहाबाद, लखनौ, अयोध्या व बनारसबद्दल मला विलक्षण आकर्षण होते या गावाना जाऊन तेथील साहित्यिक, सपादक, प्रकाशक वगैरेंना भेटावे अशी योजना आखून मी पूर्वतयारी सुरू केली. प्रवासाचे दृष्टीने अलाहाबाद, वाराणसी, अयोध्या, लखनौ असा कार्यक्रम आखणे सोयीचे होते म्हणून मी

तोच मार्ग धरला पण उत्तर प्रदेश सरकारच्या मुंबई येथील माहिती–कचेरीत मी गेलो, तेव्हा येथील पर्यटन अधिकारी श्री सहाय मला म्हणाले, "तुम्ही तुमचा कार्यक्रम बदलून प्रथम लखनौला गेलात तर बरे होईल कारण तेथे तेरा दिवसाचा लखनौ-महोत्सव लवकर सुरू होत आहे या महोत्सवात तुम्हाला उत्तर प्रदेशचे संगीत नाट्य, नृत्य इत्यादींचे उत्कृष्ट आविष्कार पाहावयाला मिळतील भारतातील त्या त्या क्षेत्रातील सर्वोत्तम कलावंत या महोत्सवात भाग घेणार आहेत " मला त्याचे म्हणणे पटले पण या वेळेपर्यंत मी अलाहाबादचे पहिल्या वर्गाचे रिझर्व्हेशन केले होते म्हणून मी ठरवले की प्रथम अलाहाबादला जायचे, तेथील कार्यक्रम आटोपून तडक लखनौ गाठायचे

अलाहाबादला माझ्या ओळखीचे कोणीही नव्हते कोठे उतरायचे ते ठरले नव्हते म्हणून पहिल्या दिवशी अलाहाबादच्या रेल्वे रिटायरिंग रूममध्येच उतरावे, चौकशी करून बरेसे हॉटेल गाठावे असे मी ठरवले वाराणसी एक्स्प्रेस मुंबईहून सकाळी पावणेमातला सुटली आणि वाटेत कुठेही अडचण न येता अगर विलंब न होता दुसऱ्या दिवशी सकाळी साडेसात वाजता अलाहाबादला पोचली वीस रुपये भरून मी स्टेशनवरची एक खोली घेतली प्रवाशानी आपले तिकीट दाखवले तर चोवीस तासांसाठी स्वतंत्र खोली किंवा सहा रुपयाना डॉर्मिटरी म्हणजे हॉलमध्ये झोपण्यापुरती जागा मिळते आगगाडीच्या इंजिनाचा आणि गाड्यांच्या येण्याजाण्यांचा आवाज येतो पण परक्या गावात येथे शंभर टक्के सुरक्षितता असते आणि गावात उतरल्याबरोबर सामान घेऊन हॉटेलसाठी शोधाशोध करण्याचे कष्ट पडत नाहीत हे फायदेही असतात

ज्या शहरात आपली कोठेही ओळख नाही, तेथे बस्तान बसविण्याचे सर्वांत प्रभावी ठिकाण म्हणजे तेथील प्रमुख दैनिकाची कचेरी कलकत्ता येथे मी प्रारंभ केला तो 'आनंद बझार पत्रिका' या भारतातील सर्वाधिक खपाच्या दैनिकाच्या कचेरीपासून मद्रासमध्ये मी पहिल्या ओळखी मिळविल्या त्या 'हिंदू' या भारतातील एका अग्रेसर दैनिकाच्या संपादकवर्गाबरोबर अलाहाबादमध्ये 'अमृत प्रभात' हे प्रमुख हिंदी भाषिक दैनिक आहे अशी मला माहिती मिळाली पण आता तर फक्त आठ-साडेआठ वाजत होते आणि सकाळी अकरानंतरच दैनिकाच्या कचेरीत जाऊन काही उपयोग होतो हे माहीत असल्याने मी मधला वेळ अलाहाबाद गावात भटकण्यात काढला, स्टेशनपासून 'अमृत प्रभात'ची कचेरी निदान तीन मैल तरी लांब होती अलाहाबादला सायकलरिक्षा हेच प्रमुख वाहन आहे गर्दी आणि रस्ते अपरिचित असल्याने बस मला निरुपयोगी होती आणि ज्या काही थोड्या ऑटोरिक्षा होत्या त्या फक्त दहा किलोमीटर्सच्या पुढील अंतरासाठीच परतीच्या भाड्याच्या बोलीने मिळत होत्या म्हणून मी सायकलरिक्षा या अतिमंद

आणि काहीशा क्रूर वाहनाचा नाइलाजाने अवलंब केला तरी कलकत्ता येथे माणसांनी ओढण्याच्या रिक्षा असतात, त्यापेक्षा सायकलरिक्षा बऱ्या

'अमृत प्रभात'कडे जाताना अलाहाबादचे आणि सबंध उत्तर प्रदेशचेच एक वैशिष्टच ठळकपणे लक्षात भरते ते म्हणजे रस्त्यावर जागोजाग दिसणारे ठेले आणि धाबे रस्त्याच्या कडेला एक मोठे चुलवण असते त्यावर तीन-चार चुलींची तोंडे असतात या चुलीवर सकाळी सहापासून रात्री उशिरापर्यंत नास्ता आणि चहा तयार होत असतो आपण इकडे सकाळच्या न्याहारीला (ब्रेकफास्ट) नास्ता म्हणतो, पण उत्तर प्रदेशात दिवसा-रात्री केव्हाही खाणे म्हणजे नास्ताच. फक्त जेवणाला खाना म्हणायचे बाकी सारा फराळ म्हणजे नास्ता त्यात जिलबी, सामोसे, रोटी किंवा पुरी आणि बटाटा भाजी हे मुख्य जिन्नस असतात झाडाखाली तीन-चार जुनी टेबले, त्याजवळ तितकीच जुनी आणि मोडकी तोडकी चार--सहा बाके टाकलेली कधी कधी मोठ्या म्हणजे साधारण पाच फूट लांब, दोन फूट रुंद आणि तीन फूट उंच चुलवणाखाली कोळसे फुलवण्यासाठी विजेचा पंखा लावलेला हा चुला सहापासून रात्रीपर्यंत अखंड पेटलेला असतो गिऱ्हाइकाने ऑर्डर दिल्यावर खाद्यपदार्थ ताजे, गरम करून दिले जातात ते खूप स्वस्तही असतात चाळीस पैसे चहा, ऐंशी पैसे पुरी-भाजी, साठ पैशांना दोन सामोसे असे साधारण दर असतात उत्तरेकडील लोक चांगले उंचेपुरे, त्यांची तब्येत चांगली आणि थंड हवेला भूकही अधिक लागते त्यामुळे केवळ दोन वेळा जेवून त्या लोकांचे भागत नाही अधून मधून दोन-चारदा नास्ता, चहा, आणि मग त्यावर अपरिहार्यपणे पान हे त्यांना अत्यावश्यकच असते या अखंड नास्त्याकडे पाहून मला तर या प्रदेशाला 'उत्तर प्रदेश' ऐवजी 'नास्ता प्रदेश' हेच नाव अधिक समर्पक वाटले !

'अमृत प्रभात'च्या संपादकवर्गाने माझे चांगले स्वागत केले अलाहाबादमध्ये मी कोणत्या लोकांना भेटावे याबद्दलच्या सूचना मुंबईत 'धर्मयुग'चे संपादक श्री धर्मवीर भारती यांनी मला दिल्या होत्या त्या यादीत ज्ञानपीठ पारितोषिक विजेत्या महादेवी वर्मा, 'प्रेमचंद' यांचे चिरंजीव अमृत राय, उपेंद्रनाथ अश्क, डॉ राजकुमार वर्मा अशी काही नावे होती त्यांचे पत्ते मी घेतले आणि त्यांच्याकडे कसे जायचे याची माहितीही घेतली तोपर्यंत साडेबारा वाजून गेले होते कोणा अपरिचिताकडे प्रथमच घरी जाण्याची ही वेळ नव्हती मात्र अलाहाबादच्या पर्यटन अधिकाऱ्यांना कचेरीत भेटण्यास हरकत नव्हती म्हणून मी 'अमृत प्रभात'च्या कचेरीपासून जवळच असलेल्या पर्यटन खात्याच्या कचेरीकडे गेलो तेथील अधिकाऱ्याने मला लखनौ, अलाहाबाद, बनारसविषयीच्या काही सचित्र पुस्तिका दिल्या, इतकेच नव्हे, तर रोज पंचवीस रुपयाला स्वतंत्र खोली असलेले, स्टेशनजवळचे कॉन्टिनेन्टल हे हॉटेलही त्यांनी फोन करून माझ्यासाठी ठरवून

दिले मी लगेच स्टेशनवरच्या रिटायरिंग रूममधील सामान घेऊन स्टेशनसमोर काटजू रस्त्यावरच्या कॉन्टिनेन्टल हॉटेलमध्ये गेलो.

अलाहाबाद स्टेशनच्या पूर्वेकडचा आणि पश्चिमेकडचा भाग यात जमीन-अस्मानाचा फरक आहे जुने अलाहाबाद अरुंद रस्त्याचे, अस्वच्छ, गर्दीचे व मुख्यतः कमी उत्पन्नवाल्यांचे आहे, तर नवे अलाहाबाद हे व्यवस्थित आखलेले, मोठ्या रस्त्याचे, अद्ययावत इमारती, दुकाने इत्यादींचे ऐश्वर्यसपन्न आहे या भागाला , सिव्हिल लाइन्स ' असे म्हणतात त्या तुलनेने जुने गाव म्हणजे ' अन्‌सिव्हिल लाइन्स ' असेच म्हटले पाहिजे ! असे भागातल्या अनेक शहरांचे झाले आहे जुनी दिल्ली आणि नवी दिल्ली, जुने पुणे आणि कॅंप विभाग, मुबईतला लालबाग परळ आणि मलबार हिल हा भाग अशी अनेक उदाहरणे देता येतील

अलाहाबादमध्ये महादेवी वर्मा व अमृतराय याच्यासारखे श्रेष्ठ साहित्यिक होते, तसेच ' माया', ' मनोरमा', ' मनोहर, कहानियां ' आणि ' प्रोब ' ही अत्यत लोकप्रिय नियतकालिके प्रसिद्ध करणारी प्रकाशनसस्थाही होती. व नियतकालिकाच्या कचेरीतही मला जायचे होते त्याशिवाय ' हिंदी साहित्य संमेलन' ही हिंदी साहित्यातील अग्रेसर सस्थाही तेथेच आहे त्या सस्थेचे कामकाजही पहायचे होते गगा-यमुना नद्याचा सगम ऊर्फ प्रयाग, प नेहरूचे ' आनदभवन ' हे घर, अलाहाबाद वस्तुसग्रहालय, आझाद उद्यान इत्यादी महत्त्वाची ठिकाणेही पहायची होती अलाहाबादच्या ' महाराष्ट्र समाज'च्या कार्यकर्त्यांना भेटून तेथील मराठी लोकाच्या कार्याचा मागोवा घ्यायचा होता महत्त्वाची ठिकाणेही पाहायची होती मी अलाहाबादला पोचलो, त्याच दिवशी सध्याकाळी तेथे सतरावी अखिल भारतीय एकाकिका स्पर्धाही सुरू होणार होती मेहता नाट्यगृहातील या स्पर्धेतील जास्तीत जास्त एकांकिका पहायचे मी ठरवले या स्पर्धेत रोज सहा नाटिका होणार होत्या एकदर ऐंशी नाटिका या स्पर्धेत सादर केल्या जाणार होत्या एकदरीत अलाहाबादच्या या पहिल्याच भेटीत माझ्यापुढे भरगच्च कार्यक्रम होता आणि त्यासाठी वेळ कसा काढायचा हाच प्रश्न होता

लेखकांना भेटण्यासाठी सध्याकाळी पाच वाजता बाहेर पडावे असे ठरवले खरे, पण त्याआधी दुपारीच अत्यत अवेळी आणि अनपेक्षित असा पाऊस पडायला सुरुवात झाली होती अशा पावसात सायकलरिक्षा अगदी निरुपयोगी आणि ऑटो मिळणे दुरापास्त. पत्ते नीट माहीत नसताना पावसातून ते शोधण्याचा प्रयत्न करणे सोपे नव्हते प्रयागसारख्या उघड्या जागीही जाणे अशक्य होते म्हणून साहित्यिकाच्या भेटीगाठी घेण्याचा कार्यक्रम दुसऱ्या दिवशी सकाळवर मी ढकलला मोठ्या कष्टाने मिळालेली एक ऑटो पधरा रुपयाच्या बोलीने केली आणि अखिल भारतीय एकाकिका स्पर्धांच्या उद्‌घाटनासाठी सिव्हिल लाइन्स भागात हनुमान मदिरा-

जवळच्या मेहता नाटचगृहात दाखल झालो

मेहता नाटचगृहाच्या आवारात श्री. वीरेन्द्र शर्मा भेटले ज्या संस्थेतर्फे एकांकिकांची स्पर्धा आयोजित केली गेली होती, तिचे ते कार्यवाह होते या योजनेबद्दल ते म्हणाले, " अलाहाबाद नाटचसंघाने १९६८ सालापासून ही स्पर्धा सुरू केली पहिल्या स्पर्धेत चार राज्यातील बीस संघानी भाग घेतला पुढे हा प्रतिसाद वाढतच गेला १९७२ मध्ये १२ राज्यातील १० भाषातील ४५ संघानी भाग घेतला १९७७ मध्ये १५ राज्याच्या ६६ संघानी आपल्या एकांकिका सादर केल्या आता या वर्षी २० राज्यांच्या ८० प्रवेशिका आल्या आहेत या वर्षी हिंदी, बंगाली, मराठी, काश्मिरी, उर्दू, पंजाबी, कानडी, नेपाळी, गुजराती, आसामी, उडिया, भोजपुरी, तेलगू, तमिळ, सिंधी इत्यादी वीस भाषातील नाटिका सादर केल्या जात आहेत इतक्या विस्तृत प्रमाणात स्पर्धा ठेवणारी आमची भारतातील एकमेव संस्था आहे

कोणत्या मराठी एकांकिका सादर केल्या जाणार आहेत, याबद्दल मला उत्सुकता असल्याने त्याविषयी मी विचारणा केली, तेव्हा श्री शर्मा म्हणाले, नांदेडची एक संस्था ' गुण्यागोविंदाने ' नावाची नाटिका करणार आहे मुंबईची रथचक्र ही संस्था ' बोलवाना ' ही नाटिका सादर करणार आहे, तर मुंबईच्या बी पी टी स्पोर्टस् क्लबतर्फे ' पत्रावळी ' ही एकांकिका होणार आहे "

" परीक्षकाना इतक्या सर्व भाषा येतात का ?" असे विचारल्यावर श्री शर्मा यानी सांगितले,

" ते अशक्यच आहे पण त्या त्या एकांकिकेच्या वेळी आम्ही काही परीक्षक कायम ठेवतो व ती भाषा येणारे दोन परीक्षक वाढवितो अभिनय, नेपथ्य, प्रकाशयोजना हे भाग ती भाषा न समजली तरी इतर परीक्षकांना कळतात "

थोडयाच वेळात या स्पर्धेचे उद्घाटक व केंद्रीय माहिती व नभोवाणी खात्याचे राज्यमंत्री श्री एच के एल भगत हे आले प्रास्ताविक भाषण करताना श्री वीरेन्द्र शर्मांनी सांगितले, " या स्पर्धांना जोडूनच आम्ही नाटचविषयक परिसंवाद व शिबिर घेतले आहे स्पर्धेसाठी येणाऱ्या संस्थांचे कलावंत व तज्ञ याना राहण्यासाठी गव्हर्न्मेंट प्रेस ग्राउंडवर शंभर तंबू उभारण्यात आले आहेत त्या मैदानाला ' थिएटर व्हिलेज ' असे नाव देण्यात आले आहे विजेत्या संघांना सोने, चांदी व ब्रांझ याच्या नटराजाच्या मूर्ती आणि एक हजार रुपये, पाचशे रुपये व तीनशे रुपये रोख अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत " श्री भगत यानी स्पर्धेचे उद्घाटन केले

पहिल्या दिवशी हिंदी, बंगाली, मणिपुरी व उडिया या भाषातील नाटिका सादर करण्यात आल्या ' पोपटलाल मंत्री ' नावाची नाटिका अलाहाबाद येथील

'जमुना कला संघ' या संस्थेने सादर केली या नाटिकेत सध्याच्या राजकारणाचे उत्तम विडंबन केले होते असंस्कृत, उपद्व्यापी लोक पैशाच्या व वाममार्गाच्या बळावर उच्चपदी जातात, मंत्रिपद बळकावतात आणि जनतेची सेवा करण्याच्या मिषाने आपलाच स्वार्थ कसा साधतात याचे विनोदी पण भेदक चित्रण या नाटिकेत होते 'वेस्ट इंडिज विरुद्धच्या क्रिकेट सामन्यात भारताचा दारुण पराभव झाला, कारण या पराभवात परकीय शक्तीचा हात होता,' असे पोपटलाल मंत्री जाहीर करतात तेव्हा प्रेक्षकात चांगलाच हशा पिकतो

दुसऱ्या दिवशी मी गव्हर्नमेंट प्रेस ग्राउंडवरील 'थिएटर व्हिलेज' या प्रांगणाला भेट दिली सुमारे तीस-पस्तीस तबूंत विविध नाट्यसंघाचे प्रतिनिधी राहत होते त्यात इम्फाळची थिएटर मिरर ड्रॅमॅटिक सोसायटी, जमशेदपूरची कला केंद्र, राउरकेला येथील दक्षिण भारत समाज (तमिळ), ओरिसामधील कला परिषद अशा अनेक संस्थांचा समावेश होता त्यापैकी काही कार्यकर्त्यांना मी भेटलो व तेथील व्यवस्थेविषयी विचारले, तेव्हा ते म्हणाले,

"येथे राहण्याची व्यवस्था मोफत आहे नास्ता, चहा व जेवण यासाठी दररोज माणशी पंधरा रुपये घेण्यात येतात देशाच्या विविध भागातून आलेल्या नाट्यसंघाशी चर्चा करून त्या त्या भाषेतील नाट्यविषयक प्रगती कळते हा या स्पर्धेचा एक फार मोठा फायदा आहे परिसंवाद, शिबिर आणि कँप फायर यामुळेही विविध भाषिक नाट्यव्यावसायिकात जवळीक निर्माण होते आतापर्यंत झालेल्या अशा १६ स्पर्धांत सहाशे नाटककाराच्या एक हजार नाटिका सादर करण्यात आल्या आणि त्यांत वीस हजार कलावंत व तज्ज्ञ यांनी भाग घेतला."

'इलाहाबाद नाट्य संघाचा' हा उपक्रम मला अतिशय स्वागतार्ह वाटला मी चार दिवसांत सुमारे बारा नाटिका पाहिल्या त्याचा दर्जा चांगला होता पण खटकली एकच गोष्ट एवढी मोठी आंतर भारतीय नाट्य स्पर्धा पण प्रेक्षकांची उपस्थिती मात्र अगदी कमी, म्हणजे पन्नास ते साठ! फक्त रविवारी सायंकाळी शे दीडशे प्रेक्षक होते हिंदी आणि उडिया, बंगालीसारखी जवळच्या प्रांतातली एखादी भाषा वगळता इतर भाषा बहुसंख्य प्रेक्षकांना समजत नसल्याने प्रेक्षकांचा कमी प्रतिसाद मिळाला असावा

# त्रिवेणीसंगम

प्रेक्षणीय स्थळे म्हणून पाहण्यासारखी अलाहाबादला दोन प्रमुख ठिकाणे— एक, गगा व यमुना याचा सगम असलेले तीर्थराज प्रयाग आणि दुसरी म्हणजे प नेहरूंचे निवासस्थान आनदभवन त्यापैकी प्रयाग पाहण्याची उत्तम वेळ म्हणजे पहाटेपासून सूर्योदयापर्यंत कारण याच वेळी शेकडो यात्रेकरू या पवित्र सगमात स्नान करतात कुभमेळ्यासारख्या महायात्रेला ही सख्या लाखांच्या घरात जाते, प्रयागला दरसाल मेळा भरतो आणि बारा वर्षांतून एकदा माघ महिन्यात कुभमेळा भरतो मी त्या ठिकाणी गेलो, तो फेब्रुवारी महिना होता कसलीही यात्रा-महायात्रा नव्हती स्टेशनपासून प्रयाग महा किलोमीटर्स आहे सायकलरिक्षा हेच वाहन असल्याने वेळ लागतो हे खरे असले तरी आजूबाजूचे निसर्गसौंदर्य पाहून सावकाश जाता येते दूरवर पाहिले गगा आणि यमुना या दोन्ही नद्या खूपच रोडावल्या होत्या प्रयागजवळच्या उचवटावर गेलो त्याच्या विस्तीर्ण कोरड्या पात्रात शेकडो तबू आणि राहुट्या होत्या एखाद्या लष्करी छावणीसारखे ते दृश्य दिसत होते मी चौकशी केली तेव्हा कळले की यात्रेकरूना राहण्यासाठी ही व्यवस्था आहे या राहुट्यात व तबूत अगदी स्वस्तात म्हणजे माणशी एका दिवसाला दोन ते तीन रुपयापर्यंत राहता येते मी स्टेशनवर रिक्षा केली, तेव्हापासूनच एक पड्या सायकलवरून माझ्याबरोबर येऊ लागला होता ' क्रियाकर्म करायचे आहे काय ?' 'स्नान करायचे काय ?' 'पूजा-अर्चा करणार का ?' असे प्रश्न तो एकसारखे विचारीत होता मी अनेकदा नकार दिला, तरी तो चिकाटी धरून शेवटपर्यंत आलाच वाटेत झाडाखाली सायकलवर बसून तयार असलेले आणखीही पड्ये दिसले कोणी टांग्यातून, रिक्षातून किंवा चालत प्रयागकडे निघाले की ते पड्ये त्यांच्याबरोबर जात आणि सर्व प्रकारची धार्मिक कार्ये करण्याची तयारी दाख-

बोल

प्रयागच्या सगमाला त्रिवेणी सगमही म्हणतात गगा व यमुना या द्यान प्रत्यक्षात दिसतातच, पण सरस्वती ही गुप्त नदीही तेथे मिळते असे सांगण्यात येते ऋग्वेदातील एका मत्रात (१० ७५ ५) 'गगे, यमुने, सरस्वती' असा उल्लेख आहे, तोच इतर धर्मग्रथांत ग्राह्य मानला असावा मनुस्मृतीत या नद्याना 'देवनद्या' असे सबोधले असून या नद्याच्या खोऱ्याला ब्रह्मावर्त असे नाव दिले आहे इतकेच नव्हे, तर या प्रदेशातील आचारविचार हे आदर्श मानले असून या लोकांची जी वर्तणूक तीच सदाचार असे म्हटले आहे

उथवटयावर काही मदिरे आहेत. ती फारशी भव्य नाहीत मात्र नव्याने बाधले जात असलेले शिवमदिर आणि शिवमडप सुदर, नक्षीदार आणि भव्य आहे मात्र मी गेलो तेव्हा ते पूर्ण झालेले नव्हते तेथून नदीपर्यंत मी चालतच गेलो वाटेत काही चहाचे ठेले, यात्रेकरू आणि भिकारी दिसले. काही यात्रेकरू दक्षिणेतून आले होते त्यांनी मोडक्यातोडक्या हिंदीतून सागितले की, यात्रेच्या काळात गगास्नान चांगले घडत नाही, म्हणून अशा निवात वेळी ते आले होते पुढे चार–पाच गट आढळले त्यांनी आपल्या नातेवाइकांच्या अस्थी विसर्जनासाठी आणल्या होत्या

अकबराने बांधलेला किल्ला किनाऱ्यावरच आहे पण अद्याप तो उघडला नसल्याने यमुनेच्या तीरावरून नावेने प्रयागपर्यंत जाण्याचे मी ठरवले अनेक नावा आणि पडे तयारच होते त्यांपैकी विष्णू भट नावाचा पस्तिशीचा पडया ठरवला आणि दहा रुपयाना नाव ठरवून निघालो हवा प्रसन्न, थड होती आजूबाजूला उत्साह होता दूरवर सगमात स्नान करणाऱ्या भाविकांच्या लहान आकृती दिसत होत्या

पडया सागू लागला, 'पृथ्वीच्या पाठीवरील हे सर्वांत पवित्र तीर्थक्षेत्र आहे महात्मा गाधी, लाल बहादूर शास्त्री, प जवाहरलाल नेहरू अशा अनेक थोर नेत्याच्या अस्थींचे या संगमात विसर्जन झाले आहे देव आणि दैत्य यानी क्षीरसागराचे मथन करून अमृत काढले ते घेण्यासाठी दोन्ही पक्षात हातघाई झाली तेव्हा त्या गडबडीत इद्राच्या पुत्राने प्रचड कावळ्याचे रूप घेतले आणि तो अमृतकुभ घेऊन स्वर्गाकडे निघाला जाताना वाटेत त्याने प्रयाग, हरिद्वार, नाशिक आणि उज्जैन या चार ठिकाणी विश्रांतीसाठी थोडा वेळ मुक्काम केला तेव्हा त्या चार जागी थोडे अमृत साडले इद्रपुत्राला या यात्रेला बारा दिवस लागले देवाचा एक दिवस म्हणजे मानवांचे एक वर्ष म्हणून दर बारा वर्षांनी या ठिकाणी अमृतकुभ मेळा भरतो, दर सहा वर्षांनी अर्धकुभ मेळा आणि दरसाल माघी मेळा भरतो अमृतस्पर्शाने प्रयाग पुनीत झाले आहे म्हणून या सगमाचे माहात्म्य फार मोठे

आहे गगाभेट, प्रायश्चित्त, वेणीदान, तीर्थश्राद्ध यांपैकी आपल्याला कोणताही विधी करायचा असल्यास सागा आपण द्याल त्यात खुषी मानून मी तो करीन इथे धर्मविधीपूर्वक स्नान केल्यास मोक्ष मिळतो कमीत कमी दक्षिणेत मी सर्व धर्म-कार्य करीन " मोक्षावरून तो पड्या अल्पद दक्षिणेवर आला होता

आमची नाव प्रयाग सगमापर्यंत आली या ठिकाणी मोठा घाट नाही कारण पावसाळ्यात गगा आणि यमुना यांना प्रचंड पूर येतात या वेळी पाण्याचा वेग एवढा तुफान असतो की पक्के बांधलेले घाटही मोडतात व वाहून जातात मात्र बनारसला गगा नदीने वळण घेतले असल्याने पावसातही पाण्याचा वेग कमी असतो, म्हणून बनारसला अनेक घाट मजबूत आहेत, असे विष्णू पड्याने सागितले मात्र सगमावर सगम घाट, गगेच्या पश्चिम किनाऱ्यावर राम घाट, किल्ल्याजवळ यमुने-वरचा किल्ला घाट, काशीराम हाऊसजवळ बलुआ घाट असे कच्चे, लहान घाट आहेत पक्का मोठा घाट नसल्याने आणि सध्या सगमाच्या पाण्याला फारशी ओढ नसल्याने अनेक नावा एकमेकाना बाधून तात्पुरता झूला केला होता यात्रेकरू या नावाड्याना पैसे देऊन कपडे बदलून स्नान करतात नदीच्या मध्यभागी स्नान करता यावे म्हणून या नावाना तराफे बाधले होते त्यावर बसून ताब्याने सगमाचे पाणी घेऊन शेकडो स्त्री-पुरुष स्नान करीत होते कोणी पूजा-अर्चा करीत होते तर कोणी उगवत्या सूर्याची प्रार्थना करीत होते अनेक जण लहान होड्यात आपल्या नातेवाइकांच्या अस्थी घालून पुरोहित ब्राह्मणांबरोबर नदीत दूर जाऊन विधिपूर्वक अस्थिविसर्जन करीत होते

गगा आणि यमुना या नद्याचे रग वेगळे आहेत एकीचा निळसर आणि दुसरीचा ताबडसर त्याचा सगम जेथे होतो तेथे या दोन रगांच्या छटा एकमेकात मिसळतात दोन्ही प्रवाह एकमेकावर आपटून लहरी व खवले उत्पन्न होतात त्याची मौज पाहण्यासारखी आहे या शोभेचे वर्णन करताना याच शहराचे नामवत नागरिक प जवाहरलाल नेहरू म्हणतात, " सकाळच्या कोमल किरणाच्या प्रका-शात गगा नदी स्मित हास्य करीत नाचत-बागडत जाते पण सध्या छायेचे आवरण पडले, की तिचा प्रवाह भिन्न आणि गूढ भासू लागतो " गगेच्या समृद्ध खोऱ्याची आठवण येऊन ते म्हणतात, " याच प्रदेशात माझी जीवनगाथा अप्रतिहतपणे चालू आहे "

सगमावर तासभर प्रसन्न, थडगार आणि पवित्र वातावरणात घालवला प्रयाग-स्नान केले आणि नावेतूनच परत यमुनेच्या काठी आलो तोपर्यंत अकबराच्या किल्ल्याची दारे उघडली होती चारशे वर्षांची असूनही या किल्ल्याची तटबदी अजून मजबूत आहे ९८३ बिघ्याचे क्षेत्रफळ त्याने व्यापले आहे या किल्ल्यातील सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे इसवी सनपूर्व २३२ मधील अशोकस्तभ पस्तीस

फूट उचीच्या या स्तंभाचा वरचा भाग घटेच्या आकाराचा आहे अशोक आणि समुद्रगुप्त या सम्राटांच्या आज्ञा या स्तभावर कोरल्या आहेत सम्राट अशोकाने आपल्या अधिकाऱ्याना दिलेला आदेश आजच्या काळीही अत्यत उपयुक्त असा आहे या आदेशात म्हटले आहे, " मी प्रजेच्या पालनाकरिता अधिकाऱ्यांची नेमणूक केली आहे त्यानी लोभ आणि भय यांचा त्याग करून प्रजेचे हित आणि सुख साधण्यासाठी तत्पर असावे अपत्याना मायेने वागवावे हे दाईचे कर्तव्य असते मी नेमलेल्या अधिकाऱ्यानी अशा दाईप्रमाणेच प्रजेशी वागावे "

# उपेंद्रनाथ अश्क

अलाहाबादच्या मुक्कामात मला श्री उपेंद्रनाथ अश्क याना भेटायचे होते कादबरी, नाटक, कविता, समीक्षण, कथा आणि ललितगद्य अशा अनेक क्षेत्रात त्याचे नाव हिंदी साहित्यात मशहूर होते मी ज्या काटजू रस्त्यावर राहत होतो, तिथून खुसरोबाग अगदी जवळ, चालत जाण्याच्या अतरावर होती आणि अश्क याचा पत्ता ५, खुसरोबाग रस्ता असा होता म्हणून एका सायकाळी मी त्याच्याकडे जायला निघालो पण पाच-सहा मिनिटे चालतो न चालतो तोच अगदी अचानक गाराचा पाऊस सुरू झाला तो फेब्रुवारी महिना होता. आणि पावसाळा केव्हाच सपून गेला होता व नवा सुरू व्हायला बराच अवकाश होता अशा वेळी हा जोरदार वर्षाव झालेला पाहून मला आश्चर्य वाटले पण रस्ता ओलाडणेही शक्य नव्हते चागला अर्धा-पाऊण तास जोराची गाराची आणि पावसाची वृष्टी झाली अर्थातच अश्क याच्याकडे जाण्याचा बेत मला तात्पुरता रद्द करावा लागला

दुसऱ्या दिवशी आधी त्याना फोन केला आणि त्यांच्या घरी कसे यायचे त्याची चौकशी करून गेलो एका जुन्या पण मोठ्या बगल्यात ते राहतात त्याच्या मुलाने माझे स्वागत केले आणि उपेंद्रनाथ अश्क याच्या लिहिण्याच्या खोलीकडे नेले त्यावेळी कडाक्याची थडी होती आणि हवेत ओलावा होता म्हणून अश्क हे सूट, बूट, मफलर, डोकीवर गरम टोपी असा जामानिमा करून बसले होते मी गेल्याबरोबर त्यांनी चहा मागवला मी माझे त्रोटक चरित्र त्यांच्या हाती दिले ते वाचून ते म्हणाले, "तुमची ही योजना फार चागली आहे आम्हालाही मराठी साहित्य व साहित्यिक याच्याविषयी कुतुहल असते तेव्हा मी स्वत बद्दल व इतर हिंदी साहित्यिकाबद्दल निर्भीडपणे बोलेन, मला गुळमुळीत आणि वरवरचे बोलणे आवडत नाही माझ्या या गुणामुळे म्हणा किंवा दुर्गुणामुळे म्हणा, पण माझ्या-

विषयीची अनेक परस्परविरोधी मते तुम्हाला ऐकू येतील. इलस्ट्रेटेड वीकलीने माझ्याविषयी लिहिताना ‘चॅलेंजिंग अँड कॉन्ट्रोव्हर्शियल’ (आव्हान देणारे व वादग्रस्त) व्यक्तिमत्त्व असा उल्लेख केला आहे’

‘माझ्या या काहीशा तुसडया स्वभावाला माझे पूर्वजीवन कारणीभूत असेल’ असे सांगून उपेंद्रनाथ अश्क म्हणाले, “माझा जन्म १९१० मध्ये जालंदर येथे झाला आमच्या घरची परिस्थिती अतिशय गरिबीची होती तशात घरात आम्ही सहा भाऊ वडील स्टेशनमास्तर होते ते व्यसनी होते ते खूप दारू प्यायचे, जुगार खेळायचे आणि संतापून आम्हा मुलांना बदडून काढायचे माझी आई जुन्या वळणाची, भोळी होती व्यसनी असले तरी माझे वडील उदार आणि लोकसंग्रह करण्याच्या वृत्तीचे होते आईने मला चांगले वळण लावून शिक्षण दिले सहा भावांपैकी मी दुसरा १९३१ मध्ये मी पदवी घेतली आणि शीलादेवी या मुलीशी विवाह करून शिक्षकाची नोकरी पत्करली सहा महिन्यानंतर मी कायद्याच्या शिक्षणासाठी जालंदरहून लाहोरला गेलो तिथे मी शाळेत शिक्षक म्हणून नोकरी धरली एल एल बी ला नाव घातले त्याच वेळी मी निरनिराळ्या स्थानिक वृत्तपत्रांत लेखन करू लागलो लाला लजपतराय यांच्या ‘वंदे मातरम्’ या उर्दू साप्ताहिकात मी लेखन करीत असे

‘१९३६ मध्ये मी एल एल बी ची परीक्षा विशेष प्रावीण्यासह उत्तीर्ण झालो सातशे विद्यार्थ्यांत माझा सहावा क्रमांक आला न्यायाधीश व्हावे असे मला वाटू लागले पण त्याच सुमाराला माझी पत्नी दीर्घ आजारानंतर निधन पावली मला भयंकर मानसिक धक्का बसला वकील किंवा न्यायाधीश होण्याचा विचार मी सोडून दिला आणि पूर्णवेळ लेखक होण्याचा निश्चय केला त्या वेळी मला एक मुलगाही होता मी फार लहानपणापासून लेखन करीत असे. माझी पहिली कविता १९२८ मध्येच प्रसिद्ध झाली होती सुरुवातीचे माझे लेखन पंजाबी या माझ्या मातृभाषेत मी करीत असे पण लाहोरला उर्दू भाषा असल्याने मी उर्दूत लेखन केले १९३९ पर्यंत माझे त्या भाषेतील साहित्यिक म्हणून चांगले नाव झाले”

श्री अश्क हे विद्यार्थी असतानाच त्यांचा पहिला कथासंग्रह प्रसिद्ध झाला १९३३ मध्ये त्यांचा दुसरा कथासंग्रह प्रसिद्ध झाला सुप्रसिद्ध हिंदी कादंबरीकार प्रेमचंद यांनी या संग्रहाला प्रस्तावना लिहिली होती कृष्णचंद्र, राजेंद्रसिंग बेदी, उदय शंकर भट्ट, हरीकृष्ण प्रेमी, चंद्रगुप्त विद्यालंकार आणि माखनलाल चतुर्वेदी अशा श्रेष्ठ लेखकांचा सहवास अश्क यांना मिळाला पत्नीच्या निधनानंतर अश्क यांनी कल्पनारम्य, भावुक लेखन सोडून दिले आणि वास्तव जीवनातील संघर्ष, दुःखे यांचे प्रभावी चित्रण करण्यास सुरवात केली १९३९ मध्ये ते अमृतसरला गेले आणि सरदार गुरुबक्षसिंग यांच्या ‘प्रीतलहरी’ साप्ताहिकात सहसंपादक

म्हणून काम करू लागले पण १९४१ मध्ये कृष्णचद्र यानी अश्क याना नवी दिल्ली येथे नभोवाणीवर नाटककार म्हणून बोलावले तेव्हा ते दिल्लीला गेले नभोवाणीच्या नाटच विभागाचे निर्माते म्हणून काम करीत असताना अश्क याचा अनेक नामवत लेखकांशी स्नेह जमला त्यात मटो, के अहमद अब्बास, फैज्ञ मिराझी, रशीद वगैरेचा समावेश होता या साहित्यिक वातावरणाच्या प्रभावामुळे अश्क यानी विविध क्षेत्रात चौफेर लेखन केले नाटक, एकाकिका, कथा, कादबरी इत्यादी अनेक प्रकार हाताळीत असतानाच त्यानी ' गिरती दीवारें ' हे त्याचे सुप्रसिद्ध पुस्तक लिहिले

मुबईची फिल्मिस्तान ही त्या वेळी भारतातील एक अग्रेसर चित्रपट कपनी होती या सस्थेने श्री उपेंद्रनाथ अश्क यांना कथा व सवाद लेखक म्हणून बोलावले आणि १९४५ मध्ये अश्क मुबईला आले तेथे श्री नितीन बोस आणि शशधर मुखर्जी याच्याबरोबर त्यानी दोन वर्षे काम केले याच काळात बलराज साहनी यांनी 'तुफान से पहिले ' हे श्री अश्क याचे नाटक रगमचावर आणले पण हिंदु-मुस्लिमांच्या एकतेवरील या नाटकावर ब्रिटिश सरकारने बदी आणली, कारण ही एकता ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध आहे असे सरकारला वाटले याच वेळी उपेंद्रनाथ अश्क याच्यावर आणखी एक आपत्ती आली ती म्हणजे त्याना क्षयरोगाने घेरले १९४७ च्या सुरुवातीला त्याना पाचगणी येथे बेल एअर सॅनिटोरियममध्ये नेण्यात आले या दुर्धर रोगाशी झगडा देत अश्क हे पाचगणीला दोन वर्षे राहिले १९४८ मध्ये कवी निराला आणि श्री अश्क याना उत्तर प्रदेश सरकारने प्रत्येकी पाच हजार रुपयांचे अनुदान दिले श्री अश्क हे क्षयरोगातून मुक्त झाले आणि त्यांनी पुढील वास्तव्यासाठी उत्तर प्रदेशातील अलाहाबाद हे शहर निवडले गेली ३६ वर्षे ते तेथेच राहून पूर्णवेळ लेखन करीत आहेत

१९३६ ते १९४८ या एका तपात श्री अश्क याच्या वैयक्तिक जीवनात अनेक घडामोडी झाल्या पहिली पत्नी निवर्तल्यावर त्यानी दुसरा विवाह केला पण तो यशस्वी झाला नाही त्यानी घटस्फोट घेतला आणि १९५१ मध्ये तिसरा विवाह केला पाचगणी येथील रुग्णालयात असताना ते आपल्या तिसऱ्या पत्नीला लेखन सागत आणि ती ते उतरून घेत असे श्री अश्क हे गेली पन्नासहून अधिक वर्षे लेखन करीत आहेत आतापर्यंत त्याची ६५ हिंदी, १२ उर्दू आणि एक पजाबी अशी ७८ पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत त्यात १० कादबऱ्या, १२ कथासग्रह, १३ नाटके, ८ काव्यसंग्रह, ४ टीकाग्रथ, ७ एकांकिका सग्रह, ३ मुलाखतीचे सग्रह व २ निबध सग्रह आहेत

मात्र केवळ आकडेवारीवरून अश्क याच्या प्रभावी साहित्याचे मूल्यमापन होणार नाही प्रभावी भाषा, जनसामान्याच्या घरात जाऊन त्याच्या सुख-दु:खाचे केलेले परिणामकारक चित्रण आणि जीवनविषयक मूलगामी दृष्टिकोन हे त्यांच्या

साहित्याचे विशेष आहेत 'चेहरे अनेक' या त्याच्या आत्मचरित्राचे तीन खंड आतापर्यंत प्रसिद्ध झाले असून त्यांनी हिंदी साहित्यात प्रचंड खळबळ उडविली आहे आपल्या नेहमीच्या निर्भीड पद्धतीने या आत्मचरित्रात त्यांनी अनेक लब्धप्रतिष्ठितांचे बुरखे फाडले आहेत आणि बड्या बड्यांची ढोंगे उघडकीस आणली आहेत त्यामुळे आपल्याला अनेकांचा रोष ओढवून घ्यावा लागला, असे श्री अश्क म्हणाले त्यांनी पुढे सांगितले, "एकंदर दहा खंडात हे आत्मचरित्र पूर्ण करण्याची माझी योजना आहे माझे स्वतःचे दोष व चुकाही मी त्या आत्मचरित्रात मोकळेपणाने सांगितल्या आहेत गेल्या पन्नास वर्षांतील हिंदी साहित्य-जगताचा हा आरसाच ठरेल"

गिरती दीवारे' या त्यांच्या कादंबरीने सर्वसामान्य वाचक आणि तज्ज्ञ समीक्षक अशा सर्वांचीच प्रशंसा मिळविली आहे रंगमंचावरील नाटके, नभोनाट्य आणि अलीकडील दूरदर्शनवरील नाटके या क्षेत्रात अश्क यांनी भरीव कार्य केले आहे अंजो दिदी, चिलमन, चारवाही ही दूरदर्शनवरील नाटके अत्यंत यशस्वी ठरली 'चिलमन' या नाटकाची निर्मिती श्री पु ल देशपांडे यांनी केली होती अश्क यांची अनेक नाटके भारतातील विविध दूरदर्शन केंद्रांवरून दाखविण्यात येत आहेत भारतातील बहुतेक सर्व प्रमुख भाषात श्री अश्क यांच्या अनेक साहित्यकृतींची भाषांतरे झाली आहेत जालंदरच्या दूरदर्शन केंद्राने त्यांच्यावर एक माहितीपटही काढला आहे 'गिरती दीवारे' ही त्यांची कादंबरी मालिका असून या मालेतील चार खंड आतापर्यंत प्रसिद्ध झाले आहेत या चार खंडांची पृष्ठसंख्या तीन हजार आहे या मालेतील पुढील दोन खंडांचे लेखन श्री अश्क सध्या करीत आहेत फ्रेंच, रशियन, इंग्रजी, जर्मन, झेक, लॅटीव्हन, जॉर्जियन अशा अनेक परदेशांच्या भाषांतही अश्क यांच्या काही पुस्तकांची भाषांतरे झाली आहेत 'गिरती दीवारे'चे भाषांतर उझ्बेकन भाषेतही झाले आहे १९७३ मध्ये त्यांच्या तीस कथांचा संग्रह रशियनमध्ये प्रसिद्ध झाला 'चेतन' ही त्यांची कादंबरी लिथुविनियन भाषेत प्रसिद्ध झाली आहे १९५६ मध्ये मॉस्को येथे कालिदास जयंती साजरी झाली तेव्हा अश्क हे खास निमंत्रणावरून तेथे गेले होते १९७४ मध्ये त्यांना सोव्हिएट लँड नेहरू पारितोषिक मिळाले आणि त्यांनी तेव्हाही रशियाचा दौरा केला केंब्रिज विद्यापीठाच्या निमंत्रणावरून त्यांनी इंग्लंडला भेट दिली आणि हॉलंड व प जर्मनीचा दौरा केला उत्रेक्त (हॉलंड) व बॉन (प जर्मन) विद्यापीठांच्या हिंदी भाषेच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांनी या दौऱ्यात भाषणेही केली १९७६ मध्ये मॉरिशसमध्ये झालेल्या विश्व हिंदी संमेलनासाठी भारत सरकारने त्यांची निवड केल्याने ते मॉरिशसलाही गेले होते १९८० मध्ये आपल्या लेखनाच्या संदर्भ संशोधनासाठी श्री अश्क हे पाकिस्तानला गेले होते तेथे त्यांनी राष्ट्राध्यक्ष झिया

याची भेट घेतली व लाहोर इस्लामाबाद, कराची वगैरे ठिकाणी व्याख्याने दिली.

अनेक पारितोषिके आणि इतर सन्मान श्री उपेंद्रनाथ अश्क याना मिळाले आहेत त्याच्या दहा ग्रथाना भारतसरकार, उत्तर प्रदेश सरकार, हरियाना सरकार किंवा पजाब सरकार यांची पारितोषिके मिळाली आहेत उत्तर प्रदेश सगीत नाटक अॅकॅडमीने १९६५ मध्ये सन्मान केला उत्तर प्रदेश साहित्य समेलनाने त्याना १९७४ मध्ये 'साहित्य विरीधी' हा सन्मान दिला १९७९ मध्ये भारत सरकारने त्यांना नभोवाणी व दूरदर्शनचे नाटकांचे 'प्रोड्यूसर इमिरिटस' केले लखनौ, बिहार आणि बागला देशच्या उर्दू अॅकॅडमींनी त्याच्या चार पुस्तकांना पारितोषिके दिली आहेत

"प्रकाशकाचा तुम्हाला कसा अनुभव आहे?" असे विचारता श्री उपेंद्रनाथ अश्क म्हणाले, "बरेच हिंदी प्रकाशक लेखकांना फसवतात, आमचे पैसे बुडवतात, खोटे हिशोब लेखकांना दाखवायचे अशी लबाडी प्रकाशक करतात म्हणून माझी पुस्तके मी स्वत च प्रकाशित करतो मला माझ्या स्नेह्याना व व्यावसायिकाना भेट म्हणून देण्यासाठी निदान शभर प्रती लागतात प्रकाशक त्यासाठी फारच थोड्या प्रती देतात, पण आता मीच माझी पुस्तके काढीत असल्याने प्रतींची अडचण येत नाही"

अनेक कटू अनुभवांमुळे श्री अश्क हे याबाबतीत काहीसे त्रस्त झालेले दिसले त्याचा मुलगा पाकिस्तानात बी बी सी वर अधिकारी होता त्याला अश्क यानी आपल्याकडेच बोलावून घेतले आहे मी अश्क यांचा निरोप घेतला, तेव्हा ते बग-ल्याच्या बागेत माझ्याबरोबर आले मग बागेच्या फाटकापर्यंत येऊन अगत्याने निरोप देताना ते म्हणाले, "मला अनेक लेखकाचा आणि सबधिताचा वाईट अनुभव आला आहे मी कोणाकडे जात नाही आणि येत नाही आपले काम भले की आपण भले अशी माझी धारणा झाली आहे मात्र माझ्याकडे कोणी आले तर मी आस्थेने स्वागत करतो त्याचा मला मनापासून आनद वाटतो पण कित्येक दिवस मी या कंपाउडचा दरवाजाही ओलांडत नाही"


त्यांचा हा काहीसा एकलकोंडा स्वभाव बनण्यासाठी तशीच कारणे घडली असतील, अशा विचाराने मी कृतज्ञतापूर्वक हस्तांदोलन करून अश्क याचा निरोप घेतला त्यांच्याकडून परत येताना जवळच्याच खुस्रो बागेत गेलो बाग पूर्वी चागली असावी, पण आता बरीच दुर्लक्षित आहे बागेतील झोपडपट्टीत काही भटके लोक राहात होते सौंदर्याच्या दृष्टीने नसले तरी इतिहासाच्या दृष्टीने या खुस्रो बागेला महत्त्व आहे बादशहा जहांगीर यांची राणी मानबाई ही रजपूत बेगम तिच्यापासून जहांगीरला खुस्रो हा मुलगा झाला तो अतिशय हुशार होता. आणि लोकांचा आवडता होता. बापास मारून मुलाने राज्य बळकावावे ही घटना मोगल सम्राटाच्या इतिहासात नवीन नव्हती खुस्रोने बादशहा होण्याचे स्वप्न पाहत



कनक भवन- अयोध्या

आनंद भवन— अलाहाबाद





बड़ाइमामबाड़ा लखनौ



बुद्धमूर्ति-सारनाथ

काशीचे घाट



संग्रहालय ठाणे
शाखा (स्थळ प्रत)




मूलगंध कुटीविहार - सारनाथ

काशी-विश्वेश्वर मंदिर - बनारस






लामिथुर शाला
लखनौ





त्रिवेणी संगम
अलाहाबाद



आलमगीर मशीद
बनारस

जहांगीरविरुद्ध बंड केले तेव्हा त्याला पकडून त्याचा वध केला. या खुसरो बागेत राजपुत्र खुसरो, त्याची आई मानबाई ऊर्फ शाहबेगम आणि खुसरोची बहीण निसार बेगम यांच्या कबरी आहेत. ऐतिहासिक महत्त्वाच्या या इमारतींची नीट देखरेख ठेवलेली दिसली नाही. त्यामुळे ऐतिहासिक घटनांनी आधीच उदासपणाची छटा ज्या खुसरो बागेवर पडली आहे, ती अधिकच उदास वाटते.

(स्थळ प्रत)

# हिंडता-फिरता गेलो आनंदभवनी

अलाहाबादचे वैशिष्टच असे, की प नेहरू, लालबहादूर शास्त्री आणि इदिरा गाधी असे देशाचे तील पतप्रधान या एकाच शहराने दिले आहेत. अलाहाबादचा उच्चार तेथील लोक इलाहाबाद असा करतात इग्रजीत मात्र Allahabad असे लिहीत असतात. या शहराचे प्रयाग हे नाव फार प्राचीन काळापासून प्रचलित होते पण अकबराने याचे नाव बदलून इलाहाबाद असे ठेवले कालिदासाच्या नाटकात गगा-यमुनेच्या सगमावर ‘ प्रतिष्ठान ’ नावाचे नगर असल्याचा उल्लेख आहे, तेच प्रयाग (विक्रमोर्वशीय) किंवा जवळचे झूसी हे आजचे आनदभवन असावे पद्मपुराणातही प्रयागचा उल्लेख आहे या अलाहाबादमध्ये धार्मिकदृष्टया सर्वांत पवित्र स्थळ म्हणजे प्रयागचा त्रिवेणी सगम, तसेच राजकीयदृष्टया सर्वांत पवित्र ठिकाण म्हणजे नेहरू घराण्याचे घर-आनदभवन भारताच्या स्वातत्र्यलढयाच्या इतिहासात या वास्तूचे महत्त्व अनन्यसाधारण आहे पडित जवाहरलाल नेहरूनी या घराबद्दल आत्मवृत्तात लिहिले आहे,

‘ मी दहा वर्षांचा होतो, तेव्हा आम्ही एका नव्या आणि खूप प्रशस्त घरात राहावयास गेलो वडिलांनी या घराचे नाव ‘ आनदभवन ’ असे ठेवले होते घराभोवती खूप विस्तीर्ण उद्यान होते आणि पोहण्याचा तलावही होता तेथे मला एकसारखे नवेनवे शोध लागत असल्यामुळे माझ्या उत्साहाला अगदी भरती आली होती आणखी काही इमारती जोडण्यात येत होत्या त्यामुळे खूप खणण्या-बांधण्याचे काम चालले होते काम करणाऱ्या मजुराकडे लक्ष लावून पाहत बसण्यात मला मौज वाटत असे

‘ घरात प्रशस्त असा पोहण्याचा तलाव होता मी लवकरच पोहण्यास

शिकलो पाण्यात वरवर हात मारणे अगर पाण्याखाली बुडून पोहणे माझ्या अंगवळणी पडले होते तलाव म्हणजे त्या काळी नवलपरीची गोष्ट होती तलावा-वर व घरात विजेचे दिवे घेतले होते तेही अलाहाबादेत तेव्हा अपूर्वाईचेच समजले जात "

जवाहरलालजींचा जन्म अलाहाबादमध्ये १४ नोव्हेंबर १८८९ मध्ये झाला म्हणजे १८९९ मध्ये त्यांच्या वडिलांनी आनंदभवन या नव्या घरात आपले कुटुंब नेले रामायणाचा, जागेशी संबंध आहे, असे अलाहाबादचे लोक मानतात जेथे आता आनंदभवन आहे, त्याच ठिकाणी राम वनवासातून आल्यावर प्रथम भर-ताला भेटले असे मानण्यात येते आनंदभवन हे हिरव्यागार झाडीत, फुलझाडांच्या प्रसन्न ताटव्यांत दिमाखाने उभे असलेले दिसते त्याचा पांढराशुभ्र रंग हिरव्या पार्श्वभूमीवर अधिकच उठून दिसतो पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी हे आपले वडिलार्जित घर राष्ट्रीय स्मारक म्हणून राष्ट्राला अर्पण केले आहे त्याचे कागद-पत्र काचेच्या फ्रेममध्ये लावून ठेवलेले इमारतीच्या जिन्याजवळच्या भिंतीवर दिसतात या कागदपत्रावर इंदिरा गांधी, संजय गांधी, आणि राजीव गांधी यांच्या सह्या आहेत

प्रथमदर्शनी सुंदर पोर्च दिसते या दुमजली इमारतीच्या गच्चीवर लखनौच्या पद्धतीचा नक्षीदार घुमट आहे तळमजल्यावरचा दिवाणखाना बंद काचेच्या दर-वाजातून पाहता येतो वरच्या मजल्यावर जाण्यासाठी नाममात्र प्रवेश फी आहे पहिल्या मजल्यावरची सर्वांत महत्त्वाची खोली म्हणजे जेथे अ भा काँग्रेसच्या वर्किंग कमिटीच्या बैठका भरत असत ती या ठिकाणी म गांधी, सरदार वल्लभ-भाई पटेल, पंडित नेहरू, मौलाना आझाद, श्री राजगोपालचारी असे भारताचे ज्येष्ठ नेते राजकीय चळवळींची धोरणे ठरवीत असत वरच्या मजल्यावर पंडित नेहरूंचे शयनगृह, त्यांची अभ्यासिका, त्यांचे कपडे, पुस्तके, लेखनसाहित्य व काही छायाचित्रे आहेत, याच वास्तूत महात्मा गांधींनी उपवास केला होता त्या वेळची त्यांची खाट, पाण्याचे भांडे वगैरे वस्तू या खोलीत आहेत या उपवासाच्या वेळी छोटी प्रियदर्शनी (पंतप्रधान इंदिराजी) गांधीजींच्या जवळ बसलेली आहे, ते छायाचित्र मनोरम आहे नेहरू कुटुंबियांच्या अनेक छायाचित्रांचे तळमजल्याजवळच्या हॉल-मध्ये प्रदर्शन आहे त्यात, आपल्या मातोश्रींची रक्षा विसर्जन करीत असतानाचे पंडित नेहरूंचे मोठे छायाचित्र हृदयद्रावक आहे पंडित नेहरूंच्यापूर्वी २८ वर्षे त्यांच्या पत्नी सौ कमला नेहरू यांचे निधन झाले पण पंडितजींच्या इच्छेनुसार कमलाबाईंच्या रक्षेचा काही भाग तोपर्यंत ठेवण्यात आला होता आपल्या रक्षेबरो-बरच या रक्षेचेही विसर्जन करावे अशी पं नेहरूंनी इच्छा व्यक्त केली होती पं.

नेहरूंचा मृत्यू २७ मे १९६४ रोजी झाला त्यानंतर त्यांची व सौ कमला नेहरू यांची रक्षा प्रयाग येथे विधिपूर्वक विसर्जित करण्यात आली

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील अनेक स्मृती आनंदभवनात आहेत प नेहरू तुरुंगात होते त्या वेळचा त्यांची माहिती असलेला बिल्ला येथे आहे चळवळीतील अनेक महत्त्वाच्या प्रसंगाची मोठी छायाचित्रे आहेत १९३० पासून सोळा वर्षे कॉंग्रेस कार्यकारिणीचे केंद्र म्हणजे आनंदभवन हेच होते इंदिरा गांधींच्या जीवनाची घडण याच वास्तूत झाली आनंदभवनाच्या उजव्या बाजूला तळमजल्यावर एक चबुतरा आहे याच ठिकाणी प्रियदर्शिनी नेहरू आणि फिरोझ गांधी यांचा विवाह १९४२ साली झाला त्यानंतर श्री फिरोझ गांधी हे लखनौ येथे प नेहरूंच्या 'नॅशनल हेरल्ड'चे संपादक म्हणून गेले

प नेहरूंना आकाशनिरीक्षणाचा खूप छंद होता म्हणून आनंदभवनच्या आवारात अद्ययावत प्लॅनिटोरियम उभारण्यात आला आहे आनंदभवनची व्यवस्था उत्तम ठेवली आहे एक गोष्ट मात्र खटकली ती अशी की अशा महत्त्वाच्या वास्तूची छायाचित्रे आणि माहितीची पुस्तिका तेथे विक्रीसाठी ठेवण्यात आली पाहिजे तेथे जो विक्रीविभाग आहे त्यात 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' 'ग्लिम्प्लेस ऑफ वर्ल्ड हिस्टरी' अशी प नेहरूंची पुस्तके विक्रीसाठी ठेवण्यात आली आहेत ही पुस्तके इतरत्र कोठेही मिळतात पण त्या वास्तूची पुस्तिका व चित्रे तेथे घेऊन आठवण म्हणून जतन करणे अधिक महत्त्वाचे आहे पाश्चात्य देशात सर्व महत्त्वाच्या राष्ट्रीय स्मारकाच्या ठिकाणी अशी व्यवस्था असते

'स्वराज्यभवन'ची इमारत आनंदभवनाला लागूनच आहे प मोतीलाल नेहरू यांनी ही इमारत निवासासाठी बांधली असली तरी पुढे स्वातंत्र्याच्या लढ्यात ही इमारत म्हणजे ज्येष्ठ राजकीय नेत्यांचे मुख्य केंद्र झाले अ भा कॉंग्रेसच्या कार्यकारिणीची कचेरी म्हणून अनेक वर्षे स्वराज्यभवनचा उपयोग करण्यात आला होता आता या इमारतीत समाजोपयोगी कार्यांचे केंद्र आहे बालविकास, शिक्षण, रुग्णालये यांच्यासाठी या इमारतीचा आता उपयोग होतो.

आनंदभवनजवळ भारद्वाज मंदिर आहे प्राचीन काळी या ठिकाणी भारद्वाज ऋषींचा आश्रम होता आणि त्या आश्रमात दहा हजार शिष्य होते, अशी माहिती सरकारी माहितीपुस्तिकेत देण्यात आली आहे प्रभू रामचंद्र भारद्वाज ऋषींचा आशीर्वाद घेण्यासाठी या ठिकाणी आले होते असेही ही पुस्तिका सांगते आज मात्र हे एकमजली बैठे मंदिर दुर्लक्षितच आहे या आवारातील दोन मंदिरांची देखभालही नीट होत नाही मात्र जवळच असलेला अलहाबाद विद्यापीठाच्या भव्य व सुंदर इमारती ही त्रुटी भरून काढतात या ठिकाणी १८७० मध्ये म्यूर सेंट्रल कॉलेज स्थापन झाले नंतर १७ वर्षांनी त्याच जागेवर अलाहाबाद विद्यापीठ सुरू

झाले विविध शाखांच्या नव्या इमारतींची व उद्यानाची भर पडली आज हा परिसर समृद्ध आणि सुंदर दिसतो

'हिंदी साहित्य संमेलन' ही प्रयागची संस्था, हिंदी भाषा आणि साहित्य या क्षेत्रातील एक अत्यंत महत्त्वाची संस्था आहे प्रयागच्या रस्त्यावर या संस्थेच्या दोन इमारती आहेत त्यापैकी नव्या इमारतीत आता संस्थेची मुख्य कचेरी आहे. या प्रशस्त नव्या इमारतीत संस्थेचे एक कार्यवाह श्री शिवशंकर मिश्र यांना मी भेटलो ते म्हणाले, "संस्थेचा जन्म १९१० मध्ये झाला त्या वर्षी काशीचे हिंदी-प्रेमी विद्वान एकत्र आले भारतात विविध ठिकाणी हिंदी भाषा व साहित्य यांच्या-विषयी जे कार्य चालते, त्यात एकसूत्रता असावी म्हणून एक मध्यवर्ती संस्था स्थापन करण्याचे या सभेत ठरले त्याप्रमाणे काशी येथे १० ऑक्टोबर १९१० रोजी संस्थेचे पहिले अधिवेशन झाले प्रसिद्ध हिंदी भाषाप्रेमी पं मदनमोहन मालवीय हे त्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते या अधिवेशनाला देशाच्या विविध भागांतून पाचशे प्रतिनिधी आले होते या अधिवेशनात संस्थेची सूत्रे महर्षी पुरुषो-त्तमदास टंडन यांच्याकडे सोपविण्यात आली ते अलाहाबादचे असल्याने संस्थेची कचेरी येथे आली

पुरुषोत्तमदास टंडन यांनी या हिंदी संस्थानची वाढ अत्यंत परिश्रमपूर्वक केली हिंदी भाषेवरील त्यांची निष्ठा अनन्यसाधारण होती देवनागरी लिपी आणि हिंदी भाषा व साहित्य यांचा प्रसार भारतभर करण्यासाठी त्यांनी देशातील सर्व श्रेष्ठ नेते आणि साहित्यिक यांचे सहकार्य मिळविले पं गोविंद नारायण मिश्र, पं. बदरीनारायण चौधरी 'प्रेमघन', डॉ राजेंद्र प्रसाद, महात्मा गांधी, पं राहुल सांस्कृत्यायन, संपूर्णानंद, के एम मुन्शी, स्वामी श्रद्धानंद गणेशशंकर विद्यार्थी, जमनालाल बजाज अशा ज्येष्ठ व्यक्तींच्या अध्यक्षतेखाली पुढील संमेलने कलकत्ता, कोटा, भागलपूर अशा विविध ठिकाणी भरली आणि जनतेत अपूर्व जागृती झाली

श्री शिवशंकर मिश्र म्हणाले, "आम्ही संस्थेतर्फे पुस्तके प्रकाशित करतो त्यात प्राचीन काव्य, आधुनिक काव्य, संदर्भग्रंथ, लोकसाहित्य, वैचारिक ग्रंथ, व्याकरण व भाषाशास्त्र, साहित्य-इतिहास, अनुवाद कला व संस्कृती, धर्म व इति-हास, आयुर्वेद इत्यादी अनेक विषय आहेत ज्या श्रेष्ठ लेखकांचीही पुस्तके आम्ही प्रकाशित केली आहेत, त्यांत ज्ञानपीठ पारितोषिक विजेत्या महादेवी वर्मा, सुमित्रा-नंदन पंत, डॉ रामकुमार वर्मा, उपेंद्रनाथ अश्क, रामेश्वर शुक्ल, राममूर्ती त्रिपाठी, बनारसीदास चतुर्वेदी, लक्ष्मीनारायण सिंह, ज्योतिप्रसाद मिश्र, डॉ शिवानंद नौटलिया अशा अनेक मान्यवरांचा समावेश आहे विश्वकोश, शब्दकोश, पर्यायकोश असे कोशवाङ्मयही संस्थेने प्रसिद्ध केले आहे 'संमेलन पत्रिका' नावाचे त्रैमासिक आम्ही चालवितो त्यात भारतात व भारताबाहेर हिंदी भाषेच्या व साहित्याच्या

प्रगतीची माहिती आम्ही देतो त्यातील काही भाग संशोधनाला वाहिलेला असतो आमच्या प्रचार विभागातर्फे 'राष्ट्रभाषेचा संदेश' हे पाक्षिक चालविण्यात येते संमेलन पत्रिकेचे ९ विशेषांक आम्ही प्रसिद्ध केले आहेत त्यात कलाविशेषांक, गांधी-टंडन स्मृती अंक, श्यामसुंदरदास जन्मशती विशेषांक वगैरे आहेत

श्री शिवशंकर मिश्र यांनी मला अलीकडचे दोन विशेषांक दिले महर्षी टंडन यांच्या जन्मशताब्दीनिमित्त काढलेल्या या दोन अंकांची रॉयल आकाराची पाचशे पन्नास आणि सहाशे अशी प्रचंड पृष्ठसंख्या होती आणि मूल्य फक्त तीस रुपये होते संस्थेने आतापर्यंत आठशेहून अधिक ग्रंथ प्रकाशित केले आहेत हिंदीचा इतर भारतीय भाषेशी संपर्क वाढावा म्हणून कन्नड-हिंदी शब्दकोश आणि तेलगू-हिंदी शब्दकोश असे ग्रंथही या 'हिंदी साहित्य संमेलन'ने प्रसिद्ध केले आहेत

संस्थेचे भव्य ग्रंथालय आणि अभ्यासिका आहे तीत महान् हिंदी साहित्यिकांची मोठी तैलचित्रे, दुर्मीळ ग्रंथ व अनेक ग्रंथांची मूळ हस्तलिखिते जपून ठेवण्यात आली आहेत महर्षी टंडन यांचे काही हस्तलिखित ग्रंथ व त्यांच्या वस्तूही येथे पाहता येतात 'राजर्षी टंडन सभामंडप' याच आवारात बांधण्यात येत आहे चौदा लाख रुपये खर्चून बांधण्यात येत असलेल्या या वास्तूत नाट्यगृह, एक सभागृह होईल हिंदी साहित्य संमेलनाचे स्फूर्तिस्थान राजर्षी टंडन हेच होते त्यांचा संगमरवरी पुतळा संस्थेच्या आवारात बसविण्यात आला आहे अलाहाबाद येथे माया, मनोरमा, मनोहर कहानियां आणि प्रोब ही नियतकालिके प्रसिद्ध करणारी 'माया प्रेस' ही संस्था आहे या संस्थेचा पत्ता मी हिंदी साहित्य संमेलनच्या कार्यवाहाकडून घेतला तसेच अलाहाबादमधील आणखी काही लेखकांचे व प्रकाशकांचेही पत्ते मी त्यांच्याकडून घेतले

अलाहाबादमधील महाराष्ट्रीय लोकांच्या कार्याविषयीही मला बरीच उत्सुकता होती, म्हणून तेथील 'महाराष्ट्र लोकसेवा मंडळ'चे अध्यक्ष श्री रा ग गोडबोले यांना मी भेटलो त्यांचे निवासस्थान हिंदी साहित्य संमेलनच्या कचेरीसमोरच आहे अलाहाबादमधील मराठी-भाषिकांविषयी विचारता ते म्हणाले, "येथे सुमारे दोनशे मराठी कुटुंबे आहेत त्यापैकी ९९ टक्के लोक नोकरी करणारे आहेत वकील, इंजिनियर, आर्किटेक्ट, डॉक्टर अशा व्यवसायांत बाकीचे आहेत १९०४ मध्ये माझे वडील बनारसहून येथे आले १८५७ च्या उठावाचेवेळी माझी आजी ब्रह्मावर्त भागात होती इकडे स्थायिक झालेली अनेक कुटुंबे शे-दीडशे वर्षे या भागात आहेत महाराष्ट्र लोकसेवा मंडळातर्फे आम्ही दरसाल गणेशोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा करतो त्या वेळी नाटक, शास्त्रीय गायन, भजन, भाषणे वगैरे कार्यक्रम होतात या वेळी स्मरणिकाही प्रकाशित करण्यात येते कधी कधी महाराष्ट्रातून व्याख्याते व कलावंत येतात. आनंद माडगूळकर यांचा 'गीतरामा-

थण 'चा कार्यक्रम मंडळाने केला आहे. स्थानिक वृत्तपत्रे, नभोवाणी व दूरदर्शन यामुळे आमच्या मंडळाच्या कार्यक्रमाचा चांगला प्रसार झाला आहे. १९८२ साली संस्थेचा सुवर्ण महोत्सव मोठ्या थाटात साजरा करण्यात आला."

चंद्रशेखर पार्क आणि म्युझियम असाही संगम अलाहाबादमध्ये पाहावयास मिळतो. ज्याला आता चंद्रशेखर पार्क हे नाव देण्यात आले आहे ते उद्यान मूळ प्रिन्स आल्फ्रेड पार्क या नावाने ओळखले जात होते. राजपुत्र आल्फ्रेड यांनी अलाहाबादला दिलेल्या भेटीचे ते स्मारक होते. पण ब्रिटिश सत्तेविरुद्धच्या संघर्षातील हुतात्मा चंद्रशेखर आझाद यांचे नाव नंतर या उद्यानाला देण्यात आले असून उद्यानात आझादांचे स्मारकही आहे. याच उद्यानात वस्तुसंग्रहालय आहे. त्यात निकोलस रोरीच यांची चित्रे, पं. नेहरूंना देण्यात आलेल्या काही भेटवस्तू, राजस्थानी मिनिएचर चित्रे, नक्षीकाम केलेली वस्त्रे अशा वस्तू पाहण्यासारख्या आहेत. पण इतर विभाग साधारणच आहेत. महात्मा गांधी मार्ग आणि सरोजिनी मार्ग यांच्या चौकात भव्य कॅथेड्रल आहे. लालसर रंगाचे हे चर्च जुन्या ख्रिश्चन वैभवाचे निदर्शक आहे. जवळच असलेली हायकोर्टाची इमारतही सरकारी माहिती पुस्तिकेत प्रेक्षणीय स्थळ म्हणून दाखविली असली, तरी ही न्यायाच्या कामकाजाची जागा आहे. तेथे खास प्रेक्षणीय असे काही नाही. सिव्हिल लाइन्समधील हनुमान मंदिर मात्र प्रशस्त, स्वच्छ, सुंदर आणि भव्य चौकाचे आहे. त्याच्या प्रवेश द्वारावरील पांढऱ्या घोड्यांचा सूर्याचा रथ विशेष लक्ष वेधून घेतो.

# अमृतराय आणि रामकुमार वर्मा

ज्ञानपीठ पारितोषिकविजेत्या कवयित्री श्रीमती महादेवी वर्मा या अलाहाबादमध्ये राहतात त्यांना भेटणे आवश्यक होते उत्तर प्रदेशच्या सांस्कृतिक दौऱ्यात अलाहाबादला जाऊनही महादेवींना न भेटणे म्हणजे पंढरपूरला जाऊन विठ्ठलाचे दर्शन न घेण्यासारखे आहे. पण मी अलाहाबादला गेलो, तेव्हा महादेवी वर्मा या भोपाळला गेल्या होत्या त्या परत येईपर्यंत थांबणे भाग होते जळगाव येथील अ भा मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन महादेवीजींच्या हस्ते झाले होते त्या-वेळी मी त्यांना भेटलो होतो पण ते घाईगर्दीत शिवाय, लेखकाला त्याच्या घरी, तो ज्या वातावरणात राहतो, लिहितो, त्या वातावरणात भेटण्यातच त्या भेटीचे सार्थक असते अलाहाबादमध्ये अमृतराय हे साहित्य अॅकॅडमी पारितोषिक विजेते राहतात प्रसिद्ध हिंदी कादंबरीकार प्रेमचंद यांचे ते चिरंजीव पण ते स्वयंप्रकाशी आहेत हिंदी साहित्यातील एक ज्येष्ठ चरित्रकार, कथाकार आणि विनोदकार आहेत अलाहाबादचे आणखी एक महत्त्वाचे लेखक म्हणजे डॉ रामकुमार वर्मा हिंदी एकांकिकेचे प्रवर्तक म्हणून त्यांना मानाचे स्थान आहे

डॉ रामकुमार वर्मा यांचा पत्ता साकेत, डी पी गर्ल्स कॉलेजजवळ, प्रयाग रस्ता असा होता हे ठिकाण माझ्या हॉटेलपासून सुमारे चार मैलांवर होते सकाळची वेळ होती थंडी कडाक्याची होती उघड्या सायकलरिक्षातून थंडी आणि वारा यांना तोंड देत तेथे गेलो साकेत बंगला सहज सापडला पण त्याच्या फाटकाला कुलूप होते इतक्या लांब येऊन काम झाले नाही, म्हणून निराशा झालो या वेळी मी रिक्षा सोडली होती परत जाण्यासाठी दुसरी रिक्षा पहावी म्हणून परतणार, तोच बंगल्याच्या दुसऱ्या फाटकाकडे माझे लक्ष गेले होते ते उघड होते त्यातून आत गेलो आणि एका नोकराकडे माझे कार्ड देऊन वाट पाहत राहिलो थोड्याच

वेळात पासष्टीच्या वयाचे उंच भरदार व्यक्तिमत्त्वाचे डॉ रामकुमार वर्मा आले आणि त्यांनी माझे प्रेमाने स्वागत करून बैठकीच्या खोलीत नेले "बंद फाटक पाहून मी परत जाणार होतो," असे सांगताच ते म्हणाले, "फक्त मोटार बाहेर काढण्यासाठीच ते मोठे फाटक उघडावे लागते एरवी सर्व ये-जा या लहान दरवाजातून होते "

माझे त्रोटक चरित्र वाचून डॉ वर्मा म्हणाले, "आपण हे फार चांगले काम हाती घेतले आहेत निरनिराळ्या भाषांतील लेखकांत संवाद राहणे अत्यंत लाभदायक आहे " मग आपल्याविषयी माहिती देताना त्यांनी सांगितले,' माझा महाराष्ट्राशी एकेकाळी बराच संबंध आला होता कारण १९४८ नंतरची अनेक वर्षे मी नागपूरला शिक्षणाधिकारी होतो माझा जन्म मध्य-प्रदेशातील सागर येथे झाला जबलपूर, नागपूर आणि प्रयागमध्ये माझे शिक्षण झाले १९२६ मध्ये मी प्रयाग विद्यापीठात एम ए च्या परीक्षेत प्रथम क्रमांकावर आलो हिंदी हा माझा विषय होता कारण मला लहानपणापासून साहित्याची आवड होती १९५६मध्ये मी प्रयाग विद्यापीठात हिंदी विभागाचा प्रमुख झाला मॉस्को आणि सिलोनमध्ये हिंदीचा पाहुणा प्राध्यापक म्हणून मी काम केले आहे 'नाटक पुरस्कार', 'देव पुरस्कार','चक्रधर पुरस्कार' असे काही सन्मान मला मिळाले आहेत १९६३ साली भारत सरकारने मला 'पदमभूषण' पदवी दिली " १९६६ ते १९७५ पर्यंत डॉ वर्मा हे हिंदी ग्रंथ ॲकॅडमीचे अध्यक्ष होते, हिंदी साहित्य संमेलनाने त्यांना 'वाचस्पती' ही पदवी दिली आहे

'समाज के स्वर' हा आपला एकांकिकांचा संग्रह डॉ वर्मा यांनी मला दिला त्यांच्या तेरा एकांकिका या संग्रहात समाविष्ट करण्यात आल्या आहेत त्यांच्या एकांकिकांचे तीन संग्रह या मालिकेत प्रसिद्ध झाले आहेत त्यामागील प्रेरणा सांगताना डॉ रामकुमार वर्मा म्हणाले, " व्यक्ती, परिवार आणि वर्ग या तीन स्तरावरती आजच्या समाजाचे दर्शन या एकांकिकांतून घडविण्याचा मी प्रयत्न केला आहे वर्गभेद, जातिभेद आणि संस्कारभेद यांनी ग्रासलेला आपला समाज एकसंध होऊन स्वतःच्या उन्नतीचे कार्य कसे करेल हा आजचा प्रमुख प्रश्न आहे या विविध प्रकारच्या भेदामुळे समाजाची अफाट शक्ती संघर्षात वाया जात आहे जीवन, समाज आणि देश यांच्यावरील निश्चल प्रेमाच्या भरवशावरच आपला समाज एकत्र येऊ शकेल " मग डॉ वर्मा यांनी वानगीदाखल आपल्या 'जीवन का प्रश्न', 'पृथ्वी का स्वर्ग' आणि 'चंपक' या एकांकिकांची कथानके सांगितली ते म्हणाले, "मराठी नाटक आज भारतात अग्रेसर आहे, असे ऐकतो आपले नाटक आणि साहित्य यातील प्रमुख प्रवाह कोणते आहेत ? आजचे मराठी श्रेष्ठ नाटककार कोण व ते काय लिहीत आहेत ?"

श्री वि वा. शिरवाडकर, वसंत कानेटकर, जयवंत दळवी, विजय तेंडुलकर, रत्नाकर मतकरी यांच्या काही निवडक नाटकाची माहिती मी डॉ रामकुमार वर्मा याना दिली तसेच साहित्याच्या प्रभावी अशा नव्या प्रवाहाची अलीकडील माहिती दिली उत्तर प्रदेशच्या या दौऱ्यात मला असे आढळून आले की, महाराष्ट्राबाहेर विजय तेंडुलकर हे मराठी नाटककार सर्वात अधिक ज्ञात आहेत अनेकांशी त्यांचा पत्रव्यवहारही आहे डॉ वर्मा यांच्या बरोबर भरपूर साहित्यचर्चा करून मी त्याचा निरोप घेतला आता अमृतराय आणि महादेवी वर्मा या दोन श्रेष्ठ हिंदी साहित्यिकांना भेटायचे होते अमृतराय याचा पत्ता 'धूपछाँव, न्यायमार्ग, अलाहाबाद' असा होता त्याच रस्त्यावर अलाहाबाद हायकोर्ट आहे, म्हणून त्याला न्यायमार्ग म्हणतात दोन्ही बाजूनी उच्च वृक्ष आणि लहान-मोठे बगले असलेला सिव्हिल लाइन्समधील हा रस्ता फारच सुदर आहे थोडी चौकशी करता बगला सापडला फाटकातून आत पाहिले आणि मन प्रसन्न झाले बगला बैठा आणि टुमदार होताच पण टवटवीत गुलाबाची शेकडो रोपे आणि इतर फुलझाडानी त्यांची भव्य बाग सुशोभित झाली होती मी फाटकातून आत गेलो आणि एका मुलीकरवी माझे त्रोटक चरित्र आत पाठविले बाहेर व्हराड्यातील खुर्चीवर मी थोडावेळ बागेकडे पाहत बसलो

इतक्यात पृथ्वीराज कपूर यांची उची, वर्ण आणि रूप असलेले अमृतराय बाहेर आले अमृतराय हे प्रेमचदाचे पुत्र

प्रेमचद हे हिंदीतील युगप्रवर्तक लेखक आहेत. त्यानी सबध हिंदी साहित्याचा ढाचाच बदलून टाकला प्रेमचदाच्या पूर्वीचे हिंदी साहित्य हे स्वप्नरजनात्मक होते पण प्रेमचदांनी वास्तववादी साहित्याने युग निर्माण केले त्याचे मूळ नाव धनपतराय पण ते सरकारी नोकरीत होते आणि राष्ट्रवादी लेखन करीत होते म्हणून त्यानी प्रेमचद या टोपणनावाने लेखन केले 'सोजे रामन' हा त्यांचा उर्दू कथासग्रह त्यातील राष्ट्रीय विचारांमुळे ब्रिटिशांनी जप्त केला प्रेमचद यांनी माधुरी, हस, मर्यादा, जागरण अशा नियतकालिकाचे सपादनही केले 'गोदान, 'प्रेमाश्रम,' 'गबन' इत्यादी त्यांच्या १५ कादबऱ्यानी हिंदीमध्ये, आजच्या काळातील सामाजिक विषमता, भांडवलदाराचे आक्रमण इत्यादी वास्तव विषय हाताळले प्रेमचदाचा जन्म १८८० साली झाला व मृत्यू १९३६ मध्ये झाला ३१ जुलै १९८० रोजी प्रेमचदाची जन्मशताब्दी भारतभर साजरी झाली आणि त्यांचे टपालाचे तिकीटही काढण्यात आले 'शतरज के खिलाडी' या त्याच्या कादबरीवर सत्यजित रे यानी चित्रपट काढला आहे 'हीरा मोती' 'गबन',' गरीब मजदूर' असे इतर चित्रपटही त्याच्या कादबऱ्यांवर आधारले आहेत हिंदी भाषा समृद्ध करण्याचे श्रेयही प्रेमचद यांच्याकडे जाते श्री वि स खांडेकर यांच्याप्रमाणेच ते उद्देशवादी साहित्यिक होते प्रेमचद याना दोन मुलगे आहेत त्यापैकी एक म्हणजे अमृतराय.

अमृतरायांनी खांद्यावर शाल पांघरली होती माझ्याशी हस्तांदोलन करून ते म्हणाले, "बधू मंत्रीजी, अंदर आइये " मी त्यांच्याबरोबर आत दिवाणखान्यात गेलो व्यवस्थित मांडलेल्या पुस्तकांनी तो दिवाणखाना खचून भरला होता बाहेर फुलांनी डवरलेला बगीचा आणि आत उत्तम ग्रंथांनी भरलेला दिवाणखाना लेखकाचे आदर्श निवासस्थान

"बोलिये मंत्रीजी, मैं आपकी क्या सेवा कर सकता हूं?" खानदानी अदबीने अमृतराय यांनी विचारले मी त्यांना अनेक प्रश्न विचारले ते म्हणाले, "मी गेली सुमारे चाळीस वर्षे लेखन करतो आहे कादंबरी, कथा, विनोद, चरित्र, समालोचन, प्रवासवर्णन अशा अनेक क्षेत्रात मी लेखन केले आहे माझा जन्म कानपूरमध्ये १९२१ साली झाला लखनौ, बनारस आणि अलाहाबादमध्ये माझे शिक्षण झाले इंग्रजी भाषा हा विषय घेऊन १९४२ साली मी एम ए झालो त्यानंतर दहा वर्षे मी 'हंस' या मासिकाचे संपादन केले १९५२ मध्ये मी प्रथमच परदेशी म्हणजे चीनला गेलो तेथे दोन महिने भटकलो आणि त्या अनुभवावर 'सुबह के रंग' हे प्रवासवर्णन लिहिले १९६५ते १९७२ या काळात सोविएत रशिया आणि युरोपच्या तीन यात्रा केल्या १९५० मध्ये एक जेलयात्राही घडली पाच वर्षे मी नॅशनल बुक ट्रस्टचा विश्वस्त आणि साहित्य अकादमीच्या कार्यकारिणीचा सदस्य होतो आता या सर्व सार्वजनिक कामापासून विलग झालो असून फक्त लेखन व वाचन करतो "

'आपल्या दृष्टीने आपले सर्वांत महत्त्वाचे पुस्तक कोणते?" मी विचारले त्यावर अमृतराय म्हणाले, " मी 'प्रेमचंद कलम का सिपाही' हे माझ्या वडिलांचे चरित्र लिहिले आहे ते मला माझे महत्त्वाचे पुस्तक वाटते साडेसहाशे पृष्ठांच्या या चरित्राला १९६३ चे सर्वोत्कृष्ट हिंदी पुस्तक म्हणून साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाले आहे याच पुस्तकाला १९७१ चे सोविएत देश नेहरू पारितोषिकही मिळाले आहे चरित्रात्मक हिंदी साहित्यात या पुस्तकाने नवे युग सुरू केले, असे अनेक समीक्षकांनी म्हटले आहे कादंबरीच्या क्षेत्रात 'बीज', 'नागफनी का देश', 'हाथी के दांत', 'धुंआं' इत्यादी माझ्या सात कादंबऱ्या आहेत माझे दहा-बारा कथासंग्रहही प्रसिद्ध झाले आहेत "

हिंदी विनोदाबद्दल मला खास उत्सुकता होती म्हणून मी अमृतराय यांचे मत विचारले तेव्हा ते म्हणाले, "शंभर वर्षांपूर्वी भारतेंदु हरिश्चंद्र यांनी उत्तम विनोदी लेखन केले आहे बाळकृष्ण भट्ट, प्रताप नारायण मिश्र हे त्या सुमारचे आणखी काही चांगले विनोदी लेखक पण त्यानंतर काही काळ विनोदाचा ऱ्हास झाला प्रेमचंदांनी पुन हिंदी विनोदात उत्तम दर्जाच्या साहित्याची भर टाकली अलीकडच्या काळात परसाई, शरद जोशी, रवींद्रनाथ त्यागी यांनी उत्कृष्ट विनोदी लेखन केले आहे यावेळी श्री अमृतराय यांनी मला आपले 'व्हिजिट इंडिया'

आणि 'रम्या' हे दोन विनोदी लेखांचे सग्रह दिले त्यावर त्यानी 'समानधर्मा बधू मत्रीजीको' असे लिहिले आहे

"भारतात आणि भारताबाहेर हिंदी भाषिकाची सख्या प्रचड प्रमाणावर असतानाही हिंदी पुस्तकाचा खप कमी का?" या माझ्या प्रश्नावर श्री अमृतराय म्हणाले, "दर्जेदार हिंदी साहित्याचा खप कमी आहे हे खरे चागल्या लेखकाच्या पुस्तकाचीही पहिली आवृत्ती दोन हजाराच्या पुढे जात नाही, पण पेपर बॅक हिंदी पुस्तकांचा किंवा पॉकेट बुक्सचा खप लाखात मोजावा लागतो ही पॉकेट बुक्स म्हणजे डिटेक्टिव्ह कथा असतात किंवा उथळ सामाजिक कादबऱ्या असतात हिंदी चित्रपटानी हिंदी वाचकाची रुची बिघडवून टाकली आहे हे याचे प्रमुख कारण आहे शिवाय साक्षर हिंदी लोकाची सख्या मोठी असली तरी उच्च अभिरुचीच्या सुशिक्षित लोकाची सख्या तशी मोठी नाही हेही लक्षात ठेवले पाहिजे नियतकालिकाच्या बाबतीतही तेच घडत आहे 'समातर', 'दृष्टी', , जमीन' अशा उच्च दर्जाच्या नियतकालिकाचा खप अगदीच कमी आणि त्याची आर्थिक स्थिती ओढगस्तीची याउलट 'मनोहर कहानियां' सारख्या खून, अपराध, अत्याचार याचे भडक वर्णन करणाऱ्या मासिकांचा खप तीन ते चार लाखांच्या घरात आहे, मराठीतही उच्च दर्जाचे साहित्य देणारी नियतकालिके बद पडत आहेत किंवा कसेबसे दिवस ढकलीत आहेत असे मी त्यांना सांगितले 'अर्धसत्य' हा चित्रपट आणि त्यातील सदाशिव अमरापूरकराची भूमिका याची अमृतराय यानी प्रशसा केली

"मला आता महादेवी वर्मा यांच्याकडे कस जाता येईल?" मी पृच्छा केली इतक्यात नाश्ता आणि चहा आला तो घेतानाच अमृतराय यानी महादेवींच्या घरी फोन केला "बेटी गीता, देवीजी घर मे है?" यावर त्या बाजूच्या मुलीने सांगितले की त्या घरी आहेत, पण त्याना अपघात झाला आहे पाय मुरगळला आहे त्या कोणालाच भेटू शकत नाहीत तरीही अमृतराय म्हणाले, "मेरे बधू मुबईहून आले आहेत त्यांना देवीजींनी भेटावे अशी माझी इच्छा आहे तर बेटा गीता, मुझे ऐसा कुछ रास्ता दिखाव जिसे बात बन जायगी" मग गीताने महादेवींचे चिटणीस रामजी पांडे यांना फोनवर बोलावले अमृतरायनी त्याना माझ्या उत्तर प्रदेशच्या भेटीचे प्रयोजन सागितल्यावर रामजी म्हणाले, 'त्याना इकडे पाठवा अजून डॉक्टर येऊन देवीजींना तपासून जायचे आहेत ते उपचार करून गेल्याबरोबर मी देवीजींची आणि मत्रीजींची भेट घडवून आणतो"

मला अतिशय आनद झाला अमृतराय यांनी मध्यस्थी केली नसती तर त्या परिस्थितीत माझी आणि महादेवींची भेट घडणे अशक्यच झाले असते मी त्याचा पत्ता घेतला धूपछाँव बगल्यापासून चालत दहा मिनिटांच्याच रस्त्यावर अशोकनगरमध्ये त्या राहत होत्या

# प्राणांचा दीप प्रज्वलित करून दिवाळी करणाऱ्या महादेवी वर्मा

अशोकनगर हे अलाहाबादच्या शांत, निवांत भागातील बंगल्याच्या रांगेत आहे मी पहिल्याच बंगल्यात 'महादेवी कोठे राहतात ?' असे विचारले, आणि तेथे उभ्या असलेल्या बाईने समोरच्या आंब्याच्या झाडीतल्या एका जुन्या पण भारदस्त पिवळ्या बंगल्याकडे बोट दाखविले मी कंपाउंडमधून आत गेलो बारा वर्षांच्या एका मुलाने मला व्हराड्यात बसायला सांगितले रामजी पांडे आले. त्यांना मी जळगावच्या मराठी साहित्य संमेलनात पाहिले होते मी माझे नाव सांगताना ते म्हणाले, "अमृतजींचा फोन आला होता डॉक्टर आता देवीजींच्यावर उपचार करीत आहेत त्यांचं झाल्याबरोबर मी आपल्याला बोलावतो तोपर्यंत आपण नास्ता आणि चहा घ्या "

त्यांचे बोलणे पूर्ण होण्यापूर्वीच खाद्यपदार्थ आणि चहा टेबलावर आला

इतक्यात एक नोकर आतून आला आणि रामजींना म्हणाला, "दादीजी बुलाती है" रामजी माझी क्षमा मागून आत गेले दुसरी एक वृद्ध बाई येऊन म्हणाली, "आपण मुंबईहून आलात ना ? दादीजींची तब्येत बरी नाही, पण अमृत भाईंचा निरोप आला आहे आपल्याला त्या भेटतील देव आपले भले करो" त्या घरातली सुसंस्कृत व आदबशीर वातावरणाची प्रचीती मला पहिल्या पाच-सात मिनिटांतच आली भिंतीवर काही चित्रे होती ती मी पाहत होतो समोरची छोटी पण सुंदर बाग निरखीत होतो इतक्यात ती बाई म्हणाली, "ही दादीजींनीच काढली आहेत त्यांना बीणकामाचा, चित्रकलेचा छंद आहे" घरातील नोकरवर्ग-सुद्धा महादेवींना कुटुंबातल्या नातेवाईकच मानतो मला त्या बंगल्यात पाळीव प्राण्यांचा बराच वावर दिसला एक कुत्रा बागेत हिंडत होता आणि दोन मांजरे अंगावर उबदार ऊन घेत अंगणात आरामात पडली होती आणखी कोणते प्राणी

आहेत ? असं मी विचारलं, तेव्हा ती बाई म्हणाली, " दादीजींना प्राण्यांच भारी वेड आहे त्यांनी चार कुत्रे, दोन मांजरे, त्यांची चार पिलं, कुत्र्याची आठ पिलं आणि एक ससाही पाळला आहे दादीजींची एक कुत्री होती दादीजी बाहेरगावी गेल्या तर ती काहीही खात नसे तिच्यासाठी दादीजी परगावी जाणं टाळीत असत, ती सोमा कुत्री मरण पावली '

हे बोलणे चालले असतानाच डॉक्टर आतून आले आणि रामजींना म्हणाले, " चिंता करण्याचं काही कारण नाही तीन-चार दिवसांत पूर्ववत सारं होईल " रामजींनी डॉक्टरना त्यांच्या मोटारीपर्यंत पोचवलं आणि मला आत घेऊन जाताना म्हणाले, ' चला, देवीजी आपली वाट पाहत आहेत " मी आत गेलो, तेव्हा गांधीजी, विनोबा अशा शुचिर्भूत तपस्व्यांच्या सहवासात आल्यासारखं वाटलं महादेवी झोपल्या होत्या, पण मला पाहताच अंथरुणावर उठून बसल्या कडाक्याची थंडी असल्याने त्यांनी कॉटजवळ हीटर लावला होता मला नमस्कार करून त्या म्हणाल्या, ' माफ करा मंत्रीजी, तुम्ही इतक्या दूर लेखकांना भेटण्यासाठी आलात, पण मला अपघात झाल्यामुळं मी आपलं योग्य असं स्वागत करू शकत नाही " मी अभिवादन करून म्हटलं, " आपली भेट होऊ शकली हेच भाग्य " त्या म्हणाल्या, मला विशेष काही झालेलं नाही पाय मुरगळला आहे फ्रॅक्चर वगैरे काही नाही, हे असं डॉक्टरनी सांगितल्यावर मला बरं वाटलं नाहीतर महिला विद्यापीठाचं माझं काम अडून राहिलं असतं "

महादेवींचा जन्म १९०७ चा म्हणजे आता त्या ७७ वर्षांच्या आहेत त्या अजूनही दैनंदिन काम करतात, याचे मला काहीसे आश्चर्य वाटून मी विचारले, " आपण कोणते काम करता ? " त्या म्हणाल्या, मी तरुण होते तेव्हा मला बुद्ध भिक्षुणी व्हायचं होतं चौदा वर्षांची असताना मी मिडल स्कूल परीक्षेत सर्व प्रांतांत पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले बी ए झाल्यावर मी ठरवले की संसार हा असार आहे मला भगवान बुद्धाची शिकवण फार स्फूर्तिदायक वाटली मी भिक्षुणी बनायचं ठरवलं एका तरुण बुद्धगुरूकडे दीक्षा घेण्यासाठी गेले पण मी एक तरुण मुलगी आहे, असं कळल्यावर त्यांनी माझ्यात व आपल्यामध्ये पडदा धरला आणि ते माझ्याशी बोलू लागले मला आश्चर्य वाटलं आणि अपमान झाल्यासारखंही वाटलं. तरुण स्त्रीकडे पाहिलं तर आपला संयम जाईल अशी ज्या महास्थविराला भीती वाटते, तो मला काय शिकवणार ? म्हणून मी तिथल्या तिथे दीक्षा घेण्याचा विचार सोडून दिला

भगवान बुद्धाचे तत्त्वज्ञान प्रत्यक्ष आणणारे गांधीजी हेच मी गुरू मानले भिक्षुणीचा बाह्य वेष न घेताही मनाने आपण विरक्त राहून मानवजातीसाठी कार्य करू शकतो मी बापूजींच्याकडे गेले आणि म्हणाले, ' मी तुमच्याबरोबर सत्याग्रहात

येते।' पण बापूजींनी सांगितल, "सत्याग्रह आणि तुरुग यापेक्षा तुझी जागा वेगळी आहे. तू महिलाच्या शिक्षणाच काम हाती घे उत्तर प्रदेशातील महिला शिक्षणाच्या बाबतीत मागे आहेत. तू त्याना सुशिक्षित कर " बापूजींनीच मला प्रयाग महिला विद्यापीठ काढून दिल त्या विद्यापीठाच काम मी गेली साठ वर्षं करते आहे आमच्या महिला विद्यापीठाचा पहिला पदवीदान समारभ बापूजींच्याच हस्ते झाला प नेहरू हे आमचे पहिले उपकुलगुरू होते "

महादेवी म्हणजे मूर्तिमत उदात्तता अर्धं शतक सतत काम केल्याचा कसलाही गर्व नाही उलट, हे काम करण्याची सधी मिळाली म्हणून धन्यता वाटते, अस त्या म्हणाल्या मी अलाहाबादला केव्हा आलो, काय काय पाहिल अस त्यानी विचारल आणि प्रश्न केला, "सगमला गेला होतास ना?" मी म्हटल, गेलो होतो, पण माझ्यासारख्या साहित्यप्रेमींच खर प्रयाग, सगम म्हणजे आपल्यासारख्या ज्येष्ठ लेखिकेची भेट आणि आशीर्वाद हाच

महादेवींची खोली भौतिक समृद्धी दर्शवीत नाही पण तेथे आध्यात्मिक वातावरण मात्र निश्चितच आहे रामकृष्ण परमहंस, भगवान बुद्ध, गाधीजी, सरस्वती, महाकवी निराला, अशा देवदेवता आणि महामानव यांच्या मूर्ती किंवा चित्रे खोलीत भरपूर आहेत शिवाय महादेवींनी काढलेली चित्रे आणि त्यांनीच तयार केलेली खेळणीही खोलीत ठेवण्यात आली आहेत 'आपण लेखन केव्हा करता ?' हा सर्वच लेखकाना विचारला जाणारा प्रश्न मी महादेवींना विचारला तेव्हा त्या म्हणाल्या, ' प्रयाग विद्यापीठासाठी मी सारा दिवस देते लेखन ही माझी हौस आहे, छद आहे माझ्या छदामुळे विद्यापीठाचे काम अडू नये, म्हणून मी पहाटे चारपासून सहापर्यंत लेखन करते मग रात्री दहा वाजता पुन्हा लेखन करते, लेखनाचा विषय सपेपर्यंत किंवा झोप येईपर्यंत ते चालू असते माझी दिनचर्या कामाच्या बदलत्या स्वरूपाबरोबर बदलते पण रात्रचर्या मात्र कायम आहे "

"आपण आत्मचरित्र लिहिले आहे काय ?" असे विचारता त्या म्हणाल्या, "मी एक साधी कार्यकर्ती आहे आत्मचरित्र लिहिण्याची मला अजूनपर्यंत तरी आवश्यकता वाटली नाही वाटली असती, तरी दैनदिन कामात वेळ मिळाला नसता यापुढे काय होईल ते मी काय सागू ?" मग जळगावच्या साहित्य सम्मेलनाचा विषय त्यांनी स्वत'च काढला व त्या म्हणाल्या, "जळगाव येथे तुम्हा मराठी लेखकाचे साहित्य सम्मेलन पाहून मला खूप आनद झाला अनेक मराठी साहित्यिकांना बोलण्याची सधी मिळाली जनसामान्यात साहित्याची रुची निर्माण करण्याचे आणि तिचे सवर्धन करण्याचे मोठे कार्य मराठी साहित्य सम्मेलने करीत आहेत "

आपल्या लेखनाबद्दल त्या म्हणाल्या, "माझी अनुभूती हेच माझे काव्य आहे

माझ्या गद्य लेखनात चिंतनाला अधिक महत्त्व मी देते पण आजूबाजूची परिस्थिती पाहून माझ्या मनात येणारे विचार हेच दोन्हींचेही स्फूर्तिस्थान आहे.

"आजची आजूबाजूची परिस्थिती आपल्याला कितपत उत्साहजनक वाटते ?" असे मी विचारले, तेव्हा महादेवींनी एक विषण्ण स्मित केले आणि त्या म्हणाल्या, "क्या कहूं ? या राजकारणी लोकांच्या स्वार्थामुळे आजची परिस्थिती अतिशय उद्वेगजनक झाली आहे राजकारण, अर्थकारण, सांस्कृतिक चळवळ, संगीत, साहित्य या सर्वांत राजकीय नेत्यांच्या स्वार्थाने धिंगाणा घातला आहे लेखकांची आत्मप्रेरणाच या संकटाशी मुकाबला करू शकेल परिस्थिती कितीही वाईट असली तरी मी निराश नाही गांधीजींनी आम्हाला निराशा शिकवलीच नाही आशावाद ही त्यांची प्रेरक शक्ती होती कुणाचीही भीडमूर्वत न ठेवता लेखकाने आपल्याला वाटते ते निर्भयपणे जगापुढे मांडले पाहिजे लेखक कलावंतांची ही तत्त्वनिष्ठाच राजकीय आक्रमणावर बंधने घालू शकेल अर्थात साहित्याचे सृजन हा लेखकाच्या वैयक्तिक जीवनातील सर्वांत मोठा आनंद आहे" असे म्हणून त्यांनी आपल्या कवितेच्या दोन ओळी म्हटल्या–

सर्जन मैं उतनी करुण हूं
करुण जितनी रात।
सर्जन मैं उतनी सजल
जितनी सजल बरसात ॥

त्यांच्या जीवनात आणि साहित्यात समर्पणाची भावना सर्वत्र दिसते, त्याचे कारण विचारता त्यांनी 'नीहार' या-आपल्या पहिल्या काव्यसंग्रहातील चार ओळी म्हटल्या–

अपने इस सूनेपन की
मैं हूं रानी मतवाली,
प्राणों के दीप जलाकर
करती रहती दीवाली।

महादेवी वर्मा यांच्या साहित्यसंपदेचा इतिहास रोमांचकारक आणि स्फूर्तिप्रद आहे वयाच्या अवघ्या सातव्या वर्षी त्यांनी पहिली कविता लिहिली आठव्या वर्षी त्यांनी व्रज भाषेतील समस्यापूर्तीत भाग घेतला अकराव्या वर्षी खडी बोलीतील 'दिया' ही कविता त्यांनी लिहिली १९२० मध्ये, वयाच्या तेराव्या वर्षापासून त्यांच्या कविता विविध नियतकालिकांतून प्रसिद्ध होऊ लागल्या १९२३ मध्ये त्यांनी पहिले बालनाट्य लिहिले त्यांच्या काव्यलेखनास बहर येऊ लागला 'नीहार' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह १९३० मध्ये प्रकाशित झाला, तेव्हा समीक्षक व इतर साहित्यिकांनी या नव्या कवयित्रीचे मुक्तकंठाने कौतुक केले

त्यानंतर दर दोन वर्षांनी त्याचे ' रश्मी ' ' नीरजा ' आणि ' सांध्यगीत ' हे काव्य संग्रह प्रसिद्ध झाले नवा दृष्टिकोन मांडणारी प्रभावी कवयित्री म्हणून त्यांना मान्यता मिळाली याच काळात उत्तम चित्रकर्ती म्हणूनही त्यांचा बोलबाला झाला दीपशिखा या त्यांच्या पाचव्या संग्रहात त्यांनी काढलेली चित्रे म्हणजे काव्य आणि चित्रकला यांचा संगमच आहे हा संग्रह १९४२ मध्ये प्रसिद्ध झाला प्रथम दर्जाच्या कवयित्री म्हणून त्यांचे नाव स्थिर झाले.

याच सुमाराला त्यांचा ' अतीत का चलचित्र ' हा संग्रह प्रसिद्ध झाला १९४४ मध्ये ' विवेकाचनात्मक गद्य ' हा त्यांचा समीक्षात्मक संग्रह निघाला पुढील वर्षी स्मृती की रेखाएँ ' हा त्यांच्या व्यक्तिचित्रांचा संग्रह प्रसिद्ध झाला गद्य लेखिका म्हणूनही त्यांना मान्यता मिळू लागली स्त्रियांच्या चळवळीविषयी महादेवींना फार पूर्वीपासून आस्था होती तिचे प्रतीक म्हणजे ' शृंखला की कडियाँ ' हा त्यांचा स्त्री मुक्तिविषयक संग्रह त्यानंतर ' पथ के साथी ', ' क्षणदा ' (ललित निबंध) ' साहित्यकार की आस्था तथा अन्य निबंध ' (१९६२) हा समीक्षात्मक ग्रंथ अशी त्यांची पुस्तके प्रसिद्ध झाली काव्यलेखनातील त्यांची भरारीही चालूच होती. ' बंगदर्शन', ' सप्तपर्णा', ' हिमालय ' (राष्ट्रीय कवितांचे संपादन) ' संधिनी ' ' प्रभा ' हे त्यांनी लिहिलेले किंवा संकलन केलेले संग्रह प्रसिद्ध झाले अगदी अली-कडचे असे त्यांचे पुस्तक म्हणजे ' मेरा परिवार ' आपल्या परिवारातील पशु-पक्ष्यांच्या विषयी त्यात त्यांनी आपल्या कोमल आठवणी लिहिल्या आहेत हे पुस्तक १९७८ मध्ये प्रसिद्ध झाले अजूनही त्यांचे लेखन नियमितपणे चालूच असते म्हणजे १९१४ पासून १९८४ पर्यंत सत्तर वर्षे ही व्रती लेखिका लिहीत आहे त्यांना अनेक मानसन्मान मिळाले, पण त्या सर्वांकडे पाहण्याची त्यांची वृत्ती तटस्थपणाची, निरिच्छपणाचीच आहे

इंदूरच्या हिंदी साहित्य संमेलनाने महादेवी वर्मा यांना १९३४ मध्ये सक्से-रिया पुरस्कार दिला साहित्य अकादमीच्या उद्‌घाटनाच्या महनीय प्रवक्त्या म्हणून भाषण करतानाच १९५४ मध्ये त्यांनी भारतीय संस्कृतीचे जतन करणाऱ्या या संस्थेच्या नावात ' अकादमी ' हा इंग्रजी शब्द घातल्याबद्दल निर्भयपणे निषेध व्यक्त केला महाकवी निराला यांच्या एकसष्टी समारंभाच्या त्या अध्यक्ष होत्या (१९५६) प्रतापगड हिंदी साहित्य संमेलनाच्या त्या अध्यक्ष होत्या (१९६०) वाराणसी येथे झालेल्या राष्ट्रीय पुरस्काराच्या त्या पहिल्या मानकरी झाल्या. (१९६१) संत, साहित्यकार संमेलनाच्या अध्यक्ष म्हणून त्यांनी १९६५ मध्ये उदास भाषण केले प्रयाग संगीत महाविद्यालयाचा दीक्षांत विधी महादेवींच्या हस्ते झाला काशी विद्यापीठाच्या हिंदी परिषदेच्या त्या अध्यक्ष होत्या. विक्रम विद्यापीठाचा

दीक्षांत विधी त्यांच्या हस्ते झाला उत्तर प्रदेश हिंदी साहित्य संस्थानचा सर्वश्रेष्ठ साहित्यिक सन्मान 'भारत-भारती पुरस्कार' महादेवींना १९८१ साली देण्यात आला त्या पाठोपाठ भारतीय ज्ञानपीठाचा पुरस्कारही महादेवींना मिळाला पण या श्रेष्ठ साहित्यसेवेचे श्रेय त्या पूर्णपणे स्वतःकडे घेत नाहीत त्यांच्या साधनेबद्दल मी त्यांना विचारले, तेव्हा त्या म्हणाल्या, "मी स्वतः हे सारे कुठे लिहिले आहे ? 'लिखती हू कुछ, कुछ लिख जाती"

महादेवींना उत्तम विनोददृष्टी आहे त्यांचे हसणे निर्मळ, निर्व्याज आणि लहान मुलाच्या हसण्यासारखे असते बनारसला एकदा 'ठलुआ' क्लबतर्फे, महादेवींचा सत्कार झाला हा ठक, लुटेरा आणि आळशी याचा गमतीचा क्लब आहे या क्लबच्या सन्मानाला उत्तर देताना महादेवी म्हणाल्या, "सारे ठग आणि लुटारू हे पुरुष होते हे लक्षात घ्या कोणत्याही कलेत प्रावीण्य मिळवा असा माझा या क्लबला संदेश आहे तुमची ठगगिरी, लुटेरापण आणि आळस इतक्या परिणत अवस्थेला न्या की तुमच्या पत्नी प्रसन्न होतील"

एकदा एका चाहत्याने महादेवींना कालिदेवीची मूर्ती भेट म्हणून दिली ती त्यांनी आपल्या घरात ठेवली काही दिवसांनी एका पाहुण्याने आश्चर्याने विचारले, 'देवीजी, आपण गांधीजींच्या शिष्या म्हणजे अहिंसेच्या समर्थक पण कालीमाता ही हिंसक आहे असे असताना आपण ही मूर्ती कशी जवळ ठेवलीत ?" महादेवी म्हणाल्या, "कालिमाता दुष्टांचे निर्दालन करताना हिंसक झाली असेल पण ज्याने मला प्रेमाने ही मूर्ती भेट दिली त्याची भावना मात्र पूर्णपणे अहिंसक होती"

बराच वेळ त्यांच्या उदात्त सहवासात घालविल्यावर मी निरोप घेऊ लागलो व महादेवींना म्हटले, "आपली स्वाक्षरी देता का ?" त्या म्हणाल्या, "केवळ स्वाक्षरीच नव्हे, तर मी माझी एक कविताही आपल्याला लिहून देते"

चिरसजग आँखे उनींदी
आज कैसा व्यस्तबाना ।
जाग तुझको दूर जाना ।

महादेवी
१७, सी अशोक नगर
प्रयाग
१२-२-५४

महादेवी वर्मांच्या एका काव्यातील या ओळी असून त्याचा अर्थ असा की, "नेहमीच जागृत असणाऱ्या तुझ्या डोळ्यांवर झोप का आहे ? आज तुझी (ही) वेशभूषा अशी विस्कटलेली का आहे ? (असा झोपू नकोस, लक्षात ठेव) तुझे विशाल ध्येय दूर जाण्याचे आहे, तेव्हा तू जागा रहा"

# ' शाम-ए-अवध '

हिन्दीमधील चार अत्यत लोकप्रिय नियतकालिके अलाहाबादहून निघतात· 'माया', 'मनोहर कहानिया', 'मनोरमा' आणि 'सत्यकथा' अशी ही नियत-कालिके आहेत 'प्रोब' हे इग्रजी मासिकही याच सस्थेचे आहे अर्थातच या सस्थेच्या कचेरीला भेट देणे आवश्यकच होते 'मनोहर कहानिया' हे मासिक तर अखिल भारतात सर्वाधिक खपाचे (चार लाख) आहे गुन्हेगारी व गुन्ह्यांचे अन्वेषण या विषयाला वाहिलेले हे मासिक लेखकाना मानधन देण्यातही प्रथम क्रमाकावर आहे. अलाहाबादच्या 'मुठी गज' भागात या मासिकांची कचेरी आहे तेथे अगदी सकाळीच मी दाखल झालो, तेव्हा संपादकवर्ग अजून कामावर यायचाच होता मी थोडा वेळ थांबलो आणि 'प्रोब' चे सपादक श्री जे बी सिन्हा प्रथम आले त्यानी माझे चांगले स्वागत केले ते म्हणाले, "माया प्रेसची स्थापना बावन्न वर्षांपूर्वी झाली आणि तेव्हाच 'माया' हे सर्वसाधारण वाचकांना चागले साहित्य देणारे मासिक सुरु झाले पन्नास वर्षांपूर्वी 'मनोरमा' हे स्त्रियांच्या प्रश्नाना वाहिलेले मासिक सुरू झाले १९४५ मध्ये 'मनोहर कहानिया' हे मासिक निघाले. गुन्ह्यांचा शोध कसा घेतला जातो, याबरोबरच गुन्हे थोपविण्यासाठी कोणती खबरदारी घेता येईल, याचेही मार्गदर्शन वाचकांना करता यावे हा या मासिकाचा उद्देश आहे. 'प्रोब' हे अगदी अलीकडे म्हणजे १९७८ मध्ये प्रकाशित होण्यास सुरवात झाली राजकारण, समाजकारण, अर्थशास्त्र इत्यादी विविध क्षेत्रांतील प्रश्नांचे रूप आणि ते सोडविता येण्याची शक्यता यांची मांडणी 'प्रोब' मध्ये शोधक पत्रकारितेच्या आधाराने केली जाते शोधक पत्रकारिता हा प्रवाह इग्लड-अमेरिकेत फार जुना असला तरी आपल्याकडे तो अद्याप नवा आहे 'प्रोब'चा मुख्य आधार ही नि:पक्षपाती शोधक पत्रकारिता आहे फक्त सहा वर्षांत 'प्रोब' चा खप

एक लाखावर गेला आहे आम्हाला मिळत असलेला वाढता पाठिंबा लक्षात घेऊन ' प्रोब ' हे मासिकाऐवजी पाक्षिक स्वरूपात प्रसिद्ध करण्याचा आम्ही विचार करीत आहोत "

श्री जे बी सिन्हा हे ' प्रोब 'मध्ये येण्यापूर्वी ' टाईम्स ' आणि ' स्टेटसमन ' या नामवंत दैनिकांत काम करीत होते ' इंडिया टुडे ' व ' संडे ' या नियतकालिकांतही त्यांनी महत्त्वाच्या जागांवर काम केले आहे मग मी ' माया 'चे संपादक श्री. अमरकांत वर्मा यांना भेटलो हे उत्तम दर्जाचे लेखकही आहेत ' सुखा पत्ता ' ही त्यांची कादंबरी व अनेक कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. ' माया ' मध्ये येण्यापूर्वी ते आग्रा येथे ' सैनिक 'चे संपादक होते ' भारत ', ' कहानी ', ' अमृत पत्रिका ' या नियतकालिकांतही त्यांनी काम केले आहे ' मनोहर कहानियां'चे श्री हर्षवदन कुलश्रेष्ठ यांनाही मी भेटलो श्री श्रीकांत सिनकर आणि इतर काही मराठी लेखक या मासिकात सातत्याने लिहितात असे त्यांनी सांगितले ' माया प्रेस'च्या संपादक वर्गाला भेटून व त्यांचा अद्ययावत छापखाना पाहून मी निघालो

अलाहाबादची माझी सर्व कामे दुपारी एक वाजताच संपली आता शक्य तितक्या लवकर मला लखनौला जायचे होते तिथे चालू असलेल्या लखनौ महोत्सवाला मला हजर रहायचे होते हॉटेलवर आल्याबरोबर अलाहाबादपासून लखनौला लवकरात लवकर कसे पोचता येईल, याची चौकशी केली संध्याकाळी साडेपाचला आगगाडी होती ती लखनौला रात्री दहा-साडेदहाला पोचणार होती त्यापूर्वी झीरो रस्त्यावरून तीन वाजता बस सुटणार होती, ती सात-साडेसातपर्यंत लखनौला पोचणार होती तीन तास वाचवावेत म्हणून जेवण केले आणि झीरो रस्त्यावरल्या बसस्थानकावर गेलो हे स्थानक भयंकर गलिच्छ आहे व्यवस्थापनाचा प्रकार शून्य आहे उत्तर प्रदेशच्या बसेस जुन्या, मोडक्या, घाणेरड्या आणि अनियमित धावणाऱ्या आहेत लखनौवरून येणारी बसच अर्ध्या तासाने परत जाते, असे मला चौकशीवरील खिडकीत सांगण्यात आले पण चार वाजले तरी लखनौवरून बस आलीच नाही शेवटी मी विचार केला, की बसची वाट पाहात असताना गाडीही चुकायची तेव्हा सामान घेऊन पुन्हा झीरो रस्त्यावरून अलाहाबाद स्टेशनवर आलो बसस्थानकावर शून्य व्यवस्था असल्यानेच त्याला झीरो हे नाव पडले असावे, असे मी अनुमान काढले अलाहाबाद ते लखनौ हे अंतर फक्त १७० किलोमीटर्स आहे तिकीट १९ रुपये आहे. वास्तविक हे अंतर साडेतीन तासात गाडीने सहज कापावे पण बस सोडून गाडीकडे आलो तो आगीतून फुफाट्यात अशी माझी अवस्था झाली

साडेपाचला सुटणारी गाडी सव्वासहाला प्लॅटफॉर्मवर आली आणि पावणेसातला सुटली गाडीत भयंकर गर्दी होती, पण एका तरुण सरदारजीच्या सहाय्याने

कशीबशी जागा मिळवली तो लखनौचाच रहिवासी होता आणि लष्कराच्या सेवेतून रजा घेऊन आपल्या घरी जात होता त्याचे नाव होते गुरुबक्षसिंग गाडी अगदी हळूहळू चालली होती पॅसेंजर असल्याने प्रत्येक लहान स्टेशनवर ती थांबे आणि बराच वेळ तेथे उभी राही रायबरेली या सुप्रसिद्ध स्टेशनवर तर ती पूर्ण सव्वा तास थांबली वाटेत भुईमुगाच्या शेंगा, खारी डाळ आणि मातीच्या भांड्या-तून मिळणारा बेचव चहा याखेरीज खायला-प्यायला काही मिळाले नाही अखेर लखनौ स्टेशनला गाडी पोचली, तेव्हा रात्रीचे पावणेदोन वाजले होते उत्तर प्रदेशातील गुन्हेगारीबद्दल पूर्वी खूपच वाचले होते त्यामुळे एवढ्या रात्री अनोळखी गावात जाण्याचे धाडस होईना माझा एकमेव आधार म्हणजे गुरुबक्षसिंग गाडी स्टेशनवर पोचण्यापूर्वी तो म्हणाला, " आपण आजची रात्र लखनौ स्टेशनवरच्या रिटायरिंग रूममध्येच घालवू कारण लखनौमध्ये माझे घर स्टेशनपासून सात-आठ मैल लांब आहे रात्री-अपरात्री त्या बाजूला एकट्याने जाणे धोक्याचे आहे "

कोणाची तरी सोबत मिळाली म्हणून मीही सुटकेचा निःश्वास टाकला पण स्टेशनवर गुरुबक्षसिंगला त्याच्या घराजवळच राहणारा ओळखीचा कोणीतरी भेटला तेव्हा तो मला म्हणाला, " माफ करा मला सोबत आहे त्याच्याबरोबर मी रिक्षाने घरी जातो " त्याने माझा निरोप घेतला आता रात्रीचे दोन वाजून गेले होते. मी रिटायरिंग रूमकडे गेलो, तर तेथील सर्व जागा भरलेल्या स्टेशनचा वेटिंग हॉल म्हणजे प्रचंड मोकळी जागा तिथे पॅसेंजरच नव्हे, तर भिकारी, आसराहीन असे शभर-सव्वाशे लोक झोपले होते. थंडी तर कडाक्याची होती. गेल्या बारा तासात मी काहीही खाल्लेले नव्हते रिक्षावाले त्या अवेळीही जवळ येऊन आग्रह करीत होते, " साहेब, उत्तम डिलक्स हॉटेलमध्ये नेतो फक्त वीस रुपये रोजचे सेल्फकटेड खोली " पण त्याच्याबरोबर जाण्याचे मला धाडस होईना त्या अपरात्री परक्या गावी कोणी कुठे भलतीकडेच नेईल, ही भीती होती पण स्टेशनच्या त्या दरिद्री, उघड्या हॉलमध्ये चार तास काय, पण अर्धा तासही काढणे मला अशक्य होते सामान घेऊन बाहेर पटांगणात आलो तिथे मध्यभागी एक उपाहारगृह दिसले. झोपण्याची व्यवस्था करण्यापूर्वी काही खाऊन घ्यावे म्हणून उपाहारगृहात-- खरे तर उघड्यावर टाकलेल्या बाकड्यावर व टेबलावर-- आलो चपाती, डाळ, वांग्याची भाजी आणि भात त्या अवेळीही मिळाला जेवण खूप स्वस्त होते म्हणजे त्या सर्वांना मिळून दीड रुपयाच पडला माझे जेवण होत होते तेव्हा एक रिक्षावाला माझी वाट पाहतच होता तो माझ्याजवळ येऊन पुन्हा कोणत्या तरी हॉटेलचे कार्ड मला देऊन म्हणाला, " चला, मी तुम्हाला हॉटेलवर सोडतो "

मी म्हटले, " मी लांब कुठे येणार नाही इथून समोर दोनतीन हॉटेलांच्या

पाटया दिसतात तिथेच मी येईन " माझ्या उजव्या बाजूला प्रकाशित असा फलक दिसत होता त्याचे नाव वाचता येत नव्हते पण ते कोणते तरी हॉटेल असावे, असा अंदाज करून मी म्हटले, " त्या हॉटेलात मला घेऊन चल " त्यावर रिक्षावाला म्हणाला, " ती पाटी ' लखनऊ स्टेशन ' अशी आहे ते हॉटेल नाही " मग मी समोरच्या दुसऱ्या हॉटेलकडे बोट दाखवले त्याने सामान उचलले आणि 'शर्मा हॉटेल ' कडे नेऊन त्याने घंटा दाबली तेव्हा पावणेतीन वाजले होते ते हॉटेल चार मजली होते कुणीतरी रात्रपाळीचा नोकर आला आणि म्हणाला, " रोजचे तीस रुपये पडतील खोली सर्वांत वरच्या, चौथ्या मजल्यावर आहे " आता थंडीचा कडाका इतका वाढला होता की स्वेटर, कोट वगैरे घालूनही मी कुडकुडत होतो सकाळ होईपर्यंत कसे तरी तीन-चार तास मला काढायचे होते मी तीस रुपये दिले रिक्षावाल्याचे पैसे दिले तरी तो थांबलाच होता त्यावरून हॉटेलला गिऱ्हाईक आणल्याबद्दल त्याला हॉटेल मालकाकडून कमिशन मिळणार होते हे उघड दिसत होते खोली त्यातल्या त्यात बरी होती दोन जाड रग होते दिवसभरच्या श्रमाने मी इतका थकून गेलो होतो की अंथरुणावर पडल्याबरोबर मला झोप येऊ लागली जवळ स्टेशन होत आणि इंजिनचे आणि गाडीचे आवाज येत होते, तरीही मला आठ वाजेपर्यंत गाढ झोप आली

लखनौच्या महाराष्ट्र मंडळाच्या श्री वसंत आंबेकर यांच्याबरोबर माझा आधीच पत्रव्यवहार झाला होता ते राजेंद्रनगरमध्ये राहत होते सकाळी नऊ वाजता मी हॉटेलवाल्याकडे राजेंद्रनगर कुठे आहे याची चौकशी केली " इथून चालत जाण्याइतके ते जवळ आहे " असे त्याने सांगितले मी दहा मिनिटातच आंबेकरांच्या घरी पोचलो त्यांनी माझे चांगले स्वागत केले आणि सांगितले, " महाराष्ट्र मंडळाच्या जागेत आपल्याला राहायचं असेल तर आम्ही तशी व्यवस्था करू " आंबेकरांच्याबरोबर मी ती जागा पाहिली, पण ती मला समाधानकारक वाटली नाही म्हणून त्यांचेच सल्ल्यावरून मी विधानसभा मार्गावरील चरण हॉटेलमध्ये जायचं ठरवलं. आंबेकर यांनी त्यांचे शेजारी व उत्साही कार्यकर्ते श्री गर्दे यांचीही ओळख करून दिली तसेच भातखंडे संगीत विद्यापीठाचे रजिस्ट्रार श्री. आळेकर यानाही त्यांनी फोन केला, त्यांनी अकरा वाजता मला, माझ्या हॉटेलवर भेटण्याचे मान्य केले आंबेकरांच्या घरून आम्ही हिंदीतील नामवंत लेखक, श्री अमृतलाल नागर यांना फोन केला त्यांनी दुपारी साडेचार वाजता भेटण्याची वेळ दिली महाराष्ट्र मंडळातील माझ्या भाषणाचा दिवस व वेळ ठरवून मी स्टेशनजवळच्या हॉटेलवर परत आलो

श्री आंबेकर यांच्याकडून तेथील महाराष्ट्र मंडळाची बरीच माहिती मिळाली लखनौ येथे कटरा मकबूलगंज विभागात महाराष्ट्र मंडळाची जुनी इमारत आहे सध्या श्री श र. आळेकर हे मंडळाचे अध्यक्ष आणि श्री. वसंत आंबेकर हे

चिटणीस आहेत लखनौमध्ये सुमारे पाचशे महाराष्ट्रीय कुटुंबे आहेत महाराष्ट्र मंडळाची सभासद संख्या सुमारे अडीचशे आहे गणेशोत्सव हा मंडळाचा मुख्य कार्यक्रम असतो त्यावेळी नाटक बसविले जाते तसेच संगीत, व्याख्याने, कीर्तन वगैरे कार्यक्रम करण्यात येतात गेल्या वर्षी 'फुलाला सुगंध मातीचा' हे नाटक करण्यात आले महिला समाजातर्फे लोकगीत व नृत्याचे कार्यक्रम झाले श्री नंद-कुमार लोंढे यांनी कथाकथन केले टिळकजयंती, गांधी जयंती, शिवजयंती, कोजागिरी, दिवाळी, वनभोजन असे इतर कार्यक्रम महाराष्ट्र मंडळातर्फे करण्यात येतात, अशी माहिती चिटणीस श्री वसंत आंबेकर यांनी दिली मंडळातर्फे ग्रंथालय चालविण्यात येते पण लखनौच्या ग्रंथालयाचा विशेष असा की शहराच्या सहा भागात ते विभागले आहे कारण लखनौचा विस्तार फार मोठा असल्याने केवळ पुस्तक बदलून घेण्यासाठी चार सहा मैल येणे वाचकाला अवघड होते म्हणून राजेंद्रनगर, महानगर, मानकनगर, इंदिरा नगर आणि निराला नगर अशा भागात वाचनालयाच्या शाखा आहेत पुस्तके अधूनमधून या शाखेकडून त्या शाखेकडे बदलण्यात येतात प्रत्येक शाखेची जबाबदारी स्थानिक चिटणिसाच्यावर सोपविण्यात आली आहे दिवाळी अंकांना वाचकाची विशेष मागणी असते संस्थेचे नाटक 'रवींद्रालय' या अद्ययावत नाट्यगृहात सादर करण्यात येते व त्याला उत्तम प्रतिसाद असतो, असे श्री आंबेकर यांनी सांगितले मंडळातील सर्व सभासदांत चांगले सहकार्य असून तेथील मराठी मंडळी एकोप्याने राहतात.

'सुभे बनारस, शाम ए अवध' ही उक्ती प्रसिद्ध आहे या दोन्हींचा आनंद मी भरपूर लुटला आहे बनारसला मी गंगा नदीवरची रम्य पहाट अनुभवली आहे आणि लखनौच्या प्रसन्न सायंकाळी संगीत नृत्य नाटक इत्यादींचा अपूर्व सोहळा उपभोगला आहे या शामे अवधचीच कथा मला इथे सांगायची आहे फेब्रुवारी-अखेर 'लखनौ महोत्सव' मोठ्या थाटामाटात साजरा झाला गेली सात वर्षे हा महोत्सव साजरा करण्यात येत असला, तरी या वर्षीचा महोत्सव विशेष महत्त्वाचा होता कारण 'बडा इमामवाडा' या इतिहासप्रसिद्ध वास्तूची द्विशताब्दी या महोत्सवात या वर्षी साजरी होत होती

या महोत्सवासाठी केसरबाग भागात बेगम हजरत पार्कमध्ये खास जत्रा भरविण्यात आली होती. या जत्रेत शंभरावर स्टॉल्स, मुलासाठी आगगाडी, विविध खेळ, भारतीय सैन्याच्या शस्त्रास्त्रांचे व आधुनिक रणगाड्याचे प्रदर्शन, उत्तर प्रदेशातील वैशिष्ट्याचे दर्शन, अयोध्येचे वैशिष्ट्य व परंपरा दाखविणारा विभाग, लखनौची खास वस्त्रे, खेळणी, संगीत परंपरा, साहित्यविषयक कार्य अशा अनेक

अंगाचे दर्शन या जत्रेत घडत होते. लखनौवर एक उत्कृष्ट, रंगीत व्हिडिओ तयार करण्यात आला होता व तो महोत्सवात रोज दाखविण्यात येत होता त्यात लखनौची ऐतिहासिक, संगीत, नृत्य, वाद्ये वगैरेच्या परंपरा आणि लखनौची 'तहजीब' किंवा संस्कृती यांचे कलात्मक चित्रण श्रीमती विजय नरेश यांनी सादर केले होते. परगावाहून किंवा परदेशाहून आलेल्या प्रवाशांना या व्हिडिओमुळे थोड्या वेळात लखनौची व उत्तर प्रदेशाची कल्पना येत असे

सांस्कृतिक कार्यक्रम हा या महोत्सवाचा गाभा होता सोनल मानसिंग, मलिका पुखराज, बिरजू महाराज, शरण राणी अशा जागतिक कीर्तीच्या कलावंतांनी या कार्यक्रमात भाग घेतला होता या कार्यक्रमासाठी भव्य शामियाना, भरपूर मोठा रंगमंच, अद्ययावत् प्रकाशयोजना अशा सुविधा करण्यात आल्या होत्या सांस्कृतिक कार्यक्रमाखेरीज पतंगाची चढाओढ, नावांची शर्यत, वक्तृत्व स्पर्धा, कोंबड्यांची झुंज, फॅन्सी ड्रेस स्पर्धा, ज्युडोची प्रात्यक्षिके, शोभेच्या दारूकामाची आतषबाजी, 'अवधची संस्कृती' या विषयावरील परिसंवाद, निरोगी बालक स्पर्धा, चित्रकलेतील स्पर्धा, इत्यादी अनेक इतर कार्यक्रमही होते

उत्तर प्रदेशची सांस्कृतिक व क्रीडाक्षेत्रातील झलक या महोत्सवात दिसावी या दृष्टीने त्याची आखणी लखनौचे कमिशनर श्री सुरेंद्र मोहन यांनी केली होती या उद्देशाची तपशीलवार माहिती घ्यावी म्हणून मी श्री सुरेंद्र मोहन यांना भेटलो, तेव्हा ते म्हणाले, लखनौविषयी बाहेरच्या प्रांतात बरेच गैरसमज आहेत लखनौ हे फक्त विलासी, ऐषआरामी आणि चैन करणारे शहर आहे (अशी ऐकीव माहितीवर आधारलेली) अशी परप्रांतीयांची कल्पना झालेली आहे १८७५ साली विल्यम हॉवर्ड रसेल या इतिहासकाराने रोम, अथेन्स किंवा कॉन्स्टंटिनोपलपेक्षाही लखनौ शहर अधिक सुंदर व कलात्मक असल्याचे लिहून ठेवले आहे ऐषआरामी व कृतिशून्य अशी जी लखनौची प्रतिमा बाहेर आहे ती बदलून हे शहर किती कलासक्त, गतिमान आणि आतिथ्यशील आहे याची झलक दाखवावी म्हणून हा महोत्सव साजरा करण्यात येत आहे फ्रान्स, इजिप्त, प जर्मनी अशा काही परदेशांचे प्रतिनिधी या महोत्सवाला हजर आहेत अनेक परप्रांतीय महनीय व्यक्तीही उपस्थित आहेत नवटंकी हा खास उत्तर प्रदेशचा नाट्याचा प्रकार आम्ही सादर केला आहे तसेच गझल, कथ्थक, नृत्य इत्यादी खास लखनौच्या वैशिष्ट्यपूर्ण करमणुकीही पेश केल्या आहेत

तिकिटविक्रीचे त्रेसष्ट हजार रुपये जमा झाले आहेत यावरून महोत्सवाला लोकांचा केवढा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे हे दिसून येते बडा इमामबाडा,

रूमी गेट, जुम्मा मशीद, रेसिडेन्सी इत्यादी कित्येक ऐतिहासिक महत्त्वाच्या इमारती रात्री प्रकाशित केल्या आहेत सुंदर उद्याने हे लखनौचे वैशिष्ट्य आहे म्हणून विकास प्राधिकरणाने जुन्या उद्यानांचे नूतनीकरण आणि नव्या उद्यानाची निर्मिती यासाठी नव्वद लक्ष रुपये खर्च केले आहेत बडा इमामवाड्यासमोर अत्यंत भव्य असे उद्यान तयार करण्यात येत आहे. आधुनिक लखनौच्या निर्मितीचे श्रेय नवाब असफउद्दौला याच्याकडे जाते त्यांनीच दोनशे वर्षांपूर्वी बडा इमामवाडा (असम्मी इमामवाडा) उभारला कैसरबाग, कैसर-इझामा इत्यादींची निर्मिती करणारे शेवटचे नवाब वजीद अली शहा यांचेही लखनौवर फार मोठे ऋण आहे या महोत्सवामुळे लखनौची यथार्थ प्रतिमा निर्माण होण्यास मदत झाली तर लखनौ महोत्सवाचे सार्थक झाले असे मी मानतो तेरा दिवस चाललेल्या या महोत्सवाला दोन लक्ष लोकांनी भेटी दिल्या"

आपण ज्यांचा 'लखनौ' असा उच्चार करतो, त्याला उत्तर प्रदेशात अधिकृतपणे 'लखनऊ' असेच म्हणतात प्रभू रामचंद्रांची अयोध्या नगरी होती, पण लक्ष्मणाने गोमती किनारी लक्ष्मण नगरी वसविली, तिचेच पुढे लखनपूर व पुढे लखनऊ असे रूप झाले लखनऊ हा लक्ष्मणपूरचा अपभ्रंश, तसेच 'अवध' हा 'अयोध्या'चा अपभ्रंश आहे. लखनौत एका खास उद्यानात लक्ष्मणाचा अर्धपुतळा आहे व त्याखाली 'लखनऊ का निर्माता वीरवर श्री लक्ष्मणजी' असे कोरले आहे या महोत्सवाच्या प्रारंभाला या पुतळ्याला हार घालून अभिवादन करण्यात आले उत्तर प्रदेशचे राज्यपाल श्री सी पी एन् सिंग याच्या हस्ते लखनौ महोत्सवाचे उद्‌घाटन झाले या महोत्सवाच्या स्मरणिकेचेही याचवेळी त्यांच्या हस्ते प्रकाशन झाले लखनौच्या मशहूर गायिका बेगम अख्तर याना श्रद्धांजली देण्यासाठी त्यांच्या शिष्या शांती हिरानंद यांनी महोत्सवाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांचा प्रारंभ जा रे जा रे कागवा' या बहारदार ठुमरीने केला त्यानंतर त्यांनी तुम जावो, जावो, मुझे ना बुलावो' हा दादरा सादर केला रामपूर घराण्यातील प्रथम श्रेणीच्या या गायिकेने आपल्या कार्यक्रमाचा शेवट बेगम अख्तर यांच्या गझलने केला त्यानंतर त्याच दिवशी बनारस घराण्याच्या नामवंत गायिका सिद्धेश्वरीदेवी यांच्या कन्या सविता देवी रंगमंचावर आल्या 'जावो वही तुम श्याम' या मिश्र खमाज रागातील ठुमरीने त्यांनी आपल्या कार्यक्रमाची सुरुवात केली 'होली मैं खेलूंगी' आणि 'रे मन कृष्ण नाम कह लिजिये हे दोन प्रसन्न दादरे सादर केले

पहिल्या दिवशी झालेल्या नृत्याच्या कार्यक्रमात कुमकुम धर यानी 'गुरु-वदना' व 'शिवस्तुती' ही नृत्ये सादर करून नतर 'मैं तो खेलूंगी होरी उन्हीं के साथ' या ठुमरीच्या पार्श्वसगीतावर अभिनय नृत्य केले शेवटी भातखडे सगीत महाविद्यालयाचे धरण नाथ मिश्रा याचे गायन झाले. त्यांनी 'निर्मोही तोरा जियरा' ही मिश्र यमन रागातील ठुमरी गायली आणि 'चैन ना पहियो' हा दादरा सादर केला दुसऱ्या दिवशी परवीन सुलताना, रघुनाथ शेठ आणि राम मोहन या कलावतांनी महोत्सवात बहार आणली परवीन सुलताना यानी रागेश्वरी रागातील बडा ख्यालने बैठकीची सुरुवात केली मग 'जा जा रे कागवा' ही ठुमरी आणि 'भज मन नदनानद' हे मीराबाईचे भजन व 'भवानी दयानी' हा दादरा सादर केला पन्नालाल घोष याचे शिष्य रघुनाथ शेठ यानी बासरीवर यमनसह तीन राग वाजवले शाश्वती सेन आणि राम मोहन यानी नृत्याचे दोघाचे व स्वतत्र असे उत्कृष्ट कार्यक्रम केले कथ्थक प्रकारातील 'कान्हा खेली कहा ऐसे होरी' या नृत्याने विशेष दाद मिळविली या नृत्यांच्या कार्यक्रमात गोविंद आचार्य यांनी तबल्याची साथ केली आणि धीरा घोष यानी गायन केले

तिसऱ्या दिवशी दुपारी लखनौच्या सुप्रसिद्ध पतग-उद्यानात पतगाच्या चित्त-थरारक स्पर्धा झाल्या लखनौची पतग उडविण्याची व काटण्याची परपरा फार जुनी आहे या स्पर्धेत पहिला व दुसरा क्रमाक लखनौच्याच पतगवाल्यानी मिळविला त्याला उद्देशून दुसऱ्या दिवशी एका वृत्तपत्राने मल्लिनाथी केली होती की, 'हे साहजिकच आहे कारण एकमेकाना कापण्यास लखनौवाल्यांइतके निष्णात कोण आहे?' (ही मल्लिनाथी करणाऱ्याने या क्षेत्रातील पुण्याच्या लेखकाचा विक्रम ऐकला नसावा! पुढील वर्षी पुण्याच्या साहित्यिकानी या स्पर्धेत भाग घेऊन लखनौवाल्यांचे पतग काटावेत!) लखनौच्या पतगतज्ज्ञतेचे एक उदाहरण असे सांगतात की, सर स्टॅफर्ड क्रिप्स हे भारतात आले असता त्यांना भारतीयाचा प्रचड विरोध झाला लखनौच्या एका मैदानात क्रिप्स हे काही ब्रिटिशधार्जिण्या सस्थानिकांशी चर्चा करीत होते व तेथे कडक बदोबस्त होता पण 'गो बॅक क्रिप्स' अशी अक्षरे असलेला एक पतग लखनौच्या पतगवाल्याने अशा शिताफीने काटला की तो नेमका सर स्टॅफर्ड क्रिप्स याच्यासमोर जाऊन पडला!

लखनौ महोत्सवात तिसऱ्या दिवशी गोव्याच्या कलापथकाने लोकनृत्ये व गोव्याची गाणी यांचा अत्यत प्रेक्षणीय व सुश्राव्य असा कार्यक्रम करून दाखविला डोक्यावर पेटत्या समया घेऊन या पथकातील स्त्री-पुरुषानी केलेली नृत्ये विशेष सस्मरणीय होती गणेशवदनाने या पथकाने प्रारभ केला व कळशी फुगडीचा

बहारदार कार्यक्रम केला गोव्याच्या अनेक लोकगीतानी व लोकनृत्यानी प्रेक्षकाकडून प्रचड टाळ्या मिळविल्या त्यांतील काही नृत्ये पौराणिक प्रसगावर आधारलेली होती या कार्यक्रमाचा शेवट 'गोव्याला या, गोव्याला या अशा आग्रहाच्या निमत्रणाच्या गाण्याने झाला

चौथ्या दिवशी तर सोनल मानसिंग या सुप्रसिद्ध नर्तकीने शामियान्यात विलक्षण चैतन्य निर्माण केले 'कमल लोचन कटि पिताबर' या भजनाच्या पार्श्वभूमीवरील नृत्याने त्यानी प्रारभ केला त्यानतर सीता स्वयवरमधील एक नृत्य त्यानी रागदारी गायनाच्या पार्श्वभूमीवर केले काही नृत्यांत त्याच्याबरोबर मीनाक्षी, इदू आणि प्रणीता या त्याच्या तीन शिष्यानीही भाग घेतला होता भरतनाट्यातील सोनल मानसिंग याचा मुद्राभिनय, हस्तन्यास आणि पदन्यास यातील कौशल्याची कमाल म्हणजे प्रेक्षकाना अत्युच्च अशी मेजवानीच होती त्याच दिवशी उस्ताद गुलाम मुस्तफा खान यांनी आपल्या गायनाने श्रोत्याना मोहित केले त्यांनी कौशी कानडामधील 'झुला झुला किसने डाला' या गाण्याने सर्वांची प्रचड दाद मिळविली 'बातो बातो मे गई रात' हा दादरा आणि शेवटी भजन पेश केले त्यानतर कलकत्याचे सतारवादक भट्टाचार्य यानी या महोत्सवातील आपली पहिलीच हजेरी चागलीच गाजवली त्या दिवशी उत्कृष्ट कार्यक्रमांची रेलचेलच होती सजय शर्मा या लखनौच्या वादकाने सरोदवर वसत व मालकस वाजवून भैरवीने या सस्मरणीय रात्रीची अखेर केली या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाचे उद्घाटन सध्याकाळी सात वाजता तुर्कस्थानचे राजप्रतिनिधी देवन गुलू याच्या हस्ते झाले व रात्री अकरा वाजता कार्यक्रम सपला

शहनाईचे बादशहा बिस्मिल्ला खान यांच्या अविस्मरणीय सनईवादनाने पाचव्या दिवशीच्या कार्यक्रमाचा प्रारभ झाला बिस्मिल्ला खान हे वाराणसीचेच त्यामुळे त्याना घरचाच कार्यक्रम होता विलबित आणि द्रुत लयीतील श्याम कल्याण, पूर्वी रागातील बदिश आणि भैरवीतील जोगी मत जा हे भजन शहनाईवर ऐकून प्रेक्षक भारावून गेले कार्यक्रमाच्या सुरुवातीला टी व्ही चे कॅमेरे व प्रखर प्रकाश याचा बिस्मिल्ला खान यांना त्रास होऊ लागला म्हणून टी व्ही चे चित्रीकरण न करण्याबद्दल त्यानी सुचवले पण तरीही ते चालू राहिले तेव्हा बिस्मिल्ला खान म्हणाले, "टी व्ही शिवाय मी या क्षेत्रात नाव मिळवले आहे मला प्रसिद्धीसाठी टी व्ही ची गरज नाही तरी कृपा करून माझा मूड घालवू नका" या तिखट सूचनेनतर टी व्ही चे या कार्यक्रमाचे चित्रण थाबविण्यात आले व बहारदार शहनाई अप्रतिहतपणे सुरू झाली

याच दिवशी शरण राणी यांनी सरोदवर दरबारी वाजवून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले त्यांना दीड तासच मिळाला यापूर्वी एका कार्यक्रमात लखनौमध्येच शरण राणी यानी सहा तासाचा सरोदवादनाचा कार्यक्रम केला होता सरोदवरील त्यांचे प्रभुत्व त्यानी दीड तासात निर्विवादपणे सिद्ध केले त्यानंतर कथ्थक घराण्यातील लच्छू महाराजाच्या शिष्या कुमकुम श्रीवास्तव याचे नृत्य झाले तसेच श्रीमती मालविका सुरुकई याच्या नृत्याचाही कार्यक्रम झाला कुमकुम श्रीवास्तव यांनी 'दक्षयज्ञ' या कथेवरील नृत्य सादर केले आणि सुरुकई यांनी 'पुष्पांजली' व इस्वरजाती' ही नृत्ये सादर केली शहनाई, सरोद आणि नृत्ये हे सर्वच कार्यक्रम 'तके उत्कृष्ट झाले की, प्रत्येक कलावंताला वेळ कमी पडला अशी सुखद चुटपूट श्रोत्याना व प्रेक्षकाना लागून राहिली

नौटकी हा खास उत्तर प्रदेशाच्या सगीत लोकनाटयाचा प्रकार आहे आपल्याकडील तमाशाच्या वगाच्या जवळपासचा हा प्रकार मथुरा, आग्रा या भागात विशेष प्रचलित आहे म्हणून लखनौ महोत्सवात एका रात्री मथुरेच्या कमलेश लता आर्य पथकाचा नौटकीचा खास कार्यक्रम ठेवण्यात आला होता या नौटकीचे नाव होते 'रंभा-शुक संवाद' पंजाबची एक राणी अतिशय कलाप्रिय आणि संगीत नृत्यात वाकबगार होती तिचे नाव नौटकी त्याच नावावरून लोकनाटयाच्या या प्रकाराला नौटंकी हे नाव पडले आहे त्यात दोन विभाग आहेत–हाथरसची नौटकी आणि कानपूरची नौटकी हाथरस प्रकारात गायनाला प्राधान्य असते तर कानपूरच्या प्रकारात अभिनयावर भर असतो या कार्यक्रमात रंभेची प्रमुख भूमिका करणाऱ्या रूपवती श्रीमती कमलेश आर्य या नौटकीच्या क्षेत्रातील नाणावलेल्या कलावती आहेत त्यांना लखनौच्या कलाकार सगम आणि संगीत नाटक अकॅडमी या संस्थाचे 'श्रेष्ठ अभिनेत्री' हे सन्मान मिळाले आहेत

या नौटकीत सुरुवातीला एका मंदिरात श्रीकृष्ण बासरी वाजवीत असल्याचे दृश्य दिसते मग नाटकातील एक एक पात्र येऊन श्रीकृष्णाला अभिवादन करून जाते हे पथक मथुरेचे असल्याने प्रत्येक कार्यक्रमाच्या प्रारंभी श्रीकृष्णाला असे वंदन करण्यात येते, त्यानंतर कमलेश आर्य यांनी नाटकाला असा प्रारंभ केला–

ब्रज सारंग ब्रज लोकगीत
संगीत नृत्य का दर्पण है।
रम्भा शुक संवाद आज
इस रंगमंचपर अर्पण है।।

मग इंद्राच्या दरबाराचे दृश्य आले. दरबारात रंभेचे नृत्य झाले इंद्र प्रसन्न झाले इतक्यात 'नारायण नारायण' करीत नारदांनी प्रवेश केला ते इंद्राला म्हणाले, "अरे, तू इथे ख्यालीखुशाली करतो आहेस पण तिकडे पृथ्वीवर शुकमुनी उग्र तप करीत आहेत त्यांनी आपले तप पूर्ण केले तर तुझे आसन धोक्यात येईल तरी शुकमुनींचा तपोभंग होईल अशी काही व्यवस्था कर, नाहीतर तुझी धडगत नाही!" त्यावर इंद्र घाबरला आणि त्याने शुकमुनींचा तपोभंग करण्यासाठी नृत्यनिपुण व मादक अशा रंभेला पृथ्वीतलावर पाठवले तपश्चर्या करीत बसलेल्या शुकमुनींना रंभा मोहित करण्याचा प्रयत्न करते नृत्य, गायन यांनी त्यांचा तपोभंग होत नाही, म्हणून रंभा हातात मद्याचा प्याला घेऊन त्याला सांगते, "हाच खरा जीवनातील आनंद तो तू भरपूर पिऊन घे" त्यावर शुकमुनी सांगतात, "छे छे हे जहर आहे हा विनाशाकडे नेणारा मार्ग आहे" त्यांची ही चर्चा मुख्यत गायनाच्या माध्यमातून होते अखेर शुकमुनींचा विजय होतो

या नौटकीत विनोदासाठी कजाग बायको आणि त्रस्त नवरा अशी एक जोडी घातली आहे नौटकीत ताशाचा आवाज एकसारखा येत राहतो तसेच ग्रामीण भागात पूर्वी ध्वनिवर्धक नसल्याने नौटकीतील पात्रांना ध्वनिवर्धकापुढेही उच्च आवाजात बोलण्याची व गायनाची सवय लागलेली असते अभिनय आणि वेशभूषा यातही भडकपणा आढळतो पण नौटकीच्या प्रेक्षकाचा विचार करता तो रास्तच आहे आपल्याकडील तमाशाप्रमाणे उत्तरेकडील नौटकी हा प्रकार थोडा अस्ताव्यस्त आणि अनिर्बंध आहे उदाहरणार्थ शुकमुनींचे कथानक जरी पौराणिक असले, तरी त्यातील संवादात व गाण्यात आधुनिक समाजाचे व राजकारणाचेही दर्शन घडते वेषभूषेला अगदी ठाम साचा नसतो उदाहरणार्थ, शुक्रमुनी, घोर तपश्चर्येला बसताना उघड्या अंगाने बसलेला पाहिजे पण त्या रात्री लखनौला इतकी कडाक्याची थंडी होती की तपमान साडेपाच (सेंटिग्रेड) अंशापर्यंत खाली आले होते म्हणून शुकमहाराज अंगात स्वेटर, त्यावर कफनी आणि पायात पायमोजे घालून तप करीत होते!

लखनौ महोत्सवाची रंगत दिवसेंदिवस वाढतच होती फॅन्सी ड्रेसची स्पर्धा हॉटेल अवध क्लार्कमध्ये झाली छायाचित्रांची स्पर्धाही झाली महोत्सवाच्या सहाव्या सायकाळी, सांस्कृतिक कार्यक्रमात 'चांदनी का जहर' या नाटकाचा प्रयोग झाला लखनौच्या 'दर्पण' या संस्थेने हे नाटक सादर केले डॉ रुस्तांगी यांनी दिग्दर्शित केलेल्या या नाटकात जुन्या मुस्लिम संस्कृतीची झलक पहायला मिळाली वेषभूषा काळाला अनुरूप होती आणि कथानक, अभिनय, प्रकाशयोजना या [illegible]

अनुरूप होत्या लखनौवाल्याना कव्वालीचा फार मोठा षोक, त्यासाठी अनीसा साब्री आणि अफसर हुसेन याच्या कव्वाली गायनाचा बहारदार कार्यक्रम महोत्सवाच्या सातव्या सध्याकाळी बेगम हझरत पार्कमधील शामियान्यात ठेवण्यात आला होता शामियाना तुडुब भरला होता सुस्वर, मदहोश आवाजाच्या स्वरूपसुदरी अनीसा साब्री यानी कव्वालीचा सर्वोत्तम साक्षात्कार घडविला

कव्वाली व गझल गायनानतर त्यांनी लखनौच्या सुप्रसिद्ध 'मुजरा' शैलीत 'मै लाज की मेरी' हे गाणेही म्हटले आणि प्रेक्षकांनी टाळ्याचा कडकडाट केला अफसर हुसेन आणि त्याचे साथीदार यानी अमीर खुश्रा याची 'आज रचयो है बसत' ही रचना म्हटली तसच त्यानी काही गझल व कव्वालीही पेश केल्या

या महोत्सवाचा एक भाग म्हणून एक्क्याच्या (टाग्याच्या) शर्यतीही ठेवण्यात आल्या होत्या दरसाल होणाऱ्या या शर्यतींना प्रेक्षकाचा उत्साही प्रतिसाद मिळाला होता. राजभवनमध्ये पुष्पप्रदर्शनही भरविण्यात आले होते एक्क्यांची शर्यत लखनौ महापालिकेच्या वतीन आयोजित करण्यात आली होती

इक्बाल सिद्दीकी, काचन चतर्जी, वैजयतीमाला वर्मा आणि रिता गांगुली यांनी महोत्सवाच्या आठव्या रात्री गझलची मेजवानीच दिली इक्बाल सिद्दीकी हे लखनौचेच त्यानी स्थानिक शैलीचे 'सुनते हैं कि मिल जाती है' 'देख कर आँख की शराब', कभी इस मकान से गुजर गया' इत्यादी मदमस्त गझल म्हटल्या कांचन चतर्जी यांनी हिंदुस्थानी गायकीवरची त्याची हुकमत चागलीच नजरेस आणली त्यानी तीन वेगळ्या शैलीतील तीन गझल म्हटल्या वैजयंतीमाला वर्मा यांनी अलीम, फैझ आणि खुमार याच्या गझल सादर केल्या शेवटी दिल्लीच्या रिता गागुली यांनी बेगम अख्तर याच्या खास शैलीतील गझल पेश करून श्रोत्यांना खूष करून सोडले कुली कुतुब शहा यांच्या 'पिया आज प्याला पिये जाये ना' या गझलने त्यांनी विशेष छाप पाडली या सध्याकाळच्या कार्यक्रमाचे उद्घाटन फ्रान्सच्या राजप्रतिनिधींच्या हस्ते झाले

दिवस सरकत होते जाताना प्रत्येक सायकाळ नवा नवा आनद देऊन जात होती आणि श्रोते पुढच्या सायकाळची वाट पाहत होते मूळ निमत्रण-पत्रिकेप्रमाणे सुप्रसिद्ध पाकिस्तानी गायिका मलिका पुखराज आणि त्याची कन्या ताहिरा सईद यांच्या गझलचा कार्यक्रम होता पण तो शेवटच्या दिवशी ठेवण्यात आला मलिका पुखराज यापूर्वी लखनौला होत्या आणि त्यांनी बेगम अख्तर याच्याबरोबरच सगीताचे शिक्षण घेतले होते आता सर्वतोमुखी झालेली 'अभी तो मैं जवान हूँ' ही गझल मलिकाबाईंनी ४८ वर्षांपूर्वी प्रथम गाऊन तिला अपूर्व कीर्ती मिळवून

दिली त्या आता सत्तरीच्या आसपास आहेत. चाळीस वर्षांच्या दीर्घ कालखंडा-नंतर मलिका पुखराज लखनौला परत येत होत्या त्यामुळे त्यांच्या कार्यक्रमा-विषयी सर्वांनाच अतिशय उत्सुकता लागून राहिली होती

'गावका नाम ससुराल, मेरा नाम दामाद' हे छत्तीसगढी भाषेतील नाटक महोत्सवाच्या नवव्या दिवशी सादर करण्यात आले या नाटकात छत्तीसगढी लोक-नृत्याचा भरपूर उपयोग करण्यात आला होता हबीब तनवीर यांच्या पथकाने या नाटकाचा उत्तम प्रयोग केला विशेषत छत्तीसगढी लग्नातील मिरवणुकीने फारच मौज आणली नेपथ्य अगदी साधे होते. वनविभागातील दृश्याची आठवण करून देणाऱ्या नारळी-पोफळींची झाडे आणि मध्ये एक उचवटा एवढ्याच पार्श्वभूमीवर हे संगीत-नृत्यमय विनोदी नाटक सादर करण्यात आले होते छत्तीसगढी वन्य जमातीतील धार्मिक समजुती, गमती, परंपरा व शिष्टाचार यावर हे नाटक आधारलेले होते

कथ्थक नृत्याच्या लखनौ घराण्याचे आजचे ज्येष्ठ कलावंत बिर्जू महाराज यांच्या नृत्याचा कार्यक्रम हे दहाव्या दिवसाचे खास वैशिष्टच होते नृत्यातील अभिनय, हस्तन्यास, पदन्यास इत्यादींवरील त्यांच्या प्रभुत्वाने प्रेक्षकांवर मोठीच छाप पाडली 'छोडो छोडो बिहारी' आणि 'कुंजन मैं रचिओ रास' या गीतांच्या पार्श्वभूमीवरील बिर्जू महाराजांची नृत्ये विलक्षण मोहक होती काही नृत्यांत त्यांच्या शिष्या शाश्वती सेन यांनी त्यांना साथ दिली होती त्यापूर्वी बिर्जू महा-राजांच्या दोन शिष्यांनी कथ्थकनृत्ये सादर केली दुर्गा बीचराम आणि विपुल दास या त्यांच्या शिष्यांनी आपल्या नैपुण्याची उत्तम झलक प्रेक्षकांना दाखविली मग सुप्रसिद्ध सतारवादक उस्ताद विलायत खान यांनी सिंधूर व काफी या रागां-तील वैभवाचा साक्षात्कार घडवून प्रेक्षकांची वाहवा मिळविली

दुसऱ्या दिवशी सायंकाळी रवींद्रनाथ टागोर यांच्या 'चांडालिका' या नृत्य-नाटकाचा प्रयोग संतोष सेनगुप्ता आणि पार्टीने सादर केला कलकत्त्याच्या या पथकाने नेपथ्य, कलाकार, संगीत आणि वेशभूषा यांची अचूक निवड केली होती उत्कृष्ट प्रकाशयोजना हे बंगाली नाटकाचे वैशिष्ट्यही या वेळी उठून दिसत होते प्रकृती या हरिजन कन्येला समाज बहिष्कृत करतो पण आनंद हा बुद्ध भिक्षु तिच्या हातचे पाणी पिऊन तिला माणसात आणतो व शेवटी 'बुद्धम् शरणम् गच्छामी'चा संदेश देतो ही या नाटकातील मूळ कल्पना झरना दत्त (प्रकृती), बोस (आनंद) इत्यादी कलावंतांनी अतिशय उठावदारपणे मांडली वादळ, पाऊस इत्यादींचा

ततोतत भास निर्माण करणारी तांत्रिक बाजूही प्रशसनीय होती या नाटकातील रवींद्र सगीत प्रेक्षकाना फारच आवडले मूळ बगाली नाटकाचे हिंदी रूपातरही उत्तम झाले होते

महोत्सव सपण्यापूर्वी दोन दिवस मलिका पुखराज आणि त्यांची कन्या ताहिरा सईद याचे लखनौत आगमन झाले आकाशवाणीच्या इमारतीत मलिका पुखराज याच्या हस्ते बेगम अख्तर यांच्या अर्धपुतळ्याचे अनावरण झाले त्या वेळी एका पत्रकाराने "तुमचे वय काय ?" असे विचारले, तेव्हा हसून मलिका पुखराज म्हणाल्या, " माझ वय मी सागत नाही पण माझी मुलगी इथेच आहे म्हणून वया-बद्दलचा एक किस्सा सांगते अशाच एका नामवत आईला तिच्या तरुण मुली-समोर एकाने 'वय काय ?' असे विचारले तेव्हा आईने काही उत्तर देण्यापूर्वीच मुलगी म्हणाली, 'आई, तुझ्या नि माझ्या वयामध्ये निदान नऊ महिन्याचे तरी अतर ठेव !' "

मलिका पुखराज चित्रपटांना पार्श्वगीते गात नाहीत, त्याबद्दल विचारता त्या म्हणाल्या, " मैं अपने सगीत मे किसी मिलावट को शामील नही करना चाहती " मलिक पुखराज यानी वयाच्या चौथ्या वर्षापासून गायन शिकण्यास प्रारभ केला उस्ताद गुलाम अलीचे वडील अली बक्श, आशिक अली, उस्ताद अख्तर हुसेन आणि उस्ताद मौला बक्श याच्याकडे त्यांनी संगीताचे शिक्षण घेतले बेगम अख्तर यांच्या गझल व इतर गायकीचा यावेळी त्यांनी गौरव केला यावेळी मलिका पुख-राज यांनी 'हम भी पिये, तुम्हे भी पिलाये' आणि 'अभी तो मैं जवान हूँ' या गझल निवडक श्रोत्यांच्यासमोर म्हटल्या आकाशवाणीच्या स्टुडिओ क्रमांक एकमध्ये हा कार्यक्रम झाला

लखनौ महोत्सवाच्या बाराव्या दिवशी काशिनाथ बोडस आणि वीणा सहस्र-बुद्धे याच्या भक्तिगीताचा कार्यक्रम झाला गणेश वदनापासून प्रारभ करून त्यानी सूरदास, मीराबाई, गुरू नानकदेव, ब्रह्मानद इत्यादींच्या उत्कृष्ट रचना सुरेल आवाजात म्हटल्या 'सावरी राम की आन' ही शर्माबंधूनी म्हटलेली सत तुलसी-दासाची रचना विशेष रगली बनारस घराण्याचे रामेश्वर प्रसाद मिश्रा आणि कैलास श्रीवास्तव यांनीही भजने गायली

महोत्सवाचा अखेरचा दिवस मलिका पुखराज आणि ताहिरा सईद यांनी शेवटचा दिस गोड व्हावा ' या वचनानुसार साजरा केला त्या सायंकाळी हजरत

बेगम पार्कचा शामियाना कार्यक्रमाच्या अधिकृत वेळेपूर्वीच अर्धातास पूर्णपणे भरून गेला होता तरीही गर्दी वाढू लागली म्हणून दैनिक तिकीटविक्री बंद करण्यात आली शेकडो जादा खुर्च्या टाकूनही लोक शामियान्याच्या कडांना व इतरत्र जागा मिळेल तिथे उभे होते लखनौच्या जुन्या परंपरेतील गझल आपल्या आवडत्या व चाळीस वर्षे दुरावलेल्या गायिकेकडून ऐकायला मिळणार, म्हणून उत्सुक व रसिक श्रोतृवर्ग पडदा उघडण्याची वाट पाहत होता वेळेवर पडदा उघडला प्रथम बक्षिस समारंभ झाला आणि मग मलिका पुखराज, त्याची कन्या ताहिरा सईद व ताहिराचे पती रंगमंचावर आले कार्यक्रमाचे संचालन ताहिराच्या पतींनीच केले आपण स्वत व आपली पत्नी ताहिरा हे व्यवसायाने वकील आहोत, पण इथे आम्ही भांडणासाठी आलो नसून संगीताने लोकांना जवळ आणण्यासाठी आलो आहोत, असे त्यांनी प्रास्ताविकात सांगितले

मलिका पुखराज यांनी 'बेजबान जुबान न हो जाये' या होशियार पुरी यांच्या गझलने कार्यक्रमाला प्रारंभ केला त्यानंतर 'जैसे इश्क के तीर' ही चढत्या रंगतीची गझल मलिका पुखराज यांनी पेश केली श्रोत्यांच्याकडून आता 'अभी तो मैं जवान हूँ'ची फर्माईश प्रचंड प्रमाणात करण्यात आली पण निवेदकांनी सांगितले, "ही गझल कार्यक्रमाच्या शेवटी गायली जाईल ती तुम्हाला आताच हवी असेल तर मलिकाजान ती म्हणतील पण त्यानंतर कार्यक्रम संपेल" मग लोकांनीही आपला आग्रह सोडला आणि ताहिरा सईद यांनी 'ये आलम शौक का देखा' ही बहारदार गझल सादर केली 'अय् इश्क हमे बरबाद ना कर' ही अप्रतिम गझल मलिका आणि ताहिरा या दोघींनी गाऊन श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले

या मायलेकींनी दोन तासपर्यंत सबंध वातावरण धुंद केले. गझल हा खास लखनवी प्रकार आणि त्याला तहजबीची दाद देणारे रसिक श्रोते यांनी हा कार्यक्रम अथपासून इतिपर्यंन्त विलक्षण खुलला अखेरीस जेव्हा मलिका पुखराज यांनी 'अभी तो मैं जवान हूँ' ही त्यांची त्रिखंडात प्रसिद्ध असलेली गझल म्हणण्यास सुरुवात केली तेव्हा हजारो प्रेक्षकांनी टाळ्यांचा अपूर्व कडकडाट करून जी दाद दिली, ती अविस्मरणीय आहे तेरा दिवस चाललेल्या नृत्य-संगीतनाट्याच्या या महोत्सव मंदिरावर मलिका पुखराज यांनी सुवर्ण कळसच चढविला

# अवधचे नवाब

समग्र भारतात अवधची संस्कृती आणि व्यक्तिमत्त्व यांना अगदी वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. आजचा अवध समजून घ्यायचा असेल तर त्याचा माफक का होईना इतिहास ज्ञात असणे अत्यंत आवश्यक आहे.

अयोध्या किंवा अवध प्रांताला स्वतंत्र राजकीय व्यक्तिमत्त्व लाभले, ते सम्राट अकबराच्या काळात. १५९० मध्ये अकबराने आपल्या ताब्यातील मुलखाचे बारा भाग पाडले. त्यांपैकी अयोध्या हा एक होता. लखनौ ही त्या भागाची राजधानी होती, आणि शेखजादे हे त्या भागाचे प्रमुख होते. लखनौला त्या काळी वाजपेयी ब्राह्मणांनी यज्ञ केला, त्यासाठी अकबराने एक लक्ष रुपये दिले होते. मच्छी भवन, मिर्झा मंडी अशा नव्या, भव्य शोभिवंत इमारती लखनौमध्ये सोळाव्या शतकापासूनच उभारल्या जात होत्या. कटारी टोला, सैंधी टोला, महमूदनगर, शहागंज वगैरे सधन व्यापारी भाग वसवण्यात आले होते. लखनौला घोड्यांना चांगली मागणी होती. म्हणून फ्रान्सहून आलेला एक फ्रेंच व्यापारी येथे बादशहाकडून सनद घेऊन घोड्यांचा व्यापार करीत असे. पण एकेकाळी बादशहाचे प्रतिनिधी म्हणून नेमले गेलेले लखनौचे शेख पुढे वरिष्ठ झाले आणि आपण स्वतंत्र झालो आहोत अशा गर्वाने मिरवू लागले. म्हणून १७३२ मध्ये दिल्लीच्या बादशहाने अयोध्येचा सुभेदार म्हणून नवाब बुऱ्हाण उल् मुल्क अमीन उद्दीन खां निशापुरी याला मोठे सैन्य दिमतीला देऊन पाठवले. नवाब याचा अर्थ नायब असा असून बुऱ्हाण उल मुल्क म्हणजे देशगौरव. निशापुरी हे इराणमधील एका गावाचे नाव आहे. अवधचा हा पहिला नवाब सआदत खां या नावाने प्रसिद्ध आहे. त्याने लखनौच्या शेख जाद्यांचा बीमोड केला आणि घागरा नदीच्या काठी, फैजाबाद येथे एका टेकडीवर आपला तंबू ठोकला. अयोध्या शहर हा फैजाबादचाच एक भाग

आहे बऱ्हाण उल् मुल्क अत्यंत पराक्रमी होता त्याने अलाहाबादच्या भवतुंत सिंगचा पराभव करून त्याला ठार मारले आणि एका लढाईत मराठ्यांचाही पराभव केला

लखनौचा शेखजादा इतका उर्मट बनला होता की, त्याने मछलीभवनच्या वेशीत एक तलवार टांगली होती कोणी कितीही मोठा असो, दिल्लीच्या बादशहाचा प्रतिनिधीही असो, पण त्याने या अक्षरश टांगत्या तलवारीला वाकून कुर्निसात करूनच पुढे जावा असा शेखजाद्याचा सक्त हुकूम होता पण बुऱ्हाण उल् मुल्क सादत खां एका हत्तीवर बसून हातात तलवार घेऊन तेथे गेला त्याने त्या शस्त्राने शेखजाद्याची टांगती तलवार तोडली आणि शेखजाद्याला फर्मावले, "मछली-भवन खाली कर आणि माझ्या ताब्यात दे" शेखजाद्याने त्याला संमती दिली आणि आपला मछली भवन हा किल्ला खाली करण्यासाठी एका आठवड्याची मुदत मागून घेतली त्या मुदतीत शेखने सर्व किंमती वस्तू घेऊन पलायन केले आणि सआदत खां हा एकमेव नवाब झाला त्याने लखनौ हीच राजधानी ठेवली, पण बहुतेक काळ तो फैजाबादलाच राहत असे त्याने सैन्याचे अधिकारी व सैनिक यांच्यासाठी अनेक मोहल्ले, इमारती व बागा बांधल्या पण तो फार काळ नवाब म्हणून राहू शकला नाही सहा वर्षांनी १७३८ मध्ये त्याला दिल्लीला तातडीने जावे लागले कारण इराणच्या नादिरशहाने दिल्लीवर स्वारी करून भयंकर लुटा-लूट चालवली होती व लोकांचा छळ सुरू केला होता बादशहाच्या हुकमाप्रमाणे सआदत खां याने आपला भाचा सफदरजंग याला लखनौमध्ये प्रतिनिधी नेमून तो स्वत सैन्यासह दिल्लीला गेला, पण नादिरशहा दिल्लीला असतानाच सआदत खांचा अंत झाला

नवाब सफदरजंगने लखनौचा चांगला विकास केला. मछलीभवनाजवळची सातशे एकर जमीन घेऊन त्याने त्या जागेवर अनेक इमारती बांधल्या पण नवाब म्हणून त्याने पाच वर्षे कारभार पाहिल्यावर बादशहाने त्याला दिल्लीला बोलावून घेतले आणि राजा नवलरायला त्याच्या जागी पाठवले नवलराय हा शिस्तीचा, ज्ञानोपासक, शूर आणि उद्योगी होता पण बंगशसारख्या बलाढ्य शत्रूबरोबर युद्ध करताना तो मारला गेला १७५३ मध्ये सफदरजंग पुन्हा अवधचा नवाब झाला पण अल्पावधीतच त्याचं निधन झाल्याने त्याचा मुलगा शुजा उद्दौला हा अवधच्या गादीवर आला

नवाब शुजाउद्दौला याला नगररचनेची अतिशय आवड होती तो दररोज स्वत घोड्यावर बसून शहराची पाहणी करीत असे त्याच्यामागून फावडी व कुदळी घेऊन कामगार जात कोणी आपल्या घराचा अगर दुकानाचा भाग वाढवून

रस्त्यावर आणला असेल तर नवाब तेथल्या तेथे तो भाग पाडून टाकीत असे त्याने फैजाबाद ही आपली राजधानी केली होती, तरी तेथे ते चार महिने राहत आणि बाकीचा काळ अवधच्या इतर भागात दौऱ्यावर असत त्यांच्या कारकीर्दीत फैजाबाद हे सौंदर्य व कलेच प्रमुख केंद्र बनल मोठमोठे गायक, कवी, कलावत, व्यापारी, सधन जमीनदार यांनी फैझाबादला भरभराट आणली शिक्षणाचीही खूपच प्रगती झाली गुजरात, काश्मीर, काबूल, पेशावर अशा दूरदूरच्या ठिकाणांहून विविध शाखेचे विद्यार्थी फैझाबादच्या पाठशालात शिक्षणासाठी येऊ लागले नवाब शुजाउद्दौलाला गायन, काव्य आणि नृत्य याची आवड होती त्यामुळ तवायफ किंवा नृत्य-गायनात निपुण अशा स्त्रियांची त्याच्या काळात भरभराट झाली अनेक कलावतिणी आपल्या तबूसह नवाब शुजाउद्दौलाबरोबर दौऱ्यावरही जात अवधच्या पहिल्या नवाबाना युद्धाकडे आणि सैन्याच्या बडदास्तीकडेच लक्ष द्यावे लागले होते पण शुजाउद्दौलाच्या कारकीर्दीपासून अवधची कलात्मक परपरा सुरू झाली, ती अद्याप टिकून आहे शुजाउद्दौला याच्या कारकीर्दीतही दोन मोठी व महत्त्वाची निर्णायक युद्धे झाली एक पानिपतच आणि दुसर बक्सरच तरी पण त्याची कलात्मक आवड त्यामुळ कमी झाली नाही शुजाउद्दौलाकडे प्रचड सैन्य होते त्यात तीस हजार खडे सैन्य, चाळीस हजार प्यादे आणि बावीस हजार हेर होते त्याशिवाय अठरा हजार स्वयपाकी, बाजारबुणगे वगैरे त्याच्या पदरी होते त्याची एकदर कारकीर्द नऊ वर्षांचीच झाली असली, तरी अवधच्या सास्कृतिक जीवनावर तिचा दूरगामी परिणाम झाला १७७३ मध्ये नवाब शुजाउद्दौलाने पश्चिमेवर स्वारी करून मराठ्याच्या ताब्यात असलेले इटावा घेतले आणि बगशच्या राज्यात जाऊन हाफिज रहमतखाच्या पठाण सैन्याचा पराभव केला पण त्यानतर थोड्यात काळात १७७४ मध्ये शुजाउद्दौलाचा मृत्यू झाला

अवधच्या नबाबाचे मद्य, जेवण, गाणे बजावणे, नृत्य, शेरशायरी म्हणजे त्या त्या क्षेत्रातला अखेरचा शब्द केवळ खाण्याची गोष्ट घेतली तर दिल्लीच्या बादशहांनीही जेवणाचे वैभव भोगले नाही, ते लखनौच्या नवाबांनी उपभोगले नवाब शुजाउद्दौलाच्या काळात प्रत्येक भटारखान्यातून त्याचे जेवण येई भटारखान्याचा प्रमुख हा फार महत्त्वाचा अधिकारी समजला जाई स्वयपाकी, त्याच्या हाताखालचे नोकर, त्याच्यावरचे निरीक्षक वगैरे सर्वांचा पगार वगळता नवाबांच्या जेवणाला जो खर्च येई, तो दररोज दोन हजार रुपये होता[1] म्हणजे लखनौचा नवाब एकावेळी एक हजार रुपयाचे खाद्यपदार्थ खात असे त्याच्या प्रमुख स्वयंपाक्याला दरमहा बाराशे रुपये पगार होता दिल्लीच्या सम्राटाच्या स्वयपाक्यालाही कधी इतका पगार मिळाला नाही नवाबाचा स्वत चा भटारखाना होता. त्याचा प्रमुख मिर्झा हसन नावाचा पाकशास्त्र तज्ज्ञ होता नवाबचाच दुसरा भटारखाना

होता तिसरा होता बहुबेगमचा नबाबाच्या आईचा चौथा भटारखाना होता बहु बेगमचे दोन बधू मिर्झा अलीखान आणि सालार जग याचे दोन शाही भटारखाने होते या सहाही भटारखान्यांकडून आलेले जेवण बहुबेगम या नबाबाच्या पट्ट-राणीच्या स्वाधीन करण्यात येत असे प्रत्येक भटारखान्याकडून पुलाव, परोटा, कुर्मा, कबाब, बिर्याणी, चपाती, चटणी, लोणचे असे तीस-पस्तीस प्रकारचे खाद्य पदार्थ येत असत नबाब शुजाउद्दौला जेव्हा जेवण्यासाठी बसे, तेव्हा त्याच्यासमोर उत्तमोत्तम असे दीडशे ते दोनशे खाद्यपदार्थ माडून ठेवले जात । नवे नवे पदार्थ बनविण्यात सहाही भटारखान्यात स्पर्धा चाले चाळीस प्रकारचा पुलावच तयार करण्यात येत असे दूरदूरच्या ठिकाणाहून खास पाककलेतील तज्ज्ञ मागवले जात त्याना भरपूर पगार दिला जाई जमिनीवर अथरलेल्या पर्शियन उची गालिच्यावर नबाब बसत असे त्याच्यासमोर ‘ दस्तर ख्वान ’ नावाचा प्रचड आकाराचा नक्षीदार उची फडका पसरला जाई त्यावर उर्दू आणि पर्शियनमध्ये कविता लिहिलेल्या असत या ‘ दस्तर ख्वान ’वर दीड-दोनशे खाद्यपदार्थ कलात्मकतेने माडून ठेवलेले असत मग नबाब मद्याचे पेले रिचवीत, नृत्य पाहत, मुशायरी ऐकत चवीने दोन—तीन तास भोजन करीत असे कारण भोजन हाच नबाबाचा मुख्य उद्योग असे ।

जेवणात अनत प्रकार करण्यात येत कधीकधी पन्नास-साठ वेगवेगळे खाद्य-पदार्थ तयार करण्यात येत पण खाणारा त्याची प्रत्यक्ष चव घेऊ लागला की त्याच्या लक्षात येई की वरवर वेगळे वाटणारे हे सर्व प्रकार खरे एकच आहेत वजीद अली शहाला एकदा एक जेवण देण्यात आले त्यावेळी त्याच्या दस्तर-ख्वानावर बिर्याणी, चपाती, पुलाव, कबाब असे साठ-सत्तर पदार्थ ठेवण्यात आले होते पण त्याने जो पदार्थ तोंडात घातला तो साखरेचाच आहे हे त्याला कळून चुकले ! इतकेच नव्हे, ज्या टेबलक्लॉथवर किंवा दस्तर ख्वानवर हे पदार्थ ठेवले होते, तोही साखरेचाच होता । अशा वैचित्र्यपूर्ण पाकशास्त्रावर लखनौचे नबाब लक्षावधी रुपये उधळीत होते दिल्लीची बिर्याणी आणि लखनौचा पुलाव आजही सर्वत्र बिनतोड म्हणून प्रसिद्ध आहे. नसीर हैदर नावाचा लखनौचा स्वयपाकी सत्तर प्रकारचा पुलाव करीत असे. त्याला ‘ तादळाचा राजा ’ असा किताब होता तो इतका कसबी होता की त्याने एकदा काजू कापून तांदळासारखे केले त्या काजूचा त्याने पुलाव केला प्रत्यक्ष खाऊन पाहीपर्यंत हा तांदूळ नसून काजू आहे याची कुणालाही कल्पना आली नाही इतके ते काजू हुबेहूब तांदळासारखे कापले होते चिकन मसाला खुशबूदार व्हावा म्हणून कोंबड्यांना कस्तुरीचा खुराक घाल-ण्यात येत असे तो सुगध कोंबड्याच्या अगात चागला मुरल्यावर मगच त्या कापून नबाबाना खिलवल्या जात असत खाण्यापिण्याची अशी चैन अलम दुनियेत इतर कोणीही केली नाही असे म्हणतात

भाऊ बनारसला होता आपल्याला अवधचे राज्य मिळेल, असे त्याला स्वप्नातही वाटले नव्हते अशा वेळी एका इंग्रज अधिकाऱ्याने त्याला कावेबाजपणाने प्रश्न केला, "तुम्हाला अवधचे राज्य इंग्रजांनी दिले, तर तुम्ही काय कराल ?" सआदत अली चटकन म्हणाला, "तर मी अर्धे राज्य इंग्रजाना देईन " इंग्रजाने त्याच्याकडून तसे आश्वासन घेऊन मगच त्याला नवाब केले वचन दिल्याप्रमाणे गादीवर आल्यावर नवाब सआदत अलीने अयोध्या प्रांताच अर्धं राज्य इंग्रजाना दिल आणि आपण अर्ध्याच अवधचा नवाब राहण मान्य केल

मात्र आपण अविचारान, अदूरदर्शीपणान अर्धं राज्य घालविल, याची खत सआदत अलीला जन्मभर राहिली गादीवर आल्याबरोबर त्यान कारवाया करण्यास सुरुवात केली, सैन्यात व नोकरात कपात केली, पण त्यामुळ त्याच्या विरुद्ध असतोष वाढू लागला त्याचा खून होण्याची शक्यता आहे, असं सागून इंग्रजानी त्याच्या रक्षणासाठी म्हणून त्याच्याभोवती व लखनौ शहरात आपले गार्ड ठेवले त्याचा खर्चही नवाब सआदत अलीवरच पडला तरीही त्यान मोठ्या चातुर्यान व काट-कसरीन कारभार करून बावीस कोटी रुपयांची शिल्लक टाकली कधी ना कधी आपण इंग्रजाचेकडून आपल गमावलेल अर्धं राज्य परत घेऊ, इतकंच नव्हे, तर सबध हिंदुस्थानचा कारभार ईस्ट इडियाकडून आपल्याकडे घेऊ हे याच स्वप्न होत सआदत अली खाँ याने बारादरीची इमारत आपल्या दरबारासाठी बाधली, रेसि-डेंटच्या निवासासाठी इमारत बांधली, दिल आराम हा महाल बाधला आणि जनरल मार्टिनकडून फरहतबक्ष महाल विकत घेतला लष्कराच्या विभागात त्याने 'दिलखुष' ही इमारतही बांधली त्याशिवाय इतर अनेक इमारतींबरोबरच जगली गज, मौलवी गज, गोल गज, रास्तोगी गज इत्यादी अनेक बाजारपेठा या त्याच्याच कर्तबगारीची साक्ष देतात मितव्ययी असूनही सआदत अली खाँने लखनौच्या विकासाकडे भरपूर लक्ष पुरविले कवी, लेखक, नृत्य-सगीत विशारद यानाही त्यान चागल उत्तेजन दिल वारेमाप उधळपट्टी न करता त्याने या कलांचा परिपोष केला १८१४ मध्ये त्याचे निधन झाले आणि अवधच्या गादीवर त्याचा मुलगा गाजी-उद्दिन हैदर आला

गाझीउद्दिन हैदरच्या कारकीर्दीत अवधच्या नवाबांच्या दर्जात अत्यत महत्त्वाचा फरक पडला तो म्हणजे अवधचे नवाब हे बादशहा' झाले गाझीउद्दिन हैदर जेव्हा गादीवर आला, तेव्हा त्याच्या बापाने साठवलेला कोटचवधी रुपयाचा खजिना आयताच त्याच्या हाती आला त्यामुळे सुखोपभोगात राहण्याची सधी तर त्याच्या-पुढे हात जोडून उभी होतीच, पण 'नवाब' या 'दुय्यम' या अर्थाच्या बिरुदावर त्याचे समाधान होईना त्याने ईस्ट इडिया कपनीला विनती केली की, दिल्लीच्या बादशहाप्रमाणेच आपल्यालाही 'बादशहा असे सबोधण्यात यावे त्यासाठी

ब्रिटिशांना प्रचंड रक्कम देण्याचीही तयारी त्याने दाखविली ब्रिटिशांनी या सूचनेचा तत्काळ विचार केला त्याला 'बादशहा' ही पदवी सुपूर्त करण्यात इंग्रजांचे अनेक फायदे होते एक तर आठ-दहा कोटी रुपये नगद मिळणार होते दुसरे असे की, दिल्लीच्या बादशहाला शह मिळणार होता आणि तिसरा फायदा असा की आपण 'बादशहा' हा किताब निर्माण करू शकत असल्याने साहजिकच आपण बादशहा-पेक्षा श्रेष्ठ आहोत याची इंग्रजांना जाणीव होती एवीतेवी अवधचे नवाब हे ब्रिटिशांच्या हातचे खेळणे होते त्याला जहांपन्हा, शहेनशहा, बादशहा अशी निरुपद्रवी बिरुदे बहाल करण्याने ब्रिटिशांचे काहीच नुकसान नव्हते, उलट फायदाच होता अखेर त्यांच्या कृपेने गाझी हैदर 'बादशहा' झाला आणि ते बिरुद अवधच्या शासनकर्त्यांना अखेरपर्यंत वापरता आले या उत्सवानिमित्त हैदरने मच्छीभवन-जवळ गंज नावाचा नवा बाजार वसवला 'मुबारक मंझिल' आणि 'शाह मंझिल' हे दोन नवे महाल त्याने बांधले त्याची एक पत्नी युरोपियन होती तिच्यासाठी त्यान विलायती बाग हा महाल बांधला महंमदाच्या पावलाचा छाप असलेला काळा संगमरवरी दगड पूजास्थानी मांडून त्याने 'कदम रसूल' ही इमारतही उभारली

गाझीउद्दिन हैदर आणि त्याची पत्नी बादशहाबेगम हे पराकोटीचे धार्मिक वृत्तीचे होते हैदर आणि त्याचे वंशज मूळ इराणमधून आले होते म्हणून ते शिया पंथी होते बारा इमामांना मानणारा तो शिया पंथी हैदर या सर्व इमामांच्या जन्मोत्सव आणि छटी म्हणजे सहाव्या दिवसाचा उत्सव करीत असे बादशहाच्या काही आचरट धर्मकृत्यास विरोध करण्याची कोणा अधिकाऱ्याची हिंमत नव्हती. कारण हैदर लहरी आणि क्रोधी होता हैदरला अखेरच्या काळात एक वेगळा छंद लागला होता, तो म्हणजे हत्ती, रेडे, एडके इत्यादी पशूंची झुंज लावण्याचा. रोमन सम्राट असे खेळ पाहत हे त्याला युरोपियन प्रवाशाकडून कळल्याने त्याने लखनौत ही प्रथा सुरू केली लखनौचे बादशहा असे वैयक्तिक आनंद आणि धर्मकृत्यात गुंतून राहणे हे ब्रिटिशांच्या हिताचेच होते कारण त्यामुळे त्यांचा राजकारणात ब्रिटिशांना उपद्रव होत नसे तेरा वर्षे गादीवर राहून १८२७ मध्ये हैदर निधन पावला आणि त्याचा मुलगा नसिरुद्दिन याच्या नावाने द्वाही फिरविण्यात आली

या वेळपर्यंत ब्रिटिशांनी अवधवर आपली पकड पक्की केली होती बादशहाची सत्ता नावापुरतीच होती ब्रिटिश सैन्य अवधमध्ये सर्वत्र विखुरले होते राज्यावर कोणी बसायचे याचा निर्णय ब्रिटिशच घेत असत बादशहा आणि त्याच्या बेगमा ख्यालीखुशालीत आणि धार्मिक कृत्यात आपला वेळ व पैसा घालवीत असत रोमन साम्राज्याच्या अखेरच्या काळाप्रमाणे आता अवधच्या ऱ्हासाचा काळ सुरू झाला होता आधीच दुर्बळ झालेल्या बादशहाकडून इंग्रज मोठमोठ्या रकमा कर्जाऊ म्हणून

घेऊन त्याना अधिकच निःसत्व करीत होते नसिरउद्दीनला खगोलशास्त्राची आवड होती कर्नल विलकॉक्स यांच्या मार्गदर्शनाखाली त्यान एक वेधशाळाही उभारली आणि अनेक अद्ययावत दुर्बिणी आणून ती सज्ज केली, पण नतर ही वेधशाळा इतकी दुर्लक्षित झाली की वजीद अली शहाने एक खेळणे समजून त्यातील सर्वांत मोठी दुर्बीण एका कलावतिणीला बक्षीस दिली। तिलाही तिचे काय करायचे हे समजेना तिने भंगार म्हणून ती फुकून टाकली

नसिरुद्दीन हा नेहमी बायकांत व कलावतिणींत रमत असे राज्याचा कारभार अर्थातच वझीराकडे असे धर्मकृत्ये, नाचगाणी आणि सुखोपभोग यात बादशहा सपूर्णपणे बुडून गेलेला असे तो बायकी, लहरी आणि क्रूर झाला त्याच्याविरुद्ध त्याचे आजूबाजूचे अधिकारीच उभे राहिले आणि १८३७ मध्ये विषप्रयोग करून नसिरुद्दीनला मारण्यात आले तो निपुत्रिक असल्याने वारसाबद्दल वाद निर्माण झाला त्याच्या आईने आपला नातू घाईघाईने गादीवर बसवला, पण ब्रिटिश रेसिडेंटने प्रचड सैन्य आणले व राजवाड्यावर तोफांचा मारा सुरू केला नवा बादशहा मुन्नाजान आणि त्याची आई याना अटक करून चिनारगडाला तुरुंगात पाठवण्यात आल त्रेसष्ट वर्षांच्या महमद अली शाह याला ब्रिटिशानी अवधचा बादशहा केले. अवधची कर्तुमकर्तुम् सत्ता ब्रिटिशाच्या हाती आहे हे आता निखालसपणे सिद्ध झाल महमद अली शाहबरोबर ब्रिटिशानी नवा करार केला त्यानुसार लखनौमधील इग्रज सैन्यात बरीच वाढ करून त्याचा खर्च बादशहावर बसविण्यात आला प्रत्येक नव्या बादशहाकडन ब्रिटिश नव्या नव्या सवलती व फायदे उकळीतच राहिले आणि दुर्बल झालेले नामधारी ' बादशहा ' त्या करारावर निमूटपणे सह्या करू लागले

महमद अली वयाच्या त्रेसष्टाव्या वर्षी राज्यावर आला, तरी तो उत्साही आणि नवे काही करावे या प्रवृत्तीचा होता बॅबिलॉन शहराविषयी त्याने खूप ऐकले होते आणि लखनौ हे बॅबिलॉनसारखे शहर करावे अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती गादीवर आल्यानतर थोड्याच काळात त्याने हुसेनाबादचा देखणा इमामवाडा बाधण्यास सुरुवात केली त्यान बॅबिलॉनच्या मनोऱ्याच्या धर्तीवर एक सात मजली उच इमारत बाधायला घेतली आणि ही जगातील सर्वांत उच वास्तू ठरावी अशी आपल्या अधिकाऱ्यांना आज्ञा दिली रुमी दरवाजापासून हुसेनाबाद इमामवाड्याच्या प्रवेशद्वारापर्यंत गोमती नदीच्या काठान एक रम्य व भव्य रस्ता बाधण्यात आला जामा मशीद, इमामवाडा, रूमी दरवाजा, अनेक इमारती व उद्यान यामुळ त्या काळी लखनौचा हा भाग जगातील अत्यत सुदर परिसरात मोडत असे या सत्प्रवृत्त, उत्साही बादशहाला फार काळ मात्र राज्य करता आल नाही १८४२ मध्येच त्याचा अत झाला आणि त्याचा मुलगा अमजदअली सिंहासनावर आला त्याला चांगले वळण लागावे म्हणून अहमद अलीन लहानपणापासूनच त्याला

मौलवी व धर्मपंडिताच्या सहवासात ठेवलं होतं, पण धार्मिक शिक्षणाचा तरुण अमजदवर एवढा मारा झाला की राज्यकारभाराला आवश्यक अशा शिक्षणापासून तो पारखा राहिला व स्वतःच एक धर्मपरायण मौलवी बनला सरकारचा बराच खजिना दानधर्म आणि मौलवींचा आदरसत्कार यात खर्ची पडू लागला बादशहाचे राज्यकारभाराकडे दुर्लक्ष झाल्यामुळे स्वार्थी अधिकाऱ्याची चंगळ झाली आणि भ्रष्टाचाराला ऊत आला मात्र अमजदअलीच्या दोन कार्यांमुळे त्याची छाप अद्या-पही लखनौवर पडली आहे हजरतगंज ही नवी आधुनिक पेठ त्यानं वसवली आणि नदीवर लोखंडी पूल बांधला या पुलासाठी गाजीउद्दीन हैदरने इंग्लंडहून सामग्री मागवली होती, ती नसिरुद्दीनच्या काळात आली पण पुलाची पूर्तता केली ती मात्र सिंक्लेअर या इंजिनिअरच्या मार्गदर्शनाखाली महमद अलीनं अमीनाबाद ही वसा-हतही त्याच्याच कारकीर्दीत वसली राज्यावर आल्यावर सहा वर्षांनीच हा धर्म-परायण बादशहा कॅन्सरच्या विकाराला १८४८ साली बळी पडला त्याचा मोठा मुलगा वजिदअली शहा हा बादशहा झाला पण तो अवधचा शेवटचा बादशहा ठरला

मात्र वजीद अली हा अनेक दृष्टीने अवधचा सर्वांत लक्षणीय असा बादशहा होता त्याला संगीताची उत्तम अभिरुची होती तो केवळ श्रोता नव्हता, तर त्यानं स्वतः संगीताचं व नृत्याचं पद्धतशीर शिक्षण घेतलं होतं त्याच्या कारकीर्दीत लखनौमध्ये गायिका, कलावंतिणी, तवायफ यांना समृद्धी आली संगीताच्या मैफली आणि इतर विलास यासाठी त्यानं मनोहर उद्यान व अनेक बंगले बांधले सुरुवातीला त्यानं राज्यकारभारात इतकं लक्ष घातलं की तो घोड्यावरून शहरात फेरफटका मारीत असे, तेव्हा त्याच्याबरोबर चांदीच्या दोन पेट्या असत नागरिकांनी त्या पेट्यात तक्रार अर्ज टाकायचे आणि स्वतः बादशहा वजीद अलीनं नंतर त्या पेट्या उघडून प्रत्येक अर्जावर निर्णय द्यायचा अशी त्यानं शिस्त ठेवली पण वर्षभरातच त्याचा हा उत्साह संपुष्टात आला नाचगाणी, शेरशायरी इत्यादींतच त्याला अधिक रस वाटू लागला आणि ही, जनतेच्या तक्रारी नमूद करण्याची फेरी बंद झाली पण त्याने ‘दस्तूर-ए-वजिदी’ नावाचे ६६ प्रकरणांचे राज्यकारभारविषयक नियमांचे पुस्तक तयार करून घेतले आणि वजीद व इतर अधिकाऱ्यांना त्या नियमानुसार कारभार पाहण्यास सांगितले अमाप पैसा छंद-फंदावर उधळूनही त्याने आपल्या नऊ वर्षांच्या कारकीर्दीत दोन कोटी रुपये शिल्लक टाकले त्याला फळफळावळीची आवड असल्याने आंबा, कलिंगडे, काकडी यांच्या प्रचंड बागा त्याच्या कारकीर्दीत तयार झाल्या त्याने धार्मिक भेदभाव न करता सर्व धर्मीयांना समान वागणूक दिली सैन्याची पुनर्रचना करून वजीद अलीने वेगवेगळ्या कार्यक्षम, युद्धनिपुण अशा पलटणी तयार केल्या तरुण स्त्रियांचेही एक युद्धपथक त्याने तयार केले होते या

पार्श्वभूमीवर जेव्हा १८५७ चे स्वातंत्र्यसमर सुरू झाले, तेव्हा संबंध भारतात सर्वांत अधिक काळ लढा चालू ठेवला तो अवधने कार्ल मार्क्स यांनीही आपल्या 'नोटस् ऑन इंडियन हिस्टरी' या ग्रंथात अवधच्या या प्रतिकाराची प्रशंसा केली आहे

वजीद अलीच्या कारकीर्दीत लखनौचा अपूर्व विकास झाला संगीत, नृत्य, काव्य यांना बहर आला आणि लखनौची 'तहजीब' किंवा संस्कृती निर्माण झाली पतंग उडविणे, तितिर पक्ष्यांच्या चढाओढी लावणे, कोंबडयाच्या झुंजी, कबुतरांच्या चढाओढी लावणे, यांनी शहराचा चौक न् चौक आणि कोपरा न् कोपरा भरून गेला पान खाण्यात नजाकत आली एकमेकांशी बोलताना लखनौची आदब ही खानदानी आणि इतर भागापेक्षा उच्च प्रतीची समजली जाऊ लागली सरोद, शहनाई, तबला इत्यादी वाद्यांचे आवाज सर्वत्र घुमू लागले कथ्थक या खास लखनवी नृत्याचा हा उत्कर्ष काळ होता कचनी, चुनावाली आणि नागरात अशा तीन प्रकारच्या कलावंतिणींचे तांफे उंच हवेल्या व्यापून राहू लागले बादशहा वजीद अली स्वतः रासक्रीडेत भाग घेत असे– आपण कृष्ण बनून तो कलावंतिणींना किंवा बेगमांना गोपींच्या भूमिका देऊन नृत्य करीत असे पौराणिक कथांवरील नाटकांचीही या काळात चलती झाली मोहरमच्या दिवसात ताशियांच्या भव्य मिरवणुका निघू लागल्या इतक्या वैभवशाली मिरवणुका संबंध भारतात इतरत्र कोठेही निघत नसत स्वतः वजीद अली हा उत्तम ताशा-वादक होता नौटंकी या उत्तरेतील संगीतप्रधान तमाशात ताशाला जे महत्त्व आहे, त्याचा उगम लखनौमध्ये या काळात झाला बगदाद आणि दमास्कस येथील नौबतची परंपरा लखनौला आली आणि नौबत वाजविण्याचे तांफे तयार झाले पहाटेपासून रात्रीपर्यंत सात वेळा नौबत वाजवून वेळ किती झाला, किंवा किती वाजले ते जनतेसाठी जाहीर करण्यात येई मोहरमच्या किंवा विवाहाच्या मिरवणुकांतून लखनौला जेवढी वाद्ये आणि विविधता दिसत असे, तशी भारतात इतर कोणत्याही शहरी पाहायला मिळत नसे लखनौचे बँड वजीद अलीच्या काळापासून प्रसिद्ध आहेत व ती परंपरा आजही चालू आहे शिंग, कर्णा, बुगुल, डंका अशी अनेक वाद्ये मिरवणुकीत गहजब करीत असत

कलेचा असा उत्कर्ष होत असताना बादशहा वजीद अलीचे वैयक्तिक जीवनातील सुखोपभोग शिगेला पोचले होते वजीद अलीने त्याला जी जी स्त्री आवडली, तिच्याशी त्याने विवाह केला मग तिला वेगळा महल, साहाय्यक स्त्रिया, सेवक आणि तनखा यांची तरतूद केली जाई असे करता करता त्याच्या बेगमांची संख्या ३६५ झाली। निरनिराळ्या बेगमांच्यावर तो कविता करीत असे आणि दरबारी लोकांच्या समोर बिनदिक्कत त्या मोठ्याने वाचून दाखवीत असे कारभारातील शिथिलता आणि अनाचार यांची सीमा झाली या अनाचाराकडे ब्रिटिश

रेसिडेंट बारकाईने लक्ष ठेवून गव्हर्नर जनरलकडे गुप्त अहवाल पाठवीत होता पुढे पुढे तर बादशहाच्या दातृत्वाचा लाभ घेण्यासाठी अनेक लफंगे मौलवी, धर्मगुरू बनत आणि तनखा घेऊन अमली पदार्थांच्या नशेत डुबून जात राजा आणि प्रजा पूर्णपणे सुखोपभोगात दंग झाली आहे याची खात्री झाल्यावर १८५६ मध्ये अचानक ब्रिटिश सैन्य लखनौत शिरले. रेसिडेंटने बादशहा वजीद अलीला ईस्ट इंडिया कंपनीचा निर्णय वाचून दाखवला, "तुमचा प्रांत ब्रिटिश मुलखात समाविष्ट करण्यात आला आहे यापुढे अवधचा संपूर्ण कारभार ब्रिटिश अधिकारी पाहतील तुम्हाला सालीना बारा लक्ष रुपये तनखा दिला जाईल तुमच्या सेवकांना त्याशिवाय वेगळा सालिना तीन लक्ष रुपयाचा तनखा मिळेल" बादशहाने खूप विनवण्या करून पाहिल्या पण त्याचा उपयोग झाला नाही म्हणून तो आपले विश्वासू सहकारी आणि निवडक बेगमाना घेऊन कलकत्त्याला गेला तेथून इंग्लंडला जायचे आणि ईस्ट इंडिया कंपनीच्या या कृत्याविरुद्ध ब्रिटिश सरकारकडे अपील करायचे अशी त्याची योजना होती आपल्या अपिलाला बळकटी यावी म्हणून त्याने ब्रिटिशांचा तनखाही स्वीकारला नाही पण कलकत्त्याहून स्वत इंग्लंडला न जाता वजीद अलीने आपला वारस, आई आणि भाऊ याना या कामासाठी इंग्लंडला पाठवले एवढ्यात १८५७ चे स्वातंत्र्य युद्ध सुरू झाले त्याचा फायदा घेऊन ब्रिटिशांनी त्याला कळवले की 'ज्या प्रांताबद्दल हा वाद आहे तो आमच्या ताब्यात नसल्याने या अपीलाचा विचार करता येत नाही!' अखेर वजीद अलीला आपला अर्ज मागे घेऊन ब्रिटिश देतील तो तनखा घेऊन स्वस्थ बसावे लागले ब्रिटिशांनी त्याला सालिना बारा लाख दिले, पण त्याच्या सेवकांना तीन लक्ष रुपये देण्यास नकार दिला अवधच्या स्वातंत्र्याची अशी अखेर झाली

कलकत्त्याच्या मटिया बुराज (मातीचा बुरूज) या भागात वजीद अली पुन्हा ख्यालीखुशालीत राहू लागला व त्याने तेथे भव्य प्राणिसंग्रहालय व पशुसंग्रहालय बांधले त्यातील नोकरांची संख्या हजारावर होती तेथे पंचवीस हजार कबुतरे पाळण्यात आली होती आयुष्यातील उताराचा काळ आता पशुपक्ष्यांच्या संगतीत घालवून अवधचा शेवटचा बादशहा वजीद अली १८८७ मध्ये निधन पावला

*

# प्रेक्षणीय नगरी— लखनौ

रामाने अयोध्येची स्थापना केल्यावर लक्ष्मणाने गोमती नदीच्या काठी शहराची स्थापना केली, त्याला लक्ष्मणपूर म्हणू लागले त्याचे पुढे लखनावती असे रूप झाले आणि कालांतराने लखनावतीचा अपभ्रंश लखनऊ असा झाला आपण इंग्रजी स्पेलिंगवरून ज्याचा लखनौ असा उच्चार करतो, त्याचे उत्तर प्रदेशातील आणि भारत सरकारच्या अधिकृत कागदपत्रातील नाव 'लखनऊ' असेच आहे 'लखनऊ के निर्माता श्री लक्ष्मणजी' असा मजकूर असलेले पुतळे लखनौ शहरात आहेत 'लक्ष्मण टीला' या नावाची जी प्राचीन इमारत एका तळ्याच्या ठिकाणी आजही आहे, ती प्राचीन लखनौची सुरुवात असे मानले जाते रामायणात असा उल्लेख आहे, की रामाच्या आज्ञेप्रमाणे लक्ष्मणाने सीतेला कौशलच्या सीमेबाहेर सोडण्यासाठी बरोबर घेतले वाटेत तो गोमतीच्या किनारी थांबला लखनौ आणि कानपूर याच्यामध्ये कोसी नदी आहे लक्ष्मण रात्री जेथे राहिला, तेथेच त्याने ही लक्ष्मणपुरी नगरी वसविली, असे मानले जाते 'लक्ष्मण टीला' ही प्राचीन वास्तू दोनशे मीटर लांब, एकशेवीस मीटर रुंद आणि पाच मीटर उंच आहे या भागात केलेल्या उत्खननात प्राचीन काळातील अनेक मूर्ती व भांडी सापडली आहेत मुस्लीम बादशहाच्या अमदानीत शहापीर महमदने या लक्ष्मण टीलाचा ताबा घेतला आणि 'पीर महमदका टीला' असे त्याचे नाव पडले पण नंतर त्याचे पूर्वीचे लक्ष्मण टीला हे नावच पुन प्रचारात आले औरंगजेबाने या इमारतीजवळ बांधलेली मशीद अजूनही तेथे आहे राजा शालिवाहनांच्या काळातही 'लक्ष्मण टीला' हे एक तीर्थस्थान म्हणून प्रसिद्ध होते या लक्ष्मण टीलामध्ये एक शेष मंदिर होते लोककथेनुसार त्रेतायुगात लक्ष्मणाने शेषावतार घेतला होता म्हणून या ठिकाणी शेष मंदिर होते छोटी काशी म्हणूनही लक्ष्मण टीला प्रसिद्ध आहे

लखनौपासून सोळा मैलावर नैमिषारण्याच्या दिशेला गोमती नदीच्या काठी सिद्धदेवी मंदिर आहे जवळच एक लहानसा मठ आहे लक्ष्मणाचा ज्येष्ठ मुलगा राजकुमार चंद्रकेतू जेव्हा अश्वमेधाचा घोडा घेऊन निघाला, तेव्हा तो या ठिकाणी एका अमावस्येच्या रात्री मुक्कामाला होता म्हणून अजूनही दर अमावस्येला सिद्ध-देवीची यात्रा भरते चंद्रकेतूची माता उर्मिला हिने त्याच्या दंडावर बांधलेल्या मंतरलेल्या ताईतामुळे अमावस्येला भर जंगलात त्याचे रक्षण झाले अशी लोककथा आहे बाराव्या शतकात कुतुबुद्दीन सैयदने या मंदिराचा काही भाग उद्ध्वस्त केला होता लखनौ येथील देवी मंदिरात शंकराचार्यांनी दिग्विजय मोहिमेला देवीची प्रतिष्ठापना केली होती या शहरात अनेक शिवमंदिरे आहेत त्यातले कोपकेश्वर महादेव मंदिर विशेष प्रसिद्ध असून ते रामायणकालीन आहे, असे सांगण्यात येते लखनौमध्ये मनकामेश्वर, बुद्धेश्वर आणि सिद्धेश्वर ही शिवमंदिरेही खूपच जुनी आणि महत्त्वाची आहेत उत्तर भारतात आणि महाराष्ट्रात हनुमान मंदिर फार मोठ्या संख्येने आढळतात लखनौमध्येही रामभक्त हनुमान हा भक्तप्रिय देव आहे विशेष म्हणजे येथील अलीगंज भागातील हनुमान मंदिर मुस्लीम राज्यकर्त्यांच्या एका बेगमेने बांधलेले आहे या मंदिराच्या शिखरावर मुस्लीम धर्माची निशाणी म्हणून अर्धचंद्र आहे कुआँ का मंदिर म्हणून प्रसिद्ध असलेल्या हनुमान मंदिरात संत तुलसीदासाचे काही काळ वास्तव्य होते संकटमोचन हनुमान मंदिरात लोकांची रीघ लागलेली असते आणि संकटातून वाचविण्यासाठी हनुमानाला साकडे घाल-ण्यात येते लखनौ हे हिंदुमुस्लीम एकतेचे निदर्शक मानले जाते कारण या शहरात हिंदू शासनकर्त्यांनी बांधलेल्या मशिदी आणि मुस्लीम बादशहा व नबाब यांनी उभारलेली मंदिरे आढळतात तसेच श्वेतांबर जैनांची १५ मंदिरे या शहरात असून दिगंबर जैनांचीही मंदिरे आहेत लखनौचा एक मध्यवर्ती भाग म्हणजे अमीनाबाद तेथे प्राचीन बुद्धमठाचे अवशेष सापडले आहेत जुन्या लखनौमध्ये एक गुरुद्वारा आहे तेथे शिखांचे दशम गुरू गोविंदसिंग हे तीर्थयात्रेवर असताना आले होते

पण दक्षिणेतील मंदिरांची भव्यता आणि कलात्मकता लखनौच्या मंदिरात नाही लखनौचे खरे वैभव म्हणजे मुस्लीम बादशहा आणि नबाब यांनी उभारलेले भव्य इमामवाडे, बारादरी आणि मशिदी केसरबाग, मच्छीभवन, पंचमहाल, बडा इमामवाडा, छोटा इमामवाडा, भुलभुलय्या, रूमी दरवाजा, रेसीडेन्सी, शहानजान मशीद, लाखी दरवाजा, असफउद्दौल्ला मशीद अशा अनेक कलात्मक वस्तूंनी लख-नौला उत्तरेतील एक अत्यंत प्रेक्षणीय शहर म्हणून कीर्ती मिळवून दिली आहे लखनौचे नबाब विलासी आणि ऐषआरामी होते हे खरेच पण त्यांपैकी काही नबाबांना प्रचंड वास्तू आणि विशाल उद्याने तयार करण्याची दुर्दम्य हौस होती. त्यासाठी त्यांनी पाण्यासारखा पैसा ओतला आणि हजरो लोकांना कामे मिळवून

दिली त्यामुळे नबाब वजिद शहा म्हणत असे,

" लखनऊ हम पर फिदा, और हम फिदाए लखनऊ
आस्मां की क्या है हिंमत, जो छुडाए लखनऊ ।।"

बडा इमामवाडा ही लखनौमधील सर्वांत महत्त्वाची आणि वैशिष्टयपूर्ण अशी वास्तू नबाब अलक उद्दौलाने १७७५ मध्ये ही इमारत बांधण्यास सुरवात केली या वेळी अवधमध्ये दुष्काळ पडला होता आणि हजारो लोक भुकेकगाल होऊन काम शोधत होते त्याना काम द्यावे या हेतूने अलफ उद्दौलाने ही भव्य इमारत बांधण्यास सुरवात केली या बांधकामावर दिवसा काम करणारे वेगळे लोक असत आणि रात्री काम करणारे निराळे असत ज्या मध्यमवर्गीयाना नाइला-जाने या दुष्काळी कामावर मोलमजुरी करावी लागे, ते लज्जेने व सकोचाने फक्त रात्रीच कामावर येत काम लवकर पूर्ण होऊ नये आणि हजारो लोकाचे अधिक काळ पोषण व्हावे म्हणून अलफ उद्दौलाचे लोक रात्री काही बांधकाम मुद्दाम पाडून ते पुन्हा बाधण्यास प्रोत्साहन देत असत नऊ वर्षांनी १७८४ मध्ये ही प्रचड वास्तू पूर्ण झाली आणि जगातील सर्वांत मोठी एकमजली इमारत म्हणून अजून तिचा लौकिक आहे । बडा इमामवाडयाची लांबी १६२ फूट, रुदी ५३ फूट आणि उची ५० फूट आहे वास्तुकलेच्या दृष्टीनेही ही इमारत म्हणजे एक चमत्कार आहे कारण या विराट इमारतीला एकाही खांबाचा आधार नाही । ध्वनियोजनेच्या दृष्टीनेही या इमारतीची रचना इतकी परिपूर्ण आहे की १५४ फुटावर या इमार-तीच्या एका टोकाला जर काडी ओढली किंवा कागदाचा कपटा फाडला तर दुसऱ्या टोकाला तो आवाज अगदी स्पष्टपणे ऐकू येतो, याचे प्रात्यक्षिकही मी पाहिले त्या काळचा अत्यत ख्यातनाम इराणी वास्तुशिल्पज्ञ किफायत उल्ला याने बडा इमामवाडयाची रचना केली आहे या सबध बांधकामात लाकूड अजिबात वापरलेले नाही या इमामवाडयात वेगवेगळ्या रचनावैशिष्टयाची तीन सभागृहे आहेत सर्वांत मोठया सभागृहाला बळकट व शोभिवत अशी तीनशे फूट गॅलरी आहे सोळा फूट जाडीच्या भितीतून जिने काढले आहेत बाधकाम अतिशय बळकट आणि पक्के आहे

नबाब असफ उद्दौला आणि त्याची बेगम याच्या कबरी मुख्य इमारतीत आहेत जवळच एक मोठा आरसा आणि मूळ सुवर्णाच्या मुकुटाची प्रतिकृती आहे या आरशाची मूळ फ्रेमही सोन्याची होती पण ब्रिटिशानी ती नेली व त्याऐवजी सोनेरी रगाची लाकडी फरेम बसविली. मुख्य सभागृहात भव्य व सुदर झुबरे आहेत मोहरमच्या काळात ती प्रकाशमान करण्यात येतात मुख्य इमारतीच्या डावीकडे भुलभुलैया नावाची इमारत आहे ती तीन मजली असून, अनेक वाटा व चकवा करणारी वळणे यामुळे अनोळखी माणसाला वाटाडयाशिवाय या भुलभुलैयात रस्ता

चकण्याचा अनुभव घ्यावा लागतो व तो त्याच त्या रस्त्यावर पुन:पुन्हा येतो म्हणून या इमारतीला भुलभुलैया असे म्हणतात तिसऱ्या मजल्यावरून लखनौ शहराचे उत्तम दर्शन घडते या भूलभुलैयासमोर एक जुनी विहीर आहे ती खूपच मोठी आणि खोल आहे बडा इमामवाड्याचे काम पूर्ण करण्यासाठी गोमती नदी-प्रमाणेच या विहिरीच्या पाण्याचाही मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात आला बडा इमामवाडा आवारातील असफी मशीद ही लखनौमधीलच नव्हे, तर उत्तर प्रदेशातील एक नामांकित मशीद आहे इमामवाडा आणि मशीद यांच्या जवळच्या आसमंतात सुंदर उद्यान आहे,

नवाब असफ उद्दौलाने बांधलेल्या इमारतींचे वशिष्टय असे की त्याची बांधणी युरोपियन धर्तीची नसून, इराणी व तुर्की धर्तीची आहे त्या कामी इमामवाड्याच्या चार बाजूंना ज्या चार भव्य कमानी होत्या, त्यापैकी एकच आज अस्तित्वात आहे ती रूमी दरवाजा या नावाने प्रसिद्ध आहे या कमानीची रचना इस्तंबूल येथील भव्य दरवाज्याच्या धर्तीवर आहे रूमी दरवाजा अतिशय कलापूर्ण आहे भारतीय चित्रपटसृष्टीने या दरवाजाचा भरपूर उपयोग करून घेतला आहे 'उमराव जान', 'सावन भादो', 'चौदवी का चांद', 'मेरे हुजूर' वगैरे गाजलेल्या अनेक हिंदी चित्रपटाचे चित्रीकरण या रूमी दरवाजाच्या पार्श्वभूमीवर झाले आहे १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धानंतर ब्रिटिश सैन्याने बडा इमामवाड्याचा ताबा घेतला तेथे दारूगोळ्याचे कोठार आणि लष्करी केंद्रही ब्रिटिशांनी ठेवले होते

हा इमामवाडा आणि मच्छीभवन यांच्या जवळच्या दौलतखाना या इमारतीत नवाब असफ उद्दौला राहात असे त्याच्या औदार्यावरून त्या काळी अवधमध्ये अशी म्हण पडली होती की 'जिसको न दे मौला, उसको दे असफ उद्दौला' (ज्याला परमेश्वर देत नाही त्याला असफ उद्दौला देतो) बडा इमामवाडा बांधून झाल्यावर चौदा वर्षांनी १७९८ मध्ये असफ उद्दौलाचे निधन झाले त्याच्या नावावरून बडा इमामवाड्याला असफ इमामवाडा असेही म्हणतात इमाम याचा अर्थ अवतार असा आहे व बारा याचा अर्थ स्थान असा असल्याने बारा इमामबारा या नावाने ही वास्तू मशहूर आहे

लखनौमध्ये जे तीन इमामवाडे प्रसिद्ध आहेत, त्यांपैकी इतर दोन म्हणजे छोटा इमामवाडा आणि शहाजनफ रूमी दरवाजापलीकडे छोटा इमामवाडा आहे नवाब महमदअली शहा याने १८३९ मध्ये हा बांधला १८३८ मध्ये तो राज्यावर आला तेव्हाच त्रेसष्ट वर्षांचा होता छोटा इमामवाडा हा हुसेनाबाद वाडा म्हणूनही ओळखला जातो महमद अली शहाने राज्यावर आल्याबरोबर अनेक इमारती बांधण्यास घेतल्या छोटा इमामवाड्याजवळ त्याने भव्य मशीद बांधण्यास सुरुवात केली दिल्लीच्या जुम्मा मशिदीपेक्षाही ती मोठी असावी अशी त्याची योजना होती

लखनौ हे भारताचे बॅबिलोन करावे अशी महमदअलीची आकांक्षा होती बॅबिलो-नच्या जगप्रसिद्ध टॉवरसारखीच सात मजली उंच आणि अतिभव्य इमारतही त्याने उभारण्यास सुरवात केली या इमारतीच्या गोल जिन्याने थेट सातव्या मजल्यापर्यंत जाता यावे अशी त्याची योजना होती सात खडा (सात मजली) असे या इमार-तीचे नाव होते पण या इमारतीचे पाच मजले बांधून झाले आणि १८४२ मध्ये महमद अली शहाचे निधन झाले त्यामुळे या महत्त्वाकांक्षी इमारतीचे बांधकाम तसेच सोडून देण्यात आले

हुसेनाबाद इमामवाड्याच्या प्रवेशद्वाराजवळ प्रसन्न व देखणे उद्यान आहे. प्रवेशद्वारावर सुंदर नक्षीकाम केलेले आहे महमद अली शहाने हा इमामवाडा आतून सोन्याच्या पाण्याने मढविला होता असे सांगतात पण ब्रिटिशांनी हे सोने नेले इराणहून आयात केलेल्या संगमरवरी फरशीने जमीन आच्छादलेली आहे मौलवींना कुराणपठणासाठी चांदीचे आसन असून 'बिस्मिल्ला रहे रहीम' हे कुराणावरील वचन एका कबुतराच्या चित्रात बसविले आहे एका काचेवर कुराण कोरले आहे चांदीचे व चंदनाचे ताजिये तेथे ठेवण्यात आले असून अनेक देशांतून आयात केलेली झुंबरे छतावर लटकत आहेत भिंतीवर नक्षीकाम आणि अरेबिक भाषेतील धार्मिक वचने लिहिली आहेत. इमामवाड्याच्या बाजूला नबाबाची कन्या झीनत हिचा मकबरा आहे गतवैभवाची खूण असली तरी आज हा इमामवाडा ऱ्हासाचीच खूण म्हणून उभा आहे हा पाहून बाहेर पडल्यावर काहीशी खिन्नतेचीच छटा मनात उमटल्यावाचून राहत नाही मात्र या इमामवाड्याची आपल्या मागेही देखरेख रहावी म्हणून महंमद अली शहाने ईस्ट इंडिया कंपनीकडे छत्तीस लक्ष रुपये अनामत ठेवले आणि या रकमेच्या व्याजातून छोटा इमामवाड्याची देखभाल व दुरुस्ती करावी असे कळवले

जामा मशीद ही लखनौची सर्वांत मोठी मशीद आहे अरेबिकमध्ये जामी म्हणजे जमणे, एकत्र येणे आणि जुम्मा म्हणजे शुक्रवार शुक्रवार हा मुस्लिमांचा साप्ताहिक प्रार्थनेचा दिवस असतो त्या गावातही सर्वांत मोठी मशीद ही जुम्मा मशीद म्हणून ओळखली जाते शहाजहानने दिल्ली येथे बांधलेल्या जुम्मा मशीदचे मीनार १३० फूट उंच असून ती जगातील एक अत्यंत सुंदर मशीद म्हणून मानली गेली आहे. लखनौच्या या जुन्या मशिदीच्या पार्श्वभूमीवर अनेक चित्रपटाचे चित्री-करण झाले आहे लखनौची जुम्मा मशीद बांधताना महमद अलीची जी महत्त्वा-कांक्षा होती की दिल्लीच्या जुम्मा मशिदीपेक्षाही ती भव्य व्हावी ती त्याच्या अकाली निधनामुळे पूर्ण झाली नाही

नसीरउद्दीन हैदरने इराकमधील नजकची प्रतिकृती म्हणून शहा नजफ

इमामवाडा बाधला तो गोमती नदीच्या किनारी आहे इराकमध्ये अलीची (महमदाचा जामात) कबर आहे तिला नजफ म्हणतात लखनौच्या शहा नजाफ-मध्ये अवधचा पहिला बादशहा गाझी उद्दीन हैदर आणि त्याच्या बेगमा यांच्या कबरी शहा नजफमध्ये आहेत त्यांची एक बेगम मुबारक महल ही युरोपियन होती हैदर १८२७ मध्ये निधन पावला १८५७ च्या युद्धात शहा नजफ इमामवाडा हे स्वातत्र्य सैनिकांचे एक महत्त्वाचे युद्धकेंद्र होते

महमद अली शहाने जी सात मजली इमारत बाधण्यास घेतली व अर्धवट सोडली, तेथे आता कलादालन आहे अवधचे पाच नबाब आणि पाच बादशहा याची मोठी तैलचित्रे या कला सग्रहालयात आहेत सादत अली खान हा लखनौचा पहिला नबाब आतक उद्दौला वजीद अली शहा इत्यादी नबाबाचीही पूर्णाकृती चित्रे या कलादालनात आहेत तसेच या नबाबांच्या संबधित अशा काही वस्तूही आहेत पण वस्तुसंग्रहालय म्हणावे असा हा मोठा सग्रह नाही हे कलादालन पाहिल्यावरही गतवैभवाच्या विषण्णतेची भावना मनात उमटल्यावाचून रहात नाही मुख्य इमारत मोडकळीला आली आहे पण जवळचा तलाव व विहिरी त्यातल्या त्यात तग धरून आहेत

लखनौच्या नबाबाचे जे राजचिन्ह आहे, त्यात दोन मासे आहेत या शहरात अनेक ठिकाणी कमानीवर अगर इतर जागी दोन मासे दिसतात लखनौ हे सागरा-पासून दूर असलेले शहर असल्याने राजचिन्हात मासे कसे दिसतात, याची मी चौकशी केली तेव्हा मला समजले की, सादत खाँला १७३२ मध्ये अवधचा नबाब म्हणून दिल्लीच्या बादशहाने पाठवला, तेव्हा तो वाटेत एक नदी ओलांडीत होता अचानक एक मासा पाण्यातून उडी मारून त्याच्या अगरख्यात आला नबाब सादत खाँनि मासा हा शुभशकुन समजून त्याला आपल्या राजचिन्हात स्थान दिले मछलीभवन हा किल्ला अतिशय बळकट होता त्याला सव्वीस कमानी होत्या आणि प्रत्येक कमानीवर दोन मासे कोरलेले होते त्याची सख्या बावन्न होती. म्हणून बावन्न मछलींचा अपभ्रंश होऊन त्याला मछलीभवन हे नाव पडले होते गोमतीच्या किनाऱ्यावर लक्ष्मण टेकडीवर हा किल्ला बांधला होता पुढे ब्रिटिशानी त्याचे दारूगोळ्याच्या कोठारात रूपांतर केले १८५७ च्या स्वातत्र्ययुद्धात भार-तीयाचा सुरुवातीच्या काळात जोर वाढला, तेव्हा ब्रिटिशानी मछली भवन सोडून ब्रिटिश रेसिडेन्सीत आश्रय घेण्याचे ठरवले पण मछलीभवनमधील प्रचड दारू-गोळा हलविणे त्याना शक्य झाले नाही हे कोठार स्वातत्र्य सैनिकाच्या हाती पडून त्याचा आपल्याविरुद्ध उपयोग होऊ नये, म्हणून ब्रिटिशानी त्या प्रचड दारू-

कोठाराला आग लावली त्या आगीत मछली भवन ही ऐतिहासिक महत्त्वाची इमारत उद्ध्वस्त झाली पण या इमारतीत एके काळी अवधच्या नवाबाचे दरबार भरत असत मछली भवन हा किल्ला लखनौच्या शेखजाद्याच्या मालकीचा पण पहिला नवाब बुऱ्हाण उल मुल्क सादत खाँ याने तो शेखजाद्याकडून घेऊन आपल्या सत्तेचे केंद्र तेथे आणले मछलीभवनच्या नाशाने लखनौच्या ऐतिहासिक वैभवात मोठेच वैगुण्य राहिले आहे बुऱ्हाण उल मुल्क या पदवीचा अर्थ देशाचे भूषण असा आहे

ब्रिटिश रेसिडेन्सी ही लखनौमधील इमारत आता अगदी भग्नावस्थेत कशी-बशी उभी आहे पण या इमारतीने अत्यंत चित्तथरारक असा इतिहास पाहिला आहे १७५३ मध्ये नवाब सादत अली खान याने ब्रिटिश रेसिडेन्टचा निवास म्हणून गोमती नदीच्या काही उंचवटयावर दोन मैल परिघात ५३ इमारती बांधल्या सौन्दर्य आणि सुरक्षितता या दोन्ही दृष्टीने हा भाग अत्यंत आदर्श असा होता रेसिडेन्टचा निवास, त्याच्या कचेरीतील अधिकाऱ्यांचे बगले, कचेरी, इतर नोकरवर्गासाठी इमारती, सैन्यासाठी बराकी अशा अनेक विभागात रेसिडेन्सी ही वसाहत विभागली होती ब्रिटिश पद्धतीप्रमाणे बॅंक्वेट हॉल, रिसेप्शन रूम, तळघर वगैरे सर्व व्यवस्था अद्ययावत आणि सुसज्ज होती ही इमारत त्या वेळी बेली गार्ड या नावाने ओळखली जात असे कारण सर जॉन बेली याच्या आधिपत्याखाली या आवारात मोठे ब्रिटिश सैन्य ठेवण्यात आले होते आणि त्याने गार्डसची (सुरक्षा अधिकारी) नेमणूक सर्वत्र केली होती रेसिडेन्टच्या निवासासाठी सादत अली-खानने जी इमारत बांधली होती तिचे नाव तेहरी कोठी (क्रुकेड हाऊस) किंवा तिरपागडे घर असे होते । त्या तेढया इमारतीचे भग्न अवशेष अजूनही या भागात दिसतात ब्रिटिश एजटाच्या राजनीतीचे 'तेढया' या शब्दात उत्तम प्रतिबिंब पडले आहे या ५३ इमारतींपैकी बारा क्रमांकाच्या इमारतीचे नाव बेगम कोठी असे होते सध्या भग्नावस्थेत असलेल्या फक्त पाच इमारती रेसिडेन्सी या नावाने पूर्वीच्या वैभवाची साक्ष देत आहेत

१८५७ च्या स्वातंत्र्य समरात नवाबाच्या सैन्याचे मुख्य लक्ष्य रेसिडेन्सी हा भागच होता त्यावेळी रेसिडेन्सीत सुमारे तीन हजार इंग्रज अडकले होते आणि नवाबाच्या सैन्याने त्याना वेढा दिला होता या तीन हजारात १७२० सैनिक आणि १२८० बायका व मुले होती ८९ दिवस ही लढाई चालू होती. या काळात मुख्य इमारतींच्या तळघरात इंग्रज बायका व मुले पावणेतीन महिने लपून होती साठवलेले अन्नधान्य पुरवून खाल्ले जात होते. त्यातच नवाबाच्या सैन्याने तोफा व बंदुकांच्या गोळयाचा प्रचंड मारा केल्यामुळे ४८५ सैनिक, २३७ स्त्रिया आणि २६० मुले मारली गेली होती त्यांच्या दफनाची व्यवस्था करणे अशक्य असल्याने

त्याची प्रेते कुजून जात होती आणि जे जिवत होते त्यांना अक्षरशः नरकवास घडत होता नवाबाच्या सैन्याच्या प्रचड मान्यामुळे अनेक इमारतींना पडलेली भगदाडे अजूनही दिसतात पण ८९ दिवसानतर ब्रिटिशांना मोठी कुमक आली कॅम्बेल या सेनाधिकाऱ्याने एकतीस हजार सैनिक आणि सुमारे दोनशे तोफांसह रेसिडेन्सीच्या आवारात प्रवेश केला आणि नवाबाच्या सैन्याचा पराभव केला नेपाळचा राजा जगबहादूर यानेही इग्रजांच्या मदतीसाठी गुरखा सैन्य पाठवले बेगम कोठीजवळ भारतीय व इग्रज सैन्याचे घनघोर युद्ध झाले सहाशेवर भारतीय सैनिक मारले गेले इग्रजानाही मोठे मोहरे गमवावे लागले त्यांत कॅप्टन हडसन याचाही समावेश होता याच कॅप्टन हडसन याने मोगल साम्राज्याच्या शेवटच्या वारसाला दिल्लीच्या हुमायून कबरीत ठार केले होते रेसिडेन्सीवर इग्रजांनी आपले प्रभुत्व प्रस्थापित करून बदिवान इग्रज सैनिक व नागरिक यांना मुक्त केले त्यांची व मृताची भयकर अवस्था पाहून इग्रज व गुरखा सैनिक एवढे चिडले की त्यांनी लखनौ शहराची भयकर लुटालूट केली कैसरबाग, बडा इमामवाडा, राजवाडा इत्यादीतील सर्व जडजवाहर, सोने, चांदी वगैरेची लुटालूट झाली आणि विध्वसही झाला नवाबाच्या ज्या पडदानशीन बेगमानी वर्षानुवर्षे सूर्यप्रकाश पाहिला नव्हता, त्याना अनवाणी नाजूक पायानी दगडधोंड्यातून, काटाकुट्यातून ठेचकळत व जखमा सहन करीत रात्री-अपरात्री शक्य तेवढे सामान डोकीवर घेऊन पळून जावे लागले आज उद्ध्वस्त व केविलवाण्या दिसणाऱ्या रेसिडेन्सीचा इतिहास असा रक्तरजित व भयचकित करणारा आहे

लखनौला अनेक प्रेक्षणीय स्थळे आहेत त्यात फॉन ब्रेक अव्हेन्यूवरच्या क्रमाक एकच्या घराचा समावेश नाही, हे खरे पण ते घर पाहावे अशी माझी खूपच इच्छा होती हे घर एका खासगी व्यक्तीचे असल्याने आणि ती व्यक्तीही दिवंगत असल्याने ते आत जाऊन कसे काय पाहता येईल, हा प्रश्नच होता पण अगदी योगायोगाने मला ती सधी मिळाली मी ते घर आतून पाहिले, एवढेच नव्हे, तर तिथे चहाही घेतला माझे त्या घरात अगत्याने स्वागत झाले ते घर सुप्रसिद्ध गझल गायिका बेगम अख्तर याचे होते लखनौच्या महाराष्ट्र मडळात माझे भाषण झाल्यावर मला तेथेच एक उचेले, गोरेपान सद्गृहस्थ भेटले त्यांनी आपले नाव वसत धुळेकर असे सांगितले हे नाव मी अनेकदा ऐकले होते कारण त्यांचे वडील आचार्य रघुनाथ धुळेकर हे उत्तर प्रदेशातील एक अत्यत कर्तबगार मराठी नेते होते उत्तर प्रदेशच्या विधिमडळाचे ते सभापतीही होते वसत धुळेकर यांनी मला आपल्या घरी चहाचे निमत्रण दिले, तेव्हा मी त्यांना म्हटले, "मला बेगम अख्तर याचे घर पाहायचे आहे ते कोठे आहे ?" त्यावर श्री धुळेकर म्हणाले, 'ते घर आमच्या अगदी शेजारीच आहे माझ्या पत्नीचा आणि बेगम

अख्तर यांचा चांगला स्नेह होता मी आपल्याला त्या घरी घेऊन जाईन"

ठरल्याप्रमाणे मी दुसऱ्या दिवशी सकाळी धुळेकरांच्याकडे गेलो तिथून ते, सौ सरोज धुळेकर आणि मी जवळच बेगम अख्तर यांच्या घरी गेलो तेथे बेगम अख्तर यांच्या बहिणीचे पती श्री सय्यदमुक्तार अहमद यांनी आमचे स्वागत केले. अगदी सुरुवातीलाच ते म्हणाले, "कालच रेडिओ स्टेशनवर मलिका पुखराज यांच्या हस्ते बेगमसाहेबांच्या पुतळ्याचे अनावरण झाले वास्तविक मलिका या बेगम अख्तर यांच्या समकालीन शिष्या नेहमी त्यांचे आमच्या घरी येणे-जाणे होते दोघी अनेकदा एकत्र गाणे शिकल्या चाळीस वर्षांनंतर मलिका लखनौला आल्या, पण त्या आमच्या घरी आल्या नाहीत कारण त्यांच्या काही हितसंबंधी व्यक्तींनी असा गैरसमज करून दिला, की बेगम साहेबांच्या घरचे लोक तुम्हाला चांगली वागणूक देणार नाहीत तुमचा अपमान करतील म्हणून तुम्ही तेथे जाऊ नका" आम्हाला त्याचे अतिशय दु ख झाले

बेगम अख्तर यांचे घर काहीसे आडबाजूलाच आहे मूळ मोठ्या व प्रशस्त घराचा काही भाग त्यांच्या मेव्हण्याने विकला, तेव्हापासून लखनौकरांची त्यांच्या-वर इतराजी झाली, असे नंतर मला इतरांच्याकडून कळले बेगम अख्तर म्हणजे लखनौच्या गौरवाचा विषय त्यांच्या घराला कलाक्षेत्रात मोठा मान असे असता त्यांच्यामागे अल्पावधीतच त्यांच्या नातेवाइकांनी घराचा काही भाग केवळ आर्थिक फायद्यासाठी विक्रीस काढावा हे बेगमसाहेबांच्या चाहत्यांना आवडले नाही घराच्या आवारात सुरवातीला ऊंच वृक्ष आहेत बाग आहे, पण ती दुर्लक्षित आहे घराला पांढरा आणि हिरवा असे रंग आहेत आता शिल्लक आहे ते घर एक मजली असले तरीही खूपच मोठे आहे पहिल्याच मोठ्या दिवाणखान्यात बेगम अख्तर यांचे छायाचित्र आणि त्यांच्या दोन्ही बाजूंना भारत सरकारने त्यांना दिलेले 'पद्मश्री' व 'पद्मभूषण' हे किताब फ्रेम करून ठेवले आहेत पहिली पदवी १९६८ मध्ये आणि दुसरी १९७५ मध्ये त्यांना देण्यात आली बेगम अख्तर यांचा जन्म ७ ऑक्टो-बर १९१४ रोजी झाला लहानपणापासून त्यांना गाण्याची अत्यंत आवड होती. उस्ताद अब्दुल वहिद खाँ (किराणा) आणि उस्ताद अटे महमद खाँ (पतियाळा) यांच्याकडून त्यांनी संगीताचे शिक्षण घेतले वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षी बेगम अख्तर यांची पहिली ध्वनिमुद्रिका निघाली त्यांच्या चारशेवर ध्वनिमुद्रिका निघाल्या आहेत भारतातील गझल गायकीची गंगोत्री म्हणून बेगम अख्तर यांचा निर्देश करण्यात येतो त्यांचा आवाज काहीसा पुरुषी असला तरी दादरा, गझल व ठुमरी यांना अत्यावश्यक असलेला लाडिकपणा त्यांच्या आवाजात ओतप्रोत भरलेला असल्याने या क्षेत्रातील त्यांचे कार्य भारतीय संगीताच्या इतिहासात अविस्मरणीय असे ठरले आहे. हलक्या फुलक्या संगीताच्या क्षेत्रात त्यांनी चाळीस वर्षे अबाधित

आधिपत्य राखले ('कोयलिया न कर पुकार', 'ना जा परदेस', 'ए मोहब्बत तेरे अजानमे रोना आया', 'पपिया धीरे धीरे बोल' इत्यादी त्याची गाणी अमर आहेत ) एका युगप्रवर्तक भारतीय गायिकेच्या घरी गेल्यामुळे मला अत्यत समाधान वाटले

श्री सय्यद मुक्तार महमद म्हणाले, "बेगमसाहेब होत्या तोपर्यंत घरखर्च चालत होता पण त्यानतर आम्ही तो कसा चालवणार ? माझ्या मुलींची लग्ने व्हावयाची होती त्यासाठी पैसा हवा होता म्हणून अत्यत नाइलाजाने आम्हाला या घराचा काही भाग विकावा लागला येत्या ऑक्टोबरच्या ७ तारखेस आम्ही बेगमसाहेबांचा स्मृतिदिन साजरा करणार आहोत त्यावेळी या घरासमोर मडप उभारून त्यांच्या समकालीन व त्याच्या शिष्या यांच्या गायनाचा कार्यक्रम आम्ही करणार आहोत बेगम अख्तर यांचे घर सोडताना खोल विषण्णतेने आमची मने भरून आली "

लखनौमध्ये इटालियन पद्धतीची सर्वात प्रसिद्ध इमारत म्हणजे ला मार्टिनियर या सुदर वास्तूत १८४० सालापासून कॉन्व्हेंटची शाळा सुरू झाली जनरल क्लॉड मार्टिन या फ्रेंच वास्तुशिल्पकाराने ही अत्यत सुदर अशी इमारत बाधण्यास १७७६ मध्ये सुरुवात केली आणि त्याच्या आराखड्याबरहुकूम जोसेफ क्वेरोस याने मार्टिनच्या मृत्यूनतर पूर्ण केली. लखनौवर अतिशय माहितीपूर्ण ग्रथ (लखनौ दि लास्ट फेज ऑफ ॲन ओरिएन्टल कल्चर) लिहिताना अबदुला हलीम शरार यानी ला मार्टिनियरवर लिहिताना जुन्या भारतीय व पाश्चात्य इमारतींच्या रचनेतील एक महत्त्वाचा फरक मांगितला आहे तो असा की, पूर्वीच्या काळी भारतातील घरगुती स्त्रिया बाहेर रस्त्यावर फिरावयास जात नसत, म्हणून त्या-काळी घर बाधतानाच मध्ये एखादा चौक किंवा घराच्या मागे परसू बांधण्यात येई व त्या परसूभोवती भित असे. त्याचा हेतू असा होता की सतत घरात राह-णाऱ्या स्त्रियाना घरातल्या घरात का होईना, थोडा वेळ मोकळ्या हवेत बसता येईल किंवा फिरता येईल मात्र पाश्चात्य महिला मुक्तपणे बाहेर फिरू शकत असल्याने त्या देशातील घराना अशा सोयी करण्याची आवश्यकता पडत नसे म्हणून ला मार्टिनियर ही भव्य इमारत लखनौच्या इतर जुन्या इमारतींपेक्षा अगदी वेगळी दिसते

फ्रेंच पद्धतीची ही भव्य इमारत कलाकुसरींनी सुशोभित आहे अनेक पायऱ्या-वर ही इमारत वसवलेली आहे, कमानी मुस्लीम पद्धतीच्या नसून इटालियन पद्ध-तीच्या आहेत जुन्या काळचे वातावरण अजूनही कायम ठेवण्यासाठी पायऱ्या सपल्यावर तोफा ठेवलेल्या दिसतात ला मार्टिनियरचा मुख्य भाग दोनमजली असून मधला भाग तीनमजली आहे इमारतीसमोर मोठा तलाव असून त्यात १२३

फूट उंच स्तंभ आहे क्लॉड मार्टिन याचे व्यक्तिमत्त्व बहुरंगी होते ईस्ट इंडिया कंपनीच्या सैन्याचा एक अधिकारी म्हणून तो प्रथम लखनौला आला पुढे त्याने ती नोकरी सोडून व्यापारात अमाप पैसा मिळविला त्याला कलेची व साहित्याची फार आवड होती त्याची अनेक चित्रे आजही लंडनमध्ये क्यू गार्डनमध्ये ठेवली आहेत पर्शियन व संस्कृतमधील हजारो ग्रंथांचा त्याने संग्रह केला होता

हजरत गंजमधील विधान भवनचा घुमट आणि भव्य इमारत लखनौच्या मध्यवर्ती भागात असल्याने जातायेता आपले लक्ष वेधून घेते या इमारतीसमोरचे कॉफी हाऊसही बरेच प्रसिद्ध आहे लखनौमधील साहित्यिक, चित्रकार, संगीतज्ञ वगैरेंचे गप्पागोष्टींचे हे आवडते ठिकाण पण सुप्रसिद्ध हिंदी विनोदी लेखक श्री के पी सक्सेना यांनी मला याच कॉफीगृहात कॉफी घेताना सांगितले की त्या ठिकाणची जुनी कीर्ती आता मंदावत आहे विधानसभा जवळच असल्याने आता आमदार, त्यांचे सहकारी आणि इतर राजकीय पुढारी यांचे हे आर्थिक व इतर वाटाघाटी करण्याचे केंद्र झाले आहे लखनौची उद्याने हे या राजधानीचे खास वैशिष्टय आहे प्रशस्त आणि सुंदर बागबगीचे ही शेकडो वर्षांची मुस्लीम शास्त्याची परंपरा आहे बनारसी बाग (या बागेतच प्राणिसंग्रहालय आहे ), दिलखुश बाग (पूर्वीचे शिकारीचे ठिकाण), आलमबाग, सिकंदर बाग या जुन्या उद्यानाबरोबरच शहीद बाग ही नवी बागही प्रेक्षणीय आहे या उद्यानात देशासाठी बलिदान करणाऱ्या स्वातंत्र्य-सैनिकांचे स्मरणार्थ उंचचउंच असा स्तंभ उभारण्यात आला आहे त्याचे उद्‌घाटन १९५७ मध्ये पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या हस्ते झाले भगवान बुद्धाचा पुतळा असलेल्या उद्यानाचे नाव ' बुद्ध पार्क ' आहे हत्तीचा पुतळा असलेले हाथी पार्क, सरोजिनी नायडूंच्या स्मरणार्थ नायडू पार्क, दिलखुश पार्क, विलायती बाग, अशी अनेक रमणीय उद्याने लखनौच्या सौंदर्यात भर घालीत आहेत. शिकंदर उद्यानात ' नॅशनल बोटॅनिकल रीसर्च इन्स्टिटयूट ' आहे.

नादान महल या काहीशा विचित्र नावाच्या भागात एक जुनी मोडकळीस आलेली इमारत आहे अकबराच्या काळात अवधचा नवाब म्हणून काम करीत असलेल्या अब्दुल रहीमचे थडगे या ठिकाणी आहे लखनौ स्टेशनची इमारतही वैशिष्टचपूर्ण आहे बहुतेक रेल्वेस्टेशन्सच्या वास्तू रूक्ष, आणि केवळ सोय हे एकच ध्येय समोर ठेवून बांधलेल्या असतात, पण उत्तर प्रदेशमध्ये मला असे आढळून आले की त्या त्या गावच्या रेल्वेस्टेशनच्या इमारतीत त्या गावचे वैशिष्टच नजरेत भरते उदाहरणार्थ, लखनौचे स्टेशन मुस्लीम पद्धतीच्या सुंदर घुमटांनी समृद्ध आहे, तर अयोध्या स्टेशनवर मंदिरासारखे घुमट आहेत वाराणसी स्टेशनचा माथाही काशीविश्वेश्वराच्या मंदिराच्या शिखरासारखा बांधण्यात आला आहे त्या मानाने आपल्याकडील पुणे, बॉम्बे सेंट्रल इत्यादी रेल्वेस्टेशन्स अगदीच वैशिष्टचहीन आहेत.

कैसरबागनजीक चौलाखी दरवाजा नावाची नक्षीदार भव्य कमान आहे. हा दरवाजा आणि त्याच्याजवळच्या इमारती एका नापिताच्या मालकीच्या होत्या. त्या नवाबाने चार लक्ष रुपयांना विकत घेतल्या होत्या, म्हणून त्यांना चौलाखी दरवाजा म्हणतात. कैसरबागच्या बारादरीत आता भातखंडे महाविद्यालय आणि उत्तर प्रदेश नाट्य-संगीत ॲकॅडमीची कचेरी आहे. जवळच जे ग्रंथालय आहे, त्याची इमारत अमीर उद्दौलाच्या काळातील उत्तम शिल्पसौंदर्याचा नमुना आहे.

—

# लखनौची तहजीब

एखाद्या शहरातील सर्व प्रेक्षणीय स्थळांचे व इमारतींचे वर्णन करूनही त्या शहराचा आत्मा अज्ञातच राहतो प्रत्येक शहराचे एक वातावरण असते, संस्कृती असते, वैशिष्ट्य असते ते एकाच गोष्टीत नसते, तर त्या शहराची कलाप्रियता, परंपरा, क्रीडा, साहित्य इत्यादी अनेक अंगात ते प्रतिबिंबित होते लखनौची 'तहजीब' कोणती ? तहजीब म्हणजे तरी काय ? शब्दकोश पाहिला, तर तहजीब या शब्दाचा अर्थ संस्कृती, सिव्हिलायझेशन असा दिला आहे आणि तरीही तहजीब या मूळ उर्दू शब्दाचा तो पूर्ण अर्थ नाही लखनौची आदब, नाटक, काव्य, संगीत नृत्य, हस्तकला, छंद, फार काय पण लखनौचे पान हे सर्व त्या 'तहजीब'मध्ये समाविष्ट आहे

'पहले आप' हे या बुलंद शहराचे ब्रीदवाक्य आहे खाणे, पिणे, इत्यादी कोणत्याही गोष्टीत दुसऱ्याने आधी त्याचा उपभोग घ्यावा असा त्याला प्रेमळ आग्रह करणे हे लखनौचे पहिले वैशिष्ट्य आहे कोणीही तुम्हाला 'तुम' किंवा 'अरे' असे तेथे संबोधणार नाही, तर अत्यंत आदरपूर्वक, मान लववून 'आप' म्हणजे 'आपण' असेच म्हणतील इतराच्याबद्दलची ही कदर लखनौमध्ये सर्वत्र दिसते 'तुम्हाला काय पाहिजे ?' असे तेथे हॉटेलमधला सेवकही विचारणार नाही तर 'हमारे लायक कुछ सेवा हो तो हुक्म दीजिये हुजूर' असे नम्रपणे म्हणेल सेवकच नव्हे, तर अमृतलाल नागर किंवा प्रेमचंदांचे चिरंजीव अमृतराय यांच्यासारख्या बुजुर्गांनीही मला याच शब्दांत विनती केली, तेव्हा मला शरमिंदल्यासारखे झाले लखनौमध्ये शत्रूबद्दलसुद्धा आदराची भावना असते, हे सांगताना एका लखनौवासियाने मला सांगितले, " लढते हुए हमारे सिपाहिओने दुश्मन को भी 'तू' नही कहा। गोलियाँ चली, लेकिन गालीयाँ नही ! " एखाद्या भांडणातही एक जण प्रति-

पक्षाला अगदी अदबीने विचारील, "मैं आपको बदतमीज कहूँ, तो आपको इतराज तो नही होगा ?" लखनौच्या स्टेशनवर तुम्ही उतरलात, तर रिक्षावाला किंवा टांगेवाला कुर्निसात करून विचारील, "कहाँ तशरीफ ले जायेंगे हुजूर ? आपका खादिम हाजिर है "

लखनौ महोत्सव चालू होता, तेव्हा कुणाचे तरी दोन वर्षांचे मूल हरवले, व्यवस्थापकाच्या कचेरीत ते एका प्रेक्षकाने आणून पोचते केले व्यवस्थापकानी ध्वनिवर्धकावर सांगितले, "अशोक नामका एक लडका मिल गया है, उसके माता-पिता ऑफिसमे आनेके कष्ट उठाये तो हम बहोत उपकृत होंगे" आता ज्याचे मूल हरवले आहे तो किंवा ती अत्यंत व्यथित मनाने त्याचा शोध घेत असणारच त्या मुलाला आणण्यासाठी त्याच आवारातल्या कचेरीला जाण्याचे माता-पितरांना कधी 'कष्ट' होतील का ? पण तो लखनवी आदबचा प्रकार आहे मी एकदा चौक भागात पान घेण्यासाठी म्हणून थांबलो 'फर्माइये हुजूर', एका वृद्ध मुस्लिमाने विनंती केली मी बनारसी मीठा असे काहीसे सांगितले तेव्हा त्याने आपल्या पधरा-सोळा वर्षांच्या मुलाला सांगितले, "बेटा, हुजूर हमारे घरमें पान लेनेकी मेहरबानी करते है, चार अच्छे पान तबीयतसे बनाओ" पानाचे गिन्हाईक 'दुकानात' आलेले नाही, 'आपल्या घरी' आले आहे आणि मुंबईसारखे फटकन पान द्यायचे नाही, तबीयतसे, हळूहळू नजाकतीने द्यायचे ही नजाकत हे लखनौचे आणखी एक वैशिष्ट्य नजाकत म्हणजे नाजूकपणा हा शब्दकोशातला अर्थ असला तरी तहजीबप्रमाणेच या शब्दातही केवळ नाजूकपणापेक्षा डौल, नखरा, सौंदर्य अशा अनेक अर्थांच्या छटा आहेत

पान खाण्याची साधी गोष्ट घ्या आपल्याकडे विड्याची दोन पाने घ्यायची, देठ काढायचे, चुना माखायचा कात व सुपारी टाकायची की झालं पान पानाच्या बाबतीतही आपण अगदी मोजक्या, आवश्यक तेवढ्याच वस्तू वापरतो पण लखनौचे पान म्हणजे एक समारंभच असतो ! त्याची केवढी तरी पूर्वतयारी करावी लागते प्रथम खायची पाने जमिनीत ठराविक काळ ठेवून ती हवी तेवढीच पिकवायची चुना आणि कात यांच्यावर स्वतंत्र प्रक्रिया करायच्या एका थाळीत राख ठेवायची तीवर फडके अंथरायचे त्यावर कात ठेवायचा मग हळूहळू कातावर पाणी सोडून त्यातील अशुद्ध भाग धुऊन काढायचा त्यातून झिरपणारे पाणी राखेत शोषून घेतले जाते मग कात वाळवायचा नंतर त्यावर केवड्याचे पाणी सोडून तो सुगंधी करायचा चुना फार दाहक होऊ नये म्हणून त्यात दही मिसळायचे पूर्वी लखनौच्या नाजूक, पडदानशीन बेगमांच्या पानासाठी चुना तयार केला जाई, तेव्हा अस्सल मोत्याचा चुरा आणि दही मिसळून चुन्याचा दाह कमी करण्याची पद्धत होती केवड्याचे पाणी देऊन सुकवलेला कात पुन्हा केवड्याच्या फुलात

ठेवतात सुपारी प्रथम गुलाबपाण्यात भिजत ठेवायची आणि तीत गुलाबपाणी मुरले, की बाहेर काढून सुकवायची या पानात वेलदोडे घालतात पण ते सालीसकट सबंध नव्हे, तर सोलून त्याच्या बिया काढायच्या, त्यावर वर्ख चढवायचा आणि मग त्या वेलचीच्या बिया पानात घालायच्या नबाबाच्या काळात वर्खाऐवजी अस्सल चांदीचा रस वेलचीच्याभोवती चढवला जात असे ज्यांना पानाबरोबर तंबाखू लागतो, त्याच्यासाठी खास तंबाखू तयार करण्यात येतो त्यास केवड्याचा सुगंध दिलेला असतो त्याच्या लहान गोळ्या करण्यात येऊन त्यावर वर्ख चढविला जातो पूर्वी बेगमांना चांदीचा आणि नवाबांना सोन्याचा थर दिलेल्या तंबाखूच्या गोळ्या पानात घालून दिल्या जात काही जणांना तंबाखूऐवजी किमाम लागतो

लखनौला एक पान कधीही मिळत नाही, तर एका काडीला टोचलेली चार पाने एकदम मिळतात ती एकदम तोंडात घालायची व कौशल्याने काडी काढून घ्यायची, ही लखनवी पानाची नजाकत आहे या पानांचा रंग माणकासारखा असतो, असे पानातले तज्ज्ञ सांगतात पानाचे त्रिकोणी विडे करून त्यावर त्याला नाजूक वर्ख लावण्यात येतो अशा पानाच्या थप्प्याच्या थप्प्या चांदीच्या पानदानात सजावटीने ठेवल्या जातात त्या पानदानाबरोबरच चांदीची लहान कात्रीही असते पानाचा एखादा तुकडा कापायचा असेल, किंवा खोचलेली लवंग काढायची असेल तर या कात्रीचा उपयोग करायचा पान घेणारी व्यक्ती अधिकाराने किंवा वयाने ज्येष्ठ असेल तर पान देणाऱ्याने लवून कुर्निसात करायचा आणि ती लहान असेल तर आशीर्वाद द्यायचा ही लखनौची तहजीब आहे पानाचा असा शौक आणि कलात्मक वापर पृथ्वीच्या पाठीवर इतरत्र कुठेही झालेला नाही

प्रेयसीने पान देण्यावर उर्दू शेरशायरीत अनंत रचना केल्या गेल्या आहेत शायर अकबर यांनी म्हटले आहे--

लगावट की अदा से
उनका कहना पान हाजीर है ।
कयामत है, सितम है
दिल फिदा है जान हाजीर है ।।

(माझ्या सखीने मेंदीने रंगलेला आपला नाजूक, गोरापान हात पुढे करून पानाचा स्वीकार करण्याची विनंती मला केली, तो क्षण किती भाग्याचा ! अहाहा, तो क्षण म्हणजे कहर आहे, जीवघेणा आहे त्या रंगीन नजाकतीने माझं मन इतकं भारून गेलं की विडा देणाऱ्या सखीवरून मी जीव ओवाळून टाकायला तयार आहे )

हुक्का हेही लखनौचे एक खास वैशिष्ट्य आहे

नुसत्या पानाचे हे वैभव तर नृत्य, संगीत, चित्रकला, काव्य यांचा लखनवी

दिमाख काय पुसावा ? अब्दुल हसन अमीर खुसरो (१२५५ ते १३२५) हे थोर गायक, वादक व कवी होते लखनौच्या नबाबाना सगीताचा मोठा शौक होता त्याच्या दरबारात अनेक गायक आणि गायिकानी आपल्या उत्कृष्ट रचना पेश केल्या होत्या वजीद अली शहा हे नवाब स्वत उत्तम शास्त्रोक्त गायन करीत असत ख्यालगायकीबरोबरच गझल, कवाली, ठुमरी या हलक्या-फुलक्या सगीत प्रकाराची देणगी ही अवधचीच अजूनही लखनौला हे प्रकार जितके लोकप्रिय आहेत, तसे इतर कोठेही नाहीत या हलक्या फुलक्या प्रकाराना नृत्याची जोड देऊन लखनौच्या गायिका व तवाईफ यांनी मुजरा हा प्रकार विकसित केला

लखनौच्या नर्तकांत दोन मुख्य प्रकार होते एक प्रकारचे नर्तक कथ्थक आणि रासलीला नृत्ये करीत, तर दुसऱ्या प्रकारचे नर्तक मुख्यत काश्मिरी भांड हा नृत्याचा प्रकार करीत कथ्थक हा त्यातला 'क्लासिकल' किंवा अभिजात प्रकार मानला जातो कथ्थक नर्तक हे शकर-पार्वती आणि श्रीकृष्ण याना गुरुस्थानी मानतात खुशी महाराज, हिलालजी, प्रकाशजी, दयालूजी असे नामवत कथ्थक नर्तक शुजाउद्दौलापासून गाजीउद्दीन हैदर व त्यानतरच्याही काळात लखनौत होऊन गेले अगदी अलीकडच्या काळातही लच्छू महाराज, बिरजू महाराज इत्यादी नामवत नर्तकांनी हीच परपरा पुढे चालविली आहे भांड या प्रकारात विनोद, वात्रटपणा, विदूषकी थाट याना बराच वाव असतो. आपल्याकडील तमाशातील नाच्यापोऱ्यासारखा भांड या प्रकारातही एक पोऱ्या बाईचे कपडे घालून नाच करतो व सवाद म्हणतो भांडमध्ये अनेकदा नकलाचाही समावेश असतो रायबरेली, मुरादाबाद व लखनौ ही भांड कलाकाराची मुख्य केंद्रे होती नवाबांच्या काळात डोमनिया नावाच्या कलावतिणींचा फार प्रभाव होता या स्त्रिया नृत्य-गायनात कुशल होत्या श्रीमत सरदाराच्या पदरी अशा स्त्रियाचे पथक त्या काळी असे धनाढ्य बेगमांसाठी त्याचे खास कार्यक्रम होत साथीसाठी त्यानी ढोलकी न घेता तबला, सारगी व मजिरी घेण्याची नवी पद्धत पाडली चुना विकण्याचा व्यवसाय करणाऱ्या काही स्त्रियाही गाण्याच्या बैठकी करीत असत चुनेवाली हैदरी नावाची फार प्रसिद्ध गायिका त्या काळी लखनौमध्ये होती मुहमदशहा यांच्या दरबारातील एक गायक मियाँ सारग यांनी तयार केलेले वाद्य म्हणजे सारगी त्या वाद्याचे नावही त्याच्या सारग या नावावरूनच आले आहे गाझीउद्दीन हैदरच्या काळी जगा खान व गुलाम रसूल खान हे भारतातील सर्वोत्कृष्ट कव्वाली गायक लखनौ-मध्ये होते त्याच काळी मिनान शोरी या गायकाने टप्पा या गाण्याच्या प्रकाराचा शोध लावला पजाबातील उटांचे तांडे हाकणाऱ्याच्या लोकगीतातून त्याने टप्पा हा प्रकार विकसित केला

भाषेच्या बाबतीत लखनौला जरी उर्दू ही सर्वमान्य भाषा होती तरी

अरबी आणि फारसी या भाषाला अधिक मान असे आपल्याकडे मराठी भाषा सर्वमान्य असली तरी संस्कृत ही विद्वान पंडिताची भाषा मानली जाई, तशीच तेथे या भाषाच्या बाबतीत परिस्थिती होती याचे मुख्य कारण म्हणजे मुस्लिमांचा धर्मग्रंथ कुराण हा मूळ अरबी भाषेत आहे औरंगजेबाने फिरंगी महलची स्थापना करून त्याचे नेतृत्व निजामुद्दीन सेहलवी या विद्वान मौलवीकडे दिले, तेव्हापासून फिरंगी महल हे अरबी, फारसी व उर्दू या भाषातील साहित्य व संस्कृती याचे केंद्र झाले हिंदीचा स्वीकार नंतर फार पुढे, एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात झाला फिरंगी महल हे मुस्लिम जगताचे मुख्य विद्यापीठ झाले खुद्द दिल्लीलाही सोळाव्या शतकात फारसी भाषेतच मुख्यत काव्य लिहिले जात होते पण गुजरातहून दिल्लीला आलेल्या महमद वालीने मधुर उर्दू भाषेत काव्य-लेखनास सुरुवात केली, ती १७०० मध्ये त्याच्या प्रभावी भाषेचा व काव्याचा परिणाम एवढा मोठा झाला की उर्दू हीच भाषा शेरशायरीला अधिक उपयुक्त आहे, हे कविजगताने मान्य केले साहजिकच उर्दूचे हे लोण अवधमध्ये पसरले मिर्झा गालिब, मीर, सौद,, खान–ए अर्सू, सोझ् याच्यासारखे उत्कृष्ट कवी या भागात झाले आपल्याकडचा 'शाहीर' हा शब्दही मूळ अरबी शाइर व उर्दू शायर यावरून आला आहे १९३५ मध्ये ब्रिटिशानी फारसीऐवजी उर्दू ही अधिकृत भाषा केली

मसनवी हा फारसी काव्याचा एक महत्त्वाचा प्रकार आहे त्यात कथा किंवा बोध एकाच वृत्तात असतो मीर जाहकचा मुलगा मीर गुलाम हसन याने उर्दूतून मसनवी काव्यलेखनास लखनौमध्येच प्रारभ केला 'बेनजीर' आणि 'बद्र ए मनीर' या त्याच्या मसनवी रचना प्रसिद्ध आहेत मिर्झा महमद नकवी खाँ यानी 'लैला मजनू' लिहिल्यानतर तर मसनवी या प्रकाराने लोकप्रियतेचा उच्चांक गाठला प दयाशकर, 'कलक' नवाब मिर्झा शौक यानी या प्रकारात महत्त्वाची भर घातली मसनवीप्रमाणेच मर्सिया (शोकगीताचा एक प्रकार) काव्यही लखनौमध्ये व आसपास मशहूर होते

अवध हा भाग सपन्न, सुखवस्तू आणि कलात्मक ढंगाचा असल्याने तेथील लोक अनेक प्रकारचे छद व खेळ यात रमत असत कोंबड्याच्या झुजी लावणे, पतगाच्या स्पर्धा आणि कबुतरे उडविण्याच्या स्पर्धा हे अत्यत लोकप्रिय छद अजूनही ही परपरा लखनौत चालू आहे नवाब जेव्हा कडक उन्हात बाहेर पडत, तेव्हा त्याच्यावर छाया धरून हळूहळू आकाशात उडण्याची कला शेकडो कबुतराना शिकवली होती एका नवाबाकडे २५,००० कबुतरे असल्याची नोंद आहे त्याशिवाय हत्तींची झुज, रेड्यांच्या व एडक्याच्या टकरा, लाठमारी इत्यादी क्रीडामध्ये श्रीमत लोक रमत आणि सर्वसामान्य जनता या स्पर्धा पाहण्यासाठी हजारोंनी गर्दी करीत पर्शियातून आणलेली काही गिर्रेबाज कबुतरे अत्यत निष्णात असत व त्याना अचूक

शिक्षण देण्यात येई एखाद्या वाड्याच्या चौकात मध्यभागी एका परातीत पाणी ठेवण्यात येई त्या परातीभोवती धनिक लोक बसत गिर्रेबाज कबुतर आकाशात सोडण्यात येई ते तासन्तास आकाशात उडत राही, पण अशा मोजमापाने ते उडे की त्याचे प्रतिबिंब परातीतल्या पाण्यात सतत दिसत राही

सुंदर हस्ताक्षराची नक्षी (कॅलिग्राफी) किंवा चित्रे हे लखनौचे आणखी एक वैशिष्ट्य होते धर्मग्रंथातील एखादे वचन पक्ष्याच्या किंवा प्राण्याच्या आकारात काढले जाई बगदाद खिलाफतीपर्यंत (७५० व १२५०) अरबी भाषा हीच जगातील सर्व मुस्लिमांची प्रमाण भाषा होती त्या भाषेतील वचने निरनिराळ्या नक्षीदार किंवा चित्रमय रूपात लिहिणे हा छंद लखनौत फार मोठ्या प्रमाणावर पसरला होता अशा कलावंतात 'मुस्लिस्तान'ची सुंदर प्रत करणारा हफिझ नूर उल्ला अग्रेसर होता मुस्लिम चित्रकला व विशेषत मिनिएचर्स (लहान आकाराची चित्रे) यांचे लखनौ हे सर्वमान्य केंद्र होते, आपण जेव्हा लखनौची संस्कृती असा उल्लेख करतो, तेव्हा त्या भागातील संगीत, नृत्य, शिष्टाचार, क्रीडा, छंद इत्यादी सर्वांचाच त्यात विचार असतो नवाब आणि त्यांच्या बेगमा यांचे खानदान ही तर अजीब चीज होती उदाहरणार्थ– लखनौची एक बेगम (मलिका फिखर) इतकी धनाढ्य व नखरेबाज होती, की ती एकदा घातलेले कपडे पुन्हा वापरीत नसे तिने एकदा वापरलेले कपडे गोरगरिबांना वाटून टाकले जात मात्र त्यापूर्वी ते उसवून कापून काढले जात हेतू असा की, त्या पडदानशीन बेगमेच्या अंगाची मापे कोणाला कळू नयेत ।

# हिंदीतले 'अनंत काणेकर' अमृतलाल नागर

लखनौ येथे श्री अमृतलाल नागर यांना भेटल्यावर मला एकदम आमचे परममित्र अनत काणेकर यांची आठवण झाली काणेकराच्याप्रमाणेच अमृतलाल नागर हे सदा प्रसन्न, गोड, लोकाना मदत करण्यात तत्पर आणि उत्साही आहेत काणेकरांप्रमाणेच त्यानीही खूप प्रवास केला आहे विविध क्षेत्रात लेखन केले आहे लखनौला गेल्यावर मी कोणत्या साहित्यिकांना भेटावे अशी जेव्हा मी मुबईतील माझ्या हिंदीभाषिक स्नेह्यांकडे चौकशी करू लागलो, तेव्हा सर्वांनी जर कोणते पहिले नाव घेतले असेल, ते अमृतलाल नागर याचे म्हणून लखनौला पोचल्यावर प्रथम मी त्यांच्याशीच सपर्क साधला त्यानी त्याच दिवशी चार वाजता मला बोलावले.

चौक या लखनौच्या जुन्या भागात कॉन्व्हेंट हायस्कूलजवळच्या बोळात त्याचे घर आहे बोळ लहान आहे, पण नागर याचा वाडा प्रशस्त, मोठ्या चौकाचा आणि जुन्या नवाबाच्या निवासाची आठवण करून देणारा आहे नागर यांचे वय आता ६८ वर्षांचे आहे, पण त्याचा उत्साह तरुणांनाही लाजविणारा आहे माझे अत्यत हार्दिक स्वागत करून ते म्हणाले, "महाराष्ट्राने मला एवढे प्रेम दिले आहे की ते मी जन्मभर विसरू शकणार नाही मुबई, पुणे, कोल्हापूर ही महाराष्ट्रातील गावे मला अगदी घरच्यासारखीच वाटतात या गावात मी जीवनातील फार सुखाचा काळ घालविला आहे"

त्याच्या बोलण्यात कोल्हापूरचा उल्लेख आलेला पाहून मला आश्चर्य वाटले कारण परप्रांतीयांच्या दृष्टीने कोल्हापूर हे तसे आडबाजूचे गाव आहे कोल्हापूरला ते कशासाठी गेले होते असे मी विचारले तेव्हा श्री नागर म्हणाले, "सागतो आपण नाश्ता आणि चहा घेऊ," उत्तर प्रदेशातील शिरस्त्याप्रमाणे सकाळपासून

रात्रीपर्यंत केव्हाही काही खायचे असेल (अर्थात जेवण सोडून) तर त्याला नाश्ताच म्हणतात नागर यांनी आवाज उंच करून आत कुणाला तरी नाश्ता व चहा आणायला सांगितले आणि ते पुढे बोलू लागले, "त्यावेळी मी साहित्याप्रमाणेच चित्रपटाच्याही क्षेत्रात होतो वि स खांडेकर यांच्या 'संगम' या मराठी चित्रपटाचे हिंदीकरण करण्यासाठी माझा कोल्हापूरला मुक्काम होता कोल्हापूरची हवा, अन्न आणि तिथले लोक अगदी मस्त आहेत मनपसंत आहेत

कोल्हापूरात प्रा फडके वि स खांडेकर, गोविंदराव टेंबे अशा महान साहित्यिकांना व कलावंतांना भेटण्याचे भाग्य मला मिळाले टेंबे हे संगीतातले. पण त्यांचे लेखनही मला अतिशय आवडत असे, 'माझी संगीत साधना' हे त्यांचे पुस्तक अपूर्व आहे आजही त्या पुस्तकाचा हिंदी अनुवाद करण्याची माझी उमेद आहे दादा साळवी दामुअण्णा मालवणकर असे मोठमोठे नट आणि सी रामचंद्रांसारखे थोर संगीत दिग्दर्शक मला आठवतात कोल्हापुरात 'पुढारी' नावाचे दैनिक होते 'सावन' या माझ्या चित्रपटाला सी रामचंद्र यांनी संगीत दिले आहे महाराष्ट्राचा माझ्या मनावरचा संस्कार किती खोल व कायमचा आहे ते मी तुम्हाला पटवून देतो" असे म्हणून नागरजी उठले आपल्या लेखनाच्या बैठकीजवळ गेले तेथे भिंतीवर काचेच्या फ्रेममध्ये लावलेल्या काही ओळींची चौकट त्यांनी मला दाखविली

"वन्ही तो चेतवा रे चेतवा ।
चेतविताची चेतती" ॥ रामदास

ही त्या फ्रेममधील ओळ पाहून मला त्यांचे म्हणणे ताबडतोब पटले कृतज्ञतेचे पाणी डोळ्यात तरळत असताना अमृतलाल म्हणाले, "बड़े सुहाने दिन थे कोल्हापुरात माझी एकही सायंकाळ सुनी गेली नाही संगीत, साहित्य, नाटक, रसिक मित्र यांच्या मेजवान्या रोजच्या रोज चालत असत"

थोड्याच वेळात जिलेबी, सामोसा वगैरे खाद्यपदार्थ व चहा आला त्याचा समाचार घेता घेता श्री नागर म्हणाले, "आमचे घराणे मूळचे गुजरातचे १८९५ मध्ये माझे वडील राजाराम नागर हे अलाहाबाद बँकेचे सब एजंट म्हणून अलाहाबादला आले तेव्हापासून आम्ही उत्तर प्रदेशचे रहिवासी झालो आमच्या कुटुंबावर फार पूर्वीपासून साहित्याचे संस्कार झाले माझ्या लहानपणी 'सरस्वती', 'गृहलक्ष्मी' इत्यादी मासिके आमच्या घरी येत तेव्हाच मला वाङ्मयाची गोडी लागली अनेक साहित्यिक हे माझ्या वडिलांचे स्नेही होते राष्ट्रीय कवी व नाटककार प माधवरावजी शुक्ल हे माझे नातेवाईक होते व आचार्य श्यामसुंदरदास हे आमच्या कुटुंबियांचे स्नेही होते १९२९ मध्ये वयाच्या तेराव्या वर्षीच मी पहिली कविता लिहिली त्या वेळी सायमन कमिशनच्या निषेधार्थ लोकांनी काढलेल्या

शांततामय मोर्चावर पोलिसांनी अमानुष हल्ला केला त्या वेळी मी पहिली देश-भक्तिपर कविता लिहिली आणि ती अलाहाबादच्या दैनिक आनंद'मध्ये प्रसिद्धही झाली होती १९३३ मध्ये माझी व शरच्चंद्र चतर्जी यांची पहिली भेट झाली या भेटीचा माझ्या मनावर फार खोल व दूरगामी परिणाम झाला साहित्याकडे माझ्या मनाचा पूर्वीपासून कल होताच आता शरच्चंद्रांच्या भेटीनंतर आपण साहित्यिक व्हायचेच असा माझा निश्चय झाला या पहिल्या भेटीनंतर त्यांच्या व माझ्या नेहमी भेटी होत गेल्या

माझ्या वडिलांच्या निधनानंतर मी १९३५ मध्ये एका विमा कंपनीत लखनौला नोकरी धरली पण अठराव्या दिवसानंतर एका अधिकाऱ्याशी मतभेद होऊन ती नोकरी मी तत्काळ सोडली मी साहित्य हे आपले क्षेत्र मानतो १९३५ मध्ये 'वाटिका' हा माझा संग्रह प्रसिद्ध झाला त्यानंतर 'अवशेष', 'नवाबी मसनद', 'तुकाराम शास्त्री' ही माझी पुस्तके प्रसिद्ध झाली आणि लोकप्रियही झाली १९४० पासून १९४७ पर्यंत मी कोल्हापूर, मुंबई आणि मद्रास येथे चित्रपट व्यवसायात लेखन केले"

चित्रपटसृष्टीतील आपल्या कामाविषयी बोलताना श्री नागर यांनी सांगितले की १९४१ मध्ये किशोर साहू यांच्या 'कुवाँरा बाप' या चित्रपटाचे लेखन मी केले, त्यानंतर त्यांच्याच 'राजा' (१९०४), आचार्यनिर्मित 'उलझन' (१९४२) नितीन बोस यांच्या 'पराया धन', लीला चिटणीस आणि ग्वालानी यांच्या 'किसीसे न कहना' (योगायोग म्हणजे याच नावाचा हृषिकेश मुकर्जी यांचा चित्रपट १९८४ मध्ये भारतात चालू आहे), बहुरानी (निर्माता किशोर साहू) उदय शंकर यांचा 'कल्पना', वीरेंद्र देसाई यांचा 'गुंजन', सिंह आर्ट प्रॉडक्शनचा 'चोर' अशा अनेक चित्रपटांचे लेखन किंवा हिंदीकरण मी केले आहे श्रीमती एम एस शुभ-लक्ष्मी यांच्या 'मीरा' या तमिळ चित्रपटाचे मी हिंदीकरण केले तेव्हा त्यांचा परिचय होण्याचे भाग्य मला मिळाले दोन रशियन चित्रपटांचेही मी हिंदीकरण केले आहे"

अमृतलाल नागर यांनी मराठीतील सुप्रसिद्ध आत्मचरित्र आणि प्रवासवर्णन 'माझा प्रवास' (वाईकर भटजी) या पुस्तकाचे हिंदीत भाषांतर केले आहे 'आँखो देखा गदर' या नावाने ते प्रसिद्ध आहे तसेच मामा वरेरकर यांच्या 'सारस्वत' या नाटकाचाही त्यांनी हिंदीत अनुवाद केला आहे चेकॉव्ह, मॉपसाँ, फ्लुबर्ट अशा परकीय लेखकांच्या आणि के. एम मुन्शीसारख्या भारतातील पर-प्रांतीयांच्या कलाकृतीही त्यांनी हिंदीत आणल्या आहेत श्री नागर यांचे स्वतःचे साहित्यही फार विस्तृत कार्यक्षेत्र व्यापणारे आणि मौलिक आहे त्यांचे चौदा कथा-

संग्रह, नऊ कादंबऱ्या, तीन रंगमंचावरील नाटके, २४ नभोवाणीवरील नाटके, तीन ललित पुस्तके, आणि बालसाहित्याची सहा पुस्तके प्रसिद्ध आहेत 'बुंद आर समुद्र' हे त्यांचे गद्यात्मक महाकाव्यच आहे कालाच्या ओघात भारतीय कुटुंबव्यवस्था कशी बदलत आहे, याचे परिणामकारक चित्र त्यात आहे १९४३ मध्ये बंगालमध्ये अभूतपूर्व दुष्काळ पडला तेथे जाऊन त्या विषयावर श्री नागर यांनी 'महाकाल' ही कादंबरी लिहिली 'शतरंज के मोहरे' या त्यांच्या कादंबरीत १९ व्या शतकातील अवधच्या राजघराण्याचे विदारक चित्रण आहे 'ये कोठिवालिया' हे त्यांचे पुस्तक अतिशय गाजले आहे लखनौच्या कोठिवाल्यांचा वैभवाचा काळ आणि त्यानंतरचा ढासळता काळ यांचा मागोवा या पुस्तकात त्यांनी घेतला आहे 'अमृत और विष' या कादंबरीत त्यांनी स्वातंत्र्योत्तर काळात जुन्या व नव्या पिढीचा झालेला संघर्ष दाखविला आहे एका कादंबरीत बेगम समरूच्या चरित्रातील महत्त्वाच्या प्रसंगाचे लालित्यपूर्ण चित्रण केले आहे 'मनाचो बहुत गोपाल' ही त्यांची अगदी अलीकडची कादंबरी आहे भंग्याच्या वस्तीत जाऊन, त्यांचे अनुभव ऐकून त्यांनी त्या समाजावर ही कादंबरी लिहिली आहे

१९५३ मध्ये श्री नागर यांनी लखनौच्या आकाशवाणी केंद्रावर निर्मात्याची नोकरी धरली पण स्वतंत्र साहित्यनिर्मितीच्या आड नोकरीची बंधने व वेळ येत असल्याचे पाहून त्यांनी १९५६ मध्ये ही नोकरी सोडली व ते पूर्णवेळ लेखन करू लागले १९६२ मध्ये त्यांनी रशियाचा दौरा केला १९७६ मध्ये मॉरिशसमध्ये विश्व हिंदी संमेलन भरले होते, त्यावेळी ते मॉरिशसलाही गेले होते त्यांच्या अनेक कलाकृतींची अन्य भाषांत भाषांतरे झाली आहेत 'बुंद और समुद्र'चे रशियनमध्ये भाषांतर झाले आहे त्याच पुस्तकाची अनेक प्रमुख भारतीय भाषांत नॅशनल बुक ट्रस्टतर्फे भाषांतरे झाली आहेत 'सुहाग के नुपूर' आणि 'मानस हंस' या त्यांच्या पुस्तकांचे मराठी अनुवाद प्रसिद्ध झाले आहेत तसेच 'अमृत और विष' चा मल्याळी आणि 'सुहाग के रात' चा उडियामध्ये अनुवाद झाला आहे त्यांच्या शेकडो कथा बंगाली, गुजराती, मराठी, इंग्रजी, उडिया इत्यादी भाषांतील नियतकालिकांतून प्रसिद्ध झाल्या आहेत राजस्थान, उज्जैन, जोधपूर, अलिगड, मीरत, सागर इत्यादी अनेक विद्यापीठांनी श्री अमृतलाल नागर यांच्या वरील हिंदी प्रबंधांना पीएच डी पदव्या दिल्या आहेत जर्मन व रशियन विद्यापीठांतही त्यांच्या साहित्यावर संशोधन आणि लेखन झाले आहे श्री नागर सध्या आपली चौदावी कादंबरी लिहीत आहेत १८५४ सालापासून आतापर्यंतच्या काळातील सहा-सात पिढ्यांचे संक्रमण ते या कादंबरीत दाखवीत आहेत

श्री नागर म्हणाले, "मला मराठीविषयी पहिले कुतूहल निर्माण झाले, ते आमच्या घरी 'श्री राजराजेश्वरी' या मासिकाच्या एका जुन्या अंकातील जाहि-

रातीवरून मला अजून आठवते की तो १९०१ मधील अंक होता १९२३–२४च्या सुमारास मी सातआठ वर्षांचा असताना त्या मासिकात एक जाहिरात पाहिली ' घर बैठे मराठी सीखिए ' आपणही घरच्या घरी मराठी शिकावी असे मला तेव्हा-पासून वाटू लागले आजच्या मुलांना आणि तरुणांना हिंदी चित्रपटातील नट-नटयांविषयी जसे विलक्षण आकर्षक वाटते, तसे मला बालपणी लेखकांच्याबद्दल वाटत असे राष्ट्रीय नेत्यांच्या विषयीही आमची भावना होती मी अलाहाबादला असताना माझे एक नातेवाईक रुग्णालयात आजारी होते तेव्हा मी त्यांना भेटण्या-साठी जात होतो त्याचवेळी प जवाहरलाल नेहरू यांच्या मातोश्रीही त्याच हॉस्पिटलमध्ये आजारी होत्या व नेहरू त्यांना भेटण्यासाठी येत त्यामुळे माझ्या व नेहरूंच्या अनेक वेळा दीर्घकाळ भेटी होत असत

साहित्यातील अनेक सन्मान श्री नागर यांना मिळाले आहेत ' बूंद और समुद्र ' या कादंबरीला काशी नागरी प्रचारिणी सभेचा ' बटुक प्रसाद ' पुरस्कार मिळाला ' सुहाग के नूपुर ' या कादंबरीला उत्तरप्रदेश सरकारचे ' प्रेमचंद ' पारि-तोषिक त्यांच्या ' अमृत और विष ' या पुस्तकाला मिळाले त्याच पुस्तकाला नंतर सोवियत लँडचे नेहरू पारितोषिक मिळाले १९७२ मध्ये श्री नागर यांच्या ' मानसका हंस ' या पुस्तकाला मध्यप्रदेशाचे ' अखिल भारतीय बीर सिंह देव ' पारितोषिक मिळाले त्याच पुस्तकाला उत्तर प्रदेशाचा १९७३–७४ चा उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कारही मिळाला हिंदी नाटयकलेची उत्कृष्ट सेवा केल्याबद्दल १९७१ साली त्यांना उत्तर प्रदेश संगीत नाटय अकॅडमीचा पुरस्कार देण्यात आला प्रयाग येथील हिंदी साहित्य संमेलनाने त्यांना ' साहित्य वारिधी ' ही पदवी १९७२ मध्ये दिली भारत सरकारने त्यांना ' पद्मश्री ' देऊन गौरव केला आहे

श्री अमृतलाल नागर यांचा परिवार सुसंस्कृत, गतिमान आणि सुखी आहे त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव कुमुद नागर हे लखनौ दूरदर्शन नाटय विभागाचे निर्माते आहेत दुसरे चिरंजीव शरद नागर हे उत्तर प्रदेश संगीत नाटक अकॅडमीचे सहा-य्यक कार्यवाह आणि सांस्कृतिक अधिकारी आहेत कन्या डॉ अचला नागर या कथालेखिका असून मथुरा नभोवाणी केंद्रावर आहेत दुसरी कन्या सौ आरती पंड्या संस्कृतच्या संशोधक आणि नभोवाणी व रंगमंचावरील अभिनेत्री आहेत पत्नी सौ प्रतिभा नागर या ' पंचाहत्तर टक्के अमृतलाल नागर 'च आहेत, असे श्री नागर म्हणाले.

ज्या वाडयात श्री नागर राहत आहेत, त्याच्या एका भागात श्री शशीकपूर यांच्या सुप्रसिद्ध ' जुनून ' या चित्रपटाचे काही चित्रण झाले आहे सांस्कृतिक आणि ऐहिक दृष्टया अत्यंत यशस्वी झालेले अमृतलाल नागर हे तितकेच नम्र, मनमिळाऊ आणि हसतमुख आहेत त्यांच्या सहवासात मला वारंवार अनंत काणे-

कराची आठवण झाली त्याच्या या निगर्वी स्वभावाबद्दल मी कौतुक केले तेव्हा आम्हाला नागर म्हणाले, "मंत्रीजी, माझ्या मित्राच्या बरोबर वावरताना मी माझे नाक काढून खिशात ठेवतो पण कोणी जर माझ्याजवळ सत्ता, पैसा किंवा इतर वरिष्ठतेचा दर्प दाखवू लागला तर मी त्याला अजिबात जुमानीत नाही अशा वेळी मात्र मी माझे नाक खिशातून काढतो आणि त्याचेपेक्षाही माझे नाक उच्च आहे हे त्याला दाखवून देतो।"

कुंवर नारायण हे हिंदीतील एक वैशिष्टयपूर्ण कवी व कथाकार आहेत ते मोजकेच लिहितात पण त्यात सामाजिक संदर्भ आणि आशय फार मोठा असतो त्यांचे तीन काव्यसंग्रह, एक दीर्घ काव्य आणि दोन कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत ते मध्य लखनौपासून बरेच दूर राहतात त्यांचा बंगला अतिशय सुंदर आणि निवांत आहे इतक्या कमी लेखनावर एखादा लेखक इतक्या चांगल्या निवासाचा मालक बनू शकतो याचे मला आश्चर्य वाटले आणि ते इतर कोणता व्यवसाय करणात म्हणून मी विचारले, तेव्हा कुंवर नारायण म्हणाले, "माझा मोटारचा व्यवसाय आहे मी मोटारींचा विक्रेता आहे साहित्याचा धंदा करण्याची माझ्यावर पाळी येऊ नये म्हणून मी निर्वाहासाठी दुसरा धंदा करतो आणि कलात्मक समाधनासाठी लेखन करतो"

लखनौ विद्यापीठातून कुंवर नारायण यांनी १९५१ मध्ये इंग्रजी विषय घेऊन एम ए पदवी मिळवली चक्रव्यूह हा त्यांचा काव्यसंग्रह १९५६ मध्ये प्रसिद्ध झाला तिसरा सप्तक हा काव्यसंग्रह १९५६ मध्ये निघाला त्यानंतर 'परिवेश हम तुम' हा काव्यसंग्रह १९६१ मध्ये प्रसिद्ध झाला 'आत्मजयी' या खंडकाव्याने कुंवर नारायण यांना प्रकाशझोतात आणले कठोपनिषदातील नचिकेत या व्यक्तिरेखेवर त्यांनी लिहिलेल्या या खंडकाव्यास १९७१ चे हिंदुस्थानी अकॅडमी पारितोषिक मिळाले त्याच वर्षी 'आकारों के आसपास हा त्यांचा कथासंग्रह प्रसिद्ध झाला आणि त्याला उत्तर प्रदेश सरकारचे प्रेमचंद पारितोषिक मिळाले १९८२ मध्ये त्यांचा आमने सामने' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला त्याला केरळचे 'आसान पारितोषिक' आणि मध्यप्रदेशचे 'तुलसी पारितोषिक' मिळाले आहे त्यांनी अनेक समीक्षात्मक लेखही लिहिले आहेत. कुंवर नारायण यांची एकंदर निर्मिती संख्येने लहान असली तरी गुणवत्तेत श्रेष्ठ आहे त्यांच्या अनेक कथा व कविता कित्येक भारतीय व परदेशातील भाषांतून भाषांतरित झाल्या आहेत आधुनिक हिंदी साहित्यात वास्तवता, सामाजिक संदर्भ आणि विधायक दृष्टिकोन आणण्यात त्यांचा मोठा वाटा आहे कुंवर नारायण यांनी मला आपला एक काव्यसंग्रह (आमने सामने) आणि एक कथासंग्रह (आकारों के आसपास) दिला नमुना म्हणून त्यांच्या एका कवितेचा काही भाग खाली देत आहे

**इन्तिजाम**

कल फिर एक हत्तया हुई
अजिब परिस्थितीयों में।
मै एक अस्पताल गया
लेकिन वह जगह अस्पताल नही थी।
वहाँ डॉक्टरसे मिला
लेकिन वह आदमी डॉक्टर नही था।
फिर वहाँ एक अधमरा बच्चा लाया गया
जो बीमार नही, भूखा था।
डॉक्टरने मेज पर से
ऑपरेशनका चाकू उठाया
मगर वह चाकू नही
जग लगा भयानक छूरा था।
छुरे को बच्चे के पेट मे भोकते हुए उसने कहा
अब यह बिलकुल ठीक हो जाएगा।

# देवनागरीचे पुरस्कर्ते नंदकुमार अवस्थी

मी उत्तर प्रदेशचा दौरा करून आलो या दौऱ्यात ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या महादेवी वर्मा, प्रेमचंद यांचे चिरंजीव अमृत राय, शिवानी, अमृतलाल नागर, हिंदी एकांकिकेचे प्रणेते डॉ रायकुमार वर्मा अशा अनेक साहित्यिकाना मी भेटलो ही नावे कमी-अधिक प्रमाणात मराठी वाचकाना परिचित आहेत पण येथे फारसे ज्ञात नसलेल्या पण अफाट कर्तृत्वाच्या एका व्यक्तीला मी लखनौ येथे भेटलो. त्याचे नाव नदकुमार अवस्थी एक लेखक केवढे प्रचड कार्य जिद्दीने करतो हे प्रत्यक्ष पाहून मी चकित झाला लखनौ येथील ' उत्तर प्रदेश हिंदी सस्थान 'चे प्रमुख डॉ शिवमंगल सिंग ऊर्फ सुमन यानी मला प्रथम श्री अवस्थी याच्या कार्याची माहिती दिली, तेव्हाच त्यांना भेटण्याची मला अतिशय उत्सुकता वाटू लागली तावडतोब मी फोन करून भेटीची वेळ घेतली आणि चौपटिया रस्त्यावरील त्याच्या ' भवन वाणी ट्रस्ट ' मध्ये म्हणजेच त्यांच्या निवासस्थानी गेलो.

श्री अवस्थी हे ७७ वर्षांचे आहेत पण अतिशय उत्साही आणि नव्या नव्या योजना हाती घेऊन त्या पार पाडण्याची जिद्द धरून सतत कार्य करणारे आहेत त्याना पाहून मला पुण्याच्या केळकर म्युझियमच्या दि ग. केळकर याची आठवण झाली विविध भाषांतील धर्मग्रथ व जुने साहित्यविषयक ग्रथ हिंदी भाषेत आणण्याच्या कार्याला श्री अवस्थी यांनी स्वत'ला वाहून घेतले आहे आपल्या या कामाची पार्श्वभूमी सागताना ते म्हणाले, " मी पूर्वी रेल्वेखात्यात नोकरी करीत असे बगालला मी गेलो, तेव्हा बंकिमचद्रांचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांचे साहित्य याचा माझ्या मनावर खोल परिणाम झाला नोकरी सोडून मी काही वर्षे काँग्रेसचे कार्यही केले. पण साहित्यात माझे मन अधिक रमू लागले माझ्या मते देवनागरी ही जगातील सर्व लिपींमध्ये परिपूर्ण लिपी आहे सर्वांनी देवनागरी लिपी स्वीकारली

तर विविध भाषिक लोकांतील वाद कमी होतील या विचाराने मी असे ठरविले की भारतातीलच नव्हे, तर जगातील अनेक भाषांतील साहित्य देवनागरीत आणायचे व हिंदी अनुवादासहित ते प्रसिद्ध करायचे भारत हे पराजित राष्ट्र म्हणून त्याला पूर्वी जगात प्रतिष्ठा नव्हती, पण प्राचीन काळी नालंदा विद्यापीठाच्या वेळी भारताला प्रतिष्ठा होती व जगाच्या विविध भागातून विद्याकांक्षी लोक भारतातच येत असत हिंदी भाषेत इतर भाषांतील साहित्य आणून ती समृद्ध करण्याचा आपल्याकडून होईल तेवढा प्रयत्न करावा म्हणून मी १९४९ च्या सुमारास हे कार्य हाती घेतले

पहिले जे काम मी हाती घेतले ते सर्वांत अवघड होते हे काम म्हणजे संपूर्ण कुराण शरीफ हे देवनागरी लिपीत आणायचे मूळ कुराण अरबी भाषेत आहे. त्या भाषेतील अनेक अक्षरे देवनागरीत नाहीत व उच्चार हिंदी भाषेत नाहीत उदाहरणार्थ, अरबीत 'ज' पाच तऱ्हांनी लिहिला जातो 'आ'चे दोन उच्चार आहेत ही अक्षरे व खुणा देवनागरीत आणणे अत्यंत कठीण होते त्यासाठी मी स्वतःची फौन्ड्री काढली व नवीन अक्षरे व खुणा तयार करून घेतल्या वीस वर्षे काम करून १०२५ पानांचे कुराण शरीफ देवनागरीत व हिंदीत आणले पण त्याच्या प्रसिद्धीस काही जुन्या मताच्या मौलवींनी विरोध केला. मूळ कुराण अरबीतून दुसऱ्या भाषेत आणणे हे त्या धर्मग्रंथाचे पावित्र्य कमी करण्यासारखे आहे, असा त्यांनी आक्षेप घेतला माझी वीस वर्षांची मेहनत वाया जाणार अशी भीती वाटू लागली म्हणून मी मौलाना अलीमियां या श्रेष्ठ धर्मतज्ज्ञांना भेटलो आणि कुराणातील विचार लोकांना समजायचे असतील तर त्याचे भाषांतर होणे आवश्यक आहे हे त्यांना पटवून दिले अखेर १९६९ मध्ये त्यांच्या प्रस्तावनेसह कुराण शरीफ देवनागरीत प्रसिद्ध झाले त्याच्या आतापर्यंत एक लक्ष प्रती खपल्या आहेत मूळ अरबी कुराणाचा आदर करण्यासाठी आणि ज्यांना मुळातूनच कुराण वाचावयाचे आहे त्यांच्या सोयीसाठी देवनागरीतील कुराणाच्या प्रत्येक पानावर ३॥ × २ इंचाची अरबी पृष्ठाची छपाई करण्यात आली आहे कुराणातील कठीण शब्दांचा कोश सध्या मी छापत आहे मात्र हे शब्द त्या कोशात अकारविल्हे दिलेले नसून कुराणात ते ज्या क्रमाने दिले आहेत, त्याच क्रमाने कोशात दिले आहेत त्यामुळे शब्द शोधण्याला त्रास पडणार नाही"

श्री अवस्थी यांच्या घराच्या तळमजल्यावरच्या बैठकीवर आम्ही आतापर्यंत बसलो होतो हे प्राथमिक निवेदन झाल्यावर ते म्हणाले, "आता तुम्हाला मी प्रसिद्ध केलेली पुस्तके दाखवतो" पहिल्या मजल्यावर जाण्यापूर्वी त्यांनी मला त्याच तळमजल्यावर चालू असलेला छापखानाही दाखविला मग आम्ही पहिल्या मजल्यावर गेलो तेथे दोन मोठ्या टेबलांवर व्यवस्थित रचून ठेवलेल्या पुस्तकांच्या प्रचंड

ढिगाकडे पाहून मी थक्क झालो हे सर्व मोठमोठे ग्रथ श्री अवस्थी यांनी प्रसिद्ध केले होते त्यासाठी एक एक ग्रथ मला दाखवीत ते म्हणाले, " हेच ते कुराण शरीफ– माझी पहिली कामगिरी ही तेलगू पुस्तके हे पहिले आहे १३ व्या शतकातील रगनाथ रामायण १३६५ पृष्ठांच्या या पुस्तकाची किंमत आहे फक्त साठ रुपये त्याशिवाय तेलगुमधील मोल्ल रामायण, पोतन्नकृत महाभागवतसु हे ग्रथ तयार आहेत तमिळमधील कम्ब रामायणाचे हे सहा खड एकदर पृष्ठसख्या पाच हजार सहाशे हे तमिळमधील प्रसिद्ध 'तिरुक्कुरळ' दोन हजार वर्षांपूर्वी महाकवी तिरुवळ्ळुवार यानी लिहिलेले मल्याळम्मधील हे महाभारत आणि अध्यात्म रामायण याची पृष्ठसख्या दोन हजार आहे बगालमधील कृत्तिवास रामायण, तीन खडात मी देवनागरीत आणले आहे त्यांची पृष्ठसख्या सोळाशे आहे "

" मराठीतील कोणते ग्रथ आपण काढले आहेत ?" मी विचारले त्यावर अवस्थी यानी त्या ढिगातील दोन ग्रथ काढून दाखवीत सागितले, " श्रीधरकृत श्रीराम विजय आणि श्रीहरिविजय दोन्हींची मिळून पृष्ठसख्या दोन हजार दोनशे तीस असून किंमत १३० रुपये आहे हे कार्य मुबईचे डॉ. गजानन साठे यांनी केले आहे गुरुमुखीमधील आठ ग्रथ मी नागरी लिपीत आणले आहेत व त्यांचा हिंदी भाषेत अर्थही त्यात दिला आहे गुरू ग्रथसाहेबाचे चार भाग आणि दशम गुरू ग्रथसाहेबाचे हे चार चार भाग आहेत त्यांची पृष्ठसख्या प्रत्येकी सातशे ते ९९८ अशी आहे त्याशिवाय ख्वाजा दिह्रा महमद यांचे दोन गुरमुखी ग्रंथ मी प्रसिद्ध केले आहेत दारा शुकोह हे राजघराण्यातील असूनही महापडित होते त्यांनी फारसीमधून उपनिषदावर केलेले भाष्य मी प्रसिद्ध केले आहे ते देवनागरीत आणून त्याचा हिंदीतून अर्थही या ग्रथात दिला आहे मौलाना अब्दुल्ला हकीम पुरस्कृत ३१६ पृष्ठांचा हा उर्दू ग्रथ ' गुजस्त लखनऊ ' आणि डॉ रूस्वाकृत उर्दूमधील हा 'शरीफजाद' अठराव्या शतकात काश्मीरी भाषेत प्रकाशराम कुर्यगामी यानी रामावतारचरित हा ग्रथ लिहिला, त्याचे नागरीकरण व भाषांतर मिळून हा पाचशे पृष्ठाचा ग्रथ मी फक्त वीस रुपयाना देतो काश्मीरी भाषेतील आदि कवयित्री हालुदयद यांचा हा सस्कृत व हिंदी पद्यानुवाद "

श्री अवस्थी एक एक ग्रंथ काढून माझ्या हाती देत होते आणि त्याचा दीर्घोद्योग व व्यासग याचा मला नवा साक्षात्कार घडत होता त्यानी सोळाव्या शतकातील गुजराती गिरिधर रामायण काढले १४६० पानाच्या या ग्रथाची किंमत फक्त साठ रुपये होती मराठीत साधारण तीनशे ते साडेतीनशे पानांच्या पुस्तकाला साठ रुपये पडतात इतक्या स्वस्त किमती त्याना कशा परवडतात म्हणून मी विचारले तेव्हा श्री अवस्थी म्हणाले, " धार्मिक ग्रथाची व ललित ग्रथाची तुलना करता येणार नाही धार्मिक ग्रथाचा वापर मोठा असतो एका ग्रथाची

दहा हजार प्रतींची आवृत्ती म्हणजे एका धार्मिक क्षेत्रात नवल नव्हे शिवाय मी हे काम फायद्यासाठी करीत नसून सुविचाराच्या प्रसारासाठी करीत असल्याने कमी किंमत ठेवण्याचा मी आटोकाट प्रयत्न करतो आमच्या भुवन वाणी ट्रस्टचे ध्येय-वाक्यच असे आहे

प्रत्येक क्षेत्र, प्रत्येक संत की वाणी ।
सपूर्ण विश्वमे घर घर है पहुँचानी ॥

या वाक्याबरहुकूम मी सर्व धर्मातील मूळ ग्रंथ आणि सताचे साहित्य हिंदीत आणण्याची पराकाष्ठा करीत आहे"

श्री नदकुमार अवस्थी यानी नेपाळी आणि राजस्थानी या भाषांतील अनुक्रमे भानुभक्त रामायण व रुक्मिणी मगल हे ग्रथ हिंदीत आणले आहेत तसेच 'सिंध की त्रिवेळी' हा सिंधी भाषेतील ग्रथही देवनागरी व हिंदीत प्रसिद्ध केला आहे गुजराथीतील १९ व्या शतकातील गिरिधर रामायण (१४६० पाने) आणि प्रेमानंद रसामृत (ओखहरण, नलदमयती, सुदामा चरित्र) हा पाचशे पानी ग्रथ हिंदीतून प्रसिद्ध केला आहे उडिया भाषेतील 'रामचरित मानस' (१४६४ पाने) व 'वैदेही विलास'(१००० पाने) हे अभिजात ग्रथ त्यानी हिंदीत आणले आहेत आसामीतील 'माधव कन्दली रामायण' हा १४ व्या शतकातील ९४३ पानाचा ग्रथ अवस्थी यानी देवनागरी लिपी व हिंदी भाषात प्रसिद्ध केला आहे सस्कृत-मधील 'मानस भारती' (७४४ पाने) व 'अद्‌भुत रामायण' (२४४ पाने) त्यांनी हिंदीत आणली आहेत 'वाणी सरोवर' नावाचे विविध भाषातील अभिजात ग्रथ, हिंदीत येणारे त्रैमासिकही या भुवन वाणी ट्रस्टतर्फे श्री अवस्थी हे चालवीत असतात

आपल्या भावी योजनांबद्दल बोलताना श्री अवस्थी म्हणाले, "तेलगू (पोहण्या महाभागवतम्–१००० पृष्ठे), मराठी (भावार्थ रामायण– सत एकनाथ ३,००० पृष्ठे), कुराण शरीफ (अरेबिक) तसवीर मजिदी (६००० पृष्ठे), सस्कृत वाल्मिकी रामायण (५००० पृष्ठे), मैथिली (चद्ररामायण– ८०० पृष्ठे), उर्दू (मर्सिय मिर आँबीस १६०० पृष्ठे) इत्यादी १८ ग्रथाचे नागरीतील लेखन व हिंदी-तील अर्थ देण्याचे काम सध्या चालू आहे यापैकी काही ग्रंथाचे हिंदीकरण चालू असून काहींची छपाई चालली आहे"

सत्याहत्तराव्या वर्षीही आणखी सुमारे साठ हजार पानी ग्रथाचे काम श्री अवस्थी यानी घेतले आहे हे पाहून माझा त्याच्याविषयीचा आदर दुणावला. विश्रांती हा शब्दच त्याच्या कोशात नाही ते म्हणाले, "मला लोक विचारतात, आणखी किती काम तुम्ही हातात घेणार ? या वयात तुम्हाला हे नवे काम झेपेल काय ?" मी त्याना उत्तर देतो की परमेश्वरावर भरवसा टाकून मोठी कामे घेतली

खरी ही कामे मला माझ्या ह्यातीत पूर्ण करता आली तर मी तरून गेलो म्हणेन, आणि हे ग्रंथ प्रसिद्ध होण्यापूर्वीच मला मरण आले, तरीही तरून गेलो असेच समजेन आचार्य विनोबा हे माझे स्फूर्तिस्थान आहे आसामच्या यात्रेत विनोबांना मी भेटलो होतो व निरनिराळ्या भाषांतील अभिजात ग्रंथ हिंदीत आणण्याची सूचना त्यावेळी त्यांनी मला केली होती

श्री अवस्थी यांनी हे ग्रंथाचे काम प्रथम सर्वस्वी स्वतःच्याच बळावर उचलले होते पुढे भारत सरकारने व राज्य सरकारने त्यांना साहाय्य केले भारत सरकारने त्यांना पद्मश्री देऊन त्यांचा गौरवही केला आहे अलीकडेच दिल्ली येथे झालेल्या विश्व हिंदी संमेलनात ग्रंथ प्रकाशनाचे थोर कार्य केल्याबद्दल त्यांचा सत्कारही झाला होता भुवन वाणी ट्रस्टच्या वाढत्या व्यापासाठी मोठी इमारत बांधण्याचे कामही चालू आहे या इमारतीच्या प्रवेशद्वाराच्या कमानीवर विविध भाषातील अक्षरे कोरण्यात येऊन सर्व भाषांचे ऐक्य अधोरेखित करण्यात येत आहे

लखनौच्या महोत्सवात ' लखनउऊनामा ' नावाचे एक पुस्तक प्रसिद्ध झाले होते त्याचे लेखक श्री योगेश प्रवीण हे आहेत त्यानाही मी भेटलो लखनौ आणि अवध हे त्यांच्या लेखनाचे मुख्य विषय आहेत श्री प्रवीण हे चाळिशीच्या आसपासचे तरुण लेखक आहेत त्यांना हिंदी, उर्दू, बंगाली, इंग्रजी अशा अनेक भाषांचे उत्तम ज्ञान आहे हिंदी साहित्य हा विषय घेऊन ते पहिल्या वर्गात एम्. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत विसाव्या वर्षीच त्यांचा ' शबनम ' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला १९७५ मध्ये त्यांचे ' साहब आलम ' हे पुस्तक प्रसिद्ध झाले

नभोवाणी, दूरचित्रवाणी व चित्रपट यांच्यासाठी त्यांनी भरपूर लेखन केले आहे शशी कपूर यांच्या जुनून या चित्रपटासाठी त्यांनी लिहिलेली लोकप्रिय गाणी आशा भोसले यांनी म्हटली आहेत त्याशिवाय त्यांनी लिहिलेल्या अनेक गाण्यांच्या कॅसेट व ध्वनिमुद्रिका निघाल्या आहेत अवधच्या संस्कृतीची तपशीलवार माहिती देणारे ' दास्ताने अवध ' हे त्यांचे पुस्तक १९८३ मध्ये प्रसिद्ध झाले ' पत्थर स्वप्न ' ' पाले गुलाब ' आणि ' आविटी झलक ' ही त्यांची आणखी काही पुस्तके त्यांनी अनेक पारितोषिके मिळविली असून व्यवसायाने ते प्राध्यापक आहेत

हिंदीतील अनेक साहित्यिकांना मी भेटलो, पण अलाहाबाद किंवा लखनौ येथे हिंदी प्रकाशकांना भेटण्याचा योग आला नव्हता कारण हिंदीतील बहुतेक सर्व मोठे प्रकाशक दिल्लीला आहेत त्या प्रकाशनांच्या काही शाखा लखनौ व अलाहाबादला आहेत मात्र लखनौ दूरचित्रवाणीवरून येताना अशोक रस्त्यावर मला अचानक ' आत्माराम अँड सन्स ' असा फलक दिसला मी आत गेलो तेथे वरेंद्रकुमार यांनी माझे स्वागत केले आजच्या हिंदी प्रकाशनव्यवसायाबद्दल माहिती देताना ते म्हणाले, " हिंदीचे ९५ टक्के प्रकाशक दिल्लीला आहेत कारण राजधानीतून सहज मालाचा

उठाव होऊ शकतो सर्वसाधारणपणे हिंदीत हार्ड कव्हर पुस्तकांच्या एक हजार ते तीन हजार प्रतींची पहिली आवृत्ती निघते लेखकाला दहा ते पंधरा टक्के रॉयल्टी मिळते पुस्तक विक्रेत्यांना तीस टक्के कमिशन द्यावे लागत असल्याने किमती अधिक ठेवाव्या लागतात आमच्या 'आत्माराम अँड सन्स' या प्रकाशन संस्थेने आता, पर्यंत अकराशे पुस्तके प्रसिद्ध केली आहेत त्यात रांगेय राघव, सुमन, चंद्रशेखर नीरज, डॉ रामकुमार वर्मा, देवराज, दीनेश, हरिवंशरॉय बच्चन, नोहियाल, रामावतार त्यागी, नित्यानंद, वात्सायन, कृष्णचंदर अशा अनेक नामवंताचे साहित्य आहे"

हिंदी पुस्तकांच्या खपाविषयी श्री वरेंद्रकुमार म्हणाले, "एकंदर खपापैकी तीस टक्के खप सरकारी मदतीवर चालणाऱ्या ग्रंथालयात होतो म्हणजे अप्रत्यक्षपणे सरकारच ती खरेदी करते उरलेली पुस्तके खपण्यासाठी तीन ते चार वर्षे लागतात हिंदीमध्ये किरकोळ खरेदी करणारे गिऱ्हाईक फार थोडे आहे मात्र पेपर बॅक हिंदी पुस्तकांचा व्यवहार अगदी वेगळा आहे ही पुस्तके मुख्यत जासूस कथा म्हणजे डिटेक्टिव्ह किंवा उथळ सामाजिक कादंबऱ्या असतात त्यांच्या दीड ते तीन लक्ष प्रती निघतात व किंमती ३ ते ५ रुपये इतक्याच असतात याउलट हार्ड कव्हर पुस्तकांच्या किंमती शंभर पानाला सुमारे पंचवीस रुपये एवढ्या ठेवाव्या लागतात पेपर बॅक्सचे पुस्तकांचे गिऱ्हाईक मात्र वैयक्तिक असते आणि त्यांच्या आवृत्त्याही फार मोठ्या असल्याने पुस्तके स्वस्त देणे परवडते हिंदी पुस्तकांची बाजारपेठ मोठी असली तरी ती अजून पुरेशी संघटित झालेली नाही अनेक भुरटे प्रकाशक अचानक उद्‌भवतात, लेखकांना खोटी आश्वासने देऊन मोठ्या रकमांची लालूच दाखवतात व प्रत्यक्ष पुस्तक निघाल्यावर लेखकाचे पैसे बुडवून आपला धंदा बंद करतात त्यांच्या या अपकृत्यामुळे अनेक हिंदी लेखक सर्वच प्रकाशकांना व्यर्थ दोष देतात त्यामुळे हिंदीमध्ये लेखक व प्रकाशकात काहीसे तणावाचे वातावरण आढळते मात्र स्थिर प्रकाशक आणि ज्येष्ठ सर्वमान्य लेखक यांच्यातील संबंध सर्वसाधारणपणे सौहार्दाचे आहेत

-०-

# श्रीरामचंद्रांची अयोध्या

अयोध्या ! हे नाव वास्तव वाटतच नाही. ते भौगोलिक नसून परिकथेतलेच वाटते. रामायणातील प्रमुख घटना ज्या नगरीत घडल्या, जेथे राम, लक्ष्मण, सीता मारुती, दशरथ, कैकयी, मंथरा यांची वस्ती होती, ती अयोध्या प्रत्येक हिंदू माणसाच्या बालपणातील स्वप्नभूमी असते. वाल्मिकी रामायणात (पाचवा सर्ग) या नगरीचे अतिशय मनोरम वर्णन केले आहे. त्यात म्हटले आहे की, "अयोध्येतील नागरिक सतत उत्सव करीत असतात. ही नगरी संपन्न आहे आणि येथील पौरजन आनंदी आणि तुष्ट आहेत. इथे लक्ष्मीचा निवास असतो. अयोध्या म्हणजे रत्नांची रासच आहे. हत्ती, घोडे, रथ अशा विविध प्रकारच्या रत्नांनी ही भरगच्च भरली आहे. निरनिराळ्या राजांचे दूत, प्रतिनिधी व भरभराट पावलेला व्यापार उदीम यांनी ही नगरी सुशोभित आहे. उंच इमारती, ध्वज, तोफा यांनी अयोध्या दाटली आहे. स्वयंचलित आयुधे आणि हरहुन्नर करणारे कारागीर या नगरीत आहेत. पुराणिक, शाहीर, नृत्यांगना, नाट्यनिपुण कलावंत यांनी खच्चून भरलेली ही वैभवशाली नगरी आहे. वेदविद्येत पारंगत असलेले पंडित, ज्ञानी आणि होमहवन करणारे ब्राह्मण या नगरीत वास्तव्य करतात. सत्य, तपश्चर्या आणि दया यांनी युक्त असलेले संयमी यती येथे आहेत. ज्या नगरी महर्षी आणि तपस्वी आहेत अशा या नगरीवर दशरथ राजा राज्य करीत होता. सारांश, आदर्श नगरी कशी असावी याचे पृथ्वीतलावरील प्रात्यक्षिक म्हणजे अयोध्यानगरी होती."

अशा या जगविख्यात नगरीला जाताना माझे मन उत्कंठा, अपेक्षा आणि कुतुहल यांनी भरलेले होते, हे साहजिकच आहे. लखनौहून दुपारी साडेअकराला फैझाबादला बस होती. अयोध्या म्हणजे फैझाबादचेच एक उपनगर. मी झीरो रस्त्यावरच्या बसस्थानकावर सकाळी अकरा वाजता गेलो. उत्तर प्रदेशच्या बस

सर्व्हिसबद्दल मी फारच प्रतिकूल मते ऐकली होती आणि माझा जो थोडा अनुभव होता, तोही उत्तेजक नव्हता पण लखनौहून फैझाबादला एक आगगाडी अगदी सकाळी होती दूरदर्शनवरील माझ्या मुलाखतीमुळे त्या गाडीने जाणे मला शक्य नव्हते दुसरी गाडी सध्याकाळी होती, ती रात्री अकराच्या अवेळी पोचत होती, म्हणून मी नाइलाजाने बसचा रस्ता धरला होता

बस-स्थानकात शिरण्यापूर्वीच, रिक्षातून मी उतरल्याबरोबर दोन-चार पोरानी माझ्या सामानाचा ताबा घेतला आणि कुठे जायचे आहे म्हणून विचारले मी 'फैझाबाद' म्हणताच 'ही पहा आत्ता गाडी सुटलीच' असे म्हणून माझे सामान मोफत उचलून त्यांनी एका बसमध्ये चढवले मी आत शिरून पाहतो तो बस सपूर्णपणे रिकामी होती असे दिसले 'सामानाचे पैसे नकोत, बसवाले आम्हाला देतात' असे त्या पोरानी सांगितले होते त्याअर्थी उतारू आणण्यासाठी त्यांना कमिशन मिळत होते आणि ते हमालीपेक्षा अधिक होते हे मी ओळखले आता इतर उतारूंची वाट पाहणे आले पुढच्या १५ मिनिटांत आणखी तीनजण बसमध्ये चढले साडेअकरा वाजले तेव्हा त्या मोठ्या बसमध्ये आम्ही फक्त सहाचजण होतो तरी बरोबर साडेअकरा वाजता कडक्टर आणि ड्रायव्हर आले तेव्हा मी उत्तर प्रदेशाच्या बस सर्व्हिसचे मनातून खूपच कौतुक केले

पण 'घी देखा लेकीन बडगा नही देखा' अशी माझी अवस्था होती, याची मला त्यावेळी कल्पना आली नाही साडेअकराच्या ठोक्याला ड्रायव्हरने बस सुरू केली उतारूनी सुटकेचा नि:श्वास टाकला पण बस सुमारे दोन मीटर पुढे गेली थांबली मग पुन्हा सुमारे दोन मीटर मागे येऊन थांबली उतारू गोळा करणारी पोरे जोरजोरात ओरडू लागली, "फैझाबाद, फैझाबाद, जल्दी करो बस जा रही है" दोनचार उतारू धावत आले पुन्हा बस ठप्प ड्रायव्हरने इंजिन बंद केले आणि खाली उतरून तो चालू लागला उतारू अस्वस्थ होऊन कडक्टरकडे तक्रार करू लागले तिकिटे फाडताना तो म्हणाला, 'पाँच मिनिटमें जाता है" दहा मिनिटे झाली, वीस झाली पुन्हा ड्रायव्हर उगवला बसमध्ये चौदा-पधरा उतारू होते आता मात्र ड्रायव्हरने बस स्थानकाच्या बाहेर नेली आता बस सुरू केली ती मागे न येता बस नक्की सुटली अशी माझी खात्री झाली पण कसचे काय! स्थानकाबाहेर एका झाडाखाली उतारूसाठी बस उभी राहिली, ती चागली अर्धा तास अखेर साडेबारा-पाऊणच्या सुमाराला तीस-पस्तीस उतारू घेऊन बस खरोखरच सुटली! वाटेत बाराबकी (लखनौचे शेवटचे उपनगर) येथे पुन्हा अर्धा तास थांबली रस्त्यावर लहान-मोठे थांबे घेत अखेर सध्याकाळी पाचच्या सुमाराला ती फैझाबादला पोचली बस स्टँडवर चौकशी केली तेव्हा कळले की फैझाबाद स्टँडवरून चौक भागाला सायकलरिक्षाने जावे लागते चौकातून अयोध्येपर्यंत टेंपो मिळतात

मी चौकीला गेलो तेथे काळ्या रंगाच्या तीन चाकी, सुसरीसारख्या दिसणाऱ्या तीन टेंपो होत्या आणि मेंढरासारखी माणसे घुसडण्याचे काम तत्परतेने चालले होते. दीड रुपयात अयोध्येला जाता येत होते. सुदैवाने हा प्रवास फक्त पंधरा मिनिटां-चाच असल्याने गर्दीचा विशेष त्रास झाला नाही अयोध्या जवळ येऊ लागली, तसे मला भाबडेपणाने वाटले की, प्रवेशद्वाराच्या आसपास कदाचित लक्ष्मणाचा रथ दिसेल, दोन-चार हरणे आढळतील, हत्तीवरून जाणारे सावकार-धनिक दिसतील, महाकाय मारुती रस्त्याने जाताना दृष्टिपथात येईल, भरत-शत्रुघ्न खेळीमेळीने शरयू नदीतून नौकाविहार करताना दिसतील पण छे ! यांपैकी काहीही दिसले नाही अयोध्येत प्रवेश करताना दोन्ही बाजूंना दोन मोठ्या इमारती दिसल्या एक होती 'अयोध्या प्रशाला' आणि दुसरी होती 'फैझाबाद डेअरी' हरे राम ! अयोध्येत तरी 'गोशाला' किंवा 'दुग्धालय' असे काही नाव आढळावे ! पण तेथे डेअरी हा इंग्रजी शब्द वाचून माझी काहीशी निराशाच झाली

अयोध्येत कोठे उतरायचे हे ठरले नव्हते सरकारचा टूरिस्ट बंगला होता पण तो मुख्य गावापासून लांब, रेल्वेस्टेशनजवळ होता त्याऐवजी गावातच एखाद्या चांगल्या हॉटेलमध्ये राहायचे मी ठरविले गावातल्या मध्यवर्ती चौकात उतरून चौकशी केली, तेव्हा कळले, की अयोध्येत चांगलेच काय, पण बरे असेही हॉटेल नाही याचे कारण असे की, नाममात्र भाडे घेऊन किंवा मोफत राहण्याची व्यवस्था करणाऱ्या इतक्या धर्मशाळा अयोध्येत आहेत, की तेथे दिवसाला पंधरा-वीस रुपये घेऊन राहण्यासाठी खोली देणारे हॉटेल चाललेच नसते हे धर्मक्षेत्र असल्याने तेथे येणारे प्रवासी हे भक्त असतात, वारकरी असतात जागेबद्दलची त्यांची अपेक्षा इतकी माफक असते की अंग टेकण्यापुरती जागा मिळाली तरी त्यांचे भागते मी हॉटेलची चौकशी करीत सामान घेऊन रस्त्याच्या कडेला उभा होतो, तोच तीन-चार माकडे माझ्यापाशी आली आणि मी त्यांना काहीतरी खाण्यासाठी टाकेन या अपेक्षेने माझ्याकडे पाहू लागली मला प्रथम आश्चर्य वाटले कारण ती माकडे अगदी पाळीव मांजरासारखी बिनधास्त जवळ आली होती मी रिक्षा बोलावली आणि बिर्ला धर्मशाळेत गेलो रस्ता दहा मिनिटांचाच होता पण तेवढ्यात मला वीसपंचवीस तरी माकडे दिसली झाडांवर, विजेच्या खांबांवर, घराच्या खिडक्यांवर, गॅलऱ्यात, छपरांवर पाहावे तिकडे माकडेच माकडे अयोध्येत एवढी माकडे कशी आणि ती अशी निर्धास्तपणे कशी फिरतात असे मी रिक्षावाल्याला विचारले, तेव्हा तो म्हणाला, "इथे रामभक्त हनुमानाची गढी आहे रामाबरोबरच इथे हनुमानालाही मान आहे वानरे ही हनुमानाची सेना असल्याने अयोध्येत कोणीही माकडे मारीत नाही किंवा पकडीत नाही म्हणून माकडांची संख्या वाढतेच आहे आजमितीस गणती केली तर या गावात जेवढी माणसे तेवढीच माकडे आहेत असे

दिसेल"

बिर्ला धर्मशाळा ठीक होती. स्वतंत्र खोलीला दहा रुपये भाडेही जास्त होते पण अडचण अशी होती, की तेथे अथरुण-पांघरुणांची व्यवस्था नव्हती नुसता लोखंडी पलंग आणि पाणी पिण्यासाठी एक माठ होता त्यावेळी थंडी तर कडाक्याची होती उष्णतामान सात अंशापर्यंत खाली गेले होते अर्थातच अथरुण-पांघरुणाशिवाय त्या धर्मशाळेत राहणे अशक्य होते म्हणून मी टुरिस्ट बंगल्यावर गेलो तेथे १२–१४ खोल्या होत्या, त्या सर्व रिकाम्या होत्या दोन नोकर होते खोली चांगली प्रशस्त होती पलंग, गादी चादर, रग वगैरे सर्व व्यवस्था होती आधी सूचना दिली तर जेवणही तयार करून देण्याची व्यवस्था होती खोलीला एक दिवसाला ३५ रुपये भाडे होते व्यवस्थेच्या मानाने ते वाजवी होते हे खरे असले तरी आजूबाजूला अजिबात वस्ती नसल्याने एक प्रकारची भयाणता वातावरणात भरून राहिली होती धर्मशाळेत थंडीने कुडकुडत रात्र काढून आजारी पडण्यापेक्षा इथे उबदार पांघरुणात तरी झोपता येईल, या विचाराने मी तेथेच रहायचे ठरविले आता अंधार पडत आला होता, त्यामुळे मी त्या दिवशी गावात काही पाहणे शक्य नव्हते मी फैजाबादला एक चक्कर टाकून आलो, एवढेच

दुसऱ्या दिवशी सकाळी सहालाच उठूनच 'अयोध्या दर्शना'साठी निघालो हवा छान होती चालत जाण्यात मौज होती म्हणून मी पायीच निघालो गावात प्रवेश करतो न करतो तो माकडाचे तांडे दिसू लागले सर्व माकडे खाद्यपदार्थांच्या शोधात होती क्वचित दोन तीन माकडे एखाद्या रोटीच्या तुकड्यासाठी झगडताना दिसत बहुतेक माकडे उंच जागी बसून निरीक्षण करीत होती जाणारायेणारा कुणी काही खायला टाकतो काय याची प्रतीक्षा करीत होती ही माकडे अगदी माणसाळलेली व निरुपद्रवी होती हे मात्र खरे त्यामुळे प्रथम वाटणारी भीती थोड्या वेळाने नाहीशी होते अयोध्येची चांगली माहिती मिळावी म्हणून मी एक गाईड घेतला व त्याच्याबरोबर ही पुराणप्रसिद्ध नगरी पाहण्यासाठी निघालो अयोध्येत रिक्षावाले गाईड भरपूर आहेत ते दहा रुपयांत सर्व नगर दाखवून महत्त्वाच्या देवालयांची माहिती देतात

रिक्षावाल्याने आपली व्यवसायाची भाषा सुरू केली "अयोध्या ही पृथ्वीवरची सर्वांत पवित्र भूमी आहे कलियुगात प्राणिमात्राचा उद्धार अयोध्येतच होईल तेथे गेल्यावर आपोआप रामनाम कानी पडेल अयोध्येच्या सरयू नदीत स्नान केले तर सात जन्मांची पापे धुऊन निघतील, असे प्रत्यक्ष शंकराने पार्वतीला सांगितले आहे अयोध्येत एक हजार आठ मंदिरे आहेत रामरक्षा म्हटली तरी सर्व संकटापासून ती तुमचे रक्षण करील." तो बिचारा आपले नेहमीचे अयोध्यास्तवन करीत होता, तेव्हा माझ्या मनातले विचार त्याच्या भाविक विचाराशी जुळत नसले, तरी

सांस्कृतिकदृष्ट्या त्यांचे म्हणणे पटत होते रामायण आणि राम ही व्यक्ती यांचा भारतीयांच्या मनावर सर्वांत अधिक संस्कार झालेला असतो नीरस झाले, तर आपण आयुष्यात काही ' राम ' उरला नाही असे सहजच बोलून जातो हिंदुधर्मीयांच्या नावाची खानेसुमारी काढली, तर राम, रामचंद्र, रामचरण, रामशरण अशी रामाच्या नावाशी निगडीत नावे जास्तीत जास्त आढळतील एकवचनी, सदाचरणी, पराक्रमी, मातृपितृभक्त, निष्कपटी, सौंदर्यवान, एकपत्नी, सहनशील, ऋजू स्वभाव, युद्धातही काटेकोर नीतिनियम पाळणारा, प्रजाहितदक्ष अशा अनेक योग्य विशेषणांनी हजारो वर्षे भारतीयांच्या मनावर जर कोणी एक व्यक्ती राज्य करीत असेल, तर ती म्हणजे रामच निधनसमयी आपल्या तोंडून ' राम ' हे नाव यावे अशी सर्वत्र निष्ठावान हिंदूची इच्छा असते एखाद्याचे निधन झाले तर त्याने ' राम ' म्हटले असा आपण उल्लेख करतो मुलाला पाळण्यात घातल्यावर ' कौसल्येचा राम बाई, कौसल्येचा राम ' असे सुवासिनी म्हणतात आणि हिंदू जीवनाचा अंत होतो तोही ' राम ' म्हणून

महाराष्ट्रात एकमेकांना भेटल्यावर ' राम राम ' करण्याची प्रथा आहे हेतू हाच, की त्या निमित्ताने रामाचे नाव मुखी यावे. पापी माणसानेही लोकांना शाप देण्यासाठी 'मरा मरा' असे म्हटले तरी त्यातूनच ' राम राम ' असा आवाज येऊन त्याला पुण्य लागेल असे म्हटले जाते महात्मा गांधींचे भजन 'रघुपती राघव राजाराम' असे होते आणि मृत्यूच्या आधीन होण्यापूर्वी गांधीजींच्या तोंडून 'हे राम' हेच शब्द आले तेच शब्द यांच्या समाधीवरही कोरण्यात आले आहेत रामाने असे आपले सर्व जीवन व्यापले आहे त्या रामाच्या जन्मभूमीत,कर्मभूमीत आल्यावर मला धन्य वाटले

अयोध्या हे शहर अनेक नावांनी प्रसिद्ध आहे ही नगरी मनूने वसविली असे वाल्मिकीने म्हटले आहे मनूचा पुत्र ईक्ष्वाकू तो अयोध्येच्या सिंहासनावर आला याच ईक्ष्वाकू राजाच्या बासष्टाव्या पिढीत प्रभू श्रीरामचंद्राचा जन्म झाला ईक्ष्वाकू राजाच्या नावावरून अयोध्या ईक्ष्वाकूभूमी म्हणूनही प्रसिद्ध आहे विनीता, अयुधा (अयोध्येचा अपभ्रंश), साकेत, रामभूमी व रामपुरी या नावांनीही अयोध्या ओळखली जाते जैन धर्मातही अयोध्येला अतिशय महत्त्व आहे, कारण जैनांच्या पहिल्या व चौथ्या तीर्थंकरांची ही जन्मभूमी आहे बुद्धकाळात अयोध्या हे बौद्धांचेही धर्मक्षेत्र होते या शहरात तेव्हा अनेक बौद्ध विहार व मठ होते संत तुलसीदास यांनी आमले ' रामचरित मानस ' येथेच रामास अर्पण केले, म्हणूनही संतवाङ्मयात अयोध्येला अनन्यसाधारण महत्त्व आहे उत्तरेत भैया लोकांना मूळ वाल्मीकी रामायणापेक्षाही तुलसी-रामायण अधिक जवळचे आहे, कारण ते त्यांना सौकर्याने समजते अवधची राजधानी म्हणून तुलसीदासांनी अयोध्येचा उल्लेख ' अवधपुरी ' असा केला आहे रामायणकाळानंतर अयोध्येला उतरती कळा लागली होती, पण

सम्राट विक्रमादित्याने या नगरीचे पुनरुज्जीवन केले त्याने अयोध्येत ३५० मंदिरे बांधल्याचा उल्लेख अयोध्येच्या इतिहासात आहे

पवित्र मंदिराची यात्रा करण्यापूर्वी घाटावर गेलो अयोध्येच्या नदीचे नाव शरयू स्थानिक लोक तिला सरजू म्हणतात या नदीवर ३१ घाट आहेत निर्मली-कुंड घाट, सुमित्राघाट, रामघाट, लक्ष्मणघाट, प्रल्हादघाट, कैकेयीघाट, पापमोचन-घाट, गोलाघाट, अहिल्याबाई घाट, स्वर्गद्वार घाट, नागेश्वरनाथ घाट, धर्मराज घाट, कौसल्या घाट, ऋणमोचन घाट अशी यापैकी काही घाटांची नावे आहेत संत कबीरांनी या घाटाबद्दल म्हटले आहे—

" सरजू एक, घाट बहु तेरे कहत कबीर ये मनके फेरे "

(शरयू एकच आहे तिच्यावरचे घाट जरी अनेक असले, तरी त्यांचे निराळे-पण हा केवळ मनाचा खेळ आहे )

मी एका घाटावर स्नान केले गर्दी विशेष नव्हती, कारण तो काही यात्रेचा खास दिवस नव्हता तरीही वीस-पंचवीस जण स्नान करीत होते चार–पाच पोरसवदा पंडे ' धार्मिक कृत्य करायचे आहे काय ?' अशी पृच्छा करीत होते, पण ते फार चिकटत नव्हते 'नाही' म्हटले की लगेच बाजूला होत होते या पवित्र सरजू नदीवर स्नान करून मी अयोध्येची मंदिरे पाहण्यासाठी निघालो

सध्याची अयोध्या म्हणजे फैजाबादचे सुमारे तीस हजार वस्तीचे उपनगर आहे त्यात सर्वांत ठळकपणे दिसणारी इमारत हनुमान गढीची एका उंच टेकडीवर हनुमान गढी आहे तिची कथा अशी सांगतात की हनुमानाने जे अफाट कार्य केले, त्याची प्रशंसा करताना श्रीराम म्हणाले, " तू जे कार्य केलेस ते कोणीही करू शकणार नाही बक्षीस द्यावी अशी कोणतीही वस्तू या जगात नाही म्हणून मी माझे सर्वस्व तुला देत आहे तेसुद्धा तुझ्या थोर कार्यापुढे अल्पच आहे " असे म्हणून रामाने हनुमानाला आलिंगन देऊन जवळ घेतले आणि हनुमान गढीचे मंदिर त्याच्यासाठी दिले यावेळी हनुमानाने सांगितले, " जोपर्यंत पवित्र रामायणाची कथा या पृथ्वीवर राहील, तोपर्यंत ती ऐकण्यासाठी मीही या ठिकाणी राहीन " उत्तर हिंदुस्थानात जेथे रामायण वाचले जाते, तेथे सर्वत्र हनुमानासाठी जागा स्वच्छ करून ठेवण्याचा प्रघात आहे. कारण रामायण ऐकण्यासाठी हनुमान गुप्त रूपाने तेथे येतो असे भाविक मानतात " मोगलांनी अनेकवार स्वारी करूनही त्यांना अयोध्या नष्ट करता आली नाही, कारण गढीवरचा हा हनुमान दरवेळी अयोध्या नगरीचे रक्षण करीत आला आहे " असे अयोध्येचे पुजारी सांगतात.



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

बाबराचा हनुमान गढी तोडण्याचा प्रयत्न अयशस्वी झाला या हनुमानाला हठीला किंवा हट्टी,निग्रही-हनुमान असेही नाव आहे हनुमान गढीला वरपर्यंत चढून जाण्या-साठी पायऱ्या आहेत मंदिरात हनुमान, राम, सीता व लक्ष्मण यांच्या मूर्ती आहेत

कार्तिक महिनाभर हनुमान गढीवर मंत्र, जपजाप्य, कीर्तन व रामनामांचे कार्यक्रम होतात हनुमान जयंतीचा उत्सव मोठ्या धामधुमीने साजरा केला जातो या गढीवर व आजूबाजूला शेकडो माकडे आहेत 'श्रीरामदूत शरण प्रपद्ये' हे वचन गढीवर अनेक ठिकाणी लिहिण्यात आले आहे हा मंत्र दररोज अकरा वेळा, असा सहा महिने जपला तर हनुमानाची पूर्ण कृपा होईल, असे गढीवरच्या एका भिंतीवर लिहिले आहे

एक भव्य आणि अत्यंत सुंदर मंदिर अयोध्येत आहे, त्याचे नाव वाल्मीकी मंदिर दीड कोटी रुपये खर्चून हे अगदी अलीकडेच उभारण्यात आले आहे आजू-बाजूचे उद्यान व चबुतरे यांचे बांधकाम अजूनही चालू आहे वासुदेव घाटावरही हे संगमरवरी उत्तुंग मंदिर श्री मणिरामदास छावणी सेवा विश्रांत निधीतर्फे बांधण्यात आले आहे १९६५ मध्ये या मंदिराच्या बांधकामास सुरुवात झाली व मंदिराचा मुख्य भाग १९८३ मध्ये पूर्ण झाला 'श्रीमद् वाल्मीकी रामायण भवन' असे या मंदिराचे पूर्ण नाव आहे या मंदिराचे वैशिष्टच असे की आत दोन मजले असून सर्व भिंती पांढऱ्या संगमरवरी दगडाच्या आहेत व या भिंतीवर मूळ रामायणातील संस्कृत उतारे व त्यांचे हिंदी भाषांतर कोरले आहे प्रवेश केल्यावर मुख्या सभा-गाराच्या डाव्या हाताला रामायण वाचणाऱ्या वाल्मीकींची मूर्ती आहे या मूर्तीचे ओठ हलतात व ते रामायण वाचतात असे दाखविले आहे कॅसेट व टेपरेकॉर्डर यांच्या सहाय्याने वाल्मीकींच्या तोंडून संस्कृत रामायणातील श्लोक येतात असे दाखविले आहे गाभाऱ्यात ज्या मूर्ती आहेत, त्यात मध्ये वाल्मीकी व बाजूला राम आणि लक्ष्मण दाखविले आहेत सभागृहाच्या भिंतीवर रामायणातील निवडक प्रसंगांचीही चित्रे कोरण्यात आली आहेत सबंध अयोध्येतील हे सर्वांत सुंदर, निर्मळ व प्रसन्न असे ठिकाण आहे असेच आणखी एका लेखकाचे स्मारक अयोध्येत आहे. ते म्हणजे संत तुलसीदासाचे तुलसी स्मारक या नावाने हे नयन मनोहर मंदिर प्रसिद्ध असून तुलसीदासाचा पूर्णाकृती संगमरवरी पुतळा मंदिराच्या उजव्या बाजूला आहे

रामायणातील अनेक प्रसंगांची आठवण देणारी मंदिरे अयोध्येत आहेत उदाहरणार्थ, हनुमान गढीकडून जन्मभूमीकडे जाताना 'कोप भवन' अशा काहीशा विचित्र नावाचे एक मंदिर आहे कैकेयी जेव्हा दशरथावर रागावली आणि रामाला वनवासाला पाठविण्याचा हट्ट धरून बसली, तेव्हा ती या ठिकाणी होती असे सांगतात म्हणून तिच्या स्मृतिप्रीत्यर्थ हे 'कैकेयी कोप भवन' बांधण्यात आले या ठिकाणी रुष्ट झालेली कैकेयी, अगतिक दशरथ आणि आज्ञेची वाट पाहणारे

अधोवदन राम-लक्ष्मण यांच्या मूर्ती आहेत राणी सुमित्रा हिचे एक मंदिर राम-जन्मभूमीजवळ होते तेथे लक्ष्मण व शत्रुघ्न यांचा जन्म झाला विक्रमादित्याने या ठिकाणी सुमित्रा भवन नावाचे सुंदर मंदिर बांधले होते आता त्या ठिकाणी फक्त एक संगमरवरी दगड असून 'सुमित्रा भवन' अशी त्यावर लिहिलेली अक्षरे आता नष्ट झालेल्या मंदिराची फक्त जागा दाखवितात

कनकभवनाजवळ 'रत्नसिंहासन' नावाचे मंदिर आहे या ठिकाणी रामाचा राज्याभिषेक झाला होता, असे येथील मार्गदर्शक सांगतात सीता रसोई नावाचे मंदिर आहे तेथे सीता स्वयंपाक करीत होती असे माझ्या बरोबरच्या गाईडने सांगितले एवढ्या मोठ्या राजाची राणी स्वतः स्वयंपाक कशाला करील असा एक नास्तिक विचार माझ्या मनात आला, पण सीतेसाठी तेथे पाकसिद्धी होत असावी असे मी मानले रामसभ्यास्थान नावाचे एक स्थळ दाखविण्यात येते व या ठिकाणी राम आपल्या प्रजाजनांची गाऱ्हाणी ऐकत असत असे सांगण्यात येते. स्थानिक लोक याला रामदेवाना म्हणतात सीतारसोई भागातच रामकोट आहे या ठिकाणी रामाचे बालपण गेले योगायोग असा की, रामकोट व सीतारसोई जेथे आहे, त्याच ठिकाणाजवळ आता पोस्टऑफिस चालू आहे लव आणि अंकुश यांच्या जन्मभूमीत आता चक्क पोस्टल डिलिव्हरी आणि एक्सप्रेस डिलिव्हरी चालू व्हावी हा कालाचा महिमा

जन्मभूमी आणि कनकभवन ही अयोध्येतील दोन अत्यंत महत्त्वाची धर्मस्थळे आहेत ज्या ठिकाणी रामाचा जन्म झाला, त्याला जन्मभूमी किंवा जन्मस्थान असे नाव आहे या ठिकाणी सम्राट विक्रमादित्याने भव्य मंदिर बांधले होते, पण सम्राट बाबरने १५२८ साली अयोध्येतील अनेक मंदिरे नष्ट केली त्याचवेळी या जन्म-भूमी मंदिराचे शिखर फोडले पायाचा व त्यावरचा भाग तसाच ठेवला व त्यावर एक मशीद बांधली पुढे १७०७ साली औरंगजेबाने स्वर्गद्वार मंदिर असेच फोडून, अर्धे उद्ध्वस्त करून त्यावर मशीद बांधली त्यानंतर शिकंदर लोदी यांनी त्रेतानाथ मंदिर असेच पाडून त्याची मशीद केली रामजन्माचे ठिकाण हे हिंदूंचे अत्यंत पवित्र स्थान असल्याने ब्रिटिश काळात हिंदूंनी हे ठिकाण मूळ आपलेच आहे असे न्यायालयात सिद्ध केले, पण त्यामुळे हिंदू-मुस्लिमांच्यात तेढ निर्माण झाली भारत स्वतंत्र झाल्यानंतर, १९४९ मध्ये न्यायालयाने हे स्थळ 'वादग्रस्त म्हणून जाहीर केले आणि हिंदू किंवा मुस्लिम यांच्यापैकी कोणीच याचा वापर करू नये असा निर्णय दिला आज या जन्मभूमीभोवती लोखंडी दरवाजाचे कुंपण आहे व रात्रदिवस तेथे सशस्त्र पोलिसांचा पहारा आहे

राम जन्मभूमी हे हिंदूंचेच मंदिर असल्याने ते आपल्यालाच मिळावे असा हिंदूंनी आग्रह धरला असून त्यासाठी फार मोठी जिद्द दाखविली आहे या मूळ

मंदिराबाहेर त्यांनी लहानसे राममंदिर बांधले आहे व आपल्या हक्काच्या रक्षणासाठी एक समिती नेमली आहे या समितीचे संचालक श्री रामदयाल शरण यांना मी भेटलो तेव्हा ते म्हणाले, "२० डिसेंबर १९४९ पासून आतापर्यंत आम्ही रामजन्मभूमीच्या मंदिराबाहेर अखंड भजन चालविले आहे जोपर्यंत रामजन्मभूमी आमच्या ताब्यात मिळत नाही तोपर्यंत हे भजन रात्रदिवस, चोवीस तास आम्ही चालूच ठेवणार आहोत वीस भक्तांचा संच त्यासाठी तयार असून त्यातील पाच ते आठजण आळीपाळीने भजन करतात त्यांच्या जेवणा-खाण्यासाठी आमची समिती दरमहा अडीच हजार रुपये खर्च करीत आहे फैजाबादच्या समाज कार्यकर्त्या व माजी खासदार श्रीमती शकुंतला नायर या आमच्या समितीच्या अध्यक्ष आहेत गेली पस्तीस वर्षे सतत येथे रामनामाचा व भजनाचा घोष चालू असून हा जागतिक विक्रम आहे कोणत्याही परिस्थितीत, शांततामय मार्गाने आम्ही रामजन्माची पवित्र भूमी ताब्यात घेणारच असा आमचा निश्चय आहे" श्री रामदयाल शरण यांच्याबरोबरच मी रामभूमीला भेट दिली तेथे भजन चालू होते लोखंडी दरवाजातून मी पाहिले, तर मशिदीच्या घुमटाखालील भिंतीचे शिल्प हिंदू मंदिराचे आहे हे अगदी स्पष्ट दिसत होते तसेच मशिदीचे घुमट हे मूळ मंदिरावर नंतर लावल्याचेही अगदी स्पष्टपणे सिद्ध होत होते भजन करणाऱ्यांचा खर्च चालावा म्हणून बाहेरच्या लहान राम मंदिराजवळ ठेवलेल्या काचेच्या पेटीत भक्तांनी टाकलेली नाणी व नोटा यांचा खच पडला होता श्री शरण यांनी सांगितले की, "गेल्या पस्तीस वर्षांत आम्हाला खर्चाची कधीही तूट पडली नाही, ही प्रभू रामचंद्रांची कृपा '

मूळ कनकभवन फार प्राचीन होते जरासंधाचा वध केल्यावर श्रीकृष्ण अयोध्येला येऊन कनकभवनामध्ये राहिले होते असा अयोध्येच्या इतिहासात उल्लेख आढळतो पण पुढे धनाच्या लोभाने हे मंदिर लुटले गेले व उद्ध्वस्त केले गेले. विक्रमादित्याने या मंदिराचा पुनरुद्धार केला. अनेक वर्षांनंतर अयोध्येची राजधानी हलवून ती इंद्रप्रस्थला नेण्यात आली याच कनकभवनात रामाने वसिष्ठ मुनीचे दर्शन घेतल्याचा अयोध्या इतिहासात उल्लेख आहे. मोगलांच्या काळी अयोध्येत अनेक लढाया झाल्या, पण कनकभवनातील मूर्ती शाबूत राहिल्या कनकभवनमध्ये राम, सीता, लक्ष्मण व उर्मिला यांच्या सुंदर मूर्ती आहेत सध्याचे भव्य, संगमरवरी कनकभवन टिकमगढच्या महाराणीने लक्षावधी रुपये खर्चून बांधले आहे या मंदिरातील मूर्ती जितक्या देखण्या आहेत, तशा इतरत्र कोठेही नाहीत, असे या मंदिराच्या पुस्तिकेत म्हटले आहे कनकभवनात रोज आठ वेळा आरती होते मूर्तीचे कपडे बदलून दररोज वेगवेगळ्या रंगाचे वेष चढविण्यात येतात सोमवारी बदामी, मंगळवारी लाल, बुधवारी हिरवा, गुरुवारी पिवळा, शुक्रवारी पांढरा,

शनिवारी निळा व रविवारी गुलाबी तसेच दररोज सायकाळी कीर्तन व रात्री भजन होते. रामजन्म, सीताजन्म, कृष्णजन्म, रामविवाह पचमी, वसतोत्सव, शरद पौर्णिमा अशा अनेक प्रसगी या कनकभवनात मोठे उत्सव करण्यात येतात होलिकोत्सवात दुपारपासून रात्रीपर्यंत रग व गुलाल उडविण्याचा कार्यक्रम साजरा केला जातो

मुस्लिमांच्या आक्रमणानतर अयोध्येतील अनेक मूळ सस्कृत नावाचे मुस्लीम नावात रूपातर करण्यात आले 'चक्रतीर्थ'चे 'इस्लामाबाद' झाले, 'रामकोट'चे 'बेगमपुरा' झाले सुमित्रा घाटला अखतर मजिल असे नाव देण्यात आले कैकयी घाटाचे नामातर 'जीनत मजिल' असे करण्यात आले खुद्द रामघाटाचे नाव रहीमाबाद असे करण्यात आले बृहस्पती कुडाला बाग विजेसर असे नाव देण्यात आले जानकी घाटाचा अख्तरगज झाला सुवर्णखनी कुड सुलेमान बाग झाले वासुदेव घाट नव्या राजवटीत अगुरीबाग म्हणून ओळखला जाऊ लागला रामनगरीतील पवित्र नावांची परपरा काही काळ नष्ट झाली होती पण पुढे मुस्लिमाची सत्ता सपली व पुन्हा सर्व स्थळाना मूळ नावे मिळाली खुद्द मुस्लीम सत्तेच्या काळातही कागदोपत्री मुस्लीम नावे असली तरी हिंदूच्या बोलण्यात व लिहिण्यात जुनी सस्कृत नावेच येत असत इतिहासकारानी अशी नोंद केली आहे की गुलाम अलागीनच्या कारकीर्दीपासून नबाब वजीद अलीच्या काळापर्यंत अयोध्येवर मुस्लिमानी ७९ वेळा हल्ले केले त्यापैकी जास्तीत जास्त हल्ले (२१) औरगजेबाच्या कारकीर्दीत झाले व त्याखालोखाल (१४) हल्ले अकबराच्या काळात झाले या सर्व हल्ल्यांना तोंड देऊनही हिंदू सस्कृतीतील हे महान परपरेचे गाव आता उजळ माथ्याने व अभिमानाने आपल्या धर्माची पताका फडकवीत आहे

अयोध्येत एक भरत मदिर आहे राम वनवासातून परत आल्यावर या ठिकाणी राम व भरत यांची भेट झाली असे सांगण्यात आले या ठिकाणी रामाच्या पादुका आहेत संत तुलसीदास या देवालयात आले होते रामदरबारच्या जागी रामाने अश्वमेध यज्ञ केला होता दशरथ महल नावाची एक जागा आहे पण आता तेथे महाल किंवा मदिर नाही अशी अनेक स्थळे कालाच्या ओघात नाहीशी झाली आहेत रस्त्याने जाताना मी एका घरावर एक फलक पाहिला 'पाक्षिक साकेत– ब्रह्मदेव प्रिंटिंग प्रेस' मला त्या दोन्ही नावाविषयी कुतूहल वाटले मी आत गेलो साठीच्या वयाच्या एका गृहस्थांनी माझे स्वागत केले घर बैठे होते, लहानसेच होते आत एक जुने ट्रेडल होते मी म्हटले, 'साकेत' साप्ताहिक पाहायचे आहे! त्या गृहस्थांनी आपले नाव रामकुमार असे सागितले रॉयल आकाराचे चार पानी पाक्षिक त्यानी मला दिले ते सस्कृतमध्ये होते याचे मला कौतुक वाटले पण त्यात वाचण्यासारखा मजकूर अर्धे पानच होता. उरलेला स्थानिक नगरपालिका व उपाहारगृहे, दुकाने यांच्या जाहिरातीचा होता. पण

रामाच्या राजधानीत अजूनही संस्कृतमध्ये वृत्तपत्र निघावे हीच कौतुकाची बाब होती मी पुढे गेलो, तेव्हा एका मेडिकल स्टोअरवर पाटी होती, ' परमार्थ औषधालय ' ही पाटी मात्र फारच समर्पक असावी ।

एका देवालयात रामचंद्रांच्या सूर्यवंशी राजांची वंशावळ पाहायला मिळाली त्यातील काही नावे व कंसात त्याची कितवी पिढी हे खाली देत आहे वैवस्वत मनु (१), इक्ष्वाकु (२), निकुंभ (१६), त्रिशंकु (३१), दिलीप–१ (४३), भगीरथ (४४), ऋतुपर्ण (५०), रघु (६१), अज (६२), दशरथ (६३), राम (६४), कुश (६५), नल (६८), पुण्डरिक (७०), हिरण्यनाभ (८२), सुदर्शन (८५), अमर्ष (९१), सहदेव (१००), मरूदेव (१०५), सुमित्र–१ (११०), शाक्य (११७), कृताक (१२३), सुमित्र–२ (१२५)

बौद्ध धर्माच्या पवित्र स्थळांपैकी हनुमान गढीच्या पूर्वेकडील बौद्ध तपस्थता नावाचे कुंड प्रसिद्ध आहे या कुंडाजवळ भगवान बुद्धांनी १६ वर्षे तपस्या केली होती या कुंडात औषधी गुण असून बुधवारी या कुंडाच्या पाण्याने दात धुतले तर दंतपीडा नाहीशी होते, असे तेथील पुजारी सांगतात कैकेयी भवनाच्या पश्चिमेला दिगंबर जैन मंदिरही आहे तसेच कटरा मोहल्ल्यात श्वेतांबर जैन मंदिर आहे अयोध्येत पन्नास पवित्र कुंड आहेत त्यात रामसरोवर, सीताकुंड, सूर्यकुंड, वासुकीकुंड, अग्निकुंड, योगिनीकुंड, ब्रह्मकुंड, लक्ष्मीकुंड, जमदग्निकुंड, पार्वतीकुंड इत्यादींचा समावेश आहे यात्रेकरूना मोफत किंवा नाममात्र भाडे घेऊन राहण्यासाठी जागा देणाऱ्या १० धर्मशाळा या शहरात आहेत त्यात बिर्लाबाई, गंगाबाई, सत्यनामी, सूरजमल, बंबईकी सेठाणी धर्मशाळा, लखनऊवाली, रामरूप इत्यादी विशेष सोयीस्कर आहेत त्याशिवाय अनेक जातीजमातींच्या, पंचायतींच्या इमारती अयोध्येत आहेत

आता माझे अयोध्यादर्शन पूर्ण झाले होते पुढच्या मुक्कामाकडे म्हणजे बनारसकडे डोळे लागले होते अयोध्येहून बनारसला जाणारी गाडी सकाळी ११ वाजता येणार होती साधारणत पाच तासात ती बनारसला पोचत होती दुसऱ्या दिवशी महाशिवरात्र होती आणि त्या दिवशी काशीविश्वेश्वराच्या बनारसला पोचण्याची माझी योजना होती तेथे बनारस हिंदू विद्यापीठाच्या अतिथिगृहात माझ्या खोलीचे आरक्षण तेथील महाराष्ट्र समाजाचे अध्यक्ष डॉ उर्स्वलाभाजे यांनी केले होते, म्हणून मी निश्चित होतो सव्वाअकराच्या सुमाराला फैजाबादहून गाडी आली आणि माझा बनारसचा प्रवास सुरू झाला

# अस्सल भारतीय शहर— बनारस

संध्याकाळी साडेचारच्या सुमाराला बनारसला गाडी पोचली स्टेशन पाहिल्या-वर बरे वाटले स्टेशनवरचे घुमट म्हणजे काशीविश्वेश्वराच्या देवालयाच्या शिखरांच्या प्रतिकृती होत्या स्टेशनपासून बनारस हिंदू विद्यापीठ किती लांब आहे, याची मला कल्पना नव्हती बनारसला ही माझी पहिलीच भेट होती स्टेशनवर उतरल्या-बरोबर हमाल व सायकल रिक्षावाले, ऑटो रिक्षावाले यानी घेरावा घातला बनारसला सायकल रिक्षा व ऑटो रिक्षा हे दोन्ही प्रकार असल्याने ऑटोरिक्षाला नुसते ऑटो म्हणतात त्याची कल्पना नसल्याने जेव्हा दहा-बारा लोक 'दीन दीन' प्रमाणे 'ऑटो, ऑटो' म्हणत माझ्यावर हल्ला करून आले, तेव्हा त्याना काय म्हणायच आहे तेच प्रथम मला कळेना थोड्या वेळाने बोध झाला व एका ऑटोवाल्याला मी 'बनारस हिंदू विद्यापीठ' असे सांगितले त्याने लगेच माझे सामान उचलले व विचारले, 'स्पेशल ?' त्याला काय म्हणायचे आहे ते माझ्या लक्षात आले नाही ऑटोमध्येही स्पेशल व ऑर्डिनरी, लक्झरी असे काही प्रकार असावेत म्हणून मी त्याना अर्थ विचारला त्याने सांगितले की स्पेशल म्हणजे खास तुमच्यासाठी, दुसरा पर्याय म्हणजे पाच-सहाजणांनी रिक्षा करायची तिचा दर अर्थातच कमी मी म्हटले 'स्पेशल' त्याने दहा रुपयांत विद्यापीठाच्या गेस्ट हाऊसमध्ये सोडण्याचे मान्य केले प्रत्यक्ष हे अतर कापून आम्ही गेलो, तेव्हा लक्षात आले की स्टेशनपासून विद्यापीठ सुमारे सात मैल लाब आहे इतकेच नव्हे तर विद्यापीठाचे गेस्ट हाऊस व प्राध्यापकाचे बगले यातील अतर आणखी साडेतीन मैल आहे

विश्रामधाम अतिशय सुदर परिसरात होते भोवती टपोऱ्या फुलानी बहर लेली बाग होती खोलीही छान होती प्रवासातून आल्यामुळे मी प्रथम स्नान केले

सकाळी अकराला निघालो असल्याने जेवण झाले नव्हते ' जेवण किंवा खाद्यपदार्थ कुठे मिळतील ?' असे विश्रामधामच्या नोकराला विचारले, तेव्हा तो म्हणाला, "त्यासाठी लकेला जावे लागेल इथे तशी व्यवस्था नाही " मी चकितच झालो ! अरे बापरे ! नुसते जेवण किंवा पावभाजी यासाठी बनारसहून लकेला जायच ? म्हणजे कमालच आहे त्याची ऐकण्यात काही चूक झाली असेल असे वाटून मी पुन्हा विचारले त्याने पुन्हा तेच उत्तर दिले, "लका जाना पडेगा साब " तिथे कसे जायचे असे विचारल्यावर तो म्हणाला, " चालत जाता येईल समोरची कमान ओलाडल्यावर लकाच लागते " मी सुटकेचा नि श्वास टाकला म्हणजे बनारस हिंदू विद्यापीठाच्या कमानीबाहेरच्या चौकाला ' लका ' म्हणतात तर या लकेत सोन्याच्या विटा हे चलनी नाणे नसावे नाहीतर पावभाजीला सोन्याच्या चार विटा हा दर महागच पडायचा !

त्या दिवशी महाशिवरात्रच होती या पवित्र दिवशी काशीविश्वेश्वराचे दर्शन घडणे हे अत्यत महत्त्वाचे होते म्हणून मी लकेला जाऊन चपाती-भाजी खाल्ली आणि मदिराकडे कसे जायचे याची चौकशी करू लागलो विद्यापीठाच्या प्रवेश-द्वाराची कमान भव्य आहे व तिच्या समोरच विद्यापीठाचे सस्थापक प मदन मोहन मालवीय याचा पुतळा आहे या पुतळ्यासमोर दहा बारा टेंपो, तीस-चाळीस ऑटो उभ्या होत्या ' गदौलिया, गदौलिया ' असा त्याच्या चालकाकडून एखाद्या भजना-सारखा गजर चालला होता मी एकाला विचारले, " मला काशीविश्वेश्वराच्या देवळाकडे जायचे आहे " त्यावर त्याने मला अक्षरश हाताला धरून एका टेंपोत बसवले त्यात आधीच सहा-सातजण दाटीवाटीने बसले होते हा टेंपो म्हणजे, पुढे एक चाक व मागे दोन चाके असा सुसरीच्या आकाराचा असतो त्यात किती माणसे खच्चून भरावीत याविषयी सरकारी नियम नसावा एका टेंपोत किती लोक बसायचे ते उतारूची सहनशक्ती आणि चालकाची पैशाची अभिलाषा यावर ठरत असते साध्या ऑटोरिक्षातही चालकाजवळ दोन आणि मागे सहा असे आठ उतारू बसतात, म्हणजे त्यापैकी थोडेजण बसतात, काहीजण उभे राहतात तर काहीजण लोहचुबकाला चिकटलेल्या लोखडाच्या कणासारखे केवळ चिकटलेले असतात. त्यामुळे बनारसची ऑटोरिक्षा लांबून येताना ऑक्टोपससारखी दिसते कारण कुणाचा पाय, कुणाचा हात, तर कुणाचे डोके बाहेर डोकावत असतेच !

गदौलिया हा काशीविश्वेश्वराच्या मदिराजवळचा नाका आहे जुन्या बनारसचे रस्ते आधीच अगदी अरुद त्यात सायकल रिक्षा, ऑटो, टेंपो, सायकली, पादचारी आणि मोकाट सुटलेले बैल याची रस्त्यावर खचाखच गर्दी असते या बैलाना कोणीही अडवीत नाही, कारण ते शकराचे पवित्र नदी असतात अयोध्येत माक-डाची सत्ता, तशी येथे बैलाची ब्रिटिश काळात एका ब्रिटिश साहेबाच्या मडमेला

एका बैलाने बनारसमध्ये दुखापत केली होती, तेव्हा त्याने गावातील सर्व मोकाट बैल कोंडवाड्यात घातले होते पण त्यावेळी काशीतील सर्व पंड्ये एकत्र आले आणि 'हा आमच्या धर्मात हस्तक्षेप आहे' म्हणून त्यांनी उग्र निदर्शने केली. तेव्हा वरिष्ठ ब्रिटिश अधिकाऱ्यांनी त्या साहेबालाच दम भरला सर्व बैलांची मुक्तता केली आणि त्या साहेबाचीच बदली बनारसमधून इतरत्र केली बनारसवर दोन पुस्तके लिहिणारे लेखक श्री विश्वनाथ मुखर्जी नंतर मला भेटले त्यांनी मला बनारसविषयीची एक काव्यपंक्ती सांगितली ती अशी होती

राड, साड, सीढी सन्यासी
इनसे बचे तो सेवे काशी ॥

(विधवा, मोकाट, बैल, जिने व सन्याशी यांच्या तावडीतून तुम्ही बचावलात तरच तुम्हाला काशी पाहण्याचा योग आहे ) श्री मुखर्जी म्हणाले, "या ओळीत बराच इतिहास आहे पूर्वी बंगालमध्ये सतीची चाल होती बहुधा विधवांना सक्तीने सती जावे लागे तेव्हा त्या पळून काशीला येत एक तर बंगालपासून काशी जवळ दुसरे असे की काशीला मरण आले तर मुक्ती मिळते असे धर्मवचन असल्याने बनारसमध्ये विधवांची संख्या अतोनात होती व आजही आहे साड किंवा बैल तर शिवाचे वाहन म्हणून वंदनीय हे पवित्र क्षेत्र असल्याने साहजिकच फकीर, बैरागी, सन्यासी यांची संख्याही प्रचंड काशीतील इमारती उंच त्यांचे जिने आणि नदी-वरील घाटांचे जिने चढताना यात्रेकरूंचा जीव मेटाकुटीला येतो म्हणून अशी म्हण पडली की विधवा, बैल, जिने आणि सन्यासी यांच्यातून माणूस बचावला तरच तो काशीचे पुण्य पदरी पाडून घेऊ शकेल"

गदौलियाला मी टेंपोतून उतरलो, तेव्हा उजव्या हाताला माणसांचा प्रचंड समुद्र हळूहळू सरकताना दिसला अर्थातच काशीविश्वनाथाचे मंदिर त्या बाजूला आहे हे सहजच लक्षात आले मीही त्या गर्दीत मिसळलो गर्दीबरोबर आपोआप मी ढकलला जाऊन मंदिरापर्यंत पोचेन अशी खात्री होती इतक्यात पांढरे शुभ्र कपडे घातलेला, खांद्यावर लाल लुंगीसारखा फडका टाकलेला, कपाळावर गंध लावलेला एक पंड्या माझ्यासमोर उभा राहिला आणि त्याने मला विचारले,

' साहेब, दर्शनाला चाललात काय ?"

मी होकार दिल्यावर तो म्हणाला,

"आपण पायातले बूट मी सांगतो तिथे काढून ठेवा अन् गल्लीत गेल्यावर ते काढण्याची जागा नाही काळजी करू नका आपले बूट सुरक्षित राहतील ते ठेवण्यासाठी पैसे पडत नाहीत" काहीही करण्यासाठी पैसे टाकावे लागत नाहीत म्हटल्यावर कोणीही मराठी माणूस खूष होतो, तसा मीही सुखावलो पुन तो पुण्यचरित पंड्या इतक्या नम्रतेने, मृदू स्वरात बोलत होता की तो जणू आपला

कोणी बारा वर्षांचा जिवलग स्नेही, सोबती भेटला, असे मला वाटले त्याच्या ओळखीच्या एका दुकानाच्या फळीखाली मी बूट काढले दुकानदाराने माझ्या हाती मी न मागताच दोन हार, फुले व पेढ्याचा द्रोण दिला या आदराला मी पात्र नाही, असे सांगून त्या वस्तू मी परत करणार, तोच दुकानदार म्हणाला, " आत गेल्यावर हे सार लागणारच तेवढ्यासाठी तुम्हाला परत येण्याची तसदी घ्यावी लागू नये म्हणून हे दिल आहे चिंता करू नका साहेब, परत आल्यावर पैसे दिले तरी चालतील " मी म्हटले,

" दोन माला कशाला ? एक पुरे होईल " त्यावर बरोबरचा पंड्या 'अब्रह्मण्यम'च्या थाटात म्हणाला,

" छे छे साहेब, शंकरबाबाला हार घातल्यावर पार्वती माईला घालावाच लागतो बर बाबूजी, आपण अजून गंगास्नान केल नसेल ? चला या वस्तू माझ्याकडे द्या आणि आधी दशाश्वमेध घाटावर चला तिथ स्नान केल्याशिवाय बाबाच दर्शन घ्यायच नसत "

पंड्याच्या या लांबलचक कर्मकांडात मी अनपेक्षितपणे अडकत होतो याची कल्पना येऊनही मी आता काहीच करू शकत नव्हतो पंड्याबरोबर जवळच्याच दशाश्वमेध घाटावर गेलो घाटाच्या पायऱ्या येण्यापूर्वी पन्नास-साठ न्हावी रस्त्यावरच दुतर्फा बसले होते ते लोकाच्या हजामती करीत होते अनेक भक्त या न्हाव्यांकडून गोटा करून घेतात व मग स्नानास जातात माझ्याबरोबरच्या पंड्याने 'केस कापून घेणार का ?' असे विचारले, मी नकार दिला मनात म्हटले, महाराष्ट्रातल्या टीकाकारानी माझी भरपूर हजामत केली आहे, आता काशीचे न्हावी नवीन काय करणार ? घाटावर तुफान गर्दी होती दशाश्वमेध हा बनारसचा सर्वांत मोठा व सर्वांत गर्दीचा घाट आणि त्यात आज महाशिवरात्र म्हणजे अगदी झिम्मडच उडाली होती पंड्या म्हणाला, " मी आपले कपडे साभाळतो आणि पूजा–अर्चा–धर्माचार वगैरे करता आपण स्नान करून या " मी म्हटले," बाबा, मला कसलेही धार्मिक विधी करायचे नाहीत " तरीही त्याने काही तरी मंत्र म्हणणे चालूच केले वर त्याने माझी समजूत काढली, याचे वेगळे पैसे पडत नाहीत मालक आपले स्नान पुण्यदायी व्हावे एवढीच माझी सेवकाची इच्छा "

निघतानाच मी वेगळे कपडे, टॉवेल, पिशवी घेतली होती कारण गंगेत स्नान करून जावे लागेल निदान महाशिवरात्रीला तेथे स्नान करण्याचा अनुभव घ्यावा असे मी ठरविले होते अत्यंत गर्दीत कसेबसे पोचून एकदोनदा बुडी मारून कसेबसे गंगास्नान उरकले त्या महायात्रेत निवातपणे स्नान करणे शक्यच नव्हते यावेळी थंडीही चांगलीच पडली होती हजारो लोकांच्या स्नानाने गंगेचे पाणीही फारसे स्वच्छ राहिले नव्हते

स्नान आटोपून पुन्हा पड्याबरोबर मंदिराच्या दिशेने निघालो मंदिराकडे जाणाऱ्या गल्लीला विश्वनाथ गल्ली म्हणतात ती इतकी अरुंद आहे की, एका रांगेत पाच-सहा जण कसेबसे मावतात येण्यासाठी व जाण्यासाठी एकच अरुंद रस्ता आहे, त्यामुळे गर्दी होते आधीच चार सव्वाचार फूट रुंदीची गल्ली, त्यातच दुतर्फाच्या दुकानांनी आपली हद्द बाकडी किंवा ओटा घालून वाढवलेली पुन्हा बंदोबस्तासाठी ठेवलेल्या पोलिसाची गर्दी पंड्ये लोक पुढच्यांना शिताफीने मागे ढकलून आपल्या गिऱ्हाईकांचे घोडे पुढे दामटीत शिवाय पोलिस व त्यांचे अधिकारीही आपल्या ओळखीच्या लोकांना अग्रक्रम देत होते या सर्व गोंधळात अंगावर सारखे पाणी पडू लागले ते कसले याचा शोध घेण्यासाठी निरखून पाहिले तर शंकराचे भक्त स्नान करून आल्यावर छोट्या लोट्यातून पाणी आणीत असल्याचे दिसले कारण त्यांच्यापैकी प्रत्येकाला स्वतः आणलेले गंगाजल काशीविश्वेश्वराच्या पिंडीवर घालायचे होते पण बेसुमार गर्दीमुळे त्यातले पाणी हिंदकळून सांडत होते परत येणाऱ्या भक्तांच्या गळ्यात माळा व हातात प्रसाद दिसत होता जाणारे व येणारे लोक 'हरहर शंभो महादेव शंभो, काशीविश्वनाथ गंगे' असा जयजयकार करीत होते माझा पंड्या एकलव्यासारखा माझ्यावर लक्ष ठेवून हातात माझे कपडे व माळा, पेढे वगैरे सामान घेऊन माझ्याबरोबर चालत होता अशा त्या घनचक्कर गर्दीतही आजूबाजूचे दुकानदार 'बनारसी शालू' 'बनारसी सिल्क साडी'चा पुकार करून गिऱ्हाईक पटविण्याची कोशिश करीत होते कुंकू, मूर्ती, पेढे यांचे व्यापारी ओरडून आपापल्या मालाची जाहिरात करीत होते मंदिराकडे जाणारे लोक अगदी मंद गतीने पुढे सरकत होते कधीकधी तर सबंध थवा एकाच जागी बराच वेळ थांबत असे आणि गर्दीमुळे घुसमटायला होई पण भक्तांची सहनशीलता चिवट होती सर्व प्रकारच्या अडचणीतही ते धीराने उभे होते शक्य तेवढे पुढे सरकत होते माझा पंड्या सांगत होता–

"आपण मागच्या जन्मी फार मोठे पुण्य केले असले पाहिजे, म्हणून आज महाशिवरात्रीच्या पवित्र दिवशी आपल्याला दर्शन घडण्याचा योग आला रात्री अकरापासून दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या विश्वनाथाचे मंदिर पहाटे तीनला उघडते तोपर्यंत लोक रस्त्यावर बसून होते उभे होते रात्री बारापासून मी एक मिनिटभरही झोपलेलो नाही आपल्यासारख्या दानशूराचे दर्शन अशा पुण्यदिवशीच व्हायचं" मी शूरही नाही आणि दानशूर तर नाहीच हे आता त्याला सांगून पटण्यासारखं नव्हतं

काशीच्या पंड्याच्याविषयी लहानपणापासून खूप ऐकलं होतं, वाचलं होतं आज प्रत्यक्ष अनुभव आला 'पादत्राण काढून ठेवा पैसे पडत नाहीत' या साध्या विनंतीनं या पंड्यानं सुरुवात केली मग चातुर्यानं मला पेढे, माळा, फुलं घ्यायला

लावली, गंगेत आंघोळ करायला लावली आणि आता मी फार मोठा दानशूर असल्याचा सोइस्कर शोध त्यानच लावला होता ! पुण्यक्षेत्री काम करणाऱ्या व्यावसायिकाच्या चतुर संभाषणामुळे आपण नकळत कसे अधिकाधिक गुंतलो जातो याच उत्तम प्रात्यक्षिक त्या पंड्यान मला दाखवल होत ! सांड, सिडी, सन्यासी वगैरेत आता पंड्ये हा आणखी एक शब्द त्या सुप्रसिद्ध श्लोकात घालायला हवा असे मला वाटू लागले

बनारस हे भारतातीलच नव्हे, तर सबंध जगातील एक अलौकिक शहर आहे काशीविश्वनाथाचे तीर्थक्षेत्र म्हणून या शहराचे धार्मिक महत्त्व सर्वश्रुत आहे पण या शहराची अनेक इतर अंगे अशी आहेत की ती फारशी प्रसिद्ध नाहीत पक्ष्यांची निर्यातीसाठी पैदास करणारे आणि त्यांची निर्यात करणारे भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वांत मोठे केंद्र म्हणजे बनारस पृथ्वीच्या पाठीवरील सर्वांत मोठे आणि गेली अडीच हजार वर्षे अखंड पेटत राहिलेले स्मशान या शहरात आहे बनारसमध्ये लोणच्याचे जेवढे प्रकार केले जातात तितके इतरत्र कोठेही नाहीत विड्याची पाने आणि पानपट्टी या व्यवसायात सर्वांत अधिक म्हणजे दहा हजार लोक याच शहरात गुंतले आहेत संस्कृत भाषेतील सर्वश्रेष्ठ ज्ञानपीठ बनारसमध्येच आहे विधवांची आणि मोकाट सुटलेल्या बैलांची सर्वांत अधिक संख्या येथेच आहे बनारसमध्ये गंगा नदीवर जेवढे घाट आहेत, तेवढे जगातील अन्य कोणत्याही नदीवर नाहीत हिंदूंचे सर्वांत पवित्र तीर्थक्षेत्र उद्ध्वस्त करण्याचे शेकडो वर्षे मुस्लिम बादशहांनी आटोकाट प्रयत्न केले, पण हिंदू धर्म तेथे जितका जिद्दीने आणि खंबीरपणे उभा आहे, तेवढा इतरत्र कोठेही नाही बनारसचे रेशीम आणि बनारसी साडी म्हणजे खानदानी पुरंध्रींचे गौरवाचे वस्त्र

ब्रिटिशांच्या काळात ठगांचे मोठे प्रस्थ होते या ठगांचे मुख्य केंद्र होते बनारस रेशमांच्या रुमालाने हे ठग यात्रेकरूंना व इतर पांथस्थांना ठार मारीत असत कथ्थक नृत्य आणि भारतीय शास्त्रोक्त संगीत यात बनारस नेहमीच अग्रेसर राहिले आहे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे सनईवादक बिस्मिल्ला खाँ हे बनारसचेच मीनाकाम आणि धातूची नक्षीदार भांडी यांत बनारसी कलाकारांचे कौशल्य अनन्यसाधारण आहे ताजमहालच्या खालोखाल परकीय प्रवासी जास्तीत जास्त संख्येने भारतातील ज्या ठिकाणाला भेट देतात ते म्हणजे बनारस ! भगवान बुद्धांनी पहिले प्रवचन जेथे दिले, ते सारनाथ म्हणजे बनारसचाच एक भाग आहे वाल्मीकी, सूरदास, कबीर, संत तुलसीदास यांचे वास्तव्य बनारसला झाले आहे आशियातील सर्वांत मोठे विद्यापीठ याच बनारसमध्ये आहे समाजकार्यातही बना-

रसी परंपरा फार मोठी आहे हे धर्मक्षेत्र असल्याने गेली शेकडो वर्षे उदार धनिकांनी सार्वजनिक कार्यासाठी मोठमोठ्या रकमा दिल्या आहेत व त्यातून अनेक समाजोपयोगी कार्ये करणाऱ्या संस्था चालू आहेत सन १९०२ मध्ये येथे 'वाराणसी दरिद्र दुःख प्रतिकार समिती' स्थापन झाली स्वामी विवेकानंद १९०२ मध्ये अमेरिकेहून परत आल्यावर बनारसला आले त्यांनी याच संस्थेचे ध्येय व्यापक करून तिचे रूपांतर 'रामकृष्ण मिशन' मध्ये केले आज रामकृष्ण मिशन ही जगातील एक अत्यंत श्रेष्ठ अशी सेवाभावी संस्था आहे भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात बनारसने अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य केले आहे 'आज' हे ब्रिटिशांच्या विरुद्ध बंडाचे वैचारिक निशाण उभारणारे भारतातील अगदी प्रारंभीच्या काही वृत्तपत्रांपैकी एक होते

अशा या बहुरंगी, बहुढंगी नगरीचा अभ्यास करावा तितका थोडाच हॉर्वर्ड विद्यापीठाच्या 'धर्मांचा तौलनिक अभ्यास' या शाखेच्या प्राध्यापिका श्रीमती डायना ईक यांनी बनारसला वर्षभर राहून या शहरावर एक अप्रतिम ग्रंथ लिहिला आहे मराठीत बनारस अथवा काशीवर जे लेखन झाले आहे, ते बव्हंशी धार्मिक भावनेने व यात्रेच्या निमित्तानेच परकीय प्रवाशांना शेकडो वर्षे बनारसविषयी अत्यंत कुतूहल आहे व आजही ते टिकून आहे बरोबर चारशे वर्षांपूर्वी, १५८४ मध्ये राल्फ फिच या व्यापाऱ्याने भारत व चीनला भेट दिली इंग्लंडच्या दरबारात त्याचा एवढा मोठा वशिला होता की त्याने खुद्द तेव्हाच्या राणीच्या सहीची ओळख-पत्रे आणली होती तो अलाहाबादहून बनारसला आला आणि या शहराच्या वैशिष्ट्यामुळे भारावून गेला "प्राचीन भारतीय संस्कृती टिकवून धरण्याचे सर्वांत मोठे कार्य ज्या शहराने केले आहे ते शहर म्हणजे बनारस होय" असे त्याने 'अर्ली ट्रॅव्हल्स इन् इंडिया' (पृष्ठ २०) या ग्रंथात म्हटले आहे मार्क ट्वेन हे जगप्रसिद्ध अमेरिकन विनोदकार भारतात आले होते, त्यांनी 'फॉलोइंग द इक्वेटर' (पृष्ठ ४८०) मध्ये या शहराचा असा गौरव केला आहे "बनारस हे इतिहासा-पेक्षाही प्राचीन आहे, परंपरेपेक्षा प्राचीन आहे, आख्यायिकेपेक्षाही प्राचीन आहे या सर्वांची प्राचीनता एकत्र केली, तर बनारस त्यापेक्षाही प्राचीन दिसते"

बनारस हे जगातील अत्यंत प्राचीन शहरांपैकी एक आहे जेरूसलेम, अथेन्स, पेकिंग अशा प्राचीन शहरांत त्याची गणना होते बॅबिलोन जेव्हा नुकतेच जागृत होत होते, अथेन्सला सामर्थ्य प्राप्त व्हावयाचे होते आणि रोमचे नाव फारसे पसरले नव्हते, तेव्हा बनारस ज्ञानाच्या व संस्कृतीच्या शिखरावर होते रेव्हरंड शेरिंग यांनी अठराव्या शतकात म्हटले आहे की या प्राचीन इतिहासाच्या शहरात काही दिवस वास्तव्य केल्यानंतर या शहराचे जे सर्वांत मोठे वैशिष्ट्य माझ्या मनावर ठसले ते हे की अडीच हजार वर्षांत बनारसने आपले अस्सल हिंदुत्व आणि अस्सल

भारतीयत्व सोडले नाही दिल्ली, कलकत्ता, मद्रास, मुंबई ही अवाढव्य शहरे, त्या सर्वांवर पाश्चात्य संस्कृती आणि राहणीची पद्धत यांची गडद छाप आहे पण पाश्चात्य संस्कारापासून शक्य तेवढे दूर राहून आपले भारतीयत्व प्राणपणाने जपणारे भारतातील सर्वांत लक्षणीय शहर म्हणजे बनारस घरात स्नानगृहामध्ये भरपूर पाणी येत असतानाही पहाटे उठून नदीवर स्नान करणारे नागरिक जगातील इतर कोणत्या गावात आज दिसतील ? स्नान करून रोज देवाला स्नान घालून फुले वाहून पहाटे साडेपाच-सहालाच नित्य कर्मास सिद्ध होणारे नागरिक याच शहरात आढळतील मद्रास व त्रिवेंद्रमसारख्या शहरात मुंबई-कलकत्त्यापेक्षा भारतीय संस्कृतीच्या अधिक छटा दिसतात हे खरे, पण बनारसने आपले भारतीयत्व जपण्यासाठी जो लढा दिला, तसा लवलेशही मद्रास-त्रिवेंद्रमच्या इतिहासात नाही बनारसवर अनेक यवन बादशहांनी वारंवार हल्ले केले, मंदिरे उद्ध्वस्त केली त्या सर्व आपत्तींना धैर्याने तोंड देऊन बनारसने आपली संस्कृती व धर्म सोडला नाही ज्ञानाचे क्षेत्र संकुचित होऊ दिले नाही बलिष्ठ यवनांचा धर्म बनारसने स्वीकारला नाही तसाच धूर्त ख्रिस्ती मिशनऱ्यानाही या शहराने अवसर दिला नाही आपले हिंदुत्व हेच अंतिम प्रमाण मानले असा उज्ज्वल इतिहास फार थोड्या शहरांच्या वाट्याला आला असेल बनारसचे काशी या नावाने अस्तित्व इसवी सनपूर्व सहाव्या शतकापर्यंत मागे जाते लुईस मम्फोर्ड या इतिहासकाराने म्हटले आहे, बुद्ध, महावीर, आद्य शंकराचार्य, तुलसीदास, ज्ञानेश्वर असे अनेक संत-महात्मे यांना या शहराविषयी अत्यंत आदर होता व त्यांनी तेथे वास्तव्यही केले

ममफोर्ड या इतिहासकाराने बनारसचे वैशिष्ट्य अचूक शब्दांत मांडले आहे

' संबंध समाजाची सांस्कृतिक शक्ती एकत्र करून त्याला संक्षिप्त रूप देण्यात बनारस जितके यशस्वी झाले आहे, तितके कार्य जगातील फारच थोड्या इतर शहरांनी केले असेल " (द सिटी ऑफ हिस्टरी, पृष्ठ ५७०)

बनारसच्या श्रेष्ठ व दीर्घ धार्मिक परंपरेचा एक परिणाम असा झाला आहे की, ' इतरत्र केलेली पापे बनारसला धुऊन टाकली जातात, पण बनारसमध्ये पाप केले तर ते कोठे धुतले जाणार नाही ' अशी दृढ भावना येथे रुजली आहे भारतात अनेक तीर्थस्थाने आहेत त्यात काशी अथवा बनारस हे सर्वप्रथम आहे ' काशीस जावे नित्य वदावे ' ही म्हण याचे प्रत्यंतर आहे आपली अखेर काशीत व्हावी, निदान अंत्यसमयी गंगाजल मुखात पडावे ही कोट्यवधी हिंदूंची मनीषा असते तीर्थ याचा शब्दकोशातील अर्थ ' पवित्र स्थळ, यात्रेची जागा ' असा दिला आहे पण बनारसमध्ये एका संस्कृत पंडितांनी सांगितलेला अर्थ मला अधिक समर्पक वाटतो ते म्हणाले, " इहलोकातून परलोकात जाण्याच्या क्रियेतील मधला टप्पा म्हणजे तीर्थ म्हणूनच या टप्प्यावर अगर जागेवर मृत्यू यावा असे भक्तांना वाटते "

अनेक पाश्चात्य प्रवासी व लेखक यानी बनारसला भेट देऊन विपुल लेखन केले आहे त्यात हिंदुधर्म स्वीकारून बनारसमध्ये राहणारे एक अमेरिकन लेखकही होते त्यानी या शहराविषयी केलेले विधान अत्यत सार्थ आहे ते म्हणतात, "पाश्चा- त्याना स्वत च्या ख्रिश्चन धर्मात राहून या शहराचा आत्मा कधीच समजणार नाही किंबहुना, हिंदुधर्माच्या बाहेर उभे राहून बनारसकडे पाहणाऱ्याला हे केवळ एकच चमत्कृतीमय व भाविक शहर वाटेल बनारस खरे समजून घ्यायचे तर तुम्हाला हिंदू धर्मात येऊनच तेथे रहावे लागेल" (स्वामी सेवानद, पूर्वीचे आर्थर स्कोबी)

काशीचे विश्वनाथ मदिर हे अशा अत्यत थोड्या दुर्मीळ मंदिरापैकी एक आहे की त्यात हिंदूशिवाय इतराना प्रवेश नाही हिंदूखेरीज इतर नागरिकाना मंदिराच्या शेजारच्या माडीवरून किंवा मदिराला केलेल्या एका खिडकीतूनच आत पाहवे लागते

प्राचीन काळी काश्य नावाचा राजा होता, त्याने वसविलेले शहर म्हणून त्याचे नाव काशी पडले काशी म्हणजे प्रकाशमान शहर (सिटी ऑफ लाईट) स्वत काश्य हा राजपुत्र होता पण तो वडील पुत्र नसल्याने त्याला राजपद मिळाले नाही किंवा राज्यात हिस्साही मिळाला नाही

म्हणून त्याने स्वत चे राज्य सोडले आणि गगा नदीच्या काठी जेथे जगल व स्मशान होते,तेथे झाडे तोडून व साफसफाई करून काशी वसविली अनेक पिढ्या नतर दुसऱ्या राजाने हे शहर जिकले त्याला काश्य राजाची नावनिशाणी ठेवायची नव्हती म्हणून त्याने वरुणा व आसी या दोन नद्यामध्ये वसलेल्या या शहराचे नाव बदलून वाराणसी असे ठेवले उपनिषदात 'वारणा' या नावाचे महत्त्व सांगताना म्हटले आहे की ही नदी सर्व पापे वारून नेते (वारायते), म्हणून हिचे नाव वारणा असे आहे आसी नदी पूर्वी 'नासी' म्हणून ओळखली जात असे शकराचे वास्तव्य हिच्या काठी असल्याने ही नदी सर्व सृष्टीचा नाश करते म्हणून ती 'नासी' होती इसवी सनापूर्वी सहाव्या शतकातील जातक कथात भगवानबुद्ध काशीस आल्याचा उल्लेख आहे दर्भाला सस्कृतमध्ये काश म्हणतात, त्यावरून काश्य राजाचे नाव ठेवले होते, असेही उल्लेख प्राचीन वाङ्मयात आढळतात

हिमालयवासी शकराने पार्वतीशी विवाह केल्यानतर काशी हेच नाव आपल्या निवासासाठी निवडले येथे शिवाचे वास्तव्य असल्याने या नगरीस 'अविमुक्ता' असेही नाव आहे जी नगरी शिव कधीही सोडीत नाहीत, ती अविमुक्ता येथे फार मोठे जगल होते मात्र शिवाचे वास्तव्य येथे सुरू झाल्याने त्या जगलाचे व पर्यायाने शहराचेही नाव 'आनदवन' किंवा 'आनदकानन' असे झाले शिवाला रुद्र असेही नाव आहे त्यावरून या नगरीचा 'रुद्रावास' असाही उल्लेख केलेला आढळतो

शिव आणि काशी अथवा बनारस यांचे इतके अतूट नाते आहे की 'काशी के कंकर शिवशकर' (बनारसमधील प्रत्येक दगड हा शकरच आहे) अशी तेथे म्हण पडली आहे शकराचा निवास म्हणजे स्मशान त्यावरून काशीला 'महास्मशान' असेही म्हणतात 'काशीखडा'त स्मशान या शब्दाची अशी फोड केली आहे स्मा= प्रेत, शयन= झोपण्याची जागा, अथरूण सबध काशी म्हणजे एक महास्मशान आहे अशी म्हण असली तरी मुख्यत मनकर्णिका घाटावर व हरिश्चद्र घाटावरच सध्या प्रेताचे दहन करतात

बनारसमध्ये तीर्थयात्रेसाठी अनेक धनाढ्य लोक येत शिवाय यात्रेकरूच्या सोयीसाठी मोठमोठ्या व्यापाऱ्यानी या शहरात हवेल्या उठविल्या शेकडो मदिरामुळे हे शहर सधन झाले अर्थातच आक्रमक व लुटारू याची दृष्टी या शहराकडे वळली बाराव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंत बनारसवर पन्नास-साठ वेळा चढाया झाल्या व हे शहर लुटले गेले ११६४ मध्ये महमद घोरीने या शहरावर कबजा करून लुटालूट कली सन १३०० मध्ये अल्लाउद्दीन खिलजीने स्वारी केली पृथ्वीराजने पाच वेळा चढाई केली अल्लाउद्दीन खिलजीचा जामात वार्वकशा याने बनारसवर हल्ला करून लुटालूट केली १४९४ शिकदर लोदीने तेच कृत्य केले जहागीर, शहाजहान आणि औरगजेब या बादशहानीही बनारसवर जुलूम केले औरगजेबाने तर या शहराचे बनारस हे नाव बदलून मुहम्मदाबाद ठेवले अनेक मंदिरे त्याने उद्ध्वस्त केली त्यात मध्यमेश्वर हे शिवाचे मदिरही नष्ट झाले, ते पुन्हा उभारले गेले नाही सर्व सृष्टीचा केंद्रबिंदू किंवा मध्य म्हणजे शिव म्हणून त्याचे मध्यमेश्वर हे एक नाव आहे

सतत जळणारे स्मशान या शहरात आहे म्हणून बनारसमध्ये एक श्लोक प्रचलित आहे, तो असा

"खाक भी जिस जमीन का पारस है
शहर मशहूर यही बनारस है ॥"

(हेच ते विख्यात बनारस शहर, की जिथली राखसुद्धा परिस आहे)

बनारस या नावाने शेकडो वर्षे प्रसिद्ध असलेल्या या शहराचे नाव भगवान बुद्धांच्या २५०० व्या जयतीनिमित्त भारत सरकारने पुन्हा वाराणसी असे केले आहे रेल्वे, टपाल, सरकारी कागदपत्रे यांत या शहराचे नाव आजही वाराणसी असे आहे 'वाराणसी एक्सप्रेस' सारखी गाड्याची नावेही आहेत पण जनसामान्यांच्या बोलण्यालिहिण्यात आजही हे शहर 'बनारस'च आहे येथील विख्यात पानाचे नाव 'वाराणसी पान,' नसून 'बनारसी पान' आहे साड्या 'बनारसी' आहेत आणि लोक 'वाराणसी बाबू,' नसून 'बनारसी बाबू' आहेत लोकगगेच्या प्रवाहात औरगजेबाचे मुहम्मदाबाद वाहून गेले, तसेच काहीसे वाराणसीचे झाले आहे या नावांच्या

सर्व गोंधळात ' काशी ' हे नाव कुठे गेले असे विचाराल तर त्याचे उत्तर आहे की ' काशी ' हे अजूनही बनारसजवळ लहानसे रेल्वेस्टेशन व छोटेसे गाव आहे पण आपण जिला काशी म्हणून ओळखतो ती काशी म्हणजे मात्र बनारस

बनारसने श्रीमती पाहिली नाही असे नाही लक्षाधीश व कोटयधीश व्यापारी, कारखानदार, राजे–महाराजे येथे येऊन गेले, दानधर्म म्हणून लाखो रुपये एका एका भेटीत वाटून गेले, पण श्रीमती आणि धनदौलत पाहून या शहराने आपला कुलाचार सोडला नाही मुस्लिम नबाबाच्यासारखे हे शहर व्यसनात मश-गूल झाले नाही ज्ञान आणि तपस्या यांना बनारसने नेहमीच अग्रहक्क दिला आहे

# काशीविश्वेश्वर

हिंदू धर्मात जी सात परमपवित्र तीर्थक्षेत्रे सांगितली आहेत, त्यात अयोध्या, मथुरा, हरिद्वार, काशी, कांची, अवंतिका (उज्जैन) आणि द्वारका यांचा समावेश आहे या सर्वांत काशीचे महत्त्व मोठे आहे काशी हे एक तीर्थ केले, तर त्यात सर्व तीर्थांना गेल्याचे पुण्य मिळते असे आपले धर्मग्रंथ सांगतात काशी अथवा बनारस येथे गंगा नदी धनुष्याकृती होते त्यामुळे तिचा वेग कमी होतो व पावसाळ्यात पूर आला तरी घाट वाहून जात नाहीत अनेक धर्मपरायण धनाढ्यांनी बनारसला घाट बांधले आहेत इतके घाट इतर कोणत्याही नदीच्या काठावर कोठेही बांधले गेलेले नाहीत गंगा नदीच्या पश्चिम किनाऱ्यावर एकंदर चौसष्ट घाट असून पूर्व किनाऱ्यावर रामनगर किल्ल्याजवळ एक घाट आहे त्याला सामने घाट म्हणतात पश्चिम किनाऱ्यावरील घाटाची सुरुवात अस्सी घाटापासून होते या ठिकाणी गंगा नदीला अस्सी नदी मिळते म्हणून त्याचे अस्सी घाट असे नाव पडले आहे अस्सी-जवळचा घाट रेवा किंवा रेला मिश्र घाट या नावाने प्रसिद्ध आहे राजा रामजित सिंह जेव्हा विश्वनाथ मंदिराच्या शिखरावर सुवर्ण कळस चढविण्यासाठी आले होते, तेव्हा ते या ठिकाणी उतरले होते

या घाटाजवळ बाजीराव घाट आहे बाजीराव पेशव्यांनी हा घाट बांधला यांच्याजवळच संत तुलसीदास यांचे वास्तव्य होते त्यांच्या स्मरणार्थ बांधलेला घाट तुलसीघाट म्हणून प्रसिद्ध आहे या घाटावर तुलसीदासांनी प्रस्थापित केलेले हनुमान मंदिर आहे याच ठिकाणी संत तुलसीदास यांच्या पादुका, त्यांची माळ व ज्या नावेतून ते गंगा नदीतून ये-जा करीत होते, त्या नावेचा एक तुकडाही आहे त्याजवळच भद्रेश्वर मंदिर असून या मंदिराच्या घाटाला भदैनी घाट म्हणतात त्याच्याजवळ गणेश घाट किंवा जलकल घाट आहे या घाटाजवळचे अक्रूर घाट,

वैद्य घाट व हिंगू घाट हे लहान घाट काळाच्या व नदीच्या ओघात लुप्त झाले जागेजवळ आता आनदमयी घाट आहे पूर्वी याला राय गिरिधारीलाल घाट म्हणत असत त्याला लागून जानकी घाट आहे तो १८८२ साली बांधण्यात आला पाण्याची टाकी बसविण्यासाठी या घाटावरील जानकी मदिर हलविण्याचा नगरपालिकेचा बेत होता, पण नागरिकानी त्याविरुद्ध आंदोलन केले म्हणून हे मदिर हलविले गेले नाही या जवळचा घाट दहाव्या शतकात लाला वच्छराज यानी बांधला, तो वच्छराज घाट म्हणून प्रसिद्ध आहे त्याला लागून जैन घाट व पचकोट घाट आहेत त्याजवळचा घाट राजा बलवतसिंहांचे इजिनीयर वैजनाथ मिश्र यांनी बाधला. त्याला खिडकी घाट म्हणतात त्याजवळ शिवाला, नेपाळी व दडी घाट आहेत दडीस्वामी जेथे राहत असत, तेथे त्याच्या नावे बाधलेला घाट म्हणून त्याला दडी घाट म्हणतात त्याच्याजवळचा हनुमान घाट सोळाव्या शतकात बांधला गेला या घाटावर हनुमान मदिर आणि आखाडा आहे त्याच्याजवळ म्हैसूर घाट व हरिश्चद्र घाट आहेत

हरिश्चद्र घाट हा राजा हरिश्चद्राच्या नावाने बांधण्यात आला आहे राजा हरिश्चद्राची कथा प्रसिद्ध आहे स्वप्नात आलेल्या विश्वामित्र ऋषींना त्याने आपले सर्व राज्य दान दिले या दानावर विश्वामित्रांनी दक्षिणा मागितली, पण आधीच सर्व सपत्तीचे दान केल्याने दक्षिणा देण्यासाठी राजा हरिश्चद्रांजवळ काहीच नव्हते म्हणून त्याने आपली पत्नी तारामती व मुलगा रोहिदास याची विक्री केली आणि स्वत डोंबाकडे मृतदेहाच्या दहनासाठी नोकर म्हणून काम करू लागला राजा हरिश्चद्र ज्या ठिकाणी डोंबाकडे काम करीत होता, तीच ही जागा म्हणून त्याचे नाव या घाटाला दिले अजूनही या घाटावर मृतदेहाचे दहन होते मी बनारसला ज्या जयश्री हॉटेलमध्ये राहत होतो, ते या घाटाच्या समोरच, अगदी दोन मिनिटाच्या रस्त्यावर आहे या घाटाला स्मशान घाट असेही नाव आहे याजवळचा लाली घाट हा लालशहा नावाच्या मुसलमान फौजदाराने बांधला आहे त्याच्यावर निर्वाणी संन्यासाचे निवासस्थान आहे त्यानतर केदार घाट या घाटावर शकराचे मदिर आणि खाली कुड आहे त्याजवळचा घाट रामेश्वर किंवा चौमकी घाट म्हणून ओळखला जातो त्यानजीक मानससरोवर घाट आहे हा घाट अवरचे नरेश मानसिग यानी बाधला त्यानजीकचा नारद घाट ही पेशव्याची निर्मिती आहे त्याला कबाई घाट असेही म्हणतात त्याजवळचे तीन घाट म्हणजे राजा घाट किंवा विनायक घाट, धोबी घाट अथवा भुवनेश्वर घाट आणि महल घाट किंवा अन्नपूर्णा घाट राजा घाट हा पेशव्याचे नायब अधिकारी विनायक यानी बांधला चौसाटी घाट या नावाने प्रसिद्ध असलेल्या नजीकच्या घाटावर चतुषष्टी देवीचे मदिर आहे दरसाल होळीच्या दिवशी या देवीची जत्रा भरते. बगालचे राजे दिगपती यानी

चौसष्टी घाट बांधला आहे. त्याजवळच पांडे घाट किंवा सर्वेश्वर घाट आहे

बनारसमधील सर्वांत महत्त्वाचा घाट म्हणजे दशाश्वमेध घाट भाविक मुख्यत. याच घाटावर गंगास्नान करतात दशाश्वमेध सर्वांत मोठा घाट असला, तरी वस्तुत त्यात पांडे घाट, राणा महल घाट, मुन्शी घाट, अहिल्याबाई घाट आणि शीतला घाट असे पाच घाट समाविष्ट आहेत सतराव्या शतकातील उदयपूरच्या नरेशांनी राणा महल घाट बांधला नागपूरच्या राजाने मुन्शी श्रीधर घाट बांधला अहिल्या घाट इंदूरच्या महाराजांनी अहिल्याबाई होळकर यांच्या स्मरणार्थ बांधला नारायण दीक्षित जडे यांनी शीतलादेवीचा घाट बांधला या ठिकाणी ब्रह्मदेवाने दहा अश्वमेध यज्ञ केले, म्हणून याला दशाश्वमेध घाट हे नाव पडले, अशी आख्यायिका आहे दुसऱ्या शतकात भाट शिव नाग यानेही या ठिकाणी दहा अश्वमेध यज्ञ केल्याचा उल्लेख इतिहासकार जयस्वाल यांनी केला आहे गदौलियाहून आपण या घाटाकडे येतो, ते काशीविश्वेश्वराच्या मंदिरावरून पण प्रथम या घाटावर स्नान केल्या-खेरीज कोणीही विश्वनाथ मंदिरात जात नाहीत हा रस्ता अत्यंत गर्दीचा आहे दोन्ही बाजूला निवासी हॉटेले आणि उपाहारगृहे यांची दाटी आहे घाटाच्या सुरु-वातीला दोन्ही बाजूंनी पन्नास-साठ न्हावी बसलेले असतात ज्यांना क्षौर करून अथवा केस कापून घेऊन स्नान करायचे असेल त्यांच्यासाठी ही सोय आहे 'काशीचे न्हावी' हा शब्दप्रयोग लहानपणापासून ऐकलेला आज ती व्यक्ती प्रत्यक्ष पाहिली यात्रेच्या वेळी हे न्हावी एकदम सात आठ गिऱ्हाइके घेतात एकाचे क्षौर पूर्ण झाल्यावर दुसऱ्याचे डोके घ्यायचे ही नेहमीची पद्धत यावेळी सोडून देण्यात येते जे जे गिऱ्हाईक येईल त्याच्या डोकीचा एक पाट घाईघाईने काढून टाकला, अर्धवट ठेवण्यात येते मग तो दुसऱ्या न्हाव्याकडे जाऊ शकत नाही त्यावरून एक काम धड पूर्ण न करता अनेक कामांची नुसती सुरुवात करणाऱ्याला 'काशीचा न्हावी' म्हणण्याचा प्रघात पडला

न्हाव्यांची ही बटॅलियन ओलांडून आपण पायऱ्या उतरू लागलो, की भिकाऱ्यांची रांग लागते पहिल्याच चौकात उजव्या बाजूला गंगामाता मंदिर आहे पुन्हा आपण पायऱ्या उतरू लागलो, की सुटे पैसे विकणारे व रिकामी भांडी, रिकाम्या बाटल्या विकणाऱ्यांच्या रांगा लागतात स्नान करून परत जाताना गंगा-जल नेण्यासाठी भाविक ही भांडी व बाटल्या विकत घेतात याच ठिकाणी काशीचे पंड्ये आपल्याला गाठतात धर्मकृत्य करायचे आहे काय अशी पृच्छा करून ते जवळजवळ ओढूनच नेतात प्रथम 'कपडे घाटावर ठेवा. मी ते सांभाळतो' असे सांगून मग आपणच एक एक मंत्र म्हणून तुमच्या गळयात हे पंड्ये लोक धर्मकृत्य बांधतातच घाटावर मोठमोठ्या छत्र्या लावून शेकडो शास्त्री, पंड्ये बसलेले असतात ते सर्व प्रकारची धर्मकार्ये करतात स्नानासाठी घाटावर अमाप गर्दी

असते याच ठिकाणाहून नावा मिळतात त्या रुपया दोन रुपयात अनेक घाटाची दोन मैलांची सफर घडवून आणतात ग्रहणाच्या वेळी या घाटावर पाऊल ठेवायला जागा नसते येथे शीतलादेवीचे मोठे मदिर आहे दशाश्वमेध घाट हा पचतीर्थांपैकी एक आहे दशाश्वमेध घाटाला फार पूर्वी रुद्रसार किंवा रुद्रसरोवर असे नाव होते अजूनही 'दशाश्वमेध जुना रुद्राश्वमेध घाट' अशी पाटी या घाटावर आढळते दशाश्वमेध घाटावर तीन शिवलिंगे आहेत शूलात केशव (त्रिशूलधारी शकर), ब्रह्मेश्वर (या लिंगाची स्थापना ब्रह्मदेवाने केली असे पडचे सागतात) आणि तिसरे शिवलिंग शीतलादेवीच्या परिसरात आहे गगा नदीला पूर आल्यावर ही तिन्ही शिवलिंगे पाण्याखाली असतात

दशाश्वमेध घाटापलीकडच्या घाटाचे नाव प्रयाग घाट असे आहे अलाहाबाद येथील प्रयाग तीर्थावर स्नान केल्यावर जे पुण्य मिळते, तेच या घाटावर स्नान केल्यानतर मिळते असे म्हणतात या घाटाला घोडा घाट किंवा गऊ घाट असेही पूर्वी म्हणत असत त्या वेळी या घाटापलीकडे सपाट जमीन होती व घोडे, गाई व साड तेथे पाणी पिण्यासाठी येत, पण नंतर त्याच्या पलीकडे घाट बाधला गेला व त्याच्या उंच पायऱ्यामुळे येथे जनावरे येणे बद झाले प्रयागघाटानजीक राजेंद्र प्रसाद घाट असून त्याच्यावर आता पाण्याची प्रचड टाकी बांधण्यात आली आहे या घाटाला पूर्वी सोमेश्वर घाट असेही नाव होते सोमेश्वर घाटावरच्या शिवलिंगाची स्थापना चद्राने (सोम) केली असा काशीखडात उल्लेख आहे त्यापलीकडे मान-मदिर घाट व मीर घाट आहेत या ठिकाणी सोळाव्या शतकात नबाबचा अधिकारी मीर रुस्तुम याने एक किल्ला व घाट बाधला होता, पण रामनगरच्या राजा बल-वतसिंग याने १७३५ मध्ये किल्ल्याचे दगड काढून रामनगरला स्वत चा किल्ला उभारला मीर घाटावर विशालाक्षी मदिर आहे त्या घाटाजवळ त्रिपुरा भैरवी घाट आहे नतर ललिता घाट व सिद्धेश्वर घाट आहेत या घाटाच्या वरील टोका-वर नेपाळी मदिर आहे. याच्याजवळचा गगाकेशव घाट नष्ट झाला, तरी त्या ठिकाणी राजेश्वरी घाट बाधण्यात आला येपात घाट व जलसाई घाटानतर जग-प्रसिद्ध मनकर्णिका घाट आहे याची पूर्वीची नावे सिद्धीविनायक घाट व स्वर्गद्वारे-श्वर घाट अशी होती

जलसाई म्हणजे स्मशान जलसाई व मनकर्णिका हे दोन्ही मिळून जे घाट होतात, तेथे जगातील सर्वांत मोठे व सर्वांत दीर्घकाल वापरले जाणारे स्मशान आहे गेली २,५०० वर्षे येथे रात्रदिवस सतत दहन होत आहे. तेथील डोंबाचे म्हणणे आहे की, "आम्ही मूळचे ब्राह्मण, पण जेव्हा शकराने हिमालयातून पार्वतीला उचलून आणले, तेव्हा पार्वतीच्या कानातील एक कर्णभूषण खाली पडले ते आमच्या पूर्वजाने उचलले व अपहाराच्या हेतूने लपवून ठेवले. शकराच्या ही गोष्ट लक्षात

आल्यावर त्याने 'तुम्ही डोंब होऊन जन्मभर प्रेतदहनाचा उद्योग कराल' असा शाप दिला तेव्हापासून आम्ही ब्राह्मणांचे डोंब झालो जेथे पार्वतीचे कर्णभूषण पडले, तेथे मनकर्णिका कुड झाले व ही जागाही मनकर्णिका म्हणून ओळखली जाऊ लागली."

ग्वाल्हेरच्या महाराणी बैजाबाई सिंधिया यांनी १८३० मध्ये मनकर्णिकाच्या पलीकडचा वीरेश्वर घाट बाधला याला सिंधिया घाट असेही म्हणतात त्यापलीकडे जुहनाबाईने बांधलेला सकट घाट आहे वास्तविक त्याचे नाव सकटमोचन होते, पण पुढे तो सकट घाट म्हणूनच ओळखला जाऊ लागला त्यापुढचा घाट गगामहल घाट आहे नागपूरच्या भोसले राजघराण्याने १७९५ मध्ये यापुढचा अगिधर भोसला घाट बांधला त्यानंतरच्या तीन घाटांची नावे गणेश, घाट, चोरघाट, रामघाट अशी आहेत त्यापुढचा बालाजी घाट व त्यावरील लक्ष्मण बालाजीचे मदिर ही पेशव्यांची निर्मिती आहे त्यापुढे मगलागौरी व पचगगा किंवा बिंदु-माधव घाट आहेत किरण, सरस्वती, धूतपापा आणि जीर्णनदा आणि गगा या पाच नद्या येथे मिळतात म्हणून या घाटाला पचगंगा घाट असे नाव पडले आहे हा घाट श्रीपतराव या महाराष्ट्रीय धनिकाने बाधला आहे पडितराज जगन्नाथानेही 'गगालहरी' हे काव्य याच ठिकाणी लिहिले त्यापुढचा घाट वेणी-माधव व नतर ब्रह्मघाट व दुर्गाघाट आहेत दोन्ही घाटांवर अनुक्रमे ब्रह्मदेव व दुर्गामाता यांची मदिरे आहेत हे घाट नारायण दीक्षित कायगावकर या महाराष्ट्री-यानी १७४० साली बाधले त्यापुढचा राजमदिर घाट बुंदीचे नरेश सुदर्शनसिंह हाडा यांनी १५२६ मध्ये बांधला. त्यानतरचा लाला घाट बिर्ला कुटुबाने बाधला आहे त्यापुढचे तीन घाट म्हणजे गायघाट, बालाबाई घाट व त्रिलाचन घाट हे नारायण दीक्षित यानीच बांधले त्यानतर महू घाट, तेलियानाला घाट, फूटेश्वर (नवाघाट), प्रल्हाद घाट आणि शेवटी राजघाट किंवा आदिकेशव घाट आहेत पूर्वी राजघाटाजवळ काशीच्या राजाचे निवासस्थान आहे आदिकेशव घाट हा प्रल्हाद घाटापासून बराच दूर असून मध्ये घाट नाही आदिकेशव घाट मुस्लीम बादशहानी दोनदा उद्ध्वस्त केला, पण पुन पुन्हा तो बांधण्यात आला प्रिन्सेप यानी काशीचा इतिहास लिहिला आहे, तो १८३१ मध्ये प्रसिद्ध झाला या अभ्यास-पूर्ण ग्रथात त्यानी म्हटले आहे की, गगाकिनारी काशीत पूर्वी बांधण्यात आलेले ५७ घाट पुराच्या पाण्यामुळे किंवा मुस्लीम आक्रमकांच्या विध्वसी वृत्तीने नष्ट झाले त्यात त्यांनी शुक्राघाट, गोलाघाट, केवलगिरी घाट, कुवई घाट इत्यादी पूर्वी अस्तित्वात असलेल्या ५७ घाटांची नावे दिली आहेत अर्थात त्या त्या ठिकाणी हिंदू राजे अगर अन्य धनिक यानी पुन्हा नवे घाट बांधले आहेत जे घाट नष्ट झाले असे प्रिन्सेप म्हणतात, त्यापैकी चार घाट वस्तुत. नष्ट झाले नसून त्यांची

नावे बदलली आहेत, असे नतरच्या सशोधकांना आढळून आले आहे तरीही निदान पन्नास घाट नष्ट झाले यात शका नाही

गगेच्या किनाऱ्यावर असलेल्या या ६४ घाटाशी निगडित अशा अनेक आख्यायिकांचा धर्मग्रथात उल्लेख आहे उदाहरणार्थ-- वीरेश्वर घाटावर विश्व-वानर या ऋषीने तप करून शकराला प्रसन्न केले आणि त्याला शकराने अग्नीचे रूप दिले या घाटाला अग्नीधरही म्हणतात ललिता घाटाच्या टोकाला ललिता-देवीचे मदिर आहे या देवीला प्रदक्षिणा घातली तर पृथ्वीप्रदक्षिणेचे पुण्य मिळते असे पडचे सागतात अग्नीधरजवळ उपशातेश्वर मदिर आहे या देवाच्या दर्शनाने रोग दूर होतात व मनःशाती मिळते असे लोक मानतात साकता, सिद्धेश्वरी आणि सतोषीमाता याची मदिरे शेवटच्या काही घाटावर आहेत मगला गौरी मदिरात सूर्याची प्रतिमा आहे या ठिकाणी सूर्याने तप केले म्हणून त्याला अत्यत देदिप्य-मान किरण मिळाले असे काशीखडात म्हटले आहे या सूर्याच्या प्रतिमेचे नाव 'मयूखादित्य' असे आहे सूर्याने येथे जे शिवलिंग स्थापन केले असे सांगण्यात येते त्याला 'गभस्तिश्वर' असे नाव असून त्याची आजही पूजा होते नागेश्वरी व मुखनिर्मालिकादेवी याची मदिरे शीतला घाटावर आहेत त्रिलोचन घाटावर तीन नेत्रांच्या शिवाची मूर्ती आहे त्याच्या शेजारचे महादेवाचे देऊळ व त्यातील लिंग हे काशीतील पहिले शिवलिंग असून हे स्वयभू लिंग पृथ्वीच्या उदरातून आले असे काशीखडात म्हटले आहे या देवालयातच वाराणसी देवीचीही मूर्ती आहे हे वाराणसी शहराचे आराध्यदैवत आहे शेवटचा घाट आदिकेशव हा काशीच्या इतिहासातील एक अत्यंत महत्त्वाचा घाट आहे आदिकेशव म्हणजे मूळ विष्णू १२ व्या शतकापर्यंत काशीच्या राजांचे हे दैवत होते पचतीर्थापैकी हे एक तीर्थ आजही आहे शकराचा प्रतिनिधी म्हणून विष्णूचे काशीत आगमन झाले, तेव्हा विष्णू याच ठिकाणी प्रथम आला, असा पुराणात उल्लेख आहे

बनारसमध्ये एकदर ५६ गणेशमूर्ती आहेत त्यापैकी दोन आदिकेशव मदि-राच्या आवारात आहेत खर्व विनायक किंवा बुटका गणपती व राजपुत्र विनायक अशी त्याची नावे आहेत पचगगा घाटावर जे बिंदुमाधवाचे मदिर आहे, ते भव्य असून टॅव्हर्नियर या प्रवाशाने त्याचा उल्लेख 'द ग्रेट पॅगोडा ऑफ बनारस' असा केला आहे रामघाटाच्या माथ्यावर मगळागौरीचे देवालय आहे पंचगगा घाटावर बिंदुमाधव मदिरातच सत कबीरांना त्यांचे गुरू रामनद यांच्याकडून गुरुमत्र मिळाला सत तुलसीदास यांनी याच मदिरात बिंदुमाधवाचे स्तवन करणारे काव्य रचले औरंजेबाच्या कारकीर्दीत मूळ बिंदुमाधव मदिर पाडून तेथे भव्य मशीद बांधण्यात आली तिचे मीनार एवढे उच होते की ते पडण्याचा धोका निर्माण झाला म्हणून कालातराने त्याची उची ५० फुटानी कमी करण्यात आली तरीही

त्यांपैकी एक मोडून पडलाच

पचगगा घाटावर बारा लहान देवालये आहेत त्यांत शेषशायी विष्णूचे एक आहे बऱ्याच देवालयातील मूर्ती नष्ट झाल्या असून तेथे आता काही सन्याशी राहतात व योगविद्येची साधना करतात मात्र ज्या मदिरात अजून मूर्ती आहेत, अशा थोड्या मदिरापैकी एकात पचनदी तीर्थ आहे त्यात पाच नद्याच्या मूर्ती आहेत त्यापैकी गगा नदी सुसरीवर, यमुना नदी कासवावर व सरस्वती मोरावर आरूढ झालेली दाखविली आहे मात्र या ठिकाणी प्रत्यक्षात फक्त गंगा नदी आहे व इतर नद्या प्रतीक रूपाने आहेत

काशीमध्ये काशीविश्वेश्वराचे मदिर असले, तरी या तीर्थक्षेत्रात हजारो वर्षं सर्वात महत्त्वाचे मदिर होते अविमुक्तेश्वराचे सम्राट चद्रगुप्ताच्या काळापासून राजघाटावरच्या उचवटयावर असलेले अविमुक्तेश्वर हे काशीचे मुख्य दैवत होते त्याला अविमुक्तेश्वर, देवदेव आणि विश्वेश्वर देव अशी नावे होती सहाव्या शतकातील ' दशकुमार चरित 'मध्ये अविमुक्तेश्वर हेच काशीचे मुख्य दैवत असल्याचा उल्लेख आहे लक्ष्मीधरानेही ' लिंगपुराणा 'वरून अविमुक्तेश्वराच्या मदिराची जागा निर्देशित केली आहे (' तीर्थविवेचन कांड '– बारावे शतक) इसवी सन ११०४ मध्येही सध्याचे काशीविश्वेश्वर हे दैवत काहीसे दुर्लक्षितच होते व खरा मान होता अविमुक्तेश्वराचा इसवी सन ११०४ मध्ये काशीतील मदिरांची सख्या ३५० होती, १८०० मध्ये ती एक हजार झाली आणि १८७५ च्या सुमारास १६५४ झाली अकराव्या शतकात लाहोरहून मुस्लिमांची सेना काशीवर चाल करून आली या सैन्याने श्रीमत ठाकूर आणि व्यापारी याच्या पेठा लुटल्या पण अविमुक्तेश्वर मदिर अगर इतर मदिरांना त्यांनी धक्का लावला नाही, कारण पैशासाठी लुटालूट करणे हाच त्याचा मुख्य उद्देश होता मात्र ११९४ मध्ये महमद घोरी प्रचड सैन्य घेऊन काशीवर चाल करून आला तेव्हा " इस पवित्र नगरीमें इस्लामके सेनाओंने लगभग एकसहस्र मदिरोंको नष्ट किया और उसके स्थानपर मसजिदे बनवायी " (डॉ ईश्वरीप्रसाद भारत का इतिहास ) यावरून ११९४ पूर्वी तेथे हजाराहून अधिक मदिरे होती हे सिद्ध होते

मुस्लीम आक्रमकानी हिंदूची मदिरे तोडून मशिदी बाधाव्यात आणि हिंदूनी पुन पुन्हा मदिरे उभारावीत असे काशीच्या इतिहासात सतत घडत आले आहे. गझनीच्या महमदाचा सेनाधिकारी शहाबुद्दीन याने काशी शहर लुटून जमा केलेली सपत्ती व वस्तू १४०० उटांवर लादून गझनीला नेल्या, असे ' ताजुलम आसीर ' या ग्रथात हुसेन निजामी यांनी म्हटले आहे विद्या आणि भक्ती हे काशीचे मुख्य कार्य असल्याने बलिष्ठ मुस्लीम आक्रमकांना क्षात्रधर्माने प्रत्युत्तर देणे अगर प्रतिकार करणे हे पडित व भक्त याना शक्यच नव्हते.

गुजरातमधील नामवत धनाढ्य शेठ वास्तुपाल यानी दिलेल्या एक लाख रुपयाच्या देणगीने तेराव्या शतकात सध्याच्या ज्ञानवापीनजीक विश्वनाथ मदिर उभारले गेले मूळ मूर्ती व मदिर शहाबुद्दीन याने भग्न करून टाकली होती त्याने राजघाटावरील अविमुक्तेश्वर मदिरही नष्ट केले त्यावेळी अविमुक्तेश्वर मंदिराजवळच काशीचे स्मशान होते शकराचे वास्तव्य स्मशानात असते म्हणून हे मूळ मदिर स्मशानाजवळ बाधण्यात आले होते जवळच 'हडका तलाव' नावाचा तलाव होता अस्थिविसर्जनाच्या वेळी या तलावात अस्थी टाकल्या जात ज्ञानवापीजवळ जेथे एक लाख रुपये खर्चून विश्वनाथ मदिर बाधण्यात आले, त्या जवळच रजिया सुलतानने बाधलेली मशीदही होती हिंदूचे जाज्वल्य धर्मप्रेम आणि आक्रमक मुस्लीम बादशहांचा अट्टाहास यामुळे बनारसमध्ये आजही बहुतेक हिंदू मदिरांजवळ मशिदी अढळतात

महमद घोरीच्या सरदारानी अविमुक्तेश्वर मदिर नष्ट केल्यानतर कित्येक वर्षं त्याची पुनर्बांधणी झाली नाही कारण या वेळी शहराची आताच्या दशाश्वमेध घाटाच्या दिशेने वाढ होत होती पुढे १४९४ मध्ये शिकदर लोदीने विश्वेश्वर मदिर उद्ध्वस्त केले, ते सध्याच्या कारमायकेल ग्रथालयाजवळ होते त्यावेळी विश्वेश्वर मदिराजवळच पद्मेश्वर मदिरही होते. सध्या जेथे विश्वनाथ मदिर आहे, त्याच्या आसपास त्याच देवाचे मदिर चौदाव्या शतकात होते, असे डॉ मोतीचद यांनी म्हटले आहे. डॉ मोतीचद यानी असेही म्हटले आहे की काशी येथील शकराला विश्वनाथ हे नाव बाराव्या शतकात प्राप्त झाले अगदी अलीकडे, १९७८ मध्ये अतिवृष्टीमुळे रजिया मशिदीचा बराच भाग ढासळला, तेव्हा त्यात प्राचीन विश्वनाथ मंदिराचे अवशेष आढळले, मदिर उद्ध्वस्त झाले, तरी हिंदू लोक काही वर्षे उघड्यावरच पूर्वीच्या मदिरांच्या ठिकाणी शिवलिंग पूजा करीत होते पुढे मिर्झाराजे जयसिंग यांनी येथे विश्वनाथ मदिर बांधले

शेकडो वर्षे या विश्वनाथाचे नाव 'रडी बजवा महादेव' असेही होते असे विचित्र नाव पडण्यासही इतिहास आहे शिव हा नटराजही आहे त्या काळी गोकुळअष्टमीला काशीतली वेश्या या मदिरात येऊन नटराजापुढे नृत्य करून आपल्या नृत्यकलेत त्याची कृपा राहावी म्हणून स्तवन करीत असत या गाण्याबजावण्याला उद्देशून 'रडी बजवा' हे नाव प्रचलित झाले होते

ता १८ एप्रिल १६६९ रोजी औरगजेबाच्या हुकमावरून त्यावेळचे विश्वनाथ मदिर उद्ध्वस्त केले गेले साकी मुस्तइद खाँ यानी 'मासिर–ए–आलमगिरीमध्ये' याची अशी अभिमानपूर्वक नोंद केली आहे

" १७ जिलकदा, हिजरी १०७९ (१८) अप्रैल, १६६९ ई०) के दिन (धर्म) के रक्षक बादशाह सलामत के कानों में खबर पहुँची कि ठट्टा और मुल-

तान के सुबोमें और विशेषकर बनारस में बेवकूफ ब्राह्मण अपनी रद्दी किताबें अपनी पाठशाला में पढाते और समझाते है और उनमें दूर–दूर से हिन्दू-मुसलमान विद्यार्थी और जिज्ञासू उनके बदमाशी भरे ज्ञान–विज्ञानों को पढने की दृष्टी से जाते है। धर्मसंचालक बादशाह ने यह सुनने के बाद सब सुबेदारों के नाम यह फरमान जारी किया है कि वे अपनी इच्छा से काफिरो के तमाम मंदिर और पाठशालाएँ गिरा दे। उन्हें सख्त ताकीद की गयी की वे सब प्रकार के मूर्ति–पूजा सम्बन्धी शास्त्रों का पठन–पाठन और मूर्ति–पूजा भी बन्द कर दे। १५रबउल–आखिर (२ सितम्बर १६६९) को दीन प्रतिपालक बादशाह को खबर मिली की उनकी आज्ञा के अनुसार उनके अमलों में बनारसमे विश्वनाथ मंदिर गिरा दिया।"

या प्रकारानतर ११६ वर्षांनी विश्वनाथ ब्रह्मचारींचे वंशज श्री जयराम शर्मा यांच्या हस्ते मंदिराची प्रतिष्ठापना केली गेली

काशीविश्वनाथाचे सध्याचे मंदिर राणी अहल्याबाई होळकर यांनी १७७० मध्ये बांधून पूर्ण केले व त्या वर्षीच्या गोकुळअष्टमीला मंदिर समारंभपूर्वक जनतेसाठी खुले केले १८२८ मध्ये राणी बैजाबाई यांनी ज्ञानवाणी मंडप बांधला. १८३९ मध्ये महाराजा रणजितसिंह यांचे दिवाण तेजसिंह यांनी महाराजांच्या आज्ञेनुसार मंदिराच्या शिखरावर सोन्याचा पत्रा चढविला अगदी अलीकडे १९८१ साली, या सोन्याच्या पत्र्याचा काही भाग चोरीला गेला सध्याच्या विश्वनाथ मंदिराची उंची १५.५ मीटर आहे गाभारा ७.८ चौरस मीटर आणि मंडप सुमारे दीड चौरस मीटर आहे शिवलिंग जमिनीवर व खोलात आहे हे शिवलिंग नर्मदा नदीतून आणलेल्या काळ्या पाषाणापासून बनविलेले आहे हे शिवलिंग गंगाजल व बेलाची फुले यांत जवळजवळ नेहमीच बुडालेले असते त्यामुळे दर्शनासाठी खाली वाकून व शिवलिंगास स्पर्श करून नमस्कार करावा लागतो मंदिराचा नौबतखाना अजीजीतमुल्क नावाच्या मुस्लिम सरदाराने बांधला आहे अवधच्या नबाबानी या नौबतखान्यात सनई व नगारे वाजविण्यासाठी देणगी दिली आहे प्रसिद्ध सनईवादक उस्ताद खादिमअली खाँ हे सध्या येथे वंशपरंपरेने सनई वाजवितात

विश्वनाथ मंदिर व काशी तीर्थक्षेत्र यांचा आणि महाराष्ट्राचा अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध आहे. विश्वनाथ मंदिर, गणेश मंदिर इतर शेकडो मंदिरे, अहल्या घाट, भोसला घाट, पेशवा घाट, सिंधिया घाट– इत्यादी घाट मराठ्यांनी बांधले आहेत काशीतील जी इतर महत्त्वाची मंदिरे मराठ्यानी बांधली आहेत, त्यात साक्षीविनायक, दुर्गविनायक, कालभैरव, बालाजी, वेणीमाधव अन्नपूर्णा, बडा गणेश अशी कित्येक महत्त्वाची मंदिरे आहेत मराठ्यांचे साम्राज्य जेव्हा महाराष्ट्राबाहेर विस्तार पावू लागले, तेव्हा हिंदूचे सर्वांत मोठे क्षेत्र काशी व विश्वनाथ

मंदिर यावर आपला अमल बसवावा अशा महत्त्वाकांक्षेने त्यानी पराकाष्ठेचे प्रयत्न केले रोहित्याच्या विरुद्ध अयोध्येच्या नबाबाने मराठ्याच्याकडे मदत मागितली तेव्हा मराठा राज्यकर्त्यांनी अशी अट घातली की मथुरा, काशी, प्रयाग व गया ही तीर्थक्षेत्रे मराठ्याच्या ताब्यात राहतील

नबाबाला मदतीची अत्यत निकड असल्याने त्याने ती अट मान्यही केली पण लढाईत यश मिळाले, तरी मराठ्यानी या क्षेत्रावर ताबा मिळविण्याची तत्परता दाखविली नाही मराठ्यांना पायबद घालण्याचा व्यूह रचणाऱ्या ब्रिटिशानी उत्तरेत मराठ्यांना पाय रोवू देण्यास विरोध केला आणि काशीवर ताबा बसविला नतर नाना फडणिसानीही आलमगीर मशीद ही विश्वनाथाच्या मदिराजवळून हलविण्याची ब्रिटिशांना अनेकवार विनती केली व त्यासाठी नुकसानभरपाईही देण्याची तयारी दाखविली पण अवधचा मुस्लिम नबाब व उत्तरेतील मुस्लिमांचे प्राबल्य यामुळे इग्रजाना मुस्लिमांची इतराजी नको होती म्हणून त्यानी नाना फडणिसांची सूचना मान्य केली नाही पूर्वीच्या विश्वनाथ मदिराचे अवशेष वापरूनच त्यावर औरगजेबाच्या सरदारानी आलमगीर मशीद बांधली आहे, याचा स्थापत्यशास्त्राचा स्पष्ट पुरावा आजही या मशिदीकडे पाहिल्यास मिळतो. जेम्स प्रिन्सेप यांनी १८३१ मध्ये प्रसिद्ध केलेल्या चित्रात मदिराच्या मूळ बाधकामावर मशीद उभारल्याचा नि:सदेह दाखला आहे विश्वेश्वर मदिराचे अनेकदा स्थलांतर झाले आहे, हे मदिर कित्येक वर्षे राजघाटावरच्या अविमुक्तेश्वरच्या मंदिराजवळही होते सध्याच्या मदिराजवळची आलमगीर मशीद ही मूळ विश्वेश्वर मदिराच्या अवशेषावर बांधली असल्याचा निष्कर्ष एम् ए शेरिंग या इतिहासकाराने एकोणिसाव्या शतकात असा काढला आहे "या मशिदीचे खाब गुप्तकालीन नक्षीचे आहेत प्राचीन विश्वेश्वर मदिर तोडून ही मशीद बाधली गेली आहे"

विश्वनाथ मदिर दररोज पहाटे तीन वाजता खुले होते पुजारी प्रथम गगाजलाने शिवलिंगाला स्नान घालतात त्यानतर शिवलिंगाला चमेलीचे तेल लावण्यात येते मग "हरहर महादेव, शंभो काशी विश्वनाथ गगे" च्या गजरात पुन्हा ते गगाजलाने धुण्यास येते त्यानंतर सव्वाशेर ताजे कच्चे दूध, दही, साखर, तूप व केळी याच्या मिश्रणाचा त्यावर अभिषेक करण्यात येतो मग पुन्हा त्याच गगाजलाने स्नान घालण्यात येते मग त्यावर गुलाबपाणी सोडण्यात येते शिवलिंग स्वच्छ कापडाने पुसण्यात आल्यावर त्याला खास अत्तर लावण्यात येते मग शिरोभागी चदनाचा लेप चढविण्यात येतो बेलपत्र जाळून तयार केलेले भस्म लावण्यात येते त्यानतर शिरोभागी अक्षता आणि ११ बेलपत्रे चढविण्यात येतात नंतर शिवलिंगावर फुले वाहण्यात येतात। नैवेद्य दाखविण्यात येतो त्यानतर पहाटे साडेतीन-पावणेचारच्या सुमारास पहिली मगलारती होते काशीमध्ये विश्वेश्वराचा उल्लेख

'बाबा' या घरगुती नावाने होतो. 'बाबाचे दर्शन' 'बाबांची पूजा' असे पद्धचे, पुजारी व भक्त सतत बोलत असतात आरतीनतर मूर्तीला भोग लावतात पुन्हा पाच दिव्यांनी आरती होते झांज, डमरू, शख इत्यादी वाद्याच्या नादात काशी-विश्वेश्वराची आरती होते

कर्पूर गौरम् करुणावतारम्
ससार सारम् भुजगेंद्र हारम्
सदा वसतम् हृदयारविंदे
भवम् भवानी साहित्यम् नमामी

या वेळी मदिरात भक्ताची खचाखच गर्दी असते गगा किनारीचे पहाटेचे प्रसन्न वातावरण आणि त्यात समारभपूर्वक चाललेली आरती यानी मने भरून जातात हा उदात्त अनुभव नास्तिकालाही अविस्मरणीय वाटावा असा सखोल असतो, मग भाविकांना अशावेळी आपल्या जीवनाचे सार्थक झाले असे वाटल्यास नवल ते काय ? शेकडो लोक एक सुरात स्तवन करीत असतात—

त्वमेव माता च पिता त्वमेव,
त्वमेव बधुश्च सखा त्वमेव
त्वमेव विद्या प्रविणम् त्वमेव,
त्वमेव सर्वम मम देव देव

वरून पुराण व शिवपुराण यातील कथांनुसार पार्वतीने जेव्हा शकराबरोबर विवाह केला, तेव्हा शकर अगाला भस्म माखून हिमालयात राहत असत. त्यांच्या-जवळ कसलेही ऐश्वर्य अथवा वैभव नव्हते तेव्हा पार्वतीची आई म्हणाली, "तुझा नवरा असा ग कसा सदा दरिद्री ?" पतीची ही निंदा ऐकून पार्वती शकराला म्हणाली, "आता मी येथे राहणार नाही जिथे आपल्याला कोणी दिसणार नाही, तेथे मला घेऊन जा" म्हणून शकराने पार्वतीसह काशीला आगमन केले शकर व पार्वती रागावून गेली म्हणून त्याना बोलाविण्यासाठी सूर्याला पाठविण्यात आले पण सूर्य बारा रूपे घेऊन येथेच राहिला ब्रह्मदेव आले पण तेही दहा अश्वमेध यज्ञ करून काशीतच राहिले शकर-पार्वतीला बोलाविण्यासाठी त्याचा पुत्र गणपतीला पाठविण्यात आले. तोही काशीतच राहिला भगवान विष्णू आले त्यांनी ब्राह्मणाचे रूप घेतले आणि राजा दिवोदास याला उपदेश केला त्याने शिवाचे मदिर बांधून स्मशानात राहणाऱ्या शिवाला कायमचे निवासस्थान करून दिले.

विश्वनाथाचे दर्शन घेण्यासाठी प्रथम गगास्नान करावयाचे, लोटयातून गगा-जळ घ्यावयाचे, वाटेत फुले व बेल घ्यायचा. विश्वनाथ मदिराकडे जाताना साक्षी विनायकाचे दर्शन घ्यायचे आपण काशीयात्रा केल्याची साक्ष हा गणपती देतो व तशी नोंद करून ठेवतो म्हणून त्याला 'साक्षीविनायक' असे नाव आहे. मुख्य

देवाचे दर्शन घेण्यापूर्वी प्रथम या आवारातील भवानी मातेचे दर्शन घ्यायचे मग घुंडिराज गणपतीला नमन करावयाचे त्यावेळी प्रार्थना करावयाची की "मी पुन्हा आपल्या गावी जाऊन संसारात रमलो तरी हे घुंडिराज गणपती, मी जेथे असेल तेथे तू मला धुंडून या पवित्र क्षेत्रात पुन्हा आण" मग ज्ञानवापीला प्रदक्षिणा घालायची प्राचीन काळी येथे कुंड होते व त्यावर ज्ञानी ऋषिमुनी स्नान करीत असत, म्हणून या विहिरीला ज्ञानवापी असे म्हणतात तिथून मुक्तिमंडपात यावयाचे तेथे आदित्य, द्रौपदी, विष्णू, दंडपाणी आणि महेश्वर या पाच देवतांचे दर्शन घ्यायचे मग विश्वेश्वराच्या दर्शनासाठी निघावयाचे मग पार्वती, सत्यनारायण अशा आवारातील अनेक देवतांचे दर्शन घ्यावयाचे विश्वेश्वराच्या दर्शनासाठी जाताना तीन हार न्यावयाचे असतात एक हार पार्वतीला, दुसरा विश्वनाथाला घालतात तिसरा हार पुजारी भक्ताला घालून आशीर्वाद देतात त्यामुळे दर्शनाहून परत येणाऱ्या प्रत्येकाच्या गळयात हार व हातात प्रसाद दिसतो देवाबरोबरच भक्तालाही हार घालण्याची काशीची पद्धत अत्यंत वैशिष्टयपूर्ण आहे

औरंगजेबाच्या दरबारात चंद्रभानू नावाचा शायर होता जेव्हा औरंगजेबाने विश्वनाथ मंदिर तोडून मशीद बांधली, तेव्हा त्याने कुत्सितपणाने चंद्रभानूला विचारले,

"काय शायर, तुमचे मंदिर तोडून मी मशीद बांधली, त्यावर काही शेरशायरी करून दाखवता का?"

चंद्रभानू म्हणाला, "जहाँपनाह, अभय असेल तर शेर करून दाखवतो!"

औरंगजेबाने त्याला अभय दिले, तेव्हा त्याने हजरजबाबीपणे शेर म्हणून दाखविला—

बेबीं करामते बुतखान–ए–मरा ऐ शेख कि चू खराब शवद खान–ए–खुदागरदद

या शेराचा अर्थ असा "आमच्या मंदिराची ही कमाल पहा, की स्वतः उद्ध्वस्त होऊनही त्याने तुमच्या खुदाला आपल्याजवळ आणले!"

*

# काशीत राज्य विद्वानांचे

बनारस शहराचा फेरफटका करायचा असेल तर रेल्वे स्टेशनपासून सुरुवात करायला हवी स्टेशनवरचे घुमट काशीविश्वनाथ मंदिराच्या शिखराच्या आकाराचे आहेत समोरच्या मोठ्या पटांगणात ऑटो रिक्षा, सायकल रिक्षा आणि टेंपो अशी कित्येक वाहने मुबलक असतात तिथून शहरात शिरताना प्रथम डाव्या हाताला लागते ती काशी विद्यापीठाची इमारत. या विद्यापीठाची स्थापना १० फेब्रुवारी १९२१ रोजी महात्मा गांधींनी डॉ भगवानदास यांच्या हस्ते केली बाबू शिवप्रसाद गुप्त या दानशूर धनिकांनी या विद्यापीठाला मोठी देणगी दिली भारतातील अनेक नेते काशी विद्यापीठातून शिक्षण घेऊन देशसेवेसाठी सिद्ध झालेले आहेत या विद्यापीठाच्या मागे बनारसमधील सर्वांत मोठे कबरस्तान आहे मोहरमच्या दिवसांत तेथे शहरातील सर्व ताबूत येतात काशी विद्यापीठाजवळच 'भारत माता मंदिर' आहे हे आपल्या देशातील अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण व अशा प्रकारचे एकमेव मंदिर आहे कारण या मंदिरात कोणत्याही देवाची मूर्ती नसून भारताचा नकाशा आहे हा नकाशा मोठा खोलगट चौकोन तयार करून ज्याला 'रिलीफ मॅप' म्हणतात, तसा डोंगर, नद्या, समुद्र वगैरे दाखविणारा सुमारे ३० मीटर लांब व १८ मीटर रुंद असा आहे भिंतीवर ज्येष्ठ भारतीय नेते, संत, देवता यांची चित्रे असून त्याखाली बोधवचने आहेत या मंदिराचा हेतू चांगला असला तरी त्याची नीट निगा ठेवलेली नसल्याने आजच्या भारतासारखीच त्याची अवस्था झाली आहे भिंतीवरचे ढपले निघालेले आहेत, त्यामुळे अनेक बोधवचने तुटलेली आहेत, धूळ पसरलेली आहे, भिंतीवरचे रंग फिकट व पुसट झाले आहेत या मंदिराच्या प्रांगणात एक प्राचीन बोधीवृक्ष आहे, तो सम्राट अशोकाने लावलेला आहे असे सांगण्यात येते.

भारत माता मंदिरासमोर चदवा सट्टी नावाचा बनारसचा सर्वांत मोठा भाजीबाजार आहे जवळच ब्रह्मी लोकांनी बांधलेले बुद्धमंदिर आणि भारत सेवाश्रम संघाची इमारत आहे या ठिकाणी दुर्गा पूजा होते भारत सेवा संघाच्या मागे वाराणसी महानगरपालिकेची जुन्या धाटणीची इमारत आहे त्यापासून काहीशा अंतरावर शहराच्या दिशेने कैवल्य मंदिर आहे त्यांच्यापुढे रोमन कॅथॉलिकांचे चर्च लागते त्याला सिगरा चर्च म्हणतात जवळच्याच 'सिगरा' तलावावरून हे नाव पडले आहे १९ व्या शतकात सिगरा तलावाजवळ लुटारू व ठग यांची वस्ती होती तेव्हा हे ठिकाण गावाबाहेर होते आता ते शहराच्या मर्यादेत आले आहे तसेच सिगरा तलाव बुजवून आता त्या जागी इमारती बांधण्यात आल्या आहेत या चौकापासून पूर्वेकडे जाणाऱ्या रस्त्यावर 'आशुक माशुक कबर' आहे तसेच औरंगजेबानेच वसविलेला 'पान दरिबा' म्हणजे पानबाजार आहे. हा भारतातील एक मोठा पानबाजार असून पाच हजारांवर लोक येथे काम करतात बनारसी पान जगप्रसिद्ध असून या बाजारातून देशात व परदेशात विड्याची पाने मोठ्या प्रमाणावर पाठविण्यात येतात सिगरा चौराही (चौक) पासून दक्षिणेकडे जाणाऱ्या रस्त्यावर श्रीप्रकाश यांचे घर आणि बलदासजींचे मंदिर आहे त्यांच्यामागे गोपालचंद्र वेदांत शास्त्री राहत असत. मंदिराजवळच प्रसिद्ध विद्वान गोपीनाथ कविराज राहत असत शहराकडे जाणाऱ्या रस्त्यावर रथयात्रा चौराही लागतो या चौकात आषाढ महिन्यात मोठा उत्सव होतो व रथयात्रा निघते डाव्या बाजूचा लांबलचक रस्ता थेट दशाश्वमेध घाटापर्यंत जातो त्या रस्त्यावर ॲनी बेझंट यांनी स्थापन केलेले थिऑसॉफिकल लॉज आणि शिखांचे गुरुद्वार आहे या रस्त्याला मिळणाऱ्या डावीकडच्या गल्लीत बैजनाथ मंदिर आहे त्या मंदिरात शिवरात्रीला मोठा उत्सव होतो अलाहाबाद येथे ज्याच्या नावाने आझादपार्क हे स्मारक तयार केलेले आहे, ते चंद्रशेखर आझाद हे स्वातंत्र्य सैनिक याच गल्लीत राहत असत त्या घाटाजवळ बटुक भैरव आणि कामख्या देवीची मंदिरे आहेत

याच रस्त्याने आपण शहराच्या दिशेने जाऊ लागलो की १८९८ मध्ये स्थापन केलेले सेंट्रल हिंदू कॉलेज लागते जवळच्या तिमुहानीचा (जेथे तीन रस्ते मिळतात अशी जागा, चौरही म्हणजे जेथे चार रस्ते मिळतात अशी जागा) एक रस्ता शंखूधारा तलावाकडे जातो या ठिकाणीही आषाढात उत्सव भरतो. जवळच धान्य बाजार आहे, त्याला खोजवाँ बाजार म्हणतात, या बाजाराजवळ नवाबगंज ही पेठ आहे लखनौचा नवाब बनारसला आला होता, तेव्हा त्याचा मुक्काम येथे होता त्याने एक हवेलीही बांधली होती त्याने वसविलेली पेठ म्हणून तिचे नाव नवाबगंज पडले. त्याचे खोजे जेथे मुक्काम करून होते त्या भागाला खोजवाँ गंज हे नाव पडले. नवाबांच्या घोड्यांना घास दाणा देणारे जेथे राहत त्या भागाला घसियारी टोला

असे नाद आहे इथून आपण कमच्छा तिमुहानीला जातो या तीन रस्त्यांपैकी एका रस्त्यावर महाराज कुमार विजया नगरम् यांची कोठी आहे हा रस्ता थेट ख्रिश्चन चर्चपर्यंत जातो. या रस्त्यावर बनारसमधील सर्वांत जुने कॉलेज जयनारायण कॉलेज आहे. महाराजा जयनारायण घोषाल यांनी या कॉलेजची स्थापना केली जवळच्या देवकीनंदन हवेलीमध्ये पौराणिक प्रसंगावरही अनेक भित्तीचित्रे आहेत जवळच्या रवींद्रपुरी भागात डॉ राजबली पाण्डे, आचार्य हजारीप्रसाद

अंतरावर असलेल्या यक्षमूर्तीचे नाव ‘मुदिकट्टा बाबा यक्ष’ असे आहे त्याच्या- जवळ पूर्वी जयनारायण घोषाल यांनी स्थापन केलेले गुरुधाम मंदिर होते आता ते नष्ट झाले आहे सध्या त्याजागी अनेक प्राध्यापक राहतात

दुर्गा मंदिर हे बनारसचे एक भूषण आहे त्याची स्थापना राणी भवानीने केली. हे मंदिर लाल दगडाचे असून मंदिराच्या आवारात शे-सव्वाशे माकडे आहेत त्यांचे खेळ पाहणे अतिशय मनोरंजक असते या मंदिराच्या आवारात साखळीला बांधलेल्या अनेक घंटा आहेत त्यावर बसून माकडे मजेने झोके घेतात मंदिरावर सुरवातीला अनेक शिखरे, मग सहा, चार व शेवटी मध्यभागी एकच उंच शिखर अशी रचना आहे अनेक देवांतून अखेर एकच देव आहे असे दाखविण्याचा या स्थापत्यामागील हेतू आहे बनारसमधील काशीविश्वेश्वर व इतरही अनेक मंदिरांची शिखरे याच पद्धतीची आहेत या मंदिराजवळ महाराणी अहिल्याबाई यांनी दुर्गाकुंड बांधलेले आहे दुर्गा मंदिराच्या समोर रस्त्यापलीकडे पांढरे शुभ्र संगमरवरी व अत्यंत देखणे असे भव्य मंदिर आहे त्याचे नाव तुलसी मानस मंदिर असे आहे संत तुलसीदासांच्या सन्मानार्थ हे मंदिर बांधण्यात आले आहे. मंदिराच्या आवारात अतिशय सुंदर असे उद्यान तयार करण्यात आले आहे त्यात गंगावतरणाचे दृश्य आहे मंदिरात आत संगमरवरी भिंतीवर तुलसी रामायण खोदण्यात आले आहे अयोध्येच्या वाल्मीकी मंदिराच्या धर्तीवर हे मंदिर आहे.

मानस मंदिरापासून जवळच लंका नावाचा भाग आहे या ठिकाणी संत तुलसीदास हे स्वत. रामलीला करीत असत. भारतात व विशेषत उत्तर भारतात नवरात्रात रामलीला व नवरात्र संपल्यावर दसऱ्याला लंकादहन हे कार्यक्रम होतात त्यांची सुरवात बनारसच्या लंका या भागात झाली लंकेला लागूनच जगप्रसिद्ध हिंदू विद्यापीठ आहे हे विद्यापीठ आणि स्वर्गीय पंडित मदन मोहन मालवीय यांनी त्याच्या स्थापनेसाठी व विकासासाठी घेतलेले कष्ट म्हणजे भारतीय इतिहासातील एक सोन्याचे पान आहे काशी यात्रेसाठी जाणाऱ्या प्रत्येकाने ज्ञानाच्या क्षेत्रातील या काशीचेही दर्शन अवश्य घेतले पाहिजे अशा तऱ्हेचे वैशिष्ट्यपूर्ण विद्यापीठ आशि-

तौलनिक धर्मशास्त्र विभागाच्या प्रमुख श्रीमती डायना एल ईक यानी काढले आहेत १९०४ मध्ये प मदन मोहन मालवीय यानी हिंदू तत्त्वज्ञान व सस्कृती याच्या विकासासाठी एक स्वतत्र विश्व विद्यालय सुरू करण्याचे ठरविले या विद्यापीठात आधुनिक शास्त्रे व नवे विचार यांचेही अध्ययन होईल अशी त्यानी त्याची आखणी केली त्यासाठी कोटयवधी रुपयाच्या निधीची आवश्यकता होती १९०५ मध्ये अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन बनारसमध्ये भरले होते त्या अधिवेशनात प मदन मोहन मालवीय यानी ही कल्पना माडली श्रीमती ॲनी बेझट यानी या कल्पनेला पाठिंबा दिला बनारसच्या महाराजानी या विद्यापीठासाठी १३०० एकरांची विस्तृत जागा दिली आर्थिक मदत गोळा करण्यासाठी पडित मालवीय यानी भारतभर दौरा काढला त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वामुळे आणि नि स्वार्थी ऋषितुल्य जीवनामुळे सर्व बाजूनी आर्थिक मदतीचे ओघ आले. सर्वसाधारण परिस्थितीतल्या गृहिणीनी आपल्या हातातील बिलवरही दिले झाडूवाल्यानी एक दिवसाचा रोजगार विद्यापीठाला दिला लाखो रुपयांच्या एकरकमी देणगीपासून चार आण्यापर्यंतच्या लहान देणगीपर्यंतची मदत प मालवीय यांनी गोळा केली १९१६ मध्ये भारताचे तेव्हाचे व्हाईसरॉय लॉर्ड हार्डिज यांनी विद्यापीठाची कोनशिला बसविली विद्यापीठाची रचना अर्धगोलाची आहे विद्यापीठाचे शैक्षणिक कार्य १९२१ पासून सुरू झाले प्रिस ऑफ वेल्स याच्या हस्ते विद्यापीठाचे उद्घाटन झाले. सस्कृत, भारतीय तत्त्वज्ञान इत्यादी खास भारतीय विषयापासून इजनियरिंग, मेडिकल, मेटॅलर्जी अशा अनेक पाश्चात्य ज्ञानाच्या शाखाचाही अभ्यास या विद्यापीठात होतो आशियातील हे सर्वांत मोठे आणि सर्वांत सुदर असे विश्वविद्यालय आहे सध्या या विद्यापीठात सोळा हजार विद्यार्थी आहेत सर्व भारतीयांना अभिमान वाटावा असे हे ज्ञानाच्या क्षेत्रातील तीर्थस्थान आहे

प मदन मोहन मालवीय यानी ज्या निष्ठेने आपले जीवन या विद्यापीठासाठी अर्पण केले, ती अद्वितीयच होय अखेरच्या क्षणापर्यंत ते याच विद्यापीठाच्या आवारात राहत होते शेवटच्या आजारात त्याना धार्मिक वृत्तीच्या स्नेह्यांनी व नातेवाइकानी सागितले, "आपण काशीत जाऊन आता रहा, काशीत मरण आल्याने मुक्ती मिळते" त्यावर क्षीण आवाजात प मालवीय म्हणाले, "मला मुक्ती नकोच आहे कारण पुढील अनेक जन्मांतही मला या विद्यापीठाचेच कार्य करायचे आहे" बनारस हिंदू विद्यापीठाची परपरा फार थोर आहे डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन् हे भारतीय सस्कृती विभागाचे प्रमुख होते १९३८ पासून नऊ वर्षे ते उपकुलगुरूही होते सर यदुनाथ सरकार हे जगप्रसिद्ध इतिहासकार या विद्यापीठात इतिहास विभागाचे प्रमुख होते प ओंकारनाथ ठाकूर भारतीय सगीत विभागाचे

उ...९

असे नाद आहे इथून आपण कमच्छा तिमुहानीला जातो या तीन रस्त्यांपैकी एका रस्त्यावर महाराज कुमार विजया नगरम् याची कोठी आहे हा रस्ता थेट ख्रिश्चन चर्चपर्यंत जातो या रस्त्यावर बनारसमधील सर्वांत जुने कॉलेज जय-नारायण कॉलेज आहे महाराजा जयनारायण घोषाल यानी या कॉलेजची स्थापना केली जवळच्या देवकीनदन हवेलीमध्ये पौराणिक प्रसगावरही अनेक भित्तीचित्रे आहेत जवळच्या रवीद्रपुरी भागात डॉ राजबली पाडचे, आचार्य हजारीप्रसाद द्विवेदी, प रामचद्र शुक्ल, श्रीकृष्णलाल इत्यादी पडित राहत असत थोडया अतरावर असलेल्या यक्षमूर्तीचे नाव 'मुदिकट्टा बाबा यक्ष' असे आहे त्याच्या-जवळ पूर्वी जयनारायण घोषाल यानी स्थापन केलेले गुरुधाम मदिर होते आता ते नष्ट झाले आहे सध्या त्याजागी अनेक प्राध्यापक राहतात

दुर्गा मदिर हे बनारसचे एक भूषण आहे त्याची स्थापना राणी भवानीने केली हे मदिर लाल दगडाचे असून मदिराच्या आवारात शे-सव्वाशे माकडे आहेत त्यांचे खेळ पाहणे अतिशय मनोरजक असते या मदिराच्या आवारात साखळीला बाधलेल्या अनेक घटा आहेत त्यावर बसून माकडे मजेने झोके घेतात मदिरावर सुरवातीला अनेक शिखरे, मग सहा, चार व शेवटी मध्यभागी एकच उच्च शिखर अशी रचना आहे अनेक देवांतून अखेर एकच देव आहे असे दाखविण्याचा या स्थापत्यामागील हेतू आहे बनारसमधील काशीविश्वेश्वर व इतरही अनेक मदिरांची शिखरे याच पद्धतीची आहेत या मदिराजवळ महाराणी अहिल्याबाई यानी दुर्गाकुड बाधलेले आहे दुर्गा मदिराच्या समोर रस्त्यापलीकडे पाढरे शुभ्र सगमरवरी व अत्यत देखणे असे भव्य मदिर आहे त्याचे नाव तुलसी मानस मदिर असे आहे सत तुलसीदासांच्या सन्मानार्थ हे मदिर बाधण्यात आले आहे. मदि-राच्या आवारात अतिशय सुदर असे उद्यान तयार करण्यात आले आहे. त्यात गगावतरणाचे दृश्य आहे मदिरात आत सगमरवरी भिंतीवर तुलसी रामायण खोदण्यात आले आहे अयोध्येच्या वाल्मीकी मदिराच्या धर्तीवर हे मदिर आहे.

मानस मंदिरापासून जवळच लका नावाचा भाग आहे या ठिकाणी सत तुलसीदास हे स्वत रामलीला करीत असत भारतात व विशेषत उत्तर भारतात नवरात्रात रामलीला व नवरात्र सपल्यावर दसऱ्याला लकादहन हे कार्यक्रम होतात त्यांची सुरवात बनारसच्या लका या भागात झाली लकेला लागूनच जगप्रसिद्ध हिंदू विद्यापीठ आहे हे विद्यापीठ आणि स्वर्गीय पडित मदन मोहन मालवीय यांनी त्याच्या स्थापनेसाठी व विकासासाठी घेतलेले कष्ट म्हणजे भारतीय इतिहासातील एक सोन्याचे पान आहे काशी यात्रेसाठी जाणाऱ्या प्रत्येकाने ज्ञानाच्या क्षेत्रातील या काशीचेही दर्शन अवश्य घेतले पाहिजे अशा तऱ्हेचे वैशिष्ट्यपूर्ण विद्यापीठ आशि-यातच काय पण जगाच्या पाठीवर दुसरे नाही,असे कृतार्थ उद्‌गार हार्वर्ड विद्यापीठाच्या

तौलनिक धर्मशास्त्र विभागाच्या प्रमुख श्रीमती डायना एल ईक यांनी काढले आहेत १९०४ मध्ये प मदन मोहन मालवीय यांनी हिंदू तत्त्वज्ञान व सस्कृती याच्या विकासासाठी एक स्वतत्र विश्व विद्यालय सुरू करण्याचे ठरविले या विद्यापीठात आधुनिक शास्त्रे व नवे विचार याचेही अध्ययन होईल अशी त्यांनी त्याची आखणी केली त्यासाठी कोटचवधी रुपयांच्या निधीची आवश्यकता होती १९०५ मध्ये अखिल भारतीय कॉंग्रेसचे अधिवेशन बनारसमध्ये भरले होते त्या अधिवेशनात पं मदन मोहन मालवीय यांनी ही कल्पना मांडली श्रीमती ॲनी बेझट यानी या कल्पनेला पाठिंबा दिला बनारसच्या महाराजांनी या विद्यापीठासाठी १३०० एकरांची विस्तृत जागा दिली आर्थिक मदत गोळा करण्यासाठी पडित मालवीय यांनी भारतभर दौरा काढला त्याच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वामुळे आणि नि स्वार्थी ऋषितुल्य जीवनामुळे सर्व बाजूनी आर्थिक मदतीचे ओघ आले सर्वसाधारण परिस्थितीतल्या गृहिणींनी आपल्या हातातील बिलवरही दिले झाडूवाल्यांनी एक दिवसाचा रोजगार विद्यापीठाला दिला लाखो रुपयाच्या एकरकमी देणगीपासून चार आण्यापर्यंतच्या लहान देणगीपर्यंतची मदत प मालवीय यांनी गोळा केली १९१६ मध्ये भारताचे तेव्हाचे व्हाईसरॉय लॉर्ड हार्डिंज यांनी विद्यापीठाची कोनशिला बसविली विद्यापीठाची रचना अर्धगोलाची आहे विद्यापीठाचे शैक्षणिक कार्य १९२१ पासून सुरू झाले प्रिंस ऑफ वेल्स यांच्या हस्ते विद्यापीठाचे उद्घाटन झाले सस्कृत, भारतीय तत्त्वज्ञान इत्यादी खास भारतीय विषयापासून इजनियरिंग, मेडिकल, मेटॅलर्जी अशा अनेक पाश्चात्य ज्ञानाच्या शाखाचाही अभ्यास या विद्यापीठात होतो आशियातील हे सर्वांत मोठे आणि सर्वांत सुदर असे विश्वविद्यालय आहे सध्या या विद्यापीठात सोळा हजार विद्यार्थी आहेत सर्व भारतीयांना अभिमान वाटावा असे हे ज्ञानाच्या क्षेत्रातील तीर्थस्थान आहे

प मदन मोहन मालवीय यांनी ज्या निष्ठेने आपले जीवन या विद्यापीठासाठी अर्पण केले, ती अद्वितीयच होय. अखेरच्या क्षणापर्यंत ते याच विद्यापीठाच्या आवारात राहत होते शेवटच्या आजारात त्याना धार्मिक वृत्तीच्या स्नेह्यांनी व नातेवाइकांनी सांगितले, "आपण काशीत जाऊन आता रहा, काशीत मरण आल्याने मुक्ती मिळते" त्यावर क्षीण आवाजात पं मालवीय म्हणाले, "मला मुक्ती नकोच आहे कारण पुढील अनेक जन्मातही मला या विद्यापीठाचेच कार्य करायचे आहे" बनारस हिंदू विद्यापीठाची परपरा फार थोर आहे डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन् हे भारतीय सस्कृती विभागाचे प्रमुख होते १९३८ पासून नऊ वर्षे ते उपकुलगुरूही होते सर यदुनाथ सरकार हे जगप्रसिद्ध इतिहासकार या विद्यापीठात इतिहास विभागाचे प्रमुख होते पं ओंकारनाथ ठाकूर भारतीय सगीत विभागाचे

उ...९

प्रमुख होते भारत कलाभुवनमध्ये चित्रकला, शिल्पकला, प्राचीन पुस्तके वगैरेंचे उत्कृष्ट नमुने आहेत या विभागाची रचना रवींद्रनाथ टागोर याच्या मार्गदर्शनाखाली झाली आहे आचार्य कृपलानी, डॉ दुर्गाबाई देशमुख, श्रीमाळी अशा नामवंतांनी या विद्यापीठातून शिक्षण घेऊन देशकार्यास वाहून घेतलेले आहे पौर्वात्य व पाश्चात्य परदेशातील शेकडो विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येतात ऑक्सफर्ड केंब्रिज, हॉर्वर्ड अशा जगातील विख्यात विद्यापीठांच्या बरोबरीने आंतरराष्ट्रीय क्षेत्रात बनारस हिंदू विद्यापीठाने मान मिळविला आहे या विद्यापीठाच्या जडणघडणीचा इतिहास पाहताना मला पडित मदन मोहन मालवीय आणि ब्रिटिश राज्यकर्ते या दोघाचेही कौतुक वाटते ते अशासाठी की वास्तविक भारतीय स्वातत्र्याच्या सग्रामात हे शत्रुपक्ष विद्यापीठाचा पायाभरणी समारभ झाला, तेव्हा तर पहिले महायुद्ध चालू होते आणि कॉंग्रेस व सरकार याचे वितुष्ट विकोपाला गेले होते पण ज्ञानाच्या व सस्कृतीच्या क्षेत्रात त्यानी सहकार्य केले पायाभरणी व उद्घाटन यासाठी व्हॉईसरॉय आणि प्रिन्स ऑफ वेल्स यांना बोलविण्यात पंडित मालवीय यांनी कमीपणा मानला नाही, आणि ब्रिटिशांनीही आपल्याविरुद्ध लढाईसाठी उभ्या असलेल्या कॉंग्रेसपुरस्कृत विद्यापीठाच्या स्थापनेत अडथळा न आणता उलट सहकार्यच केले. आज तर परिस्थिती सपूर्णपणे पालटली आहे सरकार आणि मत्री आपलेच आहेत. उठल्या-सुठल्या मत्र्यांना विरोध करणाऱ्या आजच्या काही कार्यकर्त्यांना बनारस हिंदू विद्यापीठाच्या स्थापनेपासून काही बोध घेता येईल

या विद्यापीठाच्या आवारात काशीविश्वेश्वराचे भव्य मदिर आहे त्याला नवे विश्वनाथ मदिर म्हणतात बिर्लांनी बाधलेले हे मदिर उत्तर प्रदेशातील इतर मदिरांच्या धाटणीचे आहे १९३० मध्ये याच्या बाधकामाला सुरुवात होऊन १९५० मध्ये बाधकाम पूर्ण झाले सगमरवर व लाल दगड याचा वापर करून बांधलेले हे कलात्मक मंदिर सुमारे ७६ मीटर उच व ३८ मीटर रुद आहे काशीतील मूळ विश्वनाथ मदिराप्रमाणे येथेही शिवलिंगाची स्थापना करण्यात आली आहे सभामडप भव्य आहे लक्ष्मीनारायण, गणपती, राम-सीता, श्रीकृष्ण इत्यादी देवदेवतांच्या देखण्या मूर्ती सभामडपात आहेत बिर्ला यांनी बांधलेल्या इतर मदिराप्रमाणे येथेही मदिराभोवती सुदर उद्यान तयार करण्यात आले असून हा परिसर स्वच्छ व प्रसन्न राहील अशी दक्षता घेण्यात आली आहे बनारस हिंदू विश्वविद्यालयासमोर गगा नदीच्या दुसऱ्या तीरावर रामनगर वाडा आहे भारतातील बहुतेक राजे क्षत्रीय, पण बनारसचे राजे ब्राह्मण या ठिकाणी गगा नदीवर जो पूल बाधला आहे तो पक्का नाही नदीत प्रचड आकाराची पिंपे टाकून त्यावर जाड पत्रा टाकला आहे. याच पत्र्यावरून मोटारी, रिक्षा वगैरे वाहने व पादचारी यांची वाहतूक होते पुलाच्या पलीकडे रामनगर गाव आहे गावात गेल्यावर उजव्या हाताला

रामनगरच्या महाराजाचा वाडा आहे प्रवेशद्वार भव्य आहे हत्तीवरील अबारीसह महाराजांना या दरवाजातून जाता यावे एवढी ही कमान उंच आहे रामनगरचे राजे चेतसिंह आणि बलवंतसिंह यांच्या कारकीर्दीत हा राजवाडा बांधण्यात आला प्रवेशद्वारातून आत गेल्यावर एक प्रशस्त पटांगण लागते त्याच्या डावीकडे वाड्याचा काही भाग लोकांच्यासाठी खुला ठेवण्यात आला आहे त्यासाठी प्रवेश फी आहे वाड्याच्या या भागात लहानसे वस्तुसंग्रहालय आहे त्यात प्राचीन मूर्ती आहेत शंकर, पार्वती, गणपती, सूर्य, वराह इत्यादी देवतांच्या सुंदर मूर्ती येथे पाहावयास मिळतात मेणे व हत्तीवर ठेवायचे हौदे यांचे अनेक नमुनेही आहेत वस्त्रांच्या विभागात उंची बनारसी साड्या, राजे-महाराजाचे कलाबतूचे अंगरखे, मखमली निशव्या, खलित्यांच्या पिशव्या वगैरे राजघराण्यातील वस्तू आहेत तसेच शस्त्रांच्या विभागात जुन्या तलवारी, बंदुका, बाण, ढाली, पिस्तुले वगैरेंचे प्रदर्शन आहे अनेक प्रकारचे चांदीचे व इतर धातूचे हुक्के आणि हस्तिदंतावर कोरीव काम केलेल्या अनेक वस्तू प्रेक्षणीय आहेत.

'रामनगर घड्याळ' ही सर्वांत आकर्षक अशी या प्रदर्शनातील वस्तू अवश्य पाहण्यासारखी आहे सुमारे सव्वा मीटर व्यासाच्या घड्याळात वेळ, वार, तारीख, वर्ष, चंद्रोदय, सूर्योदय, राशी अशा अनेक गोष्टी दाखविण्याची सोय आहे १७८२ मध्ये मूळचंद नावाच्या घड्याळजीने तयार केलेले हे घड्याळ मध्यंतरी बंद पडले होते, पण आता ते दुरुस्त करण्यात आले आहे रामनगरच्या महाराजाच्या दरबार हॉलमध्ये महाराजानी केलेल्या शिकारी, रेसिडेंट व ब्रिटिश अधिकाऱ्याच्या भेटी-गाठी, भेट म्हणून मिळालेल्या वस्तू, पेंढा भरलेले वाघ इत्यादी वस्तू आहेत राज-वाड्याचे काही भाग दरवाजाच्या काचेतून पाहता येतात पण त्यात प्रवेश मिळत नाही तळमजल्यावर महाराजांच्या जुन्या बग्ग्या व गाड्या आहेत रामनगरमध्ये अवश्य भेट देण्यासारखी दुसरी वास्तू म्हणजे भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांचे वडिलार्जित घर या दुमजली घरात शास्त्रीजींचे बालपण गेले आज हे घर काहीसे दुर्लक्षित व दैन्यावस्थेतच आहे रामनगरच्या नागरिकांनी शास्त्री-जींचा एक संगमरवरी पुतळा उभारला आहे पण शास्त्रीजींच्या स्मृतीशी निगडित अशा वस्तूंचे संग्रहालय या घरात करता आले असते, ते मात्र तेथे नाही त्यामुळे घर अगदी ओकेओके वाटते रामनगरची सफर झाली की गंगा नदीच्या पूर्व किनाऱ्याची भेट पूर्ण होते कारण त्यानंतर पुढे मोकळी जागा, वाळवंट व काही शेती व झाडे एवढेच दूरपर्यंत पसरलेले आहे

बनारसचा फेरफटका करताना गंगेच्या पूर्व किनाऱ्यावरील रामनगर पाहिले की, आपल्याला पुन्हा पश्चिम किनाऱ्यावर यावे लागते पश्चिम किनाऱ्यावर नगवा भागात डॉ वासुदेव शरण अग्रवाल, राय कृष्णदास, डॉ. मोतीचंद, बाबू शिवप्रसाद

प्रमुख होते भारत कलाभुवनमध्ये चित्रकला, शिल्पकला, प्राचीन पुस्तके वगैरेचे उत्कृष्ट नमुने आहेत या विभागाची रचना रवींद्रनाथ टागोर याच्या मार्गदर्शनाखाली झाली आहे आचार्य कृपलानी, डॉ दुर्गाबाई देशमुख, श्रीमाळी अशा नामवतानी या विद्यापीठातून शिक्षण घेऊन देशकार्यास वाहून घेतलेले आहे पौर्वात्य व पाश्चात्य परदेशातील शेकडो विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येतात ऑक्सफर्ड केंब्रिज, हॉर्वर्ड अशा जगातील विख्यात विद्यापीठाच्या बरोबरीने आतरराष्ट्रीय क्षेत्रात बनारस हिंदू विद्यापीठाने मान मिळविला आहे या विद्यापीठाच्या जडणघडणीचा इतिहास पाहताना मला पडित मदन मोहन मालवीय आणि ब्रिटिश राज्यकर्ते या दोघाचेही कौतुक वाटते ते अशासाठी की वास्तविक भारतीय स्वातन्त्र्याच्या सग्रामात हे शत्रुपक्ष विद्यापीठाचा पायाभरणी समारभ झाला, तेव्हा तर पहिले महायुद्ध चालू होते आणि काँग्रेस व सरकार याचे वितुष्ट विकोपाला गेले होते पण ज्ञानाच्या व सस्कृतीच्या क्षेत्रात त्यांनी सहकार्य केले पायाभरणी व उद्‌घाटन यासाठी व्हॉईसरॉय आणि प्रिन्स ऑफ वेल्स याना बोलविण्यात पडित मालवीय यानी कमीपणा मानला नाही, आणि ब्रिटिशानीही आपल्याविरुद्ध लढाईसाठी उभ्या असलेल्या काँग्रेसपुरस्कृत विद्यापीठाच्या स्थापनेत अडथळा न आणता उलट सहकार्यच केले. आज तर परिस्थिती सपूर्णपणे पालटली आहे सरकार आणि मत्री आपलेच आहेत उठल्या सुठल्या मत्र्याना विरोध करणाऱ्या आजच्या काही कार्यकर्त्यांना बनारस हिंदू विद्यापीठाच्या स्थापनेपासून काही बोध घेता येईल

या विद्यापीठाच्या आवारात काशीविश्वेश्वराचे भव्य मदिर आहे त्याला नवे विश्वनाथ मदिर म्हणतात बिर्लांनी बांधलेले हे मदिर उत्तर प्रदेशातील इतर मदिराच्या धाटणीचे आहे १९३० मध्ये याच्या बांधकामाला सुरुवात होऊन १९५० मध्ये बाधकाम पूर्ण झाले सगमरवर व लाल दगड यांचा वापर करून बाधलेले हे कलात्मक मदिर सुमारे ७६ मीटर उच व ३८ मीटर रुद आहे काशीतील मूळ विश्वनाथ मदिराप्रमाणे येथेही शिवलिंगाची स्थापना करण्यात आली आहे सभामडप भव्य आहे लक्ष्मीनारायण, गणपती, राम-सीता, श्रीकृष्ण इत्यादी देवदेवताच्या देखण्या मूर्ती सभामडपात आहेत बिर्ला यांनी बांधलेल्या इतर मदिरांप्रमाणे येथेही मदिराभोवती सुदर उद्यान तयार करण्यात आले असून हा परिसर स्वच्छ व प्रसन्न राहील अशी दक्षता घेण्यात आली आहे बनारस हिंदू विश्वविद्यालयासमोर गगा नदीच्या दुसऱ्या तीरावर रामनगर वाडा आहे भारतातील बहुतेक राजे क्षत्रीय, पण बनारसचे राजे ब्राह्मण या ठिकाणी गगा नदीवर जो पूल बाधला आहे तो पक्का नाही नदीत प्रचड आकाराची पिंपे टाकून त्यावर जाड पत्रा टाकला आहे. याच पत्र्यावरून मोटारी, रिक्षा वगैरे वाहने व पादचारी यांची वाहतूक होते पुलाच्या पलीकडे रामनगर गाव आहे गावात गेल्यावर उजव्या हाताला

रामनगरच्या महाराजांचा वाडा आहे प्रवेशद्वार भव्य आहे हत्तीवरील अबारीसह महाराजाना या दरवाजातून जाता यावे एवढी ही कमान उच आहे रामनगरचे राजे चेतसिंह आणि बलवंतसिंह यांच्या कारकीर्दीत हा राजवाडा बांधण्यात आला प्रवेशद्वारातून आत गेल्यावर एक प्रशस्त पटागण लागते त्याच्या डावीकडे वाड्याचा काही भाग लोकाच्यासाठी खुला ठेवण्यात आला आहे त्यासाठी प्रवेश फी आहे वाड्याच्या या भागात लहानसे वस्तुसग्रहालय आहे त्यात प्राचीन मूर्ती आहेत शकर, पार्वती, गणपती, सूर्य, वराह इत्यादी देवतांच्या सुदर मूर्ती येथे पाहावयास मिळतात मेणे व हत्तीवर ठेवायचे हौदे याचे अनेक नमुनेही आहेत. वस्त्रांच्या विभागात उची बनारसी साड्या, राजे-महाराजांचे कलाबतूचे अगरखे, मखमली शिवण्या, खलित्यांच्या पिशव्या वगैरे राजघराण्यातील वस्तू आहेत तसेच शस्त्राच्या विभागात जुन्या तलवारी, बदुका, बाण, ढाली, पिस्तुले वगैरेंचे प्रदर्शन आहे अनेक प्रकारचे चादीचे व इतर धातूचे हुक्के आणि हस्तिदतावर कोरीव काम केलेल्या अनेक वस्तू प्रेक्षणीय आहेत.

‘रामनगर घड्याळ’ ही सर्वांत आकर्षक अशी या प्रदर्शनातील वस्तू अवश्य पाहण्यासारखी आहे सुमारे सव्वा मीटर व्यासाच्या घड्याळात वेळ, वार, तारीख, वर्ष, चद्रोदय, सूर्योदय, राशी अशा अनेक गोष्टी दाखविण्याची सोय आहे १७८२ मध्ये मूळचद नावाच्या घड्याळजीने तयार केलेले हे घड्याळ मध्यतरी बद पडले होते, पण आता ते दुरुस्त करण्यात आले आहे रामनगरच्या महाराजाच्या दरबार हॉलमध्ये महाराजांनी केलेल्या शिकारी, रेसिडेंट व ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या भेटी-गाठी, भेट म्हणून मिळालेल्या वस्तू, पेंढा भरलेले वाघ इत्यादी वस्तू आहेत राज-वाड्याचे काही भाग दरवाजाच्या काचेतून पाहता येतात पण त्यात प्रवेश मिळत नाही तळमजल्यावर महाराजाच्या जुन्या बग्ग्या व गाड्या आहेत रामनगरमध्ये अवश्य भेट देण्यासारखी दुसरी वास्तू म्हणजे भारताचे माजी पतप्रधान लालबहादूर शास्त्री याचे वडिलार्जित घर या दुमजली घरात शास्त्रीजींचे बालपण गेले आज हे घर काहीसे दुर्लक्षित व दैन्यावस्थेतच आहे रामनगरच्या नागरिकानी शास्त्री-जींचा एक सगमरवरी पुतळा उभारला आहे पण शास्त्रीजींच्या स्मृतीशी निगडित अशा वस्तूचे सग्रहालय या घरात करता आले असते, ते मात्र तेथे नाही त्यामुळे घर अगदी ओकेओके वाटते रामनगरची सफर झाली की गगा नदीच्या पूर्व किनाऱ्याची भेट पूर्ण होते कारण त्यानतर पुढे मोकळी जागा, वाळवट व काही शेती व झाडे एवढेच दूरपर्यन्त पसरलेले आहे

बनारसचा फेरफटका करताना गंगेच्या पूर्व किनाऱ्यावरील रामनगर पाहिले की, आपल्याला पुन्हा पश्चिम किनाऱ्यावर यावे लागते पश्चिम किनाऱ्यावर नगवा भागात डॉ वासुदेव शरण अग्रवाल, राय कृष्णदास, डॉ मोतीचद, बाबू शिवप्रसाद

गुप्त अशी ज्ञानाच्या क्षेत्रातील वडी मडळी राहत असत स्वामी कल्याणजी, पं. गगाधर मिश्र व प कातानाथ चौंचडज यांचेही वास्तव्य जवळच होते थोडे पुढे पुष्कर तीर्थ आहे जवळच मुमुक्षू भवन आहे तेथे दडी स्वामींचे निवासस्थान आहे गगा किनारीचे चौसष्ट घाट आपण पूर्वीच पाहिले आहेत. त्यातील तुलसी घाटा-वर सध्या सकटमोचनाचे महत प वीरभद्र मिश्र राहतात त्यांच्याजवळ पं विजयानद मिश्र याचे निवासस्थान आहे हे झाशीच्या राणीचे माहेर सध्या त्याच्याजवळ आनदमयी आश्रम व हॉस्पिटल आहे तेथेच जैन धर्मांचे प्राचीन विद्यालय आहे (पूर्वी हयग्रीव तलाव होता ) तेथे सुप्रसिद्ध ज्योतिषाचार्य हृषिकेश उपाध्याय याचे निवासस्थान आहे हरिश्चद्र घाटाच्या जवळ दक्षिण भारतीय पद्ध-तीचे गोपुर असलेले शिवमदिर आहे, त्याच्याजवळ जगप्रसिद्ध विद्वान पडित क्षेत्रेश चट्टोपाध्याय राहत असत या भागाला आता सोनारपुरा म्हणतात त्याच भागातील जयश्री हॉटेलमध्ये मी राहत होतो सोनारपुऱ्याजवळ मदनपुरा आहे राजा मदन पाल यानी वसविलेल्या या विभागात सध्या बनारसी साड्या तयार करणाऱ्या कुशल विणकराची वस्ती आहे याच भागात जंगमवाडी हा लिंगायतांचा मठही आहे त्याच्या पुढे, विश्वनाथ मदिराच्या दिशेला पूर्वी अगस्त कुड होते अगस्ती ऋषी व त्याच्या पत्नी लोपामुद्रा तेथे राहत असत पण मुस्लिमाच्या स्वाऱ्यात या कुडाच्या जागी मोहल्ला वसविला गेला, असे डॉ सपूर्णानद यांनी लिहिले आहे अगस्ती कुडाच्या जागेच्या पुढे गदौलिया हा बनारसमधील सर्वांत गजबजलेला चौक आहे

एकेकाळी या ठिकाणी गोदावरी तलाव होता गोदावरीचा अपभ्रश होऊन त्या जागेला गदौलिया हे नाव पडले याच चौकातून उजवीकडचा रस्ता विश्वेश्वर मदिर व दशाश्वमेध घाट या बनारसमधील सर्वांत महत्त्वाच्या ठिकाणांकडे जातो विश्वनाथ गल्लीच्या जवळच नीलकठ विभागात ' भारत जीवन प्रेस ' हा विसाव्या शतकातील बनारसचा सर्वांत मोठा छापखाना व प्रकाशन सस्था होती रामकृष्ण वर्मा त्याचे प्रमुख होते या नीलकठ भागात भारतेन्दु युगातील विद्याधर गौड, विश्वनाथ प्रसाद मिश्र, रुदरजी असे अनेक विद्वान राहत असत ललिता घाटाजवळच्या कूटा गणेश महालमध्ये सुप्रसिद्ध कादबरीकार बाबू देवकीनदन खत्री राहत असत इथून जवळच कचौडी गल्ली आणि कुजगल्ली आहेत या कुजगल्लीत उत्कृष्ट बनारसी साड्याची दुकाने आहेत शेकडो वर्षांपूर्वी येथे स्मशान होते म्हणून येथे जो गणपती आहे, त्याचे नाव स्मशान विनायक असे आहे कुजगल्लीच्या डाव्या बाजूला जी ठठेरीगल्ली आहे हिचे हिंदी साहित्यात अनन्यसाधारण महत्त्व आहे कारण याच गल्लीत आधुनिक हिंदीचे महान साहित्यकार भारतेंदु हरिश्चद्र यांचे घर आहे या भागात सध्या पितळेच्या भांड्यांची व बनारसी साड्याची दुकाने आहेत

या गल्लीच्या पुढे काही अतरावर हनुमान मदिर आहे, ते संत तुलसीदासांनी

स्थापन केले आहे जवळच चिडिया बाजार हा पक्ष्याचा बाजार आहे. त्यापुढील भागाला मैदागिन म्हणतात प्राचीन काळी येथे मदाकिनी तीर्थ होते मैदागिन हा मदाकिनीचा अपभ्रश आहे जवळच्या मैदानावर जाहीर सभा होतात या मैदानाला टाऊन हॉल म्हणतात त्याच्या पुढे नागरी प्रचारिणी सभा व विश्वेश्वगज आहे. डाव्या हाताला कालभैरव मदिर आहे, तेथे महाप्रभू चैतन्य राहिले होते जवळच कुतुबशहा हा पक्ष्याचा दुसरा व मोठा बाजार आहे त्याच्या पुढील मच्छोदरी पार्क या तलावातून पूर्वी एक नदी झिरपत असे, असे सागतात सध्या फक्त लहानसा तलाव आहे

बनारस हे हिंदूचे सर्वश्रेष्ठ धर्मस्थान तर आहेच, पण ज्ञान, सगीत साहित्य, सस्कृत भाषा इत्यादी क्षेत्रांतही बनारसच्या परपरा श्रेष्ठ आहेत त्यामुळे धर्मस्थळां-बरोबरच या शहरात विद्वान पडित, साहित्यिक वगैरेंची निवासस्थाने जागोजाग आढळतात काशीची विद्वत्तेची हजारो वर्षांची परपरा थेट मनूपासून सुरू झाली असल्याने काशीचे विद्वान कोणाही राजामहाराजाचा मुलाहिजा ठेवीत नाहीत ते फक्त ज्ञानालाच मानतात कारण भारतात राजे होण्यापूर्वी मनू होता काशीचा राजा दिवोदास हा मनूचा वशज तो महातपस्वी आणि ज्ञानी होता काशी माहात्म्यात म्हटले आहे, की दिवोदासांच्या उग्र तपाची भीती वाटून इद्राने अग्नी, वायू आणि पाऊस बद केले. पण राजा दिवोदासाने आपल्या तपोबलाने हे तिन्ही निसर्गचमत्कार निर्माण केले राजा दिवोदास महान त्यागी होता त्याने आपले राजवस्त्र आपल्या पुत्राला दिले काशीमध्ये दिवोदासेश्वर मदिर बाधून शिवलिंग स्थापन केले आणि तो निर्वाणाप्रत गेला हे शिवलिंग आणि त्यावर बाधलेले दिवोदासेश्वर मदिर अजूनही काशीत आहे ते धर्मकूपाजवळ आहे त्याच्याजवळ इतरही अनेक लहान मदिरे नतर बांधण्यात आली आहेत.

सस्कृत भाषा व विद्या यांची काशीतील परपरा निदान अडीच हजार वर्षांची आहे त्याकाळी ऋषी मुनी आश्रमात आपल्या शिष्यांना शिकवीत असत काशीचे राजे सस्कृत पडितांचा फार मोठा मान ठेवीत असत काशीविश्वेश्वराप्रमाणेच काशीचे नरेश जेथे जातील, तेथील लोक उभे राहून 'हर हर महादेव' अशा घोषणांनी नरेशांचे स्वागत करीत असत हा मान फक्त काशीविश्वेश्वर आणि काशी नरेश यानाच असे, कारण राजा हा देवाचा अश मानला जाई पण काशीत महामहोपाध्याय पडित शिवकुमार शास्त्री हे एवढे प्रकाड पंडित होते की, काशी नरेशानी त्यानाही 'हर हर महादेव' या घोषणेने स्वागत करण्याचा मान दिला. (मराठ्याचे आणि काशीचे घनिष्ठ सबध आले, तेव्हा मराठ्यांनी निकराच्या युद्धात हीच 'हर हर महादेव'ची घोषणा करण्यास सुरवात केली) एकदा जम्मूच्या महाराजानी काशीमध्ये विद्वज्जनाची सभा आयोजित केली. या सभेसाठी पडित

शिवकुमार शास्त्री हे पालखींतून आले ते पाहून जम्मूचे नरेश कुचेष्टेने म्हणाले, " अहो, मी इथे येतो तोही पायी येतो आणि आपल्याला पालखी लागते ?" त्यावर शास्त्रीजी म्हणाले, " होय, तुम्ही नुसते राजे आहात, मी महाराजा आहे " असे म्हणून शास्त्रीजींनी पालखीतून न उतरताच पालखी परत नेण्याचा हुकूम केला त्याबरोबर विद्वत्सभेतील सारे पंडित उठून जाऊ लागले जम्मूचे नरेश थक्क झाले त्यांनी पंडितांना हात जोडून थांबण्याची विनती केली तेव्हा पंडितांच्या वतीने एकाने सांगितले, " विद्वानांचे सम्राट गेल्यानंतर आम्ही कशाला थांबू ?" मग जम्मूच्या नरेशानी काशीच्या राजाला विनती केली, " आपणच आता महामहोपाध्याय शास्त्रीजींना आणू शकाल " काशीचे राजे म्हणाले, " ती माझी ताकद नाही इथे विद्वानाचे राज्य आहे." त्यावर जम्मूचे नरेश सुवर्णमुद्रांनी भरलेले ताट व शाल घेऊन महामहोपाध्यायाच्याकडे गेले व आपण चुकलो, त्याची क्षमा करावी, अशी विनती केली त्यावर महामहोपाध्याय म्हणाले, " माझा जसा सत्कार केलात तसाच सुवर्णमुद्रा व शाल देऊन विद्वत्सभेतील प्रत्येक पंडिताचा सत्कार करून त्यांची क्षमा मागाल तरच मी परत येईन " जम्मूच्या नरेशानी ती आज्ञा मानली आणि मगच विद्वत्सभा सुरू झाली

पंडित देवीप्रसाद शुक्ल चक्रवर्ती नावाचे एक विद्वान काशीत होते त्यांना रस्त्यात एका अशिक्षिताने क्षुल्लक कारणावरून अनंत शिव्या दिल्या प चक्रवर्तींनी त्या सर्व शिव्या शांतपणे ऐकून घेतल्या ते एकपाठी होते त्यानंतर तीन दिवस ते त्यांतील प्रत्येक शिवीचा शास्त्रार्थ व निश्चित अर्थ शोधीत होते ! १९७१ मध्ये गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्ज यांनी बनारसमध्ये संस्कृत विद्यापीठ स्थापन करण्याच्या सूचनेवर शिक्कामोर्तब केले पण त्याचे नाव मात्र ' क्वीन्स कॉलेज ' असे ठेवण्यात आले या कॉलेजचे प्राचार्य डॉ व्हेनिस हे ब्रिटिश होते व अत्यंत कडक शिस्तीचे होते ते स्वत संस्कृत पंडित होते कॉलेजच्या प्राध्यापक पंडितानी वेळेवर यावे म्हणून ते हजेरी पत्रकावर त्याची येण्याची वेळ व सही नोंदण्याची सक्ती करीत. पण कोणीही प्राध्यापक वेळेवर येत नसे कारण प्रत्येकजण पहाटे उठून गंगास्नान, विश्वेश्वराची पूजा-अर्चा, प्रार्थना केल्यावरच कॉलेजला येत असे एकदा एक पंडित प्राध्यापक पहाटे पाच वाजता कॉलेजमध्ये आले, त्यानी हाताच्या पंजावर शाई माखली आणि सहीच्या जागी पंजा उठवला तो पंजा पाहून प्राचार्य रागावले त्यांनी त्या प्राध्यापकांना स्पष्टीकरण विचारले, तेव्हा ते म्हणाले, " आम्ही उशिरा कॉलेजला येतो याचा अर्थ लवकर उठत नाही असे नव्हे आम्ही पहाटे पाचला उठलेले असतो हे तुमच्या निदर्शनास आणण्यासाठी मी तो शिक्का मारला. पण आम्ही ब्रिटिशासारखे पाखंडी नाही आम्हाला स्नान-संध्या, पूजा–अर्चा यासाठी वेळ लागतो " हे ऐकल्यावर प्राचार्यांनी कॉलेजच्या वेळेमध्ये योग्य

असा बदल केला

प्रातःस्मरणीय प. गंगाधरशास्त्री हे काशीचे ख्यातनाम विद्वान. ते एकदा बाहेर गेले असता त्यांच्या घरी एक अपरिचित गृहस्थ आले. त्या घरातील परंपरे-प्रमाणे शिष्यांनी अतिथींचे पाय धुतले व त्यांना आसनावर बसविले. प. गंगाधर-शास्त्री बाहेरून आले. आपल्या घरी अनोखे अतिथी आलेले पाहून त्यांना वंदन करू लागले. पण आलेल्या पाहुण्याने त्यांना थोपवून सांगितले, "महाराज, आपल्या-सारख्या श्रेष्ठ पंडितांचे वंदन स्वीकारण्याची माझी पात्रता नाही. मी आपल्या वडिलांच्याबरोबर अध्ययन करीत होतो. पण घरगुती कारणाने माझ्या अध्ययनात बराच खंड पडला. आता मी आपला शिष्य होण्याच्या आकांक्षेने येथे आलो आहे."

त्यावर पंडित गंगाधरशास्त्री म्हणाले, "आपण आमच्या जन्मदात्यांचे सहा-ध्यायी म्हणजे मला पित्यासमान आहात. माझ्या घरात पहिले तीन दिवस आपण माझे अतिथी म्हणून राहा. हे तीन दिवस मी आपल्याला वंदन करीन. त्यानंतर आपण माझे शिष्य व्हा. मग मात्र आपण मला वंदन करायचे आहे. म्हणून आता माझ्या प्रणामाचा स्वीकार करून मला आशीर्वाद द्या." वयाचा आणि विद्वत्तेचा असा परस्परांनी आदर केला.

लॉर्ड कर्झन यांच्या कारकीर्दीत क्वीन्स कॉलेजची आर्थिक स्थिती ढासळली होती. म्हणून कॉलेजच्या प्राचार्यांनी भारत सरकारकडे अनुदान मागितले आणि व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन यांनी काशीला भेट द्यावी अशी विनंती केली. लॉर्ड कर्झन या विनंतीला मान देऊन आले व त्यांनी प्राचार्यांना विचारले, "काशीमध्ये दर्शन-शास्त्राचे विश्वविख्यात पंडित गंगाधर शास्त्री आहेत असे ऐकले. त्यांना भेटण्याची माझी इच्छा आहे." त्यावर ब्रिटिश प्राचार्य म्हणाले, "मी त्यांना भेटीला सहजच आणीन. व्हाइसरॉयला भेटण्याचा मान कोणाला नको आहे?" लॉर्ड कर्झन यांची कॉलेजला भेट ठरली. त्या भेटीपूर्वी अर्धा तास प्राचार्य महाशय गंगाधरशास्त्रींकडे गेले. त्यावेळी शास्त्रीजी धोतर नेसून, उघड्या अंगाने पोथी वाचीत बसले होते. प्राचार्य म्हणाले, "अहो शास्त्रीजी, मी तुमची आणि गव्हर्नर जनरलची भेट घड-वितो. पण तुम्ही असे उघड्या अंगाने येणे हे शिष्टाचाराला संमत नाही. आपण अंगरखा घाला, उपरणे घ्या व डोकीवर पागोटे घाला." शास्त्रीजी म्हणाले, "गव्हर्नर जनरल आपल्या संस्थेत येत आहेत ही चांगली गोष्ट आहे. पण त्यांना भेटण्यासाठी मी माझे वाचन सोडून कपडे करून येणार नाही." प्राचार्य परत गेले. लॉर्ड कर्झन यांनी समारंभाच्या वेळी प. गंगाधरशास्त्रींची चौकशी केली, पण ते यायला तयार नाहीत असे त्यांना सांगण्यात आले. त्यावर लॉर्ड कर्झन म्हणाले, "काही हरकत नाही. कार्यक्रम संपल्यावर मी त्यांच्या घरी जाईन. मी काशीला आलो, तो त्यांचे दर्शन घेण्यासाठी. कॉलेजची मदत काय, मी टपालाने पाठवू

शकलो असतो."

कॉलेजमधील कार्यक्रम सपल्यावर लॉर्ड कर्झन हे प्राचार्यांच्या समवेत गगाधर शास्त्रींच्या लहानशा घरी गेले त्यांचे तेज पुज शरीर व पवित्र वातावरण पाहून कर्झन अतिशय प्रभावित झाले पायातील बूट काढून ते गगाधर शास्त्रींच्या जवळ गेले व त्याना प्रणाम केला शास्त्रींनीही त्याना आशीर्वाद दिला आणि उठून लॉर्ड कर्झन यांचे स्वागत केले आपण न येण्याचे कारण सागताना ते म्हणाले, " माझ्या पठणाच्या आणि उपासनेच्या वेळी मी कोणाला भेटायला जात नाही आपण माझ्या घरी येऊन माझा सन्मान केलात, त्याबद्दल धन्यवाद " लॉर्ड कर्झन दिल्लीला गेले व त्यांनी क्वीन्स कॉलेजला मोठी देणगी दिलीच पण प गगाधरशास्त्रींना सी आय ई हा किताबही दिला अर्थात शास्त्रीजींना त्याचा खेदही झाला नाही आणि आनदही झाला नाही

प मधुसूदन सप्ततीर्थ नावाचे गाढे सस्कृत पडित काशीत होते त्याची कीर्ती ऐकून ऑक्सफर्ड विद्यापीठाने त्यांना व्हिजीटिंग प्रोफेसर म्हणून निमत्रित केले प सप्ततीर्थ हे स्वत चे अन्न स्वत शिजवून खात असत ते बोटीने इग्लडला निघाले त्यांनी आपल्या केबिनमध्ये स्टोव्ह ठेवला होता ते त्यावर आपले साधे जेवण तयार करीत ते दिवसातून एकच वेळ, दुपारी तीन वाजता अन्नग्रहण करीत. पण बोटीच्या नियमाप्रमाणे केबिनमध्ये स्टोव्ह पेटवण्यास बदी होती प मधुसूदन सप्ततीर्थ हे इतराच्याप्रमाणे बोटीवरचे जेवण न घेता स्वत च स्टोव्हवर स्वयपाक करतात अशी तक्रार कॅप्टनकडे गेली कॅप्टन भयंकर सतापला त्याने पडितजींना धमकी दिली, " हे ताबडतोब बद करा नाहीतर मी तुम्हाला उचलून समुद्रात फेकून देईन " तोपर्यंत बोट एडनपर्यंत आली होती प सप्ततीर्थ शातपणे म्हणाले, " अरे बाबा, दुसऱ्याच्या हातचे अन्नग्रहण करायचे नाही असे माझे व्रत आहे आपले व्रत मोडून ऑक्सफर्डला जाण्याची मला अजिबात हौस नाही मला एडनला उतरव मी परत जाईन " त्याप्रमाणे त्यांना बोटीतून उतरविण्यात आले प सप्ततीर्थ तिथून काशीला परत आले

आजही सस्कृत भाषा, वेदात, पौर्वात्य शास्त्रे, इत्यादी क्षेत्रांतील शिक्षण-सस्था काशीत जेवढ्या आहेत, तेवढ्या अन्यत्र कोठेही नाहीत क्वीन्स कॉलेज या ब्रिटिशकालातील सस्थेचे नामातर स्वातत्र्यानतर 'सस्कृत कॉलेज' असे करण्यात आले डॉ सपूर्णानद यांनी अत्यत मोठे परिश्रम करून या कॉलेजचे रूपातर १९५८ मध्ये सस्कृत विश्वविद्यालयात केले घोषाल महाराजानी स्थापन केलेले जयनारायण कॉलेज ही उत्तर भारतातील सर्वांत जुनी शिक्षणसस्था आहे १८५४ मध्ये या शाळेचे कॉलेजमध्ये रूपांतर झाले श्रेष्ठ कवी सुमित्रानदन पत, राष्ट्ररत्न शिवप्रसाद गुप्त असे ज्येष्ठ तज्ञ या कॉलेजच्या अध्यापक वर्गात होते. बनारस हिंदू विद्या-

पीठाची माहिती पूर्वी आलीच आहे. बाबू शिवप्रसाद गुप्त यांनी १९२१ मध्ये काशी विद्यापीठाची स्थापना केली संस्कृत भाषा, साहित्य आणि संस्कृतमधील शास्त्रे यांचे शिक्षण देणाऱ्या ज्या अनेक संस्था आजही काशीमध्ये कार्य करीत आहे. त्यांत कान्यकुब्ज विद्यालय, संन्यासी संस्कृत विद्यालय, सामवेद विद्यालय, नित्यानंद वेद विद्यालय, शास्त्रार्थ महाविद्यालय, विश्वनाथ गुरुकुल संस्कृत विद्यालय, कबीर मंडल संस्कृत विद्यालय, उदासीन संस्कृत विद्यालय, व अग्रवाल संस्कृत विद्यालय, हरदेवदास गोएंका संस्कृत विद्यालय, नित्यानंद विद्यालय, रामानंद संस्कृत विद्यालय, दयालू संस्कृत विद्यालय इत्यादी पन्नास-हून अधिक शिक्षणसंस्था आहेत १८६६ मध्ये भारतेंदू हरिश्चंद्र यांनी स्थापन केलेले महाविद्यालय आता हरिश्चंद्र कॉलेज या नावाने चालू आहे त्याशिवाय काशीतील हिंदू कॉलेज आणि सारनाथ येथील बौद्ध विद्यालय या संस्थांतून संस्कृत भाषा आणि पौर्वात्य विद्या यांचे शिक्षण देण्यात येते त्याशिवाय सनातन धर्म विद्यालय, दुर्गाचरण कॉलेज, बिपिन बिहारी कॉलेज, रामकृष्ण विद्यामंदिर, आर्य महिला विद्यालय अशा काशीच्या अनेक संस्था शिक्षण क्षेत्रात विख्यात आहेत. थिऑसॉफिकल सोसायटी ऑफ इंडिया या संस्थेनेही काशीत एक कॉलेज व अनेक विद्यालये चालविली आहेत जे कृष्णमूर्ती यांनी काशीत 'नवशिक्षा धार' नावाची शिक्षणसंस्था स्थापन केली अॅनी बेझंट थिऑसॉफिकल स्कूल आणि बसंत कन्या महाविद्यालय ही काशीची भूषणे आहेत. बनारसच्या महाराजांनी पूर्वी 'काशीत विद्वानांचे राज्य आहे' असे म्हटले होते, ते तसेच टिकविण्याचे कार्य काशीतली संस्कृत शिक्षणसंस्था करीत आहेत

अनेक विद्वान, पंडित, धर्मसंस्थापक यांना काशीचे नेहमीच आकर्षण वाटत राहिले आहे भगवान बुद्धांनी पहिले प्रवचन दिले ते काशीच्या सारनाथ भागात ज्यांच्याकडून आत्मबोध करून घेण्यासाठी ज्ञानेश्वरांनी 'चांगदेव पासष्ठी' लिहिली, त्या चांगदेवांनी काशीत अध्ययन करून विद्यासाधना केली होती वैष्णव संत रामानंद हे चौदाव्या शतकात काशीत राहात होते संत कबीर व रायदास हे त्यांचे शिष्य होते शुद्ध व अद्वैत पंथाचे संस्थापक वल्लभाचार्य पंधराव्या शतकात येथे वास्तव्य करीत होते, तेव्हा त्यांनी गोपाल मंदिराचीही स्थापना केली सध्या जेथे कामछा विभागात गुरुद्वार आहे, तेथे गुरुनानक यांचे वास्तव्य होते अकाली पंथाचे संस्थापक गुरू गोविंदसिंग यांचेही काशीत वास्तव्य होते ते आशभैरव भागात राहत असत बंगालचे चैतन्य महाप्रभू यांनी कृष्ण पंथाचा प्रचार काशीतूनच केला चैतन्य महाप्रभू ह विश्वेश्वर गंजमध्ये राहात असत आणि त्यांनी मंडन मिश्र यांच्याबरोबर वेदांतावर चर्चा केली बंगालचे थोर सामाजिक नेते राजा राममोहन रॉय यांचे शिक्षण काशीमध्ये झाले आहे आर्य समाजाचे संस्थापक स्वामी दयानंद

सरस्वती यांनी काशीतील पंडितांबरोबर शास्त्रार्थाचे विवेचन केले आहे. स्वामी रामानंद तीर्थ आणि स्वामी विवेकानंद यानीही काशी या पुण्यनगरीस भेटी देऊन ज्ञानसाधना केली आहे. दलाई लामा यांनी काशीमध्ये तिबेटी संस्कृतीच्या अभ्यासाचे केंद्र सुरू केले आहे. पतंजलींनी योगसूत्र तत्त्वज्ञानाची रचना काशीतच केली. आद्य शंकराचार्यांनी 'महाभाष्य' लिहून वेदांतावरील विश्लेषण याच ज्ञाननगरीत केले. तुलसीदास व पंडितराज जगन्नाथ यांच्या मुख्य रचना इथल्याच. जगाच्या इतिहासात संस्कृती आणि ज्ञान यांच्या विकासात काशीची तुलना दोनच शहरांशी होऊ शकेल— एक रोम आणि दुसरे अथेन्स. या तिन्ही शहरांना भेटी देण्याचे भाग्य मला लाभले आहे.

या ज्ञानसाधनेत महाराष्ट्राचाही मोठा वाटा आहे. सन १५०० च्या सुमारास महाराष्ट्रातील भट्ट घराणे काशीत स्थायिक झाले. या घराण्यातील भट्ट नारायण यांनी आपल्या विद्वत्तेने काशीतील पंडितांना एवढे प्रभावित केले की पंडितांनी त्यांना 'जगत्गुरु' ही पदवी आणि विद्वत्सभेतील अग्रमान दिला. याच भट्ट नारायण यांनी राजा तोरडमल्ल यांच्याकडून देणगी घेऊन १५८० च्या सुमारास विश्वनाथ मंदिर बांधले. प्रयोगरत्न, त्रिस्थली हेतू हे ग्रंथ नारायण भट्ट यांनी लिहिले तर त्यांचे चिरंजीव शंकर भट्ट यांनी द्वैत निर्णय, व्रतमयुख इत्यादी ग्रंथांचे लेखन केले. नीलकंठ भट्ट हे नारायण भट्ट यांचे नातू. त्यांनी 'व्यवहारमयूख' व इतर धर्मग्रंथ लिहिले. 'धर्मसिंधू'चे लेखक कमलाकर भट्ट हे त्यांचे चुलत भाऊ. छत्रपती शिवाजी महाराजांचे क्षत्रियत्व सिद्ध करून त्यांना राज्याभिषेक करणारे गागा भट्ट हे नारायण भट्ट यांचे नातू. शेष विष्णू, शेष कृष्ण, चिंतामणी वगैरे शेष घराण्यातील पंडित महाराष्ट्रीय होते. महादेव शेष यांनी दिल्लीच्या बादशहाचे चिरंजीव दाराशुकोह याला संस्कृतचे शिक्षण दिले होते. दीक्षित, काळे, पायगुडे, पुणतांबेकर इत्यादी काशीतील मराठी घराण्यांनी विद्वत्तेच्या क्षेत्रात महान कार्य करून अनेक ग्रंथांचे लेखन केले आणि उज्ज्वल शिष्यपरंपरा निर्माण केली.

# वेगळी मंदिरे, संगीत आणि नृत्य

आपल्याकडे अशी एक म्हण आहे की, 'नऊ खंड पृथ्वी, दहावा खंड काशी' अर्थात काशी अथवा बनारस हे आकाराने खंडप्राय नाही, पण त्याचे महत्त्व व त्यातील विविधता एखाद्या स्वतंत्र खंडाप्रमाणे आहे एवढाच त्याचा वाच्यार्थ घ्यायचा. तसे पाहिले, तर मराठीत काशीवरून अनेक म्हणी आहेत. उदाहरणार्थ, 'काशीस गंगा नेणे' म्हणजे जेथे जे आधीच भरपूर आहे, तेथे ते नेणे. इंग्रजीत 'कॅरिइंग कोल्स टू न्यू कॅसल' म्हणतात तसे. 'काशीरामेश्वर केले, नाही फळा आले' म्हणजे तीर्थयात्रा करूनही मनाला खरी विरक्ती आली नाही, तर त्या यात्रा वाया गेल्या समजावे. 'काशी लुटून वाराणशीला अन्नछत्र घालणे' म्हणजे एकाला लुबाडून दुसऱ्यावर उपकार करणे. 'काशीत मल्हारी माहात्म्य' म्हणजे काशीला जाऊन विश्वेश्वराचे माहात्म्य सांगण्याऐवजी मल्हारीचे गुणवर्णन करणे, अप्रस्तुत किंवा अनाठाई बोलणे. 'काशीस गेल्याचे आपण सांगतो, पण मांजर मारल्याचे सांगत नाही' याचा अर्थ माणूस आपण केलेल्या सत्कृत्याची प्रौढी मिरवतो पण स्वतःच्या दुष्टकृत्याविषयी बोलत नाही. 'काशीला गेला काशीदास, मथुरेला गेला मथुरादास' म्हणजे वारा वाहील तिकडे पाठ फिरविणारा संधिसाधू. 'काशीत पैशाला घोडा' याचा अर्थ लंकेत सोन्याच्या विटा सारखाच आहे. 'काशी रामेश्वर केले, ते नाही फळा आले' याचा अर्थ मनावर योग्य संस्कार झाले नाहीत, तर धर्मक्षेत्राच्या यात्रा करण्यासारख्या बाह्य उपायांनी काहीही फायदा होत नाही. काशीचे पंडे लबाड असतात, पण नाशिकचे भटजी अधिक लबाड असतात असे दर्शविणारी 'शंभर काशीकर, एक नाशिककर' ही म्हण प्रचलित आहे. 'काशीस जावे नित्य वदावे' असा निदिध्यास मुमुक्षूंनी धरावा' या वाक्यात आगरकरांनी वापरलेली एक म्हण म्हणजे कोणतीही चांगली गोष्ट कर-

ण्याचे माणसाने नेहमी बोलावे म्हणजे ती हातून कधीतरी घडते अशा अर्थाने उल्लेखिली आहे मराठी भाषा व संस्कृती यांत काशी किती खोलवर रुजली आहे हे यावरून लक्षात येते

काशीविश्वेश्वर किंवा ज्ञानवापी, दशाश्वमेध घाट ही बनारसमधील ख्यातनाम ठिकाणे आहेत ती सर्वश्रुतच आहेत पण याच अशा पारंपरिक मंदिरांच्यापेक्षा अगदी वेगळी अशी काही मंदिरे बनारसमध्ये आहेत. शहराच्या पश्चिम सीमेवरील ' पिशाच्चमोचन ' मंदिर यापैकीच एक आहे या मंदिरात संपूर्ण मूर्ती नसून फक्त मुंडके आहे या मंदिराची कथा अशी आहे की, शंकराने आपल्या प्रिय नगरीच्या रक्षणार्थ सर्व सीमेवर भैरव हे रक्षक ठेवले होते एकदा एका पिशाच्चाने चोरून काशीत प्रवेश करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा भैरवाने त्याचे डोके उडवले त्याच डोक्याची पूजा या मंदिरात होते ज्या त्रिशूळाने त्याचे शिर उडवले, तो त्रिशूळ त्याच्या डोक्यात घुसवला या ठिकाणी लहानसे तळे आहे पितृ पक्षात या ठिकाणी हजारो भाविक येऊन पूर्वजांचे श्राद्ध करतात ज्यांचे नातेवाईक अपघातात किंवा अकाली निधन पावल्यामुळे त्यांच्या आत्म्यांना मुक्ती मिळाली नाही, त्यांना पिशाच्च योनीतून बाहेर काढून मुक्ती देण्यासाठी भाविक यात्रेकरू या ठिकाणी श्राद्ध व इतर धार्मिक विधी करतात ब्रह्म नाल्यावर एक सतीचे देऊळ आहे हे अतिशय लहान असल्याने सहजासहजी लक्षात येत नाही तीन फूट उंच व दीड फूट रुंद अशा खोबणीत एका दगडी कमानीत पती पत्नीच्या दगडी मूर्ती आहेत. याच जागेवर शंभर वर्षांपूर्वी एक विधवा आपल्या पतीच्या चितेवर सती गेली होती तिच्या स्मरणार्थ हे सतीमंदिर बांधण्यात आले आहे अनेक भाविक आज या मूर्ती शंकरपार्वतीच्या आहेत असे समजून त्यांची पूजाअर्चा करतात पण वराच्या पोशाखात नटलेला शंकर कोठेही आढळत नाही, त्यावरून ही शंकरपार्वती नसून मृत पती-पत्नी आहेत हे सिद्ध होते

भारतात अनेक ठिकाणी नागांची पूजा होते पण काशीत त्याचे खास वैशिष्ट्य आहे कारण नागाला शंकराच्या गळ्याभोवती स्थान मिळाले आहे बनारसच्या उत्तर भागात नाग कुवा नावाचे कुंड आहे पुराण ग्रंथात त्याचा उल्लेख करकोटक वापी असाही करण्यात आला आहे या ठिकाणी जे नागमंदिर आहे तेथे नागपंचमीस मोठी जत्रा भरते या कुंडाचे महत्त्व असे, की विश्वविख्यात पातंजली या संस्कृत वैय्याकरणींचे निवासस्थान दोन हजार वर्षांपूर्वी याच कुंडाजवळ होते. नागपंचमीच्या या कुंडाजवळ असलेल्या मोठ्या वटवृक्षाखाली काशीतील विद्वानांची पातंजली शास्त्रींच्याविषयी प्रवचने होतात विष्णू ज्या शेषावर वास्तव्य करीत त्याच शेषानी पृथ्वीलोकात पातंजलीच्या रूपाने जन्म घेतला होता, असा उल्लेख

'काशीखंड'मध्ये आहे. ललिता घाटावर गोएंका संस्कृत विद्यालयाजवळचे नेपाळी मंदिर हे बनारसमधील इतर सर्व मंदिरांपेक्षा वेगळे. एक तर हे लाकडी आहे. हे लाकूड नेपाळहून आणण्यात आले आहे. नेपाळमधील पशुपतिनाथ मंदिराच्या धर्तीवर, पॅगोडायुक्त असे हे मंदिर आपल्या वेगळ्या वैशिष्ट्याने घाटावरील शेकडो मंदिरात उठून दिसते. लाकडावर अत्यंत बारीक व सुंदर नक्षी काढण्यात आली आहे. हे पशुपतिनाथाचे मंदिर आहे. बनारस स्टेशनजवळचे भारत माता मंदिरही अगदी वेगळ्या प्रकारचे आहे. काशीचे दानशूर बाबू शिवप्रसाद गुप्त हे जपानला गेले असता त्यांनी टोकियोमध्ये देशमाता मंदिर पाहिले. त्यावरून त्यांना या भारत माता मंदिराची कल्पना सुचली.

कोतवालपुरी भागात कालभैरवाचे मंदिर आहे. भैरव हे काशीचे रक्षक असून कालभैरव हा त्यांचा प्रमुख कोतवाल आहे. म्हणून या भागाला कोतवालपुरी हे नाव पडले. ब्रह्मदेवाने शिवाची निंदा केली, म्हणून संतापलेल्या शिवाने आपल्या रागातून कालभैरवाची निर्मिती केली. कालभैरवाने ब्रह्मदेवाचे पाचवे शिर तोडले, पण ते कालभैरवाच्या हाताला चिकटले. ते जावे म्हणून कालभैरवाने कपाल व्रत घेतले आणि कवटीच्या कमंडलूतून भिक्षा मागून अन्नसेवन केले. कालभैरव जेव्हा काशीच्या हद्दीत आला, तेव्हाच त्याच्या हाताला चिकटलेली ब्रह्मदेवाची कवटी गळून पडली. ते पाहून शिवाने आनंदाने नृत्य केले, अशी या कालभैरवाची कथा आहे. कालभैरव हा मृत्यूचा देव आहे. ब्रह्महत्या करणाऱ्याने कालभैरवाप्रमाणे कवटीतून भिक्षा मागून प्रायश्चित्त घ्यावे असे 'याज्ञवल्क्य स्मृती'मध्ये (इ. स. १००) म्हटले आहे. कालभैरवाने काशीत आल्यावर ज्या कुंडात प्रथम स्नान केले, त्याला कपालमोचन कुंड म्हणतात. कालभैरव हा मृत्यूच्या भीतीपासून मुक्ती देतो, असे धर्मग्रंथात म्हटले आहे. काशीत कालभैरवाला भैरोनाथ म्हणतात. त्याचे देवालय चौखंबी गल्लीजवळ आहे. कुत्रा हे कालभैरवाचे वाहन असल्याने श्वानारूढ कालभैरवाची मूर्ती या मंदिरात आहे. दंडपाणी नावाचे आणखी एक कालभैरवाचे मंदिर काशीत आहे. ते मुख्य मंदिराजवळच आहे. कालभैरवाच्या हातात दंड आहे, त्यावरून हे नाव पडले आहे. देवांनासुद्धा काशीत वास्तव्य करण्यासाठी दंडपाणीची मान्यता लागते, असा उल्लेख काशीखंडात आहे. बनारसमध्ये दोन मंदिरे अशी आहेत की त्यांच्या बँका आहेत. राम रमापती बँक व शिव बँक अशी त्यांची नावे आहेत. या मंदिरात टाकलेली रक्कम या बँकेच्या नावे रोखीत जमा होते. या बँकांकडून गरजूंना कर्जवाटप होते व इतर बँकांप्रमाणेच त्यांचेही व्यवहार होतात. काही मंदिरे तेथे मिळणाऱ्या खाद्यपदार्थांमुळे विशेष प्रसिद्ध आहेत. संकटमोचन मंदिराजवळील बेसन लाडू आणि गोपाल मंदिराजवळील रोठ नावाची मिठाई बनारसमध्ये खास मशहूर आहेत.

काशीविश्वेश्वर मदिराच्या आवारातील विष्णूला बनारसच्या इतिहासात फार महत्त्व आहे शिव आणि शक्ती यांनी प्रथम काशी निर्माण केली आणि इतर विश्वाची निर्मिती करण्याची विष्णूला आज्ञा केली विष्णूने विश्वाची निर्मिती केल्यावर शिव प्रसन्न झाले व त्यानी त्याला वर मागण्यास सागितले, " मला तुमच्या चरणाजवळ जागा द्यावी हाच वर द्या " असे विष्णूने सांगितल्यावरून काशीविश्वेश्वराजवळ त्याची स्थापना केली 'माझे दर्शन ज्यांना घ्यायचे असेल त्यांनी प्रथम विष्णूचे दर्शन घ्यावे' असे शिवाने सांगितले काशीला निधन पावल्यास मुक्ती मिळावी ही व्यवस्था विष्णूनेच केल्याचे काशी खडात म्हटले आहे. त्यामुळे अर्थातच विष्णूला या शहरात अतिशय महत्त्व आहे विष्णूने ज्या ठिकाणी काशीत पहिले पाऊल ठेवले, तेथेही आदि केशव हे विष्णूचे मदिर आहे ज्या ठिकाणी गगा-वारणा नदीच्या सगमावर स्नान केले, त्याला 'पादोदक' विष्णूच्या पदस्पर्शाने पवित्र झालेले जल असे नाव आहे उत्तर बनारसमध्ये बाकरिया कुंड भागातही विष्णूचे व कृष्णाचे मदिर होते पण मुस्लिमानी ती उद्ध्वस्त करून तेथे मशीद व कबरस्तान बाधले त्या ठिकाणी सापडलेली गोवर्धनधारी कृष्णाची मूर्ती आता कला भवनमध्ये (बनारस हिंदू विश्वविद्यालय) आहे

दशाश्वमेध घाटावर सर्वांत उच मदिर आहे ते शितळा देवीचे या मदिरातील मूर्ती मात्र लहान आहे तीन डोळे व चार हात असलेली ही शितळा गाढवावर आरूढ झालेली आहे गाढव वाहन असलेली देवता अगदी क्वचित आढळते या देवीचे महत्त्व ओळखून तिच्या मूर्तीजवळ पड्ये व पुजारी यानी अनेक शिवलिंगाची स्थापना केली आहे

विशालाक्षी देवीची कथा अद्‌भुत आहे. शिवाची पत्नी सती हिचे निधन झाले, तेव्हा तिचे पार्थिव शरीर हातात घेऊन शिवाने रुद्र असे ताडव नृत्य केले ते इतके भयंकर होते की सतीच्या शरीराचा एक एक भाग तुटून पडला तिचे डोळे ज्या ठिकाणी पडले, तेथेच विशालाक्षी मदिराची स्थापना झाली इतरत्र पडलेले शरीराचे सर्व भाग मिळून पुढील जन्मी पार्वतीचा अवतार झाला कांची येथे पार्वतीचे मदिर कामाक्षी या नावाने प्रसिद्ध आहे मदुराई येथे तीच देवता मीनाक्षी म्हणून प्रसिद्ध आहे मीनाक्षी मदिर हे सबध भारतातील सर्वांत भव्य असे मदिर आहे बनारसची विशालाक्षी, कांचीची कामाक्षी व मदुराईची मीनाक्षी याचा जिव्हाळ्याचा सबध असून शितळा देवीचे तीन डोळे म्हणजे या तीन मदिराचे नेत्र आहेत १९७१ मध्ये विशालाक्षी मदिराचा जीर्णोद्धार झाला, तो दक्षिण भारतीयांच्या आर्थिक मदतीनेच

काशीत सूर्याने तप केले होते म्हणून या शहरात अनेक सूर्यमदिरे आहेत. पण त्यांतील सर्वांत वैशिष्ट्यपूर्ण म्हणजे लोलारका लोलारका याचा अर्थ थर-

थरणारा सूर्य जेव्हा काशीत आला, तेव्हा काशीच्या दिव्य तेजाने तो घाबरला, थरथरला म्हणून लोलारका ही सूर्याची प्रतिमा जमिनीत खूप खोल असणाऱ्या लोलारका कुंडात आहे काशीच्या तेजाने सूर्य घाबरला व जमिनीत खोल जाऊन बसला म्हणून त्याची प्रतिमा खोलवर आहे हे कुंड बनारसच्या दक्षिण भागात, आसी नदीच्या संगमावर आहे आसी म्हणजे तलवार आसी नदी ही पापी लोकांची पापे तलवारीने भगून टाकते व लोलारका सूर्य ती पापे जाळतो अशी या मागची कल्पना आहे (लोलारका माहात्म्य काशी खंड) आपल्या पंचांगात सूर्याला एक दिवस दिला आहे त्याचे नाव रविवार पाश्चात्याच्या दिनदर्शिकेमध्येही संडे हा सूर्याचाच वार आहे

बनारसमधील लोलारका कुंडात दर रविवारी भाविकांची गर्दी असतेच भाद्रपदातील षष्ठी ही लोलारका षष्ठी म्हणून पाळली जाते व त्या दिवशी येथे मोठी यात्रा भरते बनारसच्या मध्यवर्ती भागात, गदौलिया नाक्याजवळ सूर्यकुंड नावाचे भग्न सूर्यमंदिर आहे बामारिया कुंडावरही उत्तरकुंड नावाचे सूर्यमंदिर होते, पण ते मुस्लीम आक्रमकांनी नष्ट केले भारतात वैदिक कालापासून सूर्योपासना होती हे 'उषा सूक्ता'वरून सहजच ध्यानी येते भारतातील सूर्योपासनेचे अनेक पुरावे बनारसमध्ये आढळतात भारत कलाभवनमध्ये सूर्याच्या ज्या अनेक मूर्ती व चक्रे आहेत, त्यांत आठव्या शतकातील, अकराव्या शतकातील व बाराव्या शतकातील सूर्यमूर्ती आहेत विशेष म्हणजे त्या मूर्तीत सूर्य स्त्रीलिंगी दाखविला असून त्या मूर्तीचे नाव चक्रेश्वरी असे आहे त्रिलोचन मंदिरात अजूनही उदय पावणाऱ्या सूर्याची मूर्ती असून त्याचे नाव अरुणादित्य असे आहे आदिकेशव मंदिरातही केशवादित्य ही सूर्यप्रतिमा आहे काशीत बारा महत्त्वाची आदित्य मंदिरे आहेत सूर्य हे हिंदू धर्मात ज्ञानाचे, प्रज्ञेचे आणि साक्षात्काराचे प्रतीक मानले आहे, याची साक्ष बनारसमधील अनेक सूर्यमंदिरे देतात

काशीमध्ये एकदर ५६ गणपती आहेत शिवाचे सेवक गण व त्यांचा अधिनायक तो गणेश काशीच्या सीमेवर जे आठ गणपती आहेत, त्यात पश्चिमेला देहली विनायक, उत्तरेला पाशपापी विनायक, दक्षिणेला दुर्गा विनायक, नैऋत्येला भीमचंड विनायक, वायव्येला उद्दंड विनायक आणि ईशान्येला खर्व विनायक व पूर्वेला सिद्धी विनायक हे विशेष प्रसिद्ध आहेत काशीविश्वेश्वराच्या आवारातील धुंडिराज विनायक व साक्षी विनायक हे खास महत्त्वाचे आहेत ब्रह्मनाल्यामधील गणेशमूर्तीही बरीच जुनी व भाविकांचे विशेष आदरस्थान असलेली अशी आहे सप्तसागर भागातील बड्या विनायकाची मूर्ती सर्व गणेशमूर्तीत मोठी आहे निकुंभ विनायकाला निपुत्रिक लोक विशेष मानतात ज्यांना मुलगा हवा असेल ते या निकुंभ विनायकाची पूजा करतात त्याला पौराणिक कथेचा आधार आहे प्राचीन

काळी राजा देवोदासाने पुत्रप्राप्तीसाठी या निकुंभ विनायकाची भक्ती केली पण राजाला पुत्र झाला नाही म्हणून देवोदासाने संतापाच्या भरात निकुंभ विनायकाचे मंदिर उद्ध्वस्त केले तेव्हा निकुंभ विनायकाने सबंध काशी उद्ध्वस्त केली आणि राजा देवोदासाला काशी सोडण्यास भाग पाडले पुत्रप्राप्ती करून देण्यात निकुंभ विनायकावर राजाने अविश्वास दर्शविला म्हणून त्याला शिक्षा झाली होती

शिवाच्या सेवकामध्ये यक्ष, गण, भैरव हे होते, त्याप्रमाणेच बीर (वीर) नावाचे योद्धे होते काशीत या सेवकाचीही अनेक मंदिरे आहेत बीर मंदिरांपैकी लहुट बीर, कर्मण बीर (हे मंदिर बनारस हिंदू विश्वविद्यालयाच्या आवारात आहे) आणि हर्ष बीर यांची मंदिरे विशेष प्रसिद्ध आहेत या मूर्तींना मारुतीप्रमाणे शेंदूर माखला जातो व त्याच्याजवळ सीमारक्षणासाठी त्रिशूळ असतो देवाचे महत्त्व वाढले की त्याच्या सेवकांनाही देवपण कसे मिळते, याचे हे उत्तम उदाहरण आहे. काशीतील कालीमंदिर हा कलकत्त्याचा काशीवरील प्रभाव असावा असे मानले जाते काशीतील या कालीमंदिरात कालीमाता ही शिवापेक्षा श्रेष्ठ दाखविली आहे कालीने चैतन्य दिले, तरच शिव कार्यप्रवण होतो असे मानून या मूर्तीची रचना केली आहे काली मातेचे रुद्र रूप या मंदिरात दिसते तिच्या कमरेभोवती शस्त्राचे वस्त्र आहे, गळयात कवटयाची माळ आहे, एका हातात तोडलेले मुंडके आहे व एका हातात शस्त्रसत्तर म्हणून मोठे हाड तिने धरले आहे ती शिवाच्या शरीरावर नृत्य करीत असल्याचे दाखविले आहे काशीतील अशी अनेक लहान व सहसा दुर्लक्षित मंदिरे पाहिली तर या शहराचा इतिहास व धर्म यांच्याशी ती मंदिरे अतिशय जवळच्या धाग्यांनी निगडित आहेत असे आढळते

बनारसची संगीतपरंपरा इतकी प्राचीन आहे की जातक कथेतही तिचे उल्लेख आहेत गायन, वादन व नृत्य या तिन्हीतही बनारसने जागतिक ख्याती मिळविली आहे जातककथेतील ब्रह्मदत्त याच्या कारकीर्दीतही बनारसमध्ये संगीत विद्यालये असल्याचे उल्लेख आहेत

गुप्तिल हा वीणावादक तसेच सुलसा, चित्ररेखा, श्यामा अशा गायिका व नर्तिका बनारसमध्ये असल्याचे उल्लेख जातक कथांत आहेत त्या कामी अठ्ठकाशी नावाची एक गायिका व नर्तिका बनारसमध्ये होती हिच्या गायन-वादनाच्या एका रात्रीच्या कार्यक्रमासाठी आठ हजार मुद्रा द्याव्या लागत असत, म्हणून हिचे नाव अठ्ठकाशी असे पडले होते शास्त्रोक्त संगीताप्रमाणेच कव्वाली, कजरी या हलक्या फुलक्या प्रकारातही या शहराचे नाव शेकडो वर्षे मशहूर आहे सय्यद सुलेमान नदवी यांनी म्हटले आहे, की हजरत महमद पैगंबर यांच्या जन्मापूर्वी रामपूरच्या

राजाकडे संगीतावरचे अरबी ग्रंथ होते. संगीतावरील भारतीय ग्रंथात 'स्वरलिपी 'ही (नोटेशन) होती." इ. स. ९६९ मध्ये जाहूज नावाच्या एका लेखकाने बनारस येथील संगीताच्या प्रसाराची प्रशंसा केली होती. इ. स. १०७० मध्ये बनारसचे संगीत युरोपमध्ये स्पेनपर्यंत पोचले होते, असे इतिहासकार काजी सईद अदलस्ती यांनी म्हटले आहे. इसवी सनाच्या दुसऱ्या शतकात भारतात काही गुंफा व लेणी तयार करण्यात आली. त्यांत तबला हे वाद्य दाखविले आहे, यावरून भारतीय संगीताची दीर्घ परंपरा लक्षात येते.

भारतीय संगीताला अमीर खुसरो याचे योगदान अपूर्व आहे. त्यांनी इराण-हून आलेली कव्वाली उत्तर भारतात लोकप्रिय केली. त्या काळी बनारसमध्ये शर्की अमल होता. त्या राज्याची राजधानी बनारसजवळील जौनपूर येथे होती. अमीर खुसरो यांनी ख्याल व तराना यांचाही विकास केला. मानसिंह तोमर यांनी ध्रुपदाचे पुनरुज्जीवन केले. बैजू, बख्श, तानसेन अशा मोगल दरबारातील बुजुर्ग गायकांनी ध्रुपद गायकीला प्रतिष्ठा मिळवून दिली. दादरा ही बुंदेलखंडची देणगी आहे असे काही संगीताचे इतिहासकार मानतात, पण बनारसच्या कडव्या अभि-मान्याचे म्हणणे आहे की दादराचे श्रेय बनारसच्या तवाईफांच्याकडेच जाते. शर्की बादशहांच्या कारकीर्दीत बनारसच्या संगीत परंपरेची अपूर्व प्रगती झाली. बना-रसच्या तवाईफमध्ये तीन प्रकार होते. गंधर्व, रामरजनी आणि गौनहारिन. एकाच व्यक्तीला पतीसमान मानून त्याचे मनोरंजन करणाऱ्या तवाईफला गंधर्व म्हणत. खानदानी घराण्यातील एखाद्या तरुणीचे अधःपतन होऊन ती त्या समाजातून बाहेर फेकली गेल्यावर या व्यवसायात आली तर तिला रामरजनी म्हणत. इतर सर्व तवाईफा यांना गौनहारिन असे नाव होते. या शेवटच्या वर्गातील तवाईफा ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य, चांभार किंवा डोंब अशा कोणत्याही वर्गातून येत असत. बाराव्या शतकात बनारसची जानकीबाई नावाची तवाईफ गायन व नृत्य याबद्दल भारतात प्रसिद्ध होती. अठराव्या शतकात हुस्नाबाई नावाच्या तवाईफला एवढा मान होता की, तिचा उल्लेख 'सरकार' असा करण्यात येई. 'सरकारनी गायन करण्याची कृपा करावी', अशा शब्दात तिला कार्यक्रमाच्या वेळी विनंती करण्यात येत असे. गायन व नृत्य यात निपुण अशा बनारच्या गायिकांत गुलबदन, सुखबदन, जिन्नतबाई इत्यादी मशहूर होत्या. एकोणिसाव्या शतकात सरस्वतीबाई, चंदाबाई, जौहरी, चंद्रावली इत्यादींचा अत्युच्च काळ होता. विसाव्या शतकातील ख्यातनाम गायिकांत सिद्धेश्वरी देवी, कमलेश्वरी देवी, ताराबाई रसलूनबाई, इलाहीजान यांचा विशेष बोलबाला आहे. काशीचे रसिक धनिक (त्यांना तेथे रईस म्हणतात) भारतातील अन्य ठिकाणच्या गायकांच्या बैठकीही करीत व अजून करतात. पं. ओंकारनाथ ठाकुर, मुश्ताक अली खाँ, बडे गुलाम अली खाँ इत्यादींनी बनारसमध्ये

कार्यक्रम करून रसिकांना मोहित केले आहे कारण बनारसचे वातावरण संगीताला अत्यंत अनुकूल असे आहे

प्रसिद्धू व मनोहर हे बनारसचे बंधू गायनाच्या जुलगबंदीबद्दल प्रसिद्ध होते त्यांना नंतर मोगल बादशहा बहादूरशहा याने आपल्या दरबारी बोलावून घेतले व स्वत बादशहा त्यांच्याकडून संगीताचे शिक्षण घेत असे मनोहर मिश्र, हरिप्रसाद मिश्र आणि विश्वेश्वर मिश्र हे बनारसचे तीन बंधूही संगीताच्या क्षेत्रात कीर्तिवंत होते बनारसमध्ये कबीरचौरा, पियरी, चाहमात्रा व रामापुरा या भागात आजही ज्येष्ठ गायकांची वसाहत आहे त्यात मुश्ताक अली हे विशेष प्रसिद्ध आहेत सदारंग व अदारंग हे कलाकार मूळचे बनारसचे, पण पुढे ते लखनौला स्थायिक झाले ब्रिटिश काळात बनारसची संगीतपरंपरा दृढ होण्याचे एक अत्यंत अनपेक्षित कारण झाले, ते राजकीय होते ब्रिटिशांनी अनेक नबाब, राजे, जहागीरदार यांना पदच्युत करून बनारसला नजरकैकेत ठेवले त्यांच्याबरोबर त्यांचे गायक व वादकही आले नवाब व राजे यांनी राजकारणात ढवळाढवळ करून ब्रिटिश राज्यकर्त्यांपुढे नवे प्रश्न उभे न करता त्यांनी संगीत-नृत्यात रममाण व्हावे यात ब्रिटिशांचाही स्वार्थ होता त्यामुळे बांदा, टोंक, कूर्ग, नेपाळ, लखनौ अशा अनेक भागातील पदच्युत नवाब व नरेश यांना निवृत्तीच्या काळात संगीत-नृत्याच्या कार्यक्रमाशिवाय अन्य उद्योग उरला नाही

डॉ सुशीलकुमार चौबे यांनी आपल्या 'घरोनी की चर्चा' या ग्रंथात म्हटले आहे की, "तानसेन यांचे मूळ नाव रामतनू असे होते व ते मूळचे बनारसचे होते त्यांचे वडील मकरंद पांडे हे बनारसच्या मंदिराचे पुजारी होते या मंदिरात कीर्तन ऐकताना तानसेन यांना संगीताची आवड निर्माण झाली" तानसेन यांचे तीन मुलगे बनारसमध्ये स्थायिक झाले होते व संगीत साधना करीत होते तानसेनचे नातू सादिक अली खाँ व मिसर अली खाँ हे बनारसच्या महाराजाचे राजगायक होते. बनारसच्या महाराजाचे दरबारी गायक म्हणून चतुर्बिहारी मिश्र, प्यारे खाँ, निर्मल साह, बख्तर खाँ, जाफरखाँ, अली महमद खाँ, हरी नारायण मुखर्जी, रसूल बख्श् असे अनेक ख्यातनाम गायक होते बनारसच्या राजांपैकी बहुतेक राजे-उदाहरणार्थ महीप नारायण सिंह, उदित नारायण सिंह, प्रभूनारायण सिंह स्वत उत्तम गायक होते

सतार, पखवाज, वीणा, शहनाई इत्यादी वाद्याच्या वादनात तर बनारस हे भारतात सर्वश्रेष्ठ आहे आजचे सर्वोत्कृष्ट शहनाई वादक बिसमिल्ला हे बनारसमधलेच आहेत. एकोणिसाव्या शतकात तेथे कल्लू व धम्नू हे नामवंत सारंगीवादक होते त्याच काळात बनारसचे बीनवादक उमराव खाँ हे सबंध भारतात बिनतोड वादक होते शहनाईमध्ये अहमद अली नक्कार हे एकोणिसाव्या शतकात अखिल

भारतातील सर्वश्रेष्ठ शहनाईवादक होते ते शहनाईतून बरोबर सारंगीचे सूर काढीत असत बद्दा मियाँ आणि रज्जब मियाँ हेही उत्कृष्ट शहनाईवादक होते व ते बालाजी मंदिरात वादन करीत असत

होरी, चैती आणि ठुमरी या भारतीय संगीताला बनारसच्या देणग्या आहेत, असे बनारसचे संगीततज्ज्ञ मानतात मात्र ठुमरी ही मुळात ग्वाल्हे-रच्या मानसिंग तोमर यांनी शोधली व पुढे लखनौ आणि बनारसमध्ये तिचा विकास झाला, असे बहुतेक इतर राजाचे मत आहे तोमर यांच्या नावावरून तवरी व ठुमरी असा या शब्दाचा इतिहास आहे हे मात्र खरे की ठुमरीतील लाडिकपणा व हळुवारपणा हा लखनौ व बनारसच्या तवाईफनीच भरला त्याचबरोबर हेही सत्य आहे की जुन्या, सुरवातीच्या बहुतेक ठुमऱ्यांमध्ये बनारसी शब्दाचा वापर अधिक आहे रसलूनबाई यांची ठुमरी ही सर्वोत्कृष्ट मानली जात असे बनारसचे जगदीप यांना 'ठुमरीचे बादशहा' हा किताब होता आपल्याकडे कोल्हापुरात सरदार-दरकदार पैलवानांचे आश्रयदाते होते व अमुक पैलवान हा अमक्याचा पठ्ठा असे म्हणत त्याचप्रमाणे बनारचे रईस गायकांना आश्रय देत जगदीप मिश्र हे लल्लन छक्कन या धनिकाकडे होते जगदीप यांच्या प्रेरणेने मौजुद्दीन खाँ हेही नामवंत ठुमरी गायक झाले बनारसी ठुमरीतील बुझुर्ग म्हणून श्रीमती राजेश्वरीदेवी, विद्याश्वरी, काशीबाई यांचे उल्लेख अनिवार्य आहेत. बाहेरून येऊन बनारसमध्ये संगीताची साधना करण्यात पं ओंकारनाथ ठाकूर, श्रीकृष्ण हरी हिर्लेकर आणि गायनाचार्य शिवप्रसाद यांचा समावेश आहे

सतारीचे सम्राट रविशंकर यांचा जन्म बनारसचाच त्यांनी भारतीय सता-रीला आंतरराष्ट्रीय स्तरावर नेले आता ते अमेरिकेत लॉस एंजेलिसमध्ये राहतात. तेथील सनसेट बुलेव्हार्डवरील घर मी पाहिले आहे आशिक अली खां हे बनारसचे दुसरे अखिल भारतीय कीर्तीचे सतारवादक त्यांचे पुत्र मुश्ताक अली खां हे मध्याचे सर्वोत्कृष्ट सूरबहार वादक आहेत पं ननी गोपाल, राम गांगुली, विमल चतर्जी हे बनारसचे आणखी काही आघाडीचे सतारवादक

शहनाई वादनात बिसमिल्ला खां यांच्याशिवाय त्यांचे बंधू कै शमसुद्दीन खां, श्री नंदलाल, विष्णू घोष, खादिम अली खां, प्यारे हुसेन, सुहु रामजी, कृष्णा इत्यादी अखिल भारतीय कीर्तीचे वादक आहेत बासरी वादनातही बनारस मागे नाही शहनाईवादक नंदलाल यांचे बंधू श्यामलाल, रघुनाथ प्रसन्न, तारकनाथ, राधेश्याम जयस्वाल ही बनारसच्या प्रमुख बासरीवादकांची नावे आहेत हार्मो-नियम हे वाद्य गेल्या चाळीस-पन्नास वर्षांत मागे पडले आहे पण याही क्षेत्रात बनारसचे गणपतजी, बीरू महाराज, हरेंद्र भट्टाचार्य ध्रुवजी, ईश्वरलाल नेपाली ही नावे आदराने घेतली जातात. पखवाज हे बनारसचे खास वैशिष्टयपूर्ण वाद्य

आहे भोलानाथ पाठक, बदरीलाल गोस्वामी, मदनमोहन अमरनाथ मिश्र इत्यादी नावे पट्टीचे पखवाजवादक म्हणून मान्यता पावली आहेत सरोदवादकात उस्ताद अल्लाउद्दीन खा याचे शिष्य व ज्योती भट्टाचार्य, राजेश मिश्र आणि प्रकाश महाराज हे सिद्धहस्त वादक आहेत क्लॅरिओनेट हे तसे दुर्लक्षित वाद्य पण त्यातही राजेन बाबू हे बनारसचे वादक अखिल भारतीय कीर्तीचे आहेत व्हायोलिन वादकात बनारसच्या श्रीमती एम् राजम, गोपीनाथ व गोपाल मिश्र हे बनारसचे वादक नामवत आहेत शभुनाथ मिश्र आणि सुमेरनाथ याना सारगीवादनात 'चद्र-सूर्य' मानले जात असे तमाकूजी हे बनारसचे कीर्तिवत सारगीकार तसेच फल्लू, फिजुल्ला आणि ठाकूर प्रसाद यानी सारगी वादनात बहुमोल कार्य करून बनारसची शान वाढविली आहे व सरजू प्रसाद मिश्र हेही बनारसचे मशहूर सारगीवादक होते

कथ्यक नृत्यात बनारसचा वारू कोणीही अडवू शकला नाही जगदीप, अयोध्या प्रसाद आणि बाबूराम याचे या क्षेत्रातील कर्तृत्व अपूर्व आहे व बिन्दादीनजी यानी जगन्नाथ ऊर्फ अच्छन महाराज, बैजनाथ ऊर्फ लच्छू महाराज आणि शभू महाराज या बंधूना कथ्यक नृत्याची दीक्षा दिली अच्छन महाराज याचे पुत्र म्हणजेच आजचे विख्यात कथ्यक नर्तक बिरजू महाराज कथ्यक नृत्याला भावपूर्ण रूप देण्यात ज्यानी थोर कार्य केले ते बनारसच्या शुकदेवमहाराज यानी त्याचे शिष्य व शिष्या आज भारतातच नव्हे तर, परदेशातही कीर्ती मिळवीत आहेत त्यांची नावे म्हणजेच गोपीकृष्ण, सितारा देवी आणि अलकनदा

तबल्यात दिल्ली, मीरत, फरुकाबाद, लखनौ इत्यादी 'बाज' (शैली) आहेत व राम सहायजी हे बनारसी शैलीचे प्रवर्तक आहेत त्याचे एस् मोदूखा यांनी राम सहाय अल्पवयीन असतानाच त्याना तबला वादनाचे उत्तम शिक्षण देऊन लखनौला नवाब वजीद अलीच्या दरबारात नेले तेथे त्यानी बारा वर्षांच्या राम सहायचे तबलावादन केले त्या वेळी दरबारात अनेक तबलापटू होते बाल राम सहायचे तबलावादन झाल्यावर त्याचे गुरू मोदूखा यांनी विचारले, "यापेक्षा उत्तम तबला वादन येथे कोणी करू शकत असल्यास त्याने पुढे यावे" पण या जाहीर आव्हानाचा स्वीकार कोणीही केला नाही व जमलेल्या तज्ज्ञांनी राम सहाय यांचे नैपुण्य मान्य केले राम सहायजी यानी पुढे आपले बंधू जानकी सहाय यानाही उत्तम तबलावादनाचे शिक्षण दिले त्यांचे भाचे व भैरव सहायजी हेही अखिल भारतीय कीर्तीचे तबलजी होते 'त्याच्या बोटाना परमेश्वराने डोळे दिले आहेत' असे अनेक बुजुर्ग गायक म्हणत, व मौलवीराम, जगन्नाथजी, गोकुलजी, विश्वनाथजी असे अनेक विख्यात तबलजी बनारसने दिले आहेत नन्नू सहायजी हे अंध होते, पण तबला वादनातील त्याचे कौशल्य असामान्यसाधारण

होते. सध्याच्या कीर्तिवंत तबला वादकांत पांचू महाराज, अशुतो षभट्टाचार्य, ईश्वरलाल मिश्र आणि कुमार मिश्र ही नावे विशेष महत्त्वाची आहेत.

बनारसी कजरी किंवा कजली हा खास स्थानिक प्रकार आहे. झाडाला बांधलेल्या झूल्यावर बसून हे गाणे गाण्याची परंपरा बनारसमध्ये शेकडो वर्षे आहे. भाद्रपद महिन्यात रथोत्सवानंतर 'कजरीका उत्सव' बनारसमध्ये होतो. या वेळी नववधूला प्रथमच मोकळ्या हवेवर झूल्यावर बसवून कजरीचे गायन करण्यात येते. खास कजरी गीते लिहिणाऱ्यात भारतेन्दु, हरिश्चंद्र, अंबिका दत्त व्यास, प्रेमधन, श्रीधर पाठक ही नावे प्रामुख्याने घेतली जातात. प्रेमधन यांचा 'कजली कदंबिनी' नावाचा एक कजरी संग्रहही आहे. नमुन्यादाखल श्रीधर पाठकलिखित कजरीचा काही भाग खाली दिला आहे.

रिमझिम बरसन लागी बुंदिया
चल सखी खेले कजरी ॥
वृंदावन की कुंज गली
मा मिलिजुल के सिगरी ॥
उहाँ श्याम संग चोरी
खेलवैं झुलवैं एक घरी

अनेक हिंदी व भोजपुरी चित्रपटांतही आता बनारसच्या कजरी गीतांचा वापर केला जात आहे. दशाश्वमेध घाटावर मला ऑस्ट्रियाचे जेम्स वुड नावाचे साठीच्या आसपासचे गृहस्थ भेटले. त्यांची चोवीस वर्षांची मुलगीही त्यांच्या बरोबर होती. ते म्हणाले, "मी साल्झबर्गला राहतो. मी तेथे संगीत शिक्षक आहे. बनारसच्या संगीताचा अभ्यास करण्यासाठी मी ऑस्ट्रियाहून येथे सहा महिन्यांसाठी आलो आहे." मी साल्झबर्गला गेलो आहे. मोझार्ट या जगप्रसिद्ध संगीतकाराचे ते गाव. त्याचे तेथील घरही मी पाहिले आहे, असे मी श्री. वूड यांना सांगितले, तेव्हा त्यांना आनंद झाला. ते म्हणाले, "पाश्चात्य व भारतीय संगीताचा समन्वय करता येईल की काय ते पाहणे हा माझ्या अभ्यासाचा मुख्य उद्देश आहे." बनारसच्या संगीत परंपरेचा अभ्यास करण्यासाठी पाश्चात्य संगीत क्षेत्रातील अनेक तज्ज्ञ बनारसला येतात, असेही त्यांनी सांगितले.

... ग्रंथालय ...
दा. क्र. ...
शाखा (स्थळ ...

# बुद्धम् शरणम् गच्छामि

उत्तरप्रदेशच्या दौऱ्याची मी आखणी केली तेव्हा सारनाथची भेट ही अत्यंत महत्त्वाची होईल हे मी गृहितच धरले होते अपेक्षा आणि पूर्ती यांचा प्रवासात मेळ बसतोच असे नाही मोठ्या अपेक्षेने एखाद्या ठिकाणी जावे आणि तेथे अपेक्षा पूर्ण होऊ नये, काहीसे निराशजनक असेच चित्र दिसावे असेही प्रवासात घडते, हा माझ्याप्रमाणेच अनेकांचा अनुभव असेल पण माझी सारनाथची भेट अपेक्षेहून अधिक यशस्वी झाली याचे मुख्य कारण असे की तेथे मी केवळ एक प्रवासी प्रेक्षक म्हणून न जाता तेथील प्रमुख बौद्ध भिक्षूचा पाहुणा म्हणून गेलो तो एक सुयोगच होता बनारसच्या दैनिक ‘ आज ’चे प्रमुख व्यवस्थापक आणि सहसपादक श्री राम मोहन पाठक याना मी सारनाथविषयी मार्गदर्शनाची विनती केली तेव्हा ते म्हणाले, “ गदौलियाहून सारनाथला बस जाते तेथे गेल्यावर तुम्ही तेथील प्रमुख बौद्ध भिक्षू त्रिपिटाकाचार्य दोदामगोडा रेवथा थोरो याना भेटा मी त्यांना फोन करून तुम्ही येत असल्याचे कळवतो ते तुमची सर्व व्यवस्था करतील ”

सारनाथ हे बनारसचेच एक उपनगर आहे जसे मुबईचे सांताक्रूझ किंवा पुण्याचे खडकी मी सकाळी आठ वाजता गदौलियाहून बसने निघालो आणि साडेआठच्या सुमाराला सारनाथ येथील मूलगध कुटी विहार या मदिराजवळ बसच्या अखेरच्या थांब्यावर उतरलो मदिरासमोर महाबोध सोसायटीची दुमजली चौकोनी इमारत आहे तेथे जाऊन मी रेवथा थोरो यांना भेटलो त्यावेळी हॉलड-हून काही तरुण–तरुणी तेथील आश्रमात राहण्यासाठी आले होते त्याचे पासपोर्ट वगैरे पाहून थोरो यानी त्यांना खोल्या दिल्या मग ते मला म्हणाले, “ पाठकजींनी मला तुमच्याबद्दल कळवले आहे आपल्यासारखे मोठे लेखक इथे आले याचा मला फार आनद झाला प्रथम आपण नाश्ता करून घ्यावा मग मी आपल्याला बोधि-

सत्त्व सोसायटीची माहिती देतो माझ्या माणसाला मी तुमच्या बरोबर देतो. तो तुम्हाला मदिर, स्तूप, म्युझियम वगैरे दाखवून आणील मग तुम्ही माझ्याबरोबर भोजन करा येथे आश्रमात विश्रांती घ्या आपल्याला इथे महिना पधरा दिवस राहायचे असेल तर अवश्य राहा आमच्याकडे भरपूर जागा आहे

मला जेवणासाठी बनारसला एका लेखकाकडे जायचे होते म्हणून मी त्याना येथे काही तासच मला राहता येईल असे सांगितले त्यांच्याबरोबर मी चहा आणि नाश्ता घेतला स्वत ची व सस्थेची ओळख करून देताना रेवांथा थोरो म्हणाले, “ मी श्रीलकेचा आहे गेली तीन वर्षे मी इथे काम करीत आहे आपण श्रीलकेला गेलात तर तिथे आमचा बुद्धविहार व आश्रम आहे कलुतरा येथे दोदमगोडा भागात हा आश्रम आहे तो आमच्या बोधिसत्त्व सोसायटीचाच आहे तेथे आपण हवे तितके दिवस राहू शकता आपण मला पत्र लिहिलेत तर मी त्या आश्रमाला कळवून आपली व्यवस्था करीन श्रीलकेची लहानशी भेट म्हणून आपण ही वस्तू घ्यावी अशी विनती आहे ” असे म्हणून थोरो यांनी मला सिलोनी चहाचा एक मोठा पुडा दिला हा चहा मी पुढे मुबईला घरी आणला आणि तो आम्हाला अत्यत स्वादिष्ट लागला

रेवांथा थोरो म्हणाले, “ भगवान बुद्धाच्या सबधातील चार ठिकाणे विशेष महत्त्वाची आहेत नेपाळच्या सीमेवरचे लुबिनीवन हे बुद्धाचे जन्मस्थान जेथे बुद्धांना धर्माचा साक्षात्कार झाला आणि बुद्धत्व प्राप्त झाले ते बुद्धगया आज आपण जेथे भेटलो आहोत ते सारनाथ हे तिसरे महत्त्वाचे ठिकाण याच ठिकाणी भगवान बुद्धांनी धर्मचक्र प्रवर्तन केले म्हणजे आपल्या पहिल्या पाच शिष्यांना बुद्ध धर्माच्या कल्याणप्रद मार्गाचा उपदेश केला उत्तर प्रदेशातील गोरखपूरजवळचे कुसीनारा हे चौथे महत्त्वाचे ठिकाण तेथे भगवान बुद्धाचा अत झाला ”

भगवान बुद्धांचे चरित्र म्हणजे अत्यत निर्मळ, स्फूर्तिदायक व उदात्त विचाराचा झरा आहे अडीच हजार वर्षांपूर्वी राजा शुद्धोदन मध्यप्रदेशात राज्य करीत होता त्याची राजधानी कपिलवस्तू या नगरात आषाढी पौर्णिमेपूर्वी सात दिवस मोठा उत्सव होत असे या उत्सवाच्या समाप्तीच्या वेळी पौर्णिमेस शुद्धोदन राजाची पत्नी मायादेवी हिने अध, पगू जराजर्जर व श्रमण ब्राह्मण यांना दानधर्म केला आणि रात्री उशिरापर्यंत धार्मिक ग्रथांच्या श्रवणात वेळ घालविला त्या रात्री तिला स्वप्न पडले त्या स्वप्नात तिला असे दिसले की चार दिशांच्या रक्षक देवांनी तिला उचलून हिमालयावर नेले तेथे तिला शालवृक्षाखाली ठेवण्यात आले. चार देवांच्या स्त्रियांनी रात्री मायावतीला दिव्य गगोदकाने स्नान घातले आणि वस्त्रालकारानी शृगारले त्या वेळी एक सफेद हत्ती तेथे आला त्याने तीन वेळा मायावतीला प्रदक्षिणा घातली आणि एक सफेत कमल तिला अर्पण केले हे स्वप्न

म्हणजेच भगवान बुद्ध तिच्या उदरी येणार असल्याचे भविष्य होते मायावतीला दिवस गेले. नऊ महिन्यांनतर तिने बाळतपणासाठी माहेरी पाठविण्याची राजाला विनती केली शुद्धोदन राजाने एक हजार सैनिक देऊन राणीला माहेरी पाठविण्याची तयारी केली

कपिलवस्तू आणि देवदह या दोन शहरांच्या मध्ये लुंबिनी नावाचे रमणीय उद्यान होते राणी मायावती या उद्यानात विश्रांतीसाठी थांबली ती मेण्यातून उतरून एका विशाल शालवृक्षाखाली आली त्या वेळी एक फांदी वाकली आणि त्या वृक्षाने राणीचे स्वागत केले इतक्यात राणीला प्रसूतिवेदना होऊ लागल्या तिच्या दासींनी सर्व बाजूना कनात लावून ती जागा बंदिस्त केली याच शालवृक्षाखाली, लुंबिनी येथे भगवान बुद्धाचा जन्म झाला त्यावेळी आकाशातून जलधारा वर्षल्या आणि राणी मायावतीला संदेश ऐकू आला, " तुझा हा पुत्र जगाचा उद्धार करील "

राजा शुद्धोदनाला पुत्रप्राप्तीची वार्ता कळताच त्याने मायावतीला व मुलाला कपिलवस्तूला आणले आठ विद्वान ब्राह्मणाना बोलावून त्यांना नवजात अर्भकाचे जातक वर्तवण्यास राजाने सांगितले सात ब्राह्मणानी भवितव्य वर्तवले की ' हा ऐहिक जगात रमला तर तो चक्रवर्ती होईल पण हा गृहस्थाश्रम सोडून संन्यासी झाला तर जगाचा उद्धार करील ' आठवे ब्राह्मण कौडिण्य यानी मात्र विश्वासपूर्वक सांगितले, ' हा मुलगा खात्रीने बुद्ध होईल ' भगवान बुद्धाना जन्म दिल्यावर आपल्या इहलोकीचे कार्य संपले म्हणून राणी मायावती पुत्रप्राप्तीनतर सातव्या दिवशीच स्वर्गवासी झाली पुत्रप्राप्तीमुळे आपले सर्व मनोरथ सिद्ध झाले म्हणून राजाने मुलाचे नाव सिद्धार्थ असे ठेवले

मायादेवीच्या निधनानतर सिद्धार्थाचे पालनपोषण करण्याची जबाबदारी त्याची मावशी व सावत्र माता गौतमीवर पडली हिच्या नावावरूनच त्याला गौतम बुद्ध असेही नाव पडले आपला मुलगा संन्यासी न होता गृहस्थाश्रमात राहावा व पराक्रमी चक्रवर्ती व्हावा म्हणून काय करता येईल असे राजाने सात ब्राह्मणाना विचारले. तेव्हा ते म्हणाले,

" वृद्ध, व्याधिग्रस्त व मृत माणसे जर सिद्धार्थाच्या नजरेस पडली, तर तो गृहत्याग करील म्हणून असे लोक त्याच्या नजरेस पडणार नाहीत अशी दक्षता तू घे "

त्याप्रमाणे शुद्धोदन राजाने सिद्धार्थासाठी तीन ऋतूत राहण्यासाठी तीन प्रासाद बांधले एक पावसाळ्यासाठी, एक हिवाळ्यासाठी व तिसरा उन्हाळ्यासाठी सिद्धार्थाभोवतीचे सर्व लोक तरुण, सशक्त व आनंदी असतील अशी व्यवस्था करण्यात आली होती त्यांचे मनोरंजन करायचे म्हणून राजाने नृत्यांगना व गायिकाही राजपुत्राभोवती ठेवल्या होत्या त्यात राजाचा हेतू एवढाच होता की सिद्धार्थाला जगातले

दुःख दिसू नये. मात्र त्या हेतूची कल्पना नसल्याने राजाचे सरदार-दरकदार आपसात चर्चा करू लागले की राजपुत्राने जर योग्य वेळी युद्धकलेचे शिक्षण घेतले नाही, तर परचक्रास कसे तोंड देणार ? ही कुजबूज राजाच्या कानी आली व लोक काय बोलतात ते त्याने सिद्धार्थाला सांगितले तेव्हा सिद्धार्थ म्हणाला, " आपल्या राज्यातील सर्व प्रमुख योद्धयांना निमंत्रित करा मी त्यांना माझे युद्धकला नैपुण्य दाखवितो " त्याप्रमाणे सर्व योद्ध्याच्या समोर राजपुत्राने धनुर्विद्या व इतर युद्धकलाचे एवढे प्रभावी प्रात्यक्षिक दाखविले की त्यांचे सर्व योद्धयांनी कौतुक केले

योग्य समयी राजाने सिद्धार्थाचा विवाह यशोधारा नावाच्या सौंदर्यशालिनीबरोबर केला. सिद्धार्थाने उत्तम संसार केला आणि त्याची पत्नी यशोधरा गर्भवती झाली त्या वेळी सिद्धार्थाचे वय एकोणतीस वर्षांचे होते त्या वेळपर्यंत सिद्धार्थाने वृद्धत्व, आजारीपण, कुरूपता, अपगत्व अथवा इतर कोणतेही दुःख पाहिलेच नव्हते किंवा राजाने ते त्याच्या नजरेस पडू दिले नव्हते, असे म्हणणे अधिक योग्य होईल. पण २९ व्या वर्षी सिद्धार्थाला वाटले की, आपली राजधानी फिरून पाहावी म्हणून छन्न नावाच्या सारथ्याला त्याने आपली इच्छा सांगितली छन्न याने ते राजाला सांगितले त्याबरोबर सिद्धार्थ ज्या मार्गावरून जाणार होता, त्या मार्गावरील सर्व अपग, वृद्ध, जराजर्जर लोकांना दूर केले रस्ते स्वच्छ व सुदर केले इतकी सर्व खबरदारी घेतली, तरी सिद्धार्थाला एक वृद्ध व गलितगात्र माणूस दिसलाच असे दृश्य त्याने पूर्वी कधीच पाहिले नसल्याने त्याने विचारले, " छन्न, हा प्राणी मनुष्यच आहे का ? मी कधीही असा प्राणी पाहिला नाही पांढरे केस, खोल गेलेले डोळे, दाताचे सपूर्ण उच्चाटन व चालताना हा कापतो आहे आणि पाठीचे धनुष्य झाले आहे असा हा प्राणी कोण ?"

छन्न म्हणाला, " महाराज, हा तुमच्या माझ्यासारखा मनुष्य आहे, पण याला म्हातारपण आले आहे वय झाले की सर्वांना असेच व्हायचे आहे हा मनुष्य तरुणपणी योद्धा होता त्याने अफाट पराक्रम केले अनेक तरुण सुदरींना आकर्षित केले. पण आता वृद्धत्व आल्यावर त्यातले काहीही शिल्लक राहिलेले नाही. तारुण्य हे असेच क्षणभगुर असते

सिद्धार्थ अत्यत व्यथित होऊन म्हणाला, " आता माझे मन उद्यानात रमत नाही रथ परत फिरवून राजवाड्याकडे ने "

राजाला ही बातमी समजताच त्याने सिद्धार्थाभोवतीच्या नृत्यागना व गायिका याची सख्या वाढविली पण सिद्धार्थ उदास होता काही दिवसानी तो पुन उद्यानक्रीडेसाठी निघाला, तेव्हा त्याला एक जराजर्जर माणूस दिसला. त्याने रथ थांबवून विचारले, " छन्न, हा प्राणी कोण ? हा वृद्ध नाही त्याचे केस पांढरे झालेले नाहीत आणि दातही शाबूत आहेत तरीही हा मृतवत् का आहे ? हा

मनुष्यच आहे "

छन्न म्हणाला, "महाराज, आजार म्हणतात तो हाच हा मनुष्यच आहे व तरुणही आहे पण व्याधीने त्याला ग्रासले आहे व्याधी झाल्यावर अगातील सर्व शक्ती जाते दोन दिवसापूर्वी हा माणूस चागला चपळ, सशक्त व हिंडता फिरता होता माणसाचे बळ हे चचल असते "

सिद्धार्थ म्हणाला, "अरेरे ! मला उत्तम आरोग्य मिळाले आहे या मस्तीत मी आजपर्यंत होतो पण तो माझा अहकार आता नाहीसा झाला आहे चला, आपण परत फिरू या "

आणखी काही दिवसानी सिद्धार्थ रथातून फिरावयास निघाला त्याला एक प्रेत दिसले मृत्यू म्हणजे काय हे त्याला माहीतच नव्हते त्या प्रेताकडे पाहून सिद्धार्थाने विचारले, "हा माणूस असा आडवा का पडला आहे ? हा वृद्ध दिसत नाही आणि व्याधिग्रस्तही दिसत नाही हा हालचाल का करीत नाही ? आणि इतके लोक त्याच्याभोवती जमून ही काठ्यांची शिबिका कशासाठी तयार करीत आहेत ?"

सारथी छन्न याने उत्तर दिले, "महाराज, याला मृत्यू आला आहे जो जो माणूस जन्मला, त्या प्रत्येकाची शेवटी हीच अवस्था व्हायची रक आणि राजा हे मृत्यूला समान आहेत मृत्यू म्हणजेच माणसाची अखेर मृत्यूमुळे माणसाचे सर्व आनद, आकाक्षा, कार्ये सपतात."

सिद्धार्थ आपल्या राजवाड्यावर परत आला आणि विचारमग्न झाला त्याने विचार केला, वृद्धत्व, जरा आणि मृत्यू यामुळे आपले सर्व अहकार नाहीसे होतात क्षुल्लक संसारी सुखासाठी जगण्यात काहीच अर्थ नाही त्यापेक्षा हा ससार त्यागावा म्हणजे मन शाती मिळेल काही दिवसानी सिद्धार्थ फिरावयास निघाला असता त्याला एका वृक्षाखाली एक तपस्वी दिसला. त्याच्या चेहऱ्यावर परम शाती दिसत होती. तो कोण आहे असे सिद्धार्थाने विचारल्यावर छन्न म्हणाला, "महाराज, हा सन्यासी आहे, भिक्षू आहे याने गृहस्थाश्रमाचा त्याग केला आहे जीवनातील दु खे त्याला स्पर्श करू शकत नाहीत म्हणून त्याचा चेहरा असा समाधानी व शांत दिसत आहे" त्यावर विचार करीत सिद्धार्थ थोडा वेळ उद्यानात फिरला त्याचा रथ परत येत असता त्याला पाहून एक पुरंध्री म्हणाली, "या तेज पुज राजपुत्राचे आईवडील, पत्नी किती सुखी असतील धनदौलत, सौदर्य, सत्ता ही सर्व सुखे याच्या पायाशी लोळण घेत आहेत."

तिच्या या विधानावर विचार करताना सिद्धार्थ स्वत शीच म्हणाला, "सौंदर्य, सपत्ती व सत्ता यांमुळे सुख मिळते ही कल्पना भाबडी व चुकीची आहे ! ज्याच्या अत करणापासून काम, क्रोध आणि मोह हे तीन अग्नी विझून गेले आहेत, तो खरा

सुखी "

सिद्धार्थने त्याच क्षणी ठरवले की आपण गृहत्याग करून निर्वाणाच्या श्रेष्ठ मार्गाने जायचे पण तो राजवाडयावर आल्याबरोबर त्याला वार्ता कळली की पत्नी यशोधरा प्रसूत झाली आणि तिला पुत्ररत्न झाले "माझ्या कैवल्याच्या मार्गात हा राहूच आला! हे आणखी बंधन झाले "

राजा शुद्धोदनाला सिद्धार्थाची ही प्रतिक्रिया समजली, तेव्हा तो म्हणाला, "माझ्या नातवाचे नाव 'राहुल' ठेवा माझा नातू जन्मला आता माझा मुलगा सिद्धार्थ गृहस्थ धर्म सोडीत नाही भोवती हजारो पहारेकरी ठेवण्यापेक्षा पुत्रबंधन अधिक परिणामकारक आहे मी स्वत याचा अनुभव घेतलाच आहे माझा नातू राहुल आता माझ्या मुलाला आपल्याजवळ ठेवून घेण्यास समर्थ आहे "

मात्र सिद्धार्थाचा विचार निश्चित होता तो म्हणाला,

"पत्नी, पुत्र, धनदौलत व सत्ता याच्या पायावर जे आपल्या सुखाची इमारत बाधतात, ते लवकरच दुःखी होतात. मी शाश्वत सुखाचा शोध घेणार आहे " त्याच रात्री सिद्धार्थाने राजवाडा सोडण्याचा निश्चय केला त्याचा एकनिष्ठ सेवक छन्न याने त्याला कथक नावाचा घोडा आणून दिला जाण्यापूर्वी आपल्या पत्नीला व मुलाला पाहावे म्हणून तो यशोधरेच्या महालात आला त्याला यशोधरेचा शात, सुदर चेहरा दिसला पण पुत्रमुख दिसले नाही कारण यशोधरेच्या हाताने मुलगा झाकला गेला होता हिचा हात बाजूला करून मुलाचे मुख पाहिले, तर ती जागी होईल व आपल्या ससारत्यागास कडाडून विरोध करील म्हणून सिद्धार्थ मुलाला न पाहताच महालातून बाहेर पडला मात्र त्याने मनातल्या मनात यशोधरेला उद्देशून म्हटले, " हे प्रिय पत्नी, मी तुला व नवजात मुलाला सोडून जात आहे म्हणून मी कठोर आहे असे नव्हे, पण मला जर शाश्वत सुखाचा मार्ग सापडला, तर मी तुम्हा दोघांचे कल्याण करीनच, पण त्याबरोबर इतर जणाचेही कल्याण करीन "

त्या रात्री सिद्धार्थ व छन्न हे दोघे कथक अश्वाच्या पाठीवर बसून निघाले ते तीन राज्ये ओलाडून नोम नावाच्या नदीच्या काठी आले तेथे सिद्धार्थने आपली राजवस्त्रे उतरली आणि भिक्षूचा वेष धारण केला त्याने छन्नाला राजधानीस परत पाठवले "कथकालाही आपल्या बरोबर ने" असे त्याने छन्नाला सागितले पण सिद्धार्थाचा वियोग सहन न झाल्याने कथकाने परतीच्या वाटेवर प्राण सोडला सिद्धार्थने वनात जाऊन योगाभ्यास चालविला, साधना सुरू केली त्या वेळी कौंडिण्य, वप्र, भद्रिय, महानाम आणि अश्वजित हे पाच तेजस्वी ब्राह्मण त्याला मिळाले सिद्धार्थने हटयोगाचा अभ्यास केला आणि अन्नग्रहण कमी कमी करीत मूग किंवा कुळीथ यांचा वाटीभर रस पिऊन तो राहू लागला. त्या वेळी ते

पाच ब्राह्मण आपसात म्हणाले, "हा बुद्ध होऊन आम्हाला ज्ञानाचा मार्ग दाखवील असे वाटले होते, पण हा स्वतःच्याच तपश्चर्येत मग्न आहे याच्यापासून आपला काही फायदा नाही" असा विचार करून ते पाच ब्राह्मण काशीजवळ सारनाथ येथे गेले सिद्धार्थाने दुःखाच्या कारणपरंपरेचा शोध लावला आपल्याला झालेला साक्षात्कार त्या पाच शिष्यांना सांगावा असा विचार त्याने केला, तेव्हा ते काशीस सारनाथ येथे गेल्याचे समजले म्हणून सिद्धार्थ स्वतः उरूवेलेहून सारनाथला आला जाण्यापूर्वी सिद्धार्थाने सांगितले

वाराणसी गमिष्यामि ।<br>
गत्वावै काशिका पुरी ॥<br>
धर्मचक्र प्रवर्तिष्ये ।<br>
लोकेस्व प्रवर्तितम् ॥

(मी काशीला जात आहे. तेथे जाऊन मी धर्मचक्राचा प्रसार करीन हे धर्मचक्र कोणी उलटवू शकणार नाही)

याच ठिकाणी सिद्धार्थाने आपल्या पाच शिष्यांना एकत्र आणले आणि पहिले प्रवचन दिले ते ऐकून पाच शिष्य प्रभावित झाले आणि 'बुद्धम् शरणम् गच्छामि' असे म्हणून त्यांनी बुद्धाचे नेतृत्व मान्य केले हीच बौद्ध धर्माची स्थापना अशा परम पवित्र जागी जाण्याची आपल्याला संधी मिळाली याबद्दल मला धन्यता वाटली आणि उत्तरखंडाच्या दीर्घ परिक्रमणेचे सार्थक झाले

# नितांत सुंदर- सारनाथ

सिद्धार्थांनी वयाच्या एकोणतिसाव्या वर्षी राजगृह सोडले वयाच्या छत्तिसाव्या वर्षी वैशाखी पौर्णिमेला ते बुद्ध झाले सारनाथ येथे त्यानी पाच शिष्यांना पहिला उपदेश केला, तो दिवस आषाढी पौर्णिमेचा होता त्यानी आपल्या पहिल्या उपदेशात काय सांगितले, ते अनेक पाली ग्रथाच्या आधाराने प्रा धर्मानंद कोसबी यानी पुढील शब्दात दिले आहे–

" भिक्षुहो ! कामोपभोगामध्ये सुख मानणे हा एक अत आहे, पण हा हीन, ग्राम्य, अज्ञजनसेवित, अनार्य आणि अनर्थावह आहे देहदडन करणे हा दुसरा अंत आहे हादेखील दुःखकारक, अनार्य आणि अनर्थावह आहे तपस्व्याने या दोन अतांचे सेवन करू नये तथागताने या दोन अतांच्या मधला मार्ग शोधून काढला आहे

" भिक्षुहो ! जन्म, जरा, व्याधी, मरण, अप्रिय वस्तूचा समागम आणि प्रिय वस्तूचा वियोग इत्यादी गोष्टींमुळे मनुष्याला इहलोकी दु ख होते हे जे रावापासून रकापर्यंत सर्वसाधारण दुःख, त्याला मी दु ख नावाचे पहिले आर्यसत्य म्हणतो

" या सर्व दु खांचा उगम तृष्णेमध्ये होत असतो. इहलोकीच्या उपभोगांची तृष्णा, स्वर्गलोकी उत्पन्न होण्याची तृष्णा, आणि यथेच्छ सुख भोगून आत्महत्या करून जगातून नाहीसे होऊन जाण्याची तृष्णा, या तीन तृष्णांमुळे मनुष्यप्राणी अनेक पापे आचरतो, आणि दु खभागी होतो म्हणून तृष्णेला दु खाचे मूळ समजले पाहिजे या दुसऱ्या सिद्धांताला मी दु खसमुदाय आर्यसत्य असे म्हणतो

" तृष्णेचा निरोध केला तरच निर्वाणाचा लाभ होईल देहदडनाने किंवा कामोपभोगाने मोक्षप्राप्ती होणार नाही, हा तिसरा सिद्धांत होय याला मी दुःख-निरोध आर्यसत्य असे म्हणतो

" सम्यक् दृष्टी, सम्यक् सकल्प, सम्यक् वाचा, सम्यक् कर्मांत (कर्म), सम्यक्

आजीव, सम्यक् व्यायाम, सम्यक् स्मृती आणि सम्यक् समाधी, हा तो मी नवीन शोधून काढलेला मधला मार्ग होय दु:खाचा निरोध याच मार्गाने होणार आहे व्रते आणि उपोषणे करून दु:खाचा निरोध व्हावयाचा नाही, हा चौथा सिद्धांत होय याला मी दु:खनिरोधगामिनी प्रतिपदा आर्यसत्य असे म्हणतो

"या चार आर्यसत्याचे आणि तदंतर्गत आर्यअष्टांगिक मार्गाचे ज्ञान झाल्यामुळेच मी सम्यक्संबुद्ध या पदाला पोहोचलो आहे

त्या पाच ब्राह्मण तपस्व्यांपैकी कौंडिण्य ब्राह्मणाला प्रथमत बुद्धाच्या धर्मोपदेशाचे रहस्य समजले, म्हणून त्याला आज्ञात कौंडिण्य (जाणणारा कौंडिण्य) असे टोपण नाव पडले अनुक्रमे इतरांनाही धर्मबोध होऊन ते पाचही तपस्वी अर्हंत झाले व आपणाला बौद्ध धर्माची दीक्षा देण्यासाठी तथागताला त्यानी विनती दिली

तेव्हा बुद्ध म्हणाले, "भिक्षुहो ! या माझ्या धर्माचा अंगीकार करा व ब्रह्मचर्येचे पालन करून भवदु:खाचा अंत करा !"

हे बुद्धानी उच्चारलेले शब्दच त्या पाच तपस्व्यांचा प्रव्रज्याविधी झाला

या पहिल्या प्रवचनानंतर बुद्धाच्या शिष्यात भर पडत चालली त्याची संख्या एक हजारावर गेली, तेव्हा बुद्धांनी निवडक शिष्यांना दाही दिशाना पाठवून या नव्या धर्माचा प्रसार केला या अहिंसामय धर्माचा प्रारंभ सारनाथ येथे झाला सारनाथ हा सारंगनाथाचा अपभ्रंश आहे सारंग म्हणजे हरिण बुद्धांना हरणाचा फार लळा होता म्हणून आजही सारनाथ येथे हरणांचा एक कळप आहे बुद्धांच्या काळी राजे लोक हरणाची शिकार करीत, पण बुद्धांनी त्या राजांना अहिंसेचे महत्त्व पटवून दिले राजानी ही हत्या बंद केली आणि या वनाचे नाव मृगदाव असे पडले सारनाथ ही धर्मचक्रप्रवर्तनाची पवित्र जागा म्हणून सम्राट अशोक व इतर बौद्ध धर्मीय राजांनी येथे अनेक स्तूप, विहार व उद्याने बांधली युआन च्वांग या प्रसिद्ध चिनी प्रवाशाने इसवीसनाच्या सातव्या शतकात सारनाथला भेट दिली, तेव्हा येथे बौद्धाच्या ३० विहारात १५०० भिक्षू राहत होते, असे त्याने म्हटले आहे तसेच या ठिकाणी हिंदूंची शंभर मंदिरे होती, अशीही नोंद त्याने केली आहे मोगल सम्राटांनी १२ व्या शतकात व नंतर येथील अनेक स्तूप, विहार व मंदिरे यांचा विध्वंस केला त्यात कुतुबुद्दीन ऐबकाने प्रमुख भाग घेतला आहे

सारनाथ येथील प्राचीन अवशेष शोधून काढण्यासाठी ब्रिटिशांच्या अमदानीत लॉर्ड कनिंगहॅम याने पुढाकार घेतला पुढे अधिकृतपणे पुरातत्त्व विभाग सुरू झाला आणि विसाव्या शतकाच्या प्रारंभी भारत सरकारने सारनाथ येथे उत्खनन करून प्राचीन अवशेष पुन्हा लोकांच्या अवलोकनात येतील अशी व्यवस्था केली आहे त्यात अनेक विहार, मंदिरे भग्नावस्थेत आढळली १९५६ मध्ये भारत सरकारने बुद्धाच्या अडीच हजाराव्या जयंतीनिमित्त सारनाथला परकीय व भारतीय प्रवाशांचे

एक महत्त्वाचे प्रेक्षणीय स्थळ केले, पण सारनाथच्या जीर्णोद्धाराचे खरे श्रेय सिलोनच्या (श्रीलका) महाबोधी सस्थेचे सस्थापक अगारिका धर्मपाल यांच्याकडे जाते एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात ते सारनाथ येथ आल, तव्हा भगवान बुद्धांच्या प्रथम प्रवचनाच्या या ठिकाणाची अवस्था अत्यत केविलवाणी होती या मोकळ्या मैदानावर डुकरे, मोकाट जनावरे हिंडत असत सर्वत्र कचरा व घाण पडली होती अगारिका धर्मपाल यानी प्रथम ती जागा साफसूफ करून भोवती कुपण घातले नतर त्यानी येथे अत्यत सुदर व विशाल असे मदिर बाधले तेच आजचे मूलगध कुटी विहार या मदिराभोवती त्यांनी उत्तम उद्यानही तयार केले याच मंदिरात त्यांची रक्षा ठेवण्यात आली आहे आजही या मदिराची व आसपासच्या आश्रम, स्तूप वगैरेंची व्यवस्था श्रीलकेच्या महाबोधी सस्थेकडे आहे सारनाथ आणि बद्धगया ही बद्धाची धर्मस्थाने असल्याने तेथील व्यवस्था आपल्या सस्थेकडे असावी अशी अगारिका धर्मपाल यानी महात्मा गांधींच्याकडे विसाव्या शतकाच्या सुरुवातीस विनती केली होती, पण महात्माजींनी त्याना कळविले की भारताचे स्वातत्र्यच हा प्रश्न सोडवू शकेल भारताला स्वातत्र्य मिळाल्यानतर १९५३ मध्ये राष्ट्राध्यक्ष डॉ राजेंद्र प्रसाद यानी या दोन धर्मस्थळाची व्यवस्था महाबोधी सस्थेकडे समारभपूर्वक दिली

मूलगध कुटी विहार हे सारनाथ येथील मुख्य मदिर आहे या मंदिरात भगवान बुद्धाची मूर्ती असून बुद्धाचे अवशेष तेथे एका पेटीत ठेवण्यात आले आहेत मदिर अत्यत स्वच्छ, सुदर आणि शात आहे आतील भितीवर एका जपानी बौद्ध चित्रकाराने बुद्धाच्या जीवनातील प्रमुख प्रसग चित्रित केले आहेत या मंदिरातील बुद्ध मूर्ती मूळ दगडी आहे, पण दार्जिलिंग येथील एक बुद्धभक्त श्री लेडन यानी तीवर सोन्याचा वर्ख चढविला आहे उपदेशकाच्या भूमिकेतील मूळ गुप्तकालीन मूर्तीवरून ही तशी मूर्ती बनवली आहे या मूर्तीखालील पेटीतील भगवान बुद्धाचे अवशेष वर्षातून एकदा दर्शनासाठी खुले केले जातात तो दिवस म्हणजे कार्तिक महिन्यातील पौर्णिमा या मदिराच्या दरवाजातील घटा अनेक धातूच्या मिश्रणाने तयार केली आहे ही घटा जपानची भेट आहे डॉ सपूर्णानद यांनीही सारनाथच्या सुविधांसाठी खूपच कष्ट घेतले मृगदाव हे हरणाचे क्षेत्र ही त्याचीच देणगी आहे तसेच सारनाथ येथील रस्ते, उद्याने व इतर अनेक सोयी डॉ सपूर्णानद याच्या साहाय्यामुळे मिळाल्या आहेत या मदिराला मूलगध कुटी विहार असे नाव देण्याचे कारण असे की प्राचीन काळी याच नावाचा विहार येथे होता असे पाली ग्रथातील पुराव्यावरून आढळून आले आहे

भगवान बुद्धाच्या अस्थी सारनाथ येथे केव्हा आणल्या असे मी प्रमुख भिक्षू रेवथा थोरो यांना विचारले तेव्हा ते म्हणाले, "भारत स्वतत्र झाल्यावर उत्तर

प्रदेश सरकारने या महत्त्वाच्या ठिकाणी बुद्धांचे अवशेष हवेत असा आग्रह धरला सिक्किममध्ये बुद्धाचे काही अवशेष होते, त्यांतील एक भाग देण्यास सिक्किमच्या राजेसाहेबानी मान्यता दिली फार मोठ्या इतमामाने व अवाढव्य समारभाने या अस्थी सिक्किमच्या राजकुमारांनी स्वत हत्तीवर बसून सिक्किममधून सारनाथ येथे आणल्या या अस्थी येथे आणण्याचे मुख्य श्रेय त्यावेळचे मुख्यमत्री प गोविंद वल्लभ पत यांच्याकडे जाते भगवान बुद्धाच्या अस्थींबरोबरच त्यांचे शिष्य सारिपुत मोगद्‌ग्लायन याच्याही काही अस्थी आणण्यात आल्या या महत्त्वाच्या प्रसगी केवळ भारतातीलच नव्हे, तर श्रीलका, थायलड, जपान, ब्रह्मदेश, चीन अशा अनेक देशांतील बुद्धभिक्षू आणि राजदूत हजर होते काशीनरेशाचे पाहुणे म्हणून सिक्किमच्या राजकुमारांनी बुद्धाच्या अस्थीचा सुवर्णकलश हत्तीवरून आणून त्याची या मदिरात स्थापना केली

मदिराच्या डाव्या बाजूला एक पिंपळाचे प्रचड झाड आहे बुद्धगया येथे ज्या पिंपळाखाली सिद्धार्थांना बुद्धत्व प्राप्त झाले, त्याच वृक्षाची एक शाखा १९३१ मध्ये आणून येथे लावण्यात आली त्या शाखेचा आज विशालवृक्ष झाला आहे. त्यामुळे बौद्धधर्मीयांना हा वृक्ष मूळ बोधिवृक्षाइतकाच पवित्र वाटतो सारनाथ येथील सर्वांत मोठी अती प्राचीन वास्तू म्हणजे धमेक स्तूप त्याची उची १५० फूट आणि परीघ १०० फूट आहे धमेक हे त्याच नाव धर्मचक्रवरून पडले आहे धर्म चक्र धम्मचक्क–धम्म+अक–धमक–धमेक असा या नावाचा प्रवास आहे याच जागी बुद्धानी पाच शिष्याना उपदेश केला असावा म्हणून त्या युगप्रवर्तक घटनेचे एवढे भव्य स्मारक केले असावे असा तज्ज्ञांचा अदाज आहे " या स्तूपाच्या पोटात अगर त्याखाली काही प्राचीन मूर्ती अथवा इतर वस्तू आहेत काय ते पाहण्यासाठी साठ वर्षांपूर्वी एक बोगदा खणून पाहणी करण्यात आली होती पुरातत्त्व विभागातर्फे झालेल्या पाहणीत असे आढळून आले की या स्तूपाच्या गर्भात अगर तळात काहीही मौलिक वस्तू अथवा बाधकाम नाही स्तूपाच्या एका बाजूला दगडावर अत्यत सुदर नक्षी आहे या नक्षीचे डिझाईन अनेक बनारसी शालू व इतर रेशमी कपड्यांवर चितारलेले आढळते सम्राट अशोकाने या भागात जे चार स्तूप बांधले त्यांपैकी हा एकच शिल्लक आहे बाकीचे तीन नष्ट झाले मात्र त्यांपैकी एका स्तूपाचा उघडा बोडका उचवटा दिसतो त्याला चौखडी स्तूप म्हणतात उत्खनन करून शोधून काढलेल्या प्राचीन बुद्ध विहारांचे अवशेष दूरवर पसरलेले आहेत. त्याच्या पाडलेल्या भिंतीचे काही भाग फक्त आज दिसतात या जागेवरील प्राचीन वास्तू नष्ट झाल्याचे पाहून मन उद्विग्न व विषण्ण होते.

सारनाथ हे जैनाचेही धर्मक्षेत्र आहे कारण धमेक स्तूपाजवळच सिंहपूर ही जैन तीर्थंकर श्रेयांसनाथ यांची जन्मभूमी आहे श्रेयांसनाथ हा श्रेयांसनाथचा अपभ्रंश

असून हे जैनांचे २४ वे तीर्थंकर होते तेथे आज ते जैन मदिर आहे, ते १२५ वर्षां पूर्वी बांधलेले आहे, त्याजवळच अशोक स्तभ आहे. त्याची उंची सुमारे ११ मीटर आहे अलाहाबाद येथील स्तंभासारखाच हा स्तभ आहे तो इतका गुळगुळीत आहे, की, त्यात आपले प्रतिबिंब दिसते बौद्ध धर्माचा स्वीकार ज्यांनी केला आहे, अशा अनेक राष्ट्रांनी सारनाथ या पुण्यभूमीवर मंदिरे बांधली आहेत ती मंदिरे त्या त्या राष्ट्रांच्या स्थापत्यकलेची उत्तम प्रतीके आहेत चिनी मंदिराचे प्रवेशद्वार उंच व भव्य आहे त्यातून आत गेल्यावर पॅगोडाच्या आकाराचे चिनी बुद्ध मदिर आहे ब्रह्मदेशच्या बौद्ध धर्मीयांनी प्राचीन बुद्धविहारांच्या खड अवशेषाजवळ जे मंदिर बांधले आहे, ते ब्राह्मी बुद्ध मदिर म्हणून प्रसिद्ध आहे नेपाळी लोकांनी बांधलेले एक नेपाळी मंदिरही या भागात आहे येथे जे शिवमंदिर आहे, ते सारंगनाथ महादेव मंदिर म्हणून प्रसिद्ध आहे दरसाल ऑगस्टमध्ये तेथे यात्रा भरते सारंग नाथांच्या मंदिरात दोन समान शिवलिंगे आहेत, हा त्याचा एक विशेष लक्षात राहण्यासारखा आहे जवळच एक तळे असून त्यात कमळे उगवतात त्याला कमळ सरोवर असे नाव आहे या तलावाचा भाग अत्यंत सुंदर व शांत आहे आपल्या-कडील अनेक तीर्थक्षेत्रांत जी अस्वच्छता, गोंगाट व अव्यवस्था आढळते, तिचा मागमूसही सारनाथ येथे नाही सुंदर उद्याने, तलाव, स्वच्छ मंदिरे व नीरव शांतता यांमुळे सारनाथ परिसर मनाला शांतता व प्रसन्नता देतो येथे घालविलेले तास दोन तास कोणत्याही प्रगल्भतेचा साक्षात्कार घडविल्यावाचून राहणार नाहीत मी जगात अनेक मंदिरे, प्रार्थनास्थळे पाहिली आहेत चर्चेस आणि बुद्ध मंदिरे ही स्वच्छता, प्रसन्नता व शांतता या गुणांनी उठून दिसतात असे वातावरण मला कन्याकुमारी येथे विवेकानंद स्मारकाच्या ठिकाणी आढळले

सारनाथ येथील वस्तुसंग्रहालय हे अत्यंत प्रेक्षणीय आहे रेवथा थोरो यांनी माझ्याबरोबर आपला सहकारी दिला होता आणि सिंहली भाषेत तेथील क्युरे-टरना पत्र दिले होते त्यामुळे क्युरेटरनी माझ्यासाठी खास गाईड देऊन मला संबंध वस्तुसंग्रहालय दाखविण्याची व्यवस्था केली हे संग्रहालय भारत सरकारने उभारले आहे त्यात अनेक प्राचीन व बहुमोल मूर्ती, स्तभ, शिल्पाचे नमुने वगैरे आहेत विशेष म्हणजे त्यातील काही वस्तू इसवी सनपूर्व तिसऱ्या शतकातील आहेत ज्या अशोकस्तंभावरून भारत सरकारने आपले राष्ट्रीय चिन्ह तयार केले आहे, तो मूळ स्तभ या संग्रहालयात आहे त्यावरील सिंह, चक्र व इतर नक्षीकाम अत्यंत सुबक आहे तिसऱ्या शतकातील जी बुद्धमूर्ती येथे आहे ती प्रथम प्रवच-नांच्या वेळेचे दृश्य दर्शविते या मूर्तीखाली बुद्धाचे पहिले पाच शिष्य आणि त्यांच्या-मध्ये धर्मचक्र अशा लहान मूर्ती कोरल्या आहेत याच मूर्तीबरहुकूम दुसरी मूर्ती करून ती मूलगंध कुटिविहारात बसविण्यात आली आहे सारंगनाथ येथील उत्ख-

ननात सापडलेली अनेक भांडी, कमडलू, मूर्ती वगैरे या सग्रहालयात आहेत लाल दगडापासून तयार केलेली उभी बुद्धमूर्ती ही येथील एक अत्यत दुर्मीळ वास्तू आहे ती पहिल्या शतकात तयार करण्यात आली आहे भगवान बुद्धाच्या बहुतेक मूर्ती ध्यानस्थ किंवा ' निर्वाण ' अवस्थेतील आहेत उभी मूर्ती ही अत्यत दुर्मीळ आहे तसेच बुद्ध जमिनीला स्पर्श करीत असल्याची एक दुर्मीळ मूर्ती येथे आहे पहिले प्रवचन देण्यापूर्वी बुद्ध भूमातेला वदन करीत असल्याचे हे दृश्य आहे भगवान बुद्धांच्या जीवनातील अनेक प्रसग चित्रित करणारी दगडातील शिल्पे किंवा कापडावरील चित्रे या सग्रहात विपुलतेने पाहावयास सापडतात सग्रहालयासमोर सुदर उद्यान आहे पुरातत्व विभागाची प्रकाशने विकत मिळण्याची सायही येथे करण्यात आली आहे बौद्ध धर्म आणि बुद्धविषयक शिकवण यांचा अभ्यास करणाऱ्याना हे वस्तुसग्रहालय म्हणजे एक अमोल ठेवाच आहे

या ठिकाणाला सारनाथ हे नाव अगदी अलीकडे पडले आहे बुद्धकाली याचे नाव ऋषिपत्तन असे होते. आपल्या धर्माच्या प्रसारार्थ भगवान बुद्ध प्रवास करीत करीत अखेर गोरखपूर भागात वैशाली येथे आले त्या ठिकाणी त्यांनी आपल्या शिष्यांना उपदेश केला, " भिक्षूहो, जीवनात चार मृत्युपस्थाने आहेत आपल्या देहाचे, वेदनांचे, चित्ताचे व मनोवृत्तीचे यथार्थ अवलोकन करणे ही ती चार मृत्युपस्थाने होत चार सम्यक् प्रयत्न आहेत जे पापविचार उत्पन्न झाले नसतील ते उत्पन्न होऊ न देण्याविषयी, जे पापविचार उद्भवले असतील त्यांच्या नाशाविषयी प्रयत्न, जे पुण्यविचार उत्पन्न झाले नसतील ते उत्पन्न करण्याविषयी, आणि जे पुण्यविचार उत्पन्न झाले असतील त्यांची अभ्युन्नती करून त्यांची पूर्तता करण्याचे 'प्रयत्न " याच वेळी त्यांनी सांगितले, " माझे कर्तव्य मी केले आहे आणखी तीन महिन्यानी माझे परिनिर्वाण होणार आहे."

त्यानतर बुद्ध भांडग्राम, हस्तिग्राम, भागनगर वगैरे ठिकाणी जाऊन पावा नावाच्या गावी आले तेथे एका लोहाराने त्यांना जे जेवण दिले, ते भक्षण केल्यावर भगवान बुद्ध म्हणाले, " हे जेवण तू दुसऱ्या कोणाला वाढू नकोस त्यातील एक पदार्थ कोणीही पचवू शकणार नाही " या भोजनानतर भगवान बुद्धांना अतिसाराचा विकार झाला त्यांनी आपल्या शिष्याना सांगितले, " माझा अंतकाळ जवळ आला आहे ज्यांना माझे अखेरचे दर्शन घ्यायचे आहे, त्यांना बोलवा " त्यावेळी ते कुंसिनारा येथे होते शिष्यांनी अखेरच्या दर्शनासाठी रीघ लावली भगवान बुद्धानी आपल्या शिष्याना बौद्ध धर्माचे पालन आणि प्रसार करण्याचे आवाहन केले त्यांचे अखेरचे शब्द असे होते, " सर्व सस्कार व्ययधर्मी आहेत. म्हणून सावधगिरीने वागा " मग बुद्ध ध्यानस्थ झाले पहिल्या ध्यानापासून सर्व समाधींची साधना करून ते पहिल्या ध्यानावर आले मग चौथ्या ध्यानावर येऊन

बुद्ध परिनिर्वाणास गेले

निर्वाणास जाण्यापूर्वी भगवान बुद्धांनी आपल्या शिष्यांना सूचना दिली होती, " माझ्या परिनिर्वाणानंतर माझ्या देहाची पूजा करू नका जो सन्मार्ग मी तुम्हाला शिकवलेला आहे, तो अनुसरा सावधान व्हा, उद्योगी व्हा शांत व्हा "

# बनारसचे बहुरंगी व्यक्तिमत्त्व

माणसांप्रमाणेच शहरानाही स्वतःचे असे व्यक्तिमत्त्व असते. त्याचा शोध घेणे हे अतिशय मनोरंजक आणि उद्बोधक कार्य आहे काही माणसे एकसुरी असतात तसेच शहरांचेही असते पंढरपूरचेच उदाहरण घ्या विठ्ठलाचे देऊळ आणि धार्मिक परंपरा हे पंढरपूरचे वैशिष्ट्य पण त्यापलीकडे हे गाव जात नाही महाबळेश्वर निसर्गसौंदर्यापर्यंतच थांबते. याउलट दिल्ली, मुंबई, कलकत्ता ही बहुरंगी व्यक्तिमत्त्वाची शहरे आहेत केवळ ती मोठी शहरे आहेत हे त्यांचे कारण नाही मद्रास हे मोठे शहर, राज्याची राजधानी असूनही एकसुरी आहे बनारस हे त्यामानाने लहान शहर आहे वस्ती आहे सहा लाखांच्या आसपास क्षेत्र आहे चौऱ्याहत्तर चौरस किलोमीटर. ही राज्याची राजधानीही नाही ती आहे लखनौ तसे पाहिले तर हे शहर देशाच्या एका टोकाला आहे तरीही विविधता, परंपरा आणि ज्ञाननिष्ठा यांत बनारस हे अत्यंत लक्षणीय असे मोठे शहर आहे काशीविश्वेश्वर आणि धार्मिक परंपरा ही बनारसची सर्वसामान्यपणे महत्त्वाची वैशिष्ट्ये पण त्याहून वेगळी अशी अनेक रंगतदार वैशिष्ट्ये या शहराने पैदा केली आहेत त्याचा धार्मिक परंपरांशी संबंध नाही, पण संस्कृतीशी निकटचा वारसा आहे बनारसची रेशमी, सुती वस्त्रे आणि नक्षीची भांडी बुद्धकालापासून प्रसिद्ध आहेत जातककथांमध्ये त्याचा उल्लेख आहे तसेच इसवी सनपूर्व तिसऱ्या शतकात लिहिल्या गेलेल्या 'अर्थशास्त्र' या ग्रंथातही त्यांचा गौरव करण्यात आला आहे अनेक देवालये आणि घरे यांच्या खांबावर आणि दरवाजावर अत्यंत सुंदर नक्षी कोरण्यात आली आहे गौतमेश्वर मंदिर हे त्याचे उत्तम उदाहरण आहे आग्र्याला जशा ताजमहालाच्या प्रतिकृती मिळतात तसेच बनारसला काचेचे वैशिष्ट्यपूर्ण झोलारे मिळतात पर्शियाहून या शहराला गालिच्यांची कला आली आहे

पक्ष्याला मानवी जीवनात अपूर्व स्थान आहे पक्ष्यांचे सौंदर्य आणि आकाशात विहार करण्याची त्यांची शक्ती यांचा मानवाला नेहमीच हेवा वाटत आला आहे विमानाची कल्पना प्रथम माणसाला सुचली ती पक्ष्यांच्या आकाशविहाराकडे पाहूनच क्रौंच पक्ष्याचा मृत्यू पाहून वाल्मीकींना आदिकाव्य सुचले बालवाङ्मयात पऱ्यांच्या खालोखाल पक्ष्यांना महत्त्व आहे अनेक देशांनी आपला राष्ट्रीय पक्षी घोषित केला आहे जसा भारताचा मोर पक्ष्यांचे मंजुळ आवाज ऐकून आदिकालापासून मानवाचे मन प्रसन्न झाले आहे पक्ष्यांना पात्रे बनवून 'तोता-मैना'-सारखी पुस्तके लिहिली गेली आहेत 'पंचतंत्रा'सारख्या हजारो वर्षांपूर्वीच्या कथा-वाङ्मयातही पक्ष्यांना बोलके केले आहे जगात स्थूलमानाने एकंदर ८६०० प्रकारचे पक्षी आहेत. त्यापैकी सुमारे १६०० प्रकारचे पक्षी भारतात सापडतात पक्षी पाळण्याचा छंद भारतात राजेरजवाड्यांपासून सर्वसामान्य माणसांपर्यंत हजारो वर्षे चालू आहे निर्यातीसाठी भारतातील ज्या शहरांत पक्ष्यांचे योजनापूर्वक पालन व पैदास केली जाते त्यांत कलकत्ता, बनारस, लखनौ, दिल्ली, मुंबई, जौनपूर, मीरत, बंगलोर ही मुख्य आहेत कलकत्ता येथे आसाम, बंगाल, ओरिसा इत्यादी भागांतील पक्षी येतात बनारसला नेपाळ, भूतान, आसाम, हिमाचलप्रदेश या भागांतून विविध प्रकारचे पक्षी येतात विशेषत हिमालयावर बर्फ पडून थंडीचा कडाका वाढला की बनारसच्या बाजूला पक्ष्यांची रीघ लागते बनारसमधून दरसाल ७५ ते ८० लक्ष रुपयांचे पक्षी परदेशी पाठविण्यात येतात अनेक प्रांतांतून बनारसचे व्यापारी विविध प्रकारचे पक्षी मागवून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेसाठी त्यांची विक्री करतात अमेरिका, इंग्लंड व पश्चिम जर्मनी हे देश प्रामुख्याने या पक्ष्यांचे खरेदीदार असतात पक्ष्यांना शिकारीचे व अन्य शिक्षण पद्धतशीरपणे देणारे पक्ष्यांचे व्यापारी बनारसमध्ये आहेत

शहराच्या कुतुबशहा भागात पक्ष्यांचा मोठा बाजार आहे पोपट, मैना, कोकीळ, कबूतर, तीतर, नीलकंठ, बुलबुल, रुजीपेस्टर, श्यामा, मुनिया इत्यादी पक्ष्यांची घाऊक पद्धतीवर येथे विक्री होते कबुतरांचा वेगळा बाजार आहे. तेथे काही व्यापारी त्या वेळी पाच-पाच हजार कबुतरे विकतात कलकत्त्याच्या खालोखाल बनारसचा पक्षीबाजार भारतातील सर्वांत मोठा आहे संपूर्णपणे पिवळा असलेला एक दुर्मीळ पोपट बनारसच्या बाजारात पाच हजार रुपयांना विकला गेला परदेशातील पक्षीसंग्रहालयासाठी असे दुर्मीळ पक्षी विकत घेतले जातात काही पक्ष्यांचे भारतातील अस्तित्व नष्ट होऊ नये म्हणून त्यांच्या निर्यातीवर व विक्रीवर सरकारी निर्बंध आहेत पण अशा नियमांचे काटेकोर पालन होणे हे कठीण असते बनारसमध्ये 'मॉडर्न बर्ड्स एम्पोरियम', 'नॅशनल झू' 'गुफटान बर्ड्स् कंपनी', 'खान अँड सन्स', 'बनारस ए बियरी' या कंपन्या पक्ष्यांची विक्री करतात.

त्यापैकी सर्वांत मोठी कंपनी पक्ष्यांना धान्य घालण्यासाठी दरमहा दहा हजार रुपये खर्च करते

जगातील सर्वोत्कृष्ट वस्त्रांच्या निर्मितीबद्दल बनारसची ख्याती हजारो वर्षांची आहे आज बनारसी साडी सर्वत्र प्रसिद्ध असली तरी बनारसमध्ये सुती, उनी आणि रेशमी अशा प्रकारच्या दर्जेदार वस्त्रांच्या निर्मितीची परंपरा फार जुनी आहे जातक कथातही बनारसच्या सुती व रेशमी वस्त्राचा उल्लेख आहे बुद्धाचा पार्थिव देह बनारसच्या मलमलीमध्ये झाकण्यात आला होता 'प्राचीन भारत का सामाजिक इतिहास' (डॉ जयशंकर मिश्र) या ग्रंथात (पृष्ठ १७२) बनारसच्या या प्राचीन परंपरेचा गौरव करण्यात आला आहे 'कासीकुत्तम', 'कसाय', 'काशीवस्त्र' या नावानी बुद्धकाळात काशीचे कापड प्रसिद्ध होते इसवी सनाच्या पहिल्या पहिल्या शतकातही काही पाश्चात्य लिखाणात (उदा पेरिप्लस) बनारसच्या तलम कापडाचा उल्लेख आहे काशीचे काही विणकर पुढे डाका येथे गेले व डाक्क्याची मलमल विख्यात झाली. तलम वस्त्रावर नक्षी व वेलबुट्टी काढण हे काशीच्या विणकरांचे खास कौशल्य आहे सारनाथ येथील प्राचीन धमेक स्तूपावर दगडात जी नक्षी कोरली आहे, ती त्या काळच्या काशीच्या वस्त्रावरील नक्षीची नक्कल आहे काही इतिहासकाराच्या मते रेशीम हे भारतात चीनमधून आले बनारसजवळच्या एका राजपुत्राचा विवाह चीनच्या एका राजकन्येशी झाला, तो सुमारे ख्रिस्तशतक सुरू होण्याच्या सुमाराला या राजकन्येने माहेरहून येताना रेशमी वस्त्रे व रेशमाचे किडे प्रथम भारतात आणले, असे या इतिहासकाराचे मत आहे मात्र 'काशी का इतिहास' या ग्रंथात असे आग्रहपूर्वक प्रतिपादन केले आहे की चीनमधून रेशीम भारतात येण्यापूर्वीच येथे रेशमाचे किडे व रेशीम होते

सारनाथ, बबुरी, चुनार, मदनपुरा, अलईपुरा इत्यादी भागांत बनारसी साड्या तयार होतात एक साडी तयार करण्यासाठी विणकर, डिझायनर, रंगारी, नक्षीकाम करणारा, जरीकाम भरणारा व पॉलिशवाला अशा कारागिराची आवश्यकता असते उत्कृष्ट रेशमी साडी तयार करण्याचे शिक्षण मुबारकपूरमध्ये देण्यात येते १८ व्या शतकात बनारसमध्ये रेशमी साड्या तयार करणारे तीन हजार कारागीर होते. आज त्यांची सख्या चाळीस हजारांवर गेली आहे गदौलियापासून विश्वनाथ मंदिरापर्यंतच्या रस्त्यावर दुतर्फा दुकानातून बनारसी रेशमी साड्यांचा नुसता खर्च पडलेला असतो एका बनारसी साडीसाठी जेवढे रेशीम लागते त्याचा एकत्र धागा केला तर तो मुंबईपासून नवी दिल्लीपर्यंत पोचेल, असे एका विणकराने मला सांगितले, तेव्हा मला त्यांच्या कलेचे विशेषच कौतुक वाटले कारण रेशमाचा धागा अत्यंत सूक्ष्म असतो. व त्यांचे वस्त्र विणणे ही अतिशय अवघड कला आहे बनारसच्या उंची वस्त्रांनी लंडन येथे राजा जेम्स याचा राजवाडा आणि पॅरिस-

जवळील जगप्रसिद्ध व्हर्साय येथील वाडा सजविला गेला होता फर्निचरच्या गाद्या-भोवतींचे कापड आणि पडदे यासाठी ही भरजरी वस्त्रे वापरली गेली होती.

रामलीला हा करमणूक व उद्‌बोधन यांच्या रंगतदार मिश्रणाचा प्रकार बनारसमध्ये सुरू झाला. आजही येथे नवरात्रात चाळीसवर रामलीला चालू असतात सर्वांत मोठी व महत्त्वाची रामलीला बनारस हिंदू विद्यापीठासमोरच्या लंका भागात होते. तिला अद्यापही काशीचे नरेश हजर राहतात तेथील लंका-दहनाचा कार्यक्रम अत्यंत भव्य व प्रभावी असतो तो पाहण्यासाठी भारताच्या दूर-दूरच्या भागातील प्रवासी व अनेक परकीय प्रवासीही येतात प्राय उत्तर भारतात लोकप्रिय झालेली ही रामलीला आता देशाच्या इतर भागातही दिसू लागली आहे. मुंबईतही आझाद मैदान व शिवाजी पार्क येथे रामलीला व लंकादहनाचे मोठे कार्यक्रम होतात नौटंकी या उत्तरेतील लोकनाट्याचा उगम रामलीलेतूनच झाला आहे बंगालमधील जात्रा या लोकनाट्य प्रकाराचा बराच प्रभाव नौटंकीवर पडला आहे बनारसच्या संगीत व नृत्यपरंपरेचा मागोवा आपण घेतलाच आहे

बनारसला अत्तरांचा मोठा शौक आहे फार पूर्वीपासून– निदान दोन हजार वर्षे– काशीला धनाढ्य, रसिक लोक यात्रेसाठी येत त्यांना सुगंधी द्रव्यांची हौस होती बनारसपासून जवळच असलेले जौनपूर हे अत्तराच्या उत्पादनासाठी कनोज-प्रमाणेच सबंध भारतात मशहूर आहे केवळ अत्तरेच नव्हेत, तर सुगंधी तेले उटणी, अर्क, धूप, उदबत्त्या यांच्या निर्मितीचे व व्यापाराचे मोठे केंद्र म्हणजे बनारस गदौलियासारख्या मोठ्या चौकात सुगंधी द्रव्यांची ठोक व्यापाराची दुकाने आहेत किरकोळ विक्रीची दुकाने शहरभर पसरली आहेत अंगाला लावण्यासाठीच नव्हे, तर सरबत व मिठाई यातही बनारसला सुगंधी द्रव्ये वापरतात अंगाला सुवासिक तेल लावून मालीश करून घेण्याची पद्धतही बनारसला मोठ्या प्रमाणावर आहे

अनेक प्रकारच्या दंगली हे बनारसचे एक खास वैशिष्ट्य आहे मात्र यातील 'दंगल' हा शब्द आपण 'जातीय दंगल' म्हणतो त्यापैकी नसून 'कुस्त्यांची दंगल' म्हणतो त्यातील आहे काशीवर दोन संशोधनात्मक ग्रंथ लिहिणारे श्री विश्वनाथ मुखर्जी याबाबत माझ्याशी बोलताना म्हणाले, "वादविवाद, संघर्ष, दंगल ही आमची हजारो वर्षांची परंपरा आहे काशीचे पंडित विद्वत्सभेसाठी बाहेर पडले, की त्यांच्या स्त्रिया एकमेकींशी भांडणे करीत, उणेदुणे काढीत आणि संघर्षाची आपली हौस भागवून घेत काशीत मोकाट सांडांची संख्या भरपूर त्यांच्या टकरा पाहणे हा काशीकरांचा आवडता उद्योग संस्कृत पंडितांचे शास्त्रार्थांचे वाद-विवाद या पण आम्ही दंगलीच समजतो कोंबड्यांची झुंज हा प्रकार हैदराबादहून लखनौला आणि तेथून बनारसला आला आहे व लोकप्रियही झाला आहे पांच रुपयांपासून दोनशे रुपयांपर्यंत पैजा लावून कोंबड्यांची बाजी लावली जाते तितर

पक्ष्याच्या उड्डाणाच्या शर्यंही लावण्याचाही छंद बनारसकरांना आहे बटेर झुंजीचा प्रकारही लखनौहून येथे येऊन लोकप्रिय झाला आहे बुलबुल पक्ष्यामध्ये पोस्ता, भुजगा, कांगडा इत्यादी जाती आहेत त्यात पोस्तांचा मान मोठा आहे देशी बुलबुलमध्ये सिया आणि तिखी जातीला अधिक मागणी असते दंगलीच्या दिवशी त्याला भुकेला ठेवतात म्हणजे तो अंगात चेव येऊन लढतो खाणे घातले तर तो सुस्त होतो मकर संक्रांतीला पतंग उडविल्याची दंगल होते लाल, मेढा, कबूतर यांच्या दंगली व शर्यतीही बनारसमध्ये मोठ्या आवडीने केल्या जातात

लाकडावरील कोरीव काम आणि नक्षीची भांडी हे बनारसचे अडीच हजार वर्षांचे वैशिष्टय आहे मातकाम व धातूची भांडी याविषयी हे शहर बुद्धाच्या काळापासून मशहूर होते ब्रिटिश विल्यम फॉस्टर (१५८३) आणि शहाजहानच्या कारकीर्दीत आलेला फ्रेंच प्रवासी बर्नियर यांनी आपल्या प्रवासवर्णनात बनारसची रेशमी वस्त्रे, मातीची सुबक भांडी आणि धातूची नक्षीदार पात्रे याचे गौरवपूर्ण उल्लेख केले आहेत. तसेच सुवर्णालंकार करणाऱ्या कुशल सोनाराचीही त्यांनी सविस्तर वर्णने केली आहेत आजही माती, तांबे, पितळ, पंचधातू यांची भांडी तयार करणारे कारखानदार बनारसमध्ये आहेत त्यांचा माल थितरी बाजार, विश्वनाथ गल्ली व गदौलिया भागात विपुलतेने मिळतो देवळाच्या मोठ्या पंचरशी धातूच्या घंटा तयार करणे हे बनारसचे एक वैशिष्टय आहे तसेच पितळेच्या व तांब्याच्या सुबक मूर्ती भक्तांसाठी येथे तयार करण्यात येतात तांबे, पेले, ताटे, ताटल्या, नक्षीची तबके, हुक्के इत्यादींचेही मोठे व कलात्मक उत्पादन बनारसमध्ये शेकडो वर्षांपासून होत आहे मातीची, लाकडाची व धातूची खेळणीही येथे विपुलतेने होतात धार्मिक यात्रांना येणारे आपल्याबरोबर मुलाबाळांना घेऊन येतात या मुलांच्यासाठी बनारसची खेळणी हे एक विशेष आकर्षण असते बनारसजवळ बधोई येथे गालिचाचे उत्पादन होते वास्तविक, गालिचे हे बनारसचे पारंपरिक वैशिष्टय नव्हे, पण दीडशे वर्षांपूर्वी एका पर्शियन गालिचेवाल्यावर ठगांनी हल्ला करून त्याचा माल बधोई येथे लुटला त्यानंतर तो गालिचेवाला तेथेच स्थायिक झाला आणि त्याने गालिचे विणण्यास सुरुवात केल्याने गालिच्यांचे ते केंद्र बनले. कापड व रेशीम यांवरील रंगीत चित्रे हे बनारसचे खास वैशिष्टय आहे ही चित्रे पारंपरिक भारतीय प्रकारची असतात आणि त्यांचे विषयही धार्मिक असतात. रामायण व महाभारतातील ठळक दृश्ये कापडावर चित्रित करण्यात येतात ब्रिटिश अमदानीत, अठराव्या शतकात, सरकारने बनारसच्या पारंपरिक कलांना उत्तेजन देण्यासाठी तेथे कलाभवन सुरू केले होते. हस्तिदंतावर नक्षी कोरणे हे त्या संस्थेचे प्रमुख वैशिष्टय होते

काचेचे झोलारे आणि लाखेच्या व जडाव कामे केलेल्या बांगड्या यांचीही

बनारसला खासियत आहे लाकडी बैठकीवर लाखेच्या साहाय्याने काचा चिकटवून हे डोलारे तयार करण्यात येतात त्यात ताजमहाल, मंदिरे, मखरे प्रकार असतात तसेच लाखेच्या व जडाव काम केलेल्या बांगड्याही बनारसला तयार होतात अशा बांगड्या इतरत्रही मिळतात, पण बनारसला त्याचे जेवढे विविध प्रकार दिसतात, तेवढे इतरत्र दिसत नाहीत विश्वनाथ गल्ली आणि दशाश्वमेध घाट या भागांत त्याची दुकाने आहेत देवांच्या मूर्तीवर घालण्याचे अलकार व लहान आकाराची रेशमी वस्त्रे गोपालमंदिराच्या आवारात मिळतात बनारसला झीगची फुले, वेण्या व हारही विपुलतेने मिळतात

खाण्याच्या पदार्थांत लोणची हे बनारसचे खास वैशिष्ट्य आहे सुप्रसिद्ध साहित्यिक दुर्गा भागवत याना स्वयंपाकाची अत्यंत आवड व तपशीलवार माहिती आहे त्या मला म्हणाल्या, " बनारसला जेवढ्या प्रकारची लोणची होतात. तेवढी इतरत्र कोठेही तयार होत नाहीत तेथे एक खास लोणची गल्ली आहे त्या गल्लीत शभर प्रकारची लोणची होतात बनारसला मी गेले तर त्यांपैकी जास्तीत जास्त प्रकार मी शिकून येईन " आबा व लिंबू ही आमच्याकडील प्रमुख लोणची. पण बनारसमध्ये कळकाचे कोंबही लोणच्यासाठी वापरतात कचौडी गल्ली आणि ठठेरी बाजार या भागात ही विविध प्रकारची लोणची मिळतात सुगधी जर्दा (तबाखू) हे बनारसचे आणखी एक वैशिष्ट्य येथे सुगधी द्रव्ये भरपूर असल्याने ती मिसळून खाण्याचा तबाखू तयार करतात

आयुर्वेदाचा अभ्यास व सशोधन जेवढे बनारसमध्ये झाले आहे, तेवढे इतरत्र क्वचितच झाले आहे. पडित मालवीय हे आयुर्वेदाचे निस्सीम उपासक होते

बनारसमध्ये अनेक सण व उत्सव साजरे होतात. त्यांपैकी बहुतेक धार्मिक स्वरूपाचे असतात बनारसमध्ये इतके उत्सव साजरे होतात की 'सात बार नौ त्योहार की नगरी काशी '(आठवड्याच्या सात दिवसांत नऊ उत्सव साजरे करणारी काशी) अशी म्हणच तेथे प्रचलित आहे देशाच्या अनेक भागातून काशीत देवदेवता आल्या आणि त्यांच्याबरोबर त्यांचे उत्सवही आले त्यात रथ यात्रा मेळा हा अत्यंत भव्य आणि खास इतिहास असलेला उत्सव आहे आषाढ महिन्यातील द्वितीया, तृतीया व चतुर्थी असे तीन दिवस हा उत्सव चालतो त्याचा इतिहास असा आहे की जगन्नाथपुरी येथील जगप्रसिद्ध जगन्नाथ मंदिराचे मुख्य पुजारी ब्रह्मचारी नावाचे विद्वान पडित होते ते रोज फक्त जगन्नाथाचा प्रसाद भक्षण करून राहात १७९० मध्ये ब्रह्मचारी आणि पुरीचा राजा यांच्यात मंदिराच्या अधिकारावरून बेबनाव झाला तेव्हा प्रमुख पुजारी श्री ब्रह्मचारी यांनी पुरी शहर सोडले आणि ते काशीस येऊन राहिले राजाचे व त्यांचे जरी भांडण झाले असले तरी ब्रह्मचारी यांचे व्रत

माहीत असल्याने राजाने अशी व्यवस्था केली होती की जगन्नाथाचा प्रसाद दररोज काशीस ब्रह्मचारी यांच्याकडे राजाच्या सेवकांकडून पोचता होई पण आषाढात नदीला पूर आला आणि प्रसाद आला नाही तेव्हा ब्रह्मचारी यांना दोन दिवस उपवास घडला तेव्हा रात्री जगन्नाथ त्याच्या स्वप्नात येऊन म्हणाले, "असा किती दिवस तू उपाशी राहणार ? येथे काशीतच तू माझ्या मंदिराची स्थापना कर आणि प्रसादाचे भक्षण कर." त्याप्रमाणे ब्रह्मचारी यानी काशीत जगन्नाथाची स्थापना केली त्यावर मंदिर बांधण्यासाठी व्यंकटराजे भोसले यांनी आर्थिक सहाय्य दिले आणि मंदिराचा खर्च भागविण्यासाठी छत्तीसगड विभागाचे उत्पन्नही दरसाल मंदिराला मिळेल अशी व्यवस्था केली या व्यवस्थेसाठी त्यानी बेनीराम पंडित याची नेमणूक केली राजे भोसले यानी ताम्रपत्रावर जे दानपत्र केले आहे, ते अद्याप अस्तित्वात आहे मात्र त्यासंबंधीचे कागदपत्र १८५७ च्या स्वातंत्र्य समरात राजवाड्याला लागलेल्या आगीत नष्ट झाले

ब्रह्मचारी यांचे निधन १८१८ मध्ये झाले त्यांची समाधी अस्सी नदीच्या घाटावर आहे तेथे त्याच्या अवशेषांची पूजा होते रथयात्रा उत्सवाची सुरुवात आषाढ शुक्ल प्रतिपदेस मध्यरात्रीपासूनच होते पहिल्या दिवशी फक्त स्त्रियानाच प्रवेश असतो रथयात्रेतील रथ अजूनही १८०५ सालचा जुना आहे यात्रेच्या तीन दिवसात गिरिजाघरपासून चौमुहनीपर्यंत रस्त्यावर खेळण्याची, खाद्यपदार्थांची, पानाची दुकाने थाटलेली असतात पुरीहून जगन्नाथ तीन दिवसासाठी सासुरवाडीला म्हणजे काशीला येतात, असे भक्तगण मानतो त्यामुळे हे तीन दिवस काशी नगरी उत्सव समारंभात मशगुल असते अस्सी घाटावरील जगन्नाथ मंदिरातील जगन्नाथ, बलराम व सुभद्रा याच्या मूर्ती काढून त्या रथात ठेवल्या जातात व या रथाची काशीच्या प्रमुख रस्त्यावरून मिरवणूक निघते तीन दिवस या मूर्ती रथातच असतात १८०५ मध्ये बेनीराम पंडित यांचे निधन झाले त्यांच्यानंतर त्यांच्या वंशजानी रथयात्रेची परंपरा चालू ठेवली आहे १९६५ मध्ये राय प्रल्हाद दास शापुरी यांनी मूळ रथाच्या सजावटीसाठी वीस हजार रुपयाची देणगी देऊन तो अत्यंत देखणा केला आहे

बुढवा मंगल नावाचा फार प्रख्यात महोत्सव बनारसमध्ये पूर्वी चालत असे अवधच्या नबाबाचा बनारसमधील प्रतिनिधी मीर रुस्तुम अलीने हा उत्सव सुरू केला, असे काही इतिहासकाराचे मत आहे तर काही तज्ज्ञ या महोत्सवाचे श्रेय राजा चेतसिंह यांना देतात या सणात शेकडो नावा गंगेच्या प्रवाहात मिरवणुकीच्या रूपात विहार करीत बनारसच्या राजाची सुशोभित केलेली नाव अग्रभागी असे या नावावर नृत्य करणाऱ्या स्त्रिया, गाणी म्हणणारे, वाद्ये वाजविणारे वगैरे असत. विविध रंग, फुले आणि दिवे यानी नावा सुशोभित केलेल्या असत खाद्य-

पेये विकणाऱ्यांच्या नावाही मिरवणुकीतच आपल्या मालाची विक्री करीत या नावावरील कलावंत गात व नृत्ये करीत आसी घाटापासून पंचगंगेच्या घाटावर रात्री जात शेवटी सर्व नावा बनारसच्या महाराजाच्या रामपूर राजवाड्यात जात आणि तेथे राजातर्फे रात्रभर नृत्यगायनाचा कार्यक्रम होत असे नव्या नव्या प्रेम-विषयक कविता करून त्या बुढवा मंगल महोत्सवात म्हणणे हा तरुण कवींचा आवडता छंद असे शंभरवर वर्षे हा महोत्सव चालला होता, पण बनारसचे राजे ईश्वरी नारायण यांच्या पत्नीचे निधन झाले, तेव्हा त्यांनी वर्षभर शोक पाळण्याची आज्ञा केली त्यावेळी बुढवा मंगल महोत्सव बंद झाला मात्र १९३० सालापासून हाच बुढवा मंगल उत्सव ' गुलाब बाडी ' या नावाने पुन्हा सुरू झाला पूर्वी इतक्या भव्य प्रमाणावर तो साजरा होत नसला तरी त्यामागची भावना तीच आहे या महोत्सवाची प्रेरणा धार्मिक नसून कलात्मक आहे हे वसंतोत्सवाचेच एक रूप आहे. वसंतोत्सवाची भारतीय परंपरा हजारो वर्षांची आहे सम्राट हर्षाच्या काळी मदन महोत्सव म्हणून तो प्रसिद्ध होता अशाच एका वसंतोत्सवात ' रत्नावली ' हे सुप्रसिद्ध संस्कृत नाटक सादर करण्यात आले होते महाराज जयनारायण घोषाल यांनी बुढवा मंगलचे वर्णन अशा शब्दांत केले आहे—

मयुरपंखी घोडदौड़ देखि कदाचित,
कतक पाटले मध्ये चादोया विहित ।
ए सकल नौका मध्ये करिया बिछाना,
गंगासि रंग में नौकालय सर्वजना ।
एई मत नौका हय चारि-पांच शत,
सकले भाटिया चले सहर पर्यंत,

बुढ़काल का मेला या नावाचा उत्सव श्रावण महिन्यात दर रविवारी होतो. त्याचवेळी खोडावा बाजारमधील शंकूधारा तलावात लोक स्नान करतात दुर्गाजी का मेला या नावाने दुर्गा मंदिरात उत्सव होतो हा दुर्गादेवीचा उत्सव श्रावण महिन्यात दर रविवारी व मंगळवारी होतो हा उत्सव मुख्यतः महिलावर्गाकडून साजरा केला जातो श्रावणात प्रत्येक सोमवारी व शुक्रवारी सारनाथचा उत्सव होतो त्यावेळी बनारसचे नागरिक सारनाथला जाऊन बुद्धाचे दर्शन घेतात आणि नंतर एखाद्या वृक्षाखाली बसून वनभोजन करतात काही लोक या दिवशी मिर्झापूर, सिरसी, देवदरी, टंडा कॉल, काली खोह अशा अन्य जागीही वनभोजनाला जातात. अधून मधून वनभोजनाला जाणे हा बनारसकरांचा खास शौक आहे नागपंचमीचा सणही बनारसमध्ये धूमधडाक्यात साजरा होतो. त्या दिवशी नागाची चित्रे काढलेली विकण्यास येतात. स्त्रिया हे कागद घरात भिंतीवर चिकटवून त्यांची पूजा करतात आपल्याकडे गारुडी नागाबा घेऊन येतात, तसेच त्या दिवशी तिकडेही

येतात बनारसचा विशेष असा की तेथे नागपंचमीला कुस्त्यांच्या दंगली होतात. कंडारी तीथ म्हणजे तृतीयेच्या दिवशी स्त्रिया पतीच्यासाठी उपवास करतात व देवाची प्रार्थना करतात आपल्याकडील वटसावित्रीसारखाच हा उत्सव असतो ढेला चौथ नावाचा दिवस चतुर्थीला पाळला जातो त्याची प्रथा आपल्याकडे गणेश-चतुर्थीसारखीच आहे त्या रात्री चंद्र पाहिला, तर कोणाच्या तरी शिव्या खाल्ल्या-वर तो प्रमाद माफ होतो अशी कल्पना आहे ढेला म्हणजे मातीचा ढेकूळ खेड्यात ते मुबलक सापडते पण शहरात त्याची जागा दगडाने घेतली चंद्र चुकून पाहिला, तर लोक कोणाच्या तरी घरावर दगड फेकतात व त्याच्या शिव्या खातात एके काळी बनारसमध्ये त्या रात्री घरावर लाडू फेकण्याची प्रथा होती विशेषत गणिकांच्या घरावर लाडू फेकले जात कारण शिव्या देण्यात गणिका तरबेज असतात !

जन्माष्टमी किंवा गोकुळ अष्टमी हा सण उत्तर प्रदेशात सर्वत्रच मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो त्याचा उत्कर्षबिंदू मथुरेला असतो पण बनारस-मध्येही हा सण मोठ्या धूमधडाक्यात साजरा होतो श्रीकृष्ण जन्म, दहीहंडी फोडणे व कृष्णाला शृंगार किंवा सुशोभित करणे हे बनारसी लोकांचे आवडते प्रकार आहेत लोलार्क महोत्सव भाद्रपद षष्टीला साजरा होतो त्या दिवशी लोलार्क कुंडात स्नान केल्यावर सुवासिनींना संतान प्राप्ती होते अशी समजूत आहे त्यामुळे निपुत्रिक महिला त्या दिवशी दूरदूरच्या ठिकाणाहून येथे येऊन स्नान करतात. या लोककथेचा दाखला म्हणजे सूर्यापासून कुंतीला कर्ण हा पुत्र झाला होता लोलार्क हे सूर्याचेच कुंड आहे मोगल काळात या ठिकाणी बलुचिस्तानमधील देवीची प्रस्थापना करण्यात आली होती पण काशी नरेशांनी १७६५ मध्ये तेथे पुन्हा सूर्याचे व शिवाचे मंदिर स्थापन केले अनंत चौदस या दिवशी गंगास्नान करून बनारसचे लोक हातात सुताचे अनंत बांधतात त्या दिवसापासून काशीत रामलीला सुरू होते लक्ष्मीकुंड का सोहरिया हा उत्सव सोळा दिवस चालतो म्हणून त्याला सोहरिया म्हणतात भाद्रपद महिन्यात अष्टमीपासून सोळा दिवस चालणाऱ्या या महोत्सवात खेळणी, कापड, वगैरे कुटीरोद्योगाच्या वस्तूंची मोठ्या प्रमाणावर विक्री होते या वेळी शहरात विविध संघांच्या रामलीलांचे कार्यक्रम जोरात सादर केले जातात फुलवारी, खोडावाँ, काशीपुरा आणि लक्सा हे रामलीला संघ विशेष प्रसिद्ध आहेत या सोळा दिवसांच्या समारोहात पहिल्या दिवशी महिला जीमूत-वाहन दिन साजरा करतात. घरातील लहान मुलांना शुभ चिंतणारा हा दिवस असतो नवरात्र आणि दसरा हे उत्तर प्रदेशात सर्वत्र साजरे केले जातात तसेच बनारसमध्येही केले जातात बंगाल आणि बनारस यांचे निकटचे संबंध असल्याने आणि हजारो बंगाली लोक बनारसमध्ये पिढ्यान्‌पिढ्या स्थायिक झाले असल्याने

येथे दुर्गादेवीचा उत्सव नवरात्रात भव्य प्रमाणात साजरा होतो दसऱ्याला रावणादी दैत्यांचे दहन हजारो प्रेक्षकांच्या उपस्थितीत होते त्यानंतर भरत मिलाप मेळा होतो राम आणि भरत यांच्या भेटीवर आधारित ही रामलीला नाटी इमली संघातर्फे दर वर्षी सादर करण्यात येते. त्यानंतर धनत्रयोदशी येते त्या दिवशी बनारसमध्ये नवी भांडी खरेदी करण्याची परंपरा आहे. दुसऱ्या दिवशी करवा चौथ साजरी करण्यात येते. हा स्त्रियांचा सण आहे विशेषत. पंजाबी स्त्रिया हा दिवस अधिक उत्साहाने साजरा करतात

होळीचा सण उत्तर प्रदेशात सर्वत्र मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो, तसाच तो बनारसमध्येही होतो सकाळपासून बारा वाजेपर्यंत रंग उडविला जातो आपल्याकडच्या शिमग्याप्रमाणेच काही लोक अर्वाच्य बोलून मन मोकळे करतात संध्याकाळी लोक चौसट्टी देवीच्या दर्शनासाठी जातात. रात्री होरी, ठुमरी, चैती यांच्या गायनाचे कार्यक्रम होतात होळीच्या दिवशी मीरघाटावर लाठीकाठीचा खेळ होतो बनारसचे एक लेखक श्री चकाचक बनारसी मला म्हणाले, "गेल्या पंचवीस-तीस वर्षांत होळीच्या रात्रीच्या गायनाच्या कार्यक्रमाचा दर्जा खूपच खालावला आहे पूर्वी गझल, ठुमरी, चैती होरी होत असत आता चित्रपटसंगीताचा धिंगाणाच अधिक चालतो" बनारसमध्ये दोन नवरात्र होतात पहिले नवरात्र आश्विन महिन्यात, दुसरे चैत्रात बनारसचा मारवाडी समाज गनगौर नावाचा उत्सव करतो तसेच मुसलमानांचे ईद, मोहरम, बकरी ईद वगैरे सणही साजरे होतात ज्येष्ठ मासात गंगाभक्त गंगादसरा साजरा करतात त्या वेळी लहान मुली गंगेच्या प्रवाहात बाहुल्या सोडतात निर्जला एकादशीला लोक उपवास करतात त्या दिवशी तरुण कबड्डीचा खेळ खेळतात या अनेक सण, जत्रा, उत्सवाबरोबरच बनारसच्या अनेक मंदिरांचेही सण व उत्सव होतात काशीत शेकडो मंदिरे असूनही नवी नवी मंदिरे स्थापन होतात उदाहरणार्थ, दशाश्वमेध घाटावर एक जुने गंगामंदिर आहेच मी बनारसमध्ये होतो, तेव्हा त्या जुन्या मंदिराजवळच नवे गंगामंदिर स्थापन करण्याचा महोत्सव महाशिवरात्रीला जोडून सात दिवस धूमधडाक्याने चालला होता बनारसमध्ये वर्षभर दर चार-आठ दिवसांनी कोणती ना कोणती जत्रा, सण किंवा उत्सव साजरा होतच असतो त्याशिवाय सूर्यग्रहण आणि चंद्रग्रहणाच्या वेळी लक्षावधी लोक गंगास्नान करतात अलाहाबाद (प्रयाग) आणि बनारस ही तीर्थक्षेत्रे अशा वेळी भाविकांनी फुलून जातात

भारतात बहुधा सर्वत्रच दिवाळी हा सर्वांत मोठा सण असतो पण दक्षिणेत त्याचे महत्त्व कमी आहे दिल्लीला दसऱ्याला अधिक महत्त्व आहे बनारसची दिवाळी दोन हजार वर्षे प्रसिद्ध आहे जातक कथातही बनारसच्या दिवाळीचे गौरवपूर्ण उल्लेख आहेत. नवे कपडे, नवे अलंकार, पक्वान्ने, रोषणाई आणि फटाके

वाजविणे ही इतरत्रप्रमाणेच बनारसच्याही दीपावलीची वैशिष्ट्ये आहेत दिवाळीत सुरणाची भाजी खाण्याची पद्धत आहे. त्या दिवशी जी व्यक्ती सुरण खात नाही, तिला पुढील जन्म घुशीचा येतो अशी तेथे समजूत आहे आपल्याप्रमाणेच बनारसलाही भाऊबीज साजरी होते दिवाळीच्या रात्री गगानदीत दिवे सोडण्यात येतात दिवाळीनतर पाऊस सपतो आणि वातावरण प्रसन्न असते त्या वेळी औरा तरेचे दिवस येतात औरा तरे म्हणजे आवळयाच्या झाडाखाली यावेळी वनभोजनासाठी लोक जातात त्या दिवशी आवळे खाण्याचीही तेथे पद्धत आहे त्यानतर तुलसी घाटावर नाग नथैयाचा मेळा भरतो सकट मोचनचे महत या मेळाव्याचे प्रमुख असतात दिवसा जत्रा भरते आणि रात्री रामलीलेचे कार्यक्रम होतात कार्तिक पौर्णिमा हा गुरू नानक यांच्या जयतीचा दिवस बनारसमध्ये शिखाची मोठी लोकसख्या आहे त्यामुळे तेथे नानक जयंती मोठ्या धूमधडाक्यात साजरी केली जाते

आपल्याकडे गटारी अमावास्या होते, त्याच धर्तीवर बनारसमध्ये 'प्याले के मेला' नावाचा दिवस. खरे तर रात्र— साजरी केली जाते त्या रात्री तेथे बरेच लोक प्याल्यामध्ये मद्य ओतून ते घेतात म्हणून त्याला 'प्याले के मेला' म्हणतात. त्यात विशेषत धोबी लोक अधिक भाग घेतात मार्गशीर्ष महिन्यात पहिला शनिवार यासाठी राखून ठेवलेला असतो मार्गशीर्ष चतुर्थीला पिशाच मोचन तलावावर 'लोटा भटा' उत्सव होतो त्या वेळी हजारो लोक पूर्वजाना पिडदान देतात आणि त्यांची काही इच्छा उरली असल्यास या दानामुळे त्यांचे आत्मे मुक्त होवोत अशी प्रार्थना करतात पाश्चात्त्य देशात नाताळच्या सणात 'बॉक्सिग डे' नावाच्या दिवशी लोक लांबवर फिरायला जातात. त्याच धर्तीचा 'पंचक्रोशी नावाचा सण बनारसमध्ये साजरा होतो तो पौष महिन्यात येतो त्या वेळी आसपासच्या पचक्रोशीत नागरिक फिरायला जातात लोहटिया येथील बडा गणेश मंदिराच्या आवारात मोठी यात्रा भरते या जत्रेचा विशेष असा की त्या वेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने गणपतीची उपासना करतात आणि आगामी परीक्षेत श्री गजाननाने यश द्यावे अशी प्रार्थना करतात. काही विद्यार्थी तर सकाळपासून सध्याकाळपर्यंत गणपतीपुढे हात जोडून उभे असतात !

वेदव्यास उत्सव माघ महिन्यात होतो गगेच्या काठी असलेल्या व्यास मदिरात जाऊन लोक त्या दिवशी दर्शन घेतात त्या दिवशी वेदव्यासांचे दर्शन घेतले नाही तर पुढील जन्मी शितलादेवीचे वाहन (गाढव) व्हावे लागते, अशी समजूत आहे वैशाख महिन्यात उकाडा होतो, तेव्हा वैशाख अष्टमीला शीतला मातेचा उत्सव होतो आणि उन्हाळयात शीतलता देण्याची प्रार्थना तिचे भक्त करतात मकरसक्रांतीला गगास्नान केल्यावर लोक या दिवशी खिचडी आणि

तिळाचे लाडू खातात या दिवशी बनारसमध्ये सांड, म्हैस आणि मेंढे याच्या टकरी होतात तसेच तीतर, बटेर आणि बुलबुल या पक्ष्याच्याही लढती मकर सक्रांतीला होतात गुजराथप्रमाणे काशीतही सक्रांतीला पतगाच्या स्पर्धा मोठ्या प्रमाणावर होतात

महाशिवरात्र हा बनारसमध्ये सर्वांत महत्त्वाचा दिवस असतो कारण काशी ही शिवाची राजधानी आहे शिवरात्रीला पहाटे तीन वाजल्यापासून भक्त गंगा-स्नान करतात आणि काशीविश्वेश्वर, मार्कंडेय महादेव आणि काशीतील इतर अनेक शिवमदिरांत जाऊन शिवपूजा करतात. या दिवशी दूरदूरवरून हजारो लोक काशीला येतात रथयात्राही निघते. विश्वनाथ गल्ली, अश्वमेध घाट, अहिल्या घाट, मुनशी घाट वगैरे भाग शिवरात्रीला भक्तांनी फुलून गेलेला असतो भैरवमदिरातही त्या दिवशी गर्दी होते मी या वर्षी महाशिवरात्रीलाच बनारसमध्ये होतो त्या दिवशी विश्वेश्वरमदिरात भक्तांनी पन्नास हजार रुपये दक्षिणा दिली

# साहित्यिक परंपरा

जगाच्या इतिहासात सर्वाधिक खपाचे पुस्तक म्हणजे बायबल त्याखालोखाल सर्वाधिक खप आहे तो 'रामायणा'चा त्याचे मूळ संस्कृत लेखक वाल्मीकी आणि नंतर संस्कृतमधून हिंदीत रामायण आणण्याचे महान कार्य करणारे तुलसीदास, या दोघांचाही बनारसशी अत्यंत निकटचा संबंध आहे यावरून बनारसची साहित्य-विषयक परंपरा किती प्राचीन आणि श्रेष्ठ आहे याची कल्पना येईल बनारस हे विद्वानांचे माहेरघर असल्याने दूरदूरच्या भागांतून तेथे विद्वान, पंडित, लेखक येतात आणि तेथेच स्थायिक होतात काशीच्या एका चांडालाने (डोंब) आद्य शंकराचार्यांना ब्रह्मज्ञान सांगितल्याची कथा आजही बनारसचे लेखक मोठ्या अभिमानाने सांगतात व्याकरणकार महामुनी पतंजली यांनी बनारसमध्ये नागकूपा-जवळ राहून भाष्य लिहिले आहे महाराजा दिवोदास हेही उत्तम साहित्यिक होते संत तुलसीदास यांच्याविषयी बोलताना बनारसचे विनोदकार बेधडक बनारसी मला म्हणाले, "आज जर तुलसीदास जिवंत असते तर त्यांच्या रामायणाची प्रचंड विक्री पाहून त्यांची छाती दडपून गेली असती त्यांची ९० टक्के रॉयल्टी इनकम टॅक्सकडेच गेली असती !" आजही बनारसमध्ये उत्तम साहित्यिक वातावरण आहे व्याख्याने कविसंमेलने, नाटके, नौटंकी यांचे कार्यक्रम होतात भाषणे, परिसंवाद, प्रवचनेही होतात त्यांना श्रोत्यांचा चांगला प्रतिसाद असतो वाल्मीकी, संत तुलसी-दास, संत कबीर अशा श्रेष्ठ साहित्यिकांची स्मृती उत्तमप्रकारे जपून ठेवण्यात आली आहे गंगाकाठी तुलसीदासाचे जोडे, ज्या नावेतून ते गंगा पार करून आले त्या नावेचा एक तुकडा आणि मूळ तुलसीरामायण ही अजूनही आदरपूर्वक जतन करून ठेवण्यात आली आहेत

संस्कृत भाषेचे आदिकवी वाल्मीकी यांनी लिहिलेले रामायण हे आदिकाव्य

मानले जाते वाल्मीकी यानी स्वत चा उल्लेख 'मी प्रचेत्याचा दहावा पुत्र आहे, असा केला आहे (रामायण ९६ १८) प्रचेता हे वरुणाचे नाव आहे वरुणाला दोन पुत्र झाले एक वाल्मीकी आणि दुसरा भृगु वाल्मीकी हे जातीने ब्राह्मण असले तरी ते किरातामध्ये (कोळी जमात) वाढले अध्यात्म रामायणात वाल्मिकीनी आपली जी कथा सांगितली आहे, तीत किराताच्या संगतीने आपण वाटमारी करू लागलो, असे म्हटले आहे. एकदा त्यांनी सप्तर्षींना अडवले, तेव्हा त्यांनी वाल्मीकींना विचारले की, "तू हे तुझ्या कुटुबासाठी करतोस पण तुझ्या या पापात तुझे कुटुबीय वाटा उचलतील काय ?" वाल्मीकींनी पत्नी व मुलाना विचारले, पण त्यानी पापात सहभागी होण्यास नकार दिला मग पश्चात्ताप पावून वाल्मीकी तप करू लागले. अनेक वर्षे तप केल्याने त्यांच्या अगावर वारुळ झाले. वारुळातून निघालेले म्हणून त्याचे नाव वाल्मीकी पडले. रामायणातील अनेक घटनाचे ते साक्षी होते वाल्मीकींचा आश्रम तमसा व गगा या दोन नद्याच्या जवळ होता त्याचे वास्तव्य अयोध्येत व काशीत झाले होते प्रयागच्या आग्नेयेस १८ मैलावर वाल्मीकी यांचे दीर्घकाळ वास्तव्य होते असे मानण्यास रामायणात भरपूर पुरावा आहे वाल्मीकींचे निधन काशीत झाले पजाबमध्ये वाल्मीकी ही भगी लोकाची देवता आहे या भागात अशी लोककथा आहे की, जोपर्यंत लोक भग्याना अस्पृश्य मानतील, तोपर्यंत काशीमध्ये वाल्मीकींचे प्रेत दिसेल त्यावरूनही वाल्मीकींचे अखेरच्या काळातील वास्तव्य बनारसमध्ये होते व त्याचे निधनही तेथे झाले असे म्हणतात

'रामायण' हा भारतातला अत्यत पवित्र व लोकमान्य असा धर्मग्रथ आहे रामायणावरूनच महाकाव्याची लक्षणे निश्चित करण्यात आली आहेत बनारसची साहित्यिक परपरा थेट वाल्मीकींच्यापासून सुरू होते इतकी दीर्घकालीन साहित्यिक परपरा ग्रीसचा अपवाद वगळता इतर कोणत्याही शहराला मिळाली नाही होमर याच्या 'इलियड' या महाकाव्यामुळे साहित्य क्षेत्रात ग्रीसचे निशाण उच्च आहे 'रामायण' या आदि काव्यात सात काडे व ६४५ सर्ग आहेत रामायणाचा प्रसार जगाच्या अनेक देशात व अनेक भाषांत झाला आहे विशेषत जावा, सुमात्रा, मलाया, चीन, सयाम, ब्रह्मदेश या पौर्वात्य देशांत रामायणाला साहित्यिक दर्जाबरोबरच धर्मग्रथाचाही मान मिळाला आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे त्या भागात गेलेल्या बौद्ध भिक्षूनी केलेला रामकथांचा प्रसार

सत तुलसीदास यांचा काल इ स १५३२ ते १६२३ असा आहे उत्तर भारतात बांदा जिल्ह्यातील राजापूर या गावी भाद्रपद शुद्ध एकादशीस त्यांचा जन्म झाला त्याचे वडील शुभाशुभ मानण्यात अतिरेक करणारे होते मुलाची जन्मवेळ

अशुभ आहे असे ज्योतिषाने सांगताच त्यांनी मुलाचा त्याग केला तुलसीदास भिक्षा मागत हिंडू लागले व फिरत फिरत काशीला आले तेथे ते गंगाकाठी मारुतीच्या मंदिरात राहिले तेथे सनातन नावाच्या महापंडिताचे शिष्यत्व पत्करून त्यांनी वेद, दर्शने, पुराणे यांचे अध्ययन केले योग्य वेळी त्यांचा विवाह दीनबंधू पाठक यांची अत्यंत लावण्यवती मुलगी रत्नावली हिच्याशी झाला विवाहानंतर तुलसीदासांना पत्नीचे इतके वेड लागले की एकदा ती माहेरी गेली असताना तिचा वियोग सहन न होऊन तुलसीदास एका वाहत्या प्रेताचा आधार घेऊन नदी पोहून गेले रात्रीच्या वेळी ते पत्नीच्या घरी पोचले दार बंद होते पण एक दोर लोंबत होता त्याला धरून ते वर चढून पत्नीच्या महालात गेले पत्नीने जागे होऊन पाहिले तर तो दोर नसून साप होता असे आढळले ती त्यांच्यावर भयंकर संतापली आणि तिने तुलसीदासांची प्रखर शब्दात कानउघडणी केली ती म्हणाली, "माझ्या या नश्वर हाडामांसाच्या देहावर जेवढे प्रेम करता तेवढे श्रीरामावर केलेत तर भवसागर तरून जाल" पत्नीचे हे बोल तुलसीदासांच्या जिव्हारी लागले त्यांनी संसाराचा, विषयसुखाचा त्याग केला चित्रकूट येथे जाऊन त्यांनी तप केले अयोध्येपासून जवळच वराह क्षेत्र येथे जाऊन त्यांनी नरहरीदास यांना गुरू केले

संत तुलसीदास यांचे वास्तव्य अयोध्या, चित्रकूट व काशी येथे झाले, तरी त्यांनी आयुष्यातील जास्तीत जास्त काळ काशीतच घालविला. त्यांना काशीतील सनातनी ब्राह्मणांनी बराच त्रास दिला पण महाराजा मानसिंग, अब्दुर्रहीम, खान खाना, मधुसुदन सरस्वती इत्यादींनी संत तुलसीदास यांची बाजू घेतली 'रामचरित मानस' ही तुलसीदासांची सर्वांत ख्यातनाम रचना आहे त्याशिवाय त्यांनी 'दोहावली', 'कवित्त रामायण', 'गीतावली', 'विनयपत्रिका', 'पार्वतीमंगल', 'वैराग्य संदीपनी', 'कृष्ण गीतावली', 'हनुमान बाहुके', अशा अनेक ग्रंथांची रचना केली आहे त्यांच्या ग्रंथांची संख्या ४४ आहे 'श्रीरामचरित मानस' हा ग्रंथ अवधी भाषेत तुलसीदासांनी लिहिला असून चौपाई व दोहा या छंदाचा त्यात उपयोग करण्यात आला आहे त्यांच्या प्रतिभेत भक्ती, काव्य आणि तत्त्वज्ञान यांचा संगम आढळतो. भारतातील सर्व भाषांत 'रामचरित मानस'ची भाषांतरे झाली आहेत रामकथा अत्यंत रसाळपणे या ग्रंथात सांगितली आहे नाभाजींनी तुलसीदासांविषयी म्हटले आहे

संसार अपार के पार की सुगमरूप नौका लियो।
कलिकुटिल जीव निस्तारहित वाल्मीकि तुलसी भयो ॥

(कलीने गांजलेल्या जीवांना या अपार संसार सागरात तरून नेण्यासाठी रामभक्तीची सुगम नौका घेऊन प्रत्यक्ष वाल्मीकीच तुलसीरूपाने अवतरले) संत ज्ञानेश्वरांनी गीतेचे सुलभ व गोमट्या शब्दात 'ज्ञानेश्वरीच्या रूपाने निरूपण

करून जे महान कार्य केले, तेच सत तुलसीदासानी वाल्मीकी रामायणाच्या बाबतीत केले आहे.

रामकथाविषयक ३२८ गीतांचा संत तुलसीदासांचा ग्रथ ‘गीतावली’ या नावाने प्रसिद्ध आहे कृष्णलीलेच्या धर्तीवर रामाच्या बाललीलांचे रसाळ वर्णन या ग्रथात आहे त्याच पद्धतीने श्रीकृष्णावरील ६१ गीताचा सग्रह ‘कृष्णगीता-वली’ या नावाने त्यांनी लिहिला आहे ‘विनयपत्रिका’ या ग्रथात तुलसीदासाच्या २५० आत्मचरित्रपर कविता आहेत तुलसीदास हे कवी तर होतेच पण भक्तही होते. ‘रामचरित मानस’ या ग्रथामुळे हिंदी भाषेला जागतिक प्रतिष्ठा मिळाली आहे. हा ग्रथ बनारसमध्ये लिहिला गेला, ही या शहराची फार मोठी देणगी आहे

नामवत सतकवी कबीर यांचा जन्म व मृत्यू या तारखांबाबत मतभेद असले तरी इ स १३९८ मध्ये त्याचा जन्म झाला व ते सुमारे १२० वर्षे जगले असे सागण्यात येते एका ब्राह्मण विधवेच्या पोटी त्याचा जन्म झाला तिने काशीमधील लहरतारा तलावाजवळ त्यांना सोडून दिले व एका मुसलमान कोष्टयाने त्यांचा प्रतिपाळ केला कबीर याचाही व्यवसाय कोष्टयाचाच झाला त्याच्या साहित्यावर योगमार्गी, हिंदू, सुफी, मुसलमान, नाथपथी याच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव आहे कबीर ग्रथावली, कबीर बीजक हे त्यांचे ग्रथ ख्यातनाम आहेत मात्र ते त्यांनी लिहिलेले नसून तोंडी सांगितले व त्याच्या शिष्यांनी लिहून घेतले कारण सत कबीर हे निरक्षर होते मात्र काशीतील विद्वान व पडित यांच्या सहवासाने ते बहुश्रुत व ज्ञानी झाले होते त्यांची भाषा पूरबी हिंदी आहे मात्र त्या भाषेत ब्रज, अवधी, भोजपुरी, फारशी अशा अनेक भाषातील शब्द आढळतात जातपात व धर्मभेद हे सत कबीराना मान्य नव्हते हिंदू–मुसलमान ऐक्य स्थापन करण्यात कबीरांच्या रचनेचा मोठा वाटा आहे वैष्णव आचार्यांच्या भक्तिमार्गाचा त्यांनी प्रचार केला त्याचे काव्य मुख्यत धार्मिक व गूढगूजनपर आहे आपल्याला जे जग दिसते, ते माया असून धन व स्त्री याच्या माध्यमातून ही माया परमेश्वराच्या साधकाचा छळ करते, असे त्यांनी आपल्या काव्यात म्हटले आहे रामानद व शेख टार्की हे त्यांचे गुरू होते कमाल हा त्यांचा मुलगा सत कबीराना मोठा अनुयायी वर्ग मिळाला आणि त्यांचे तत्त्वज्ञान मानणाऱ्याचा कबीर पथ झाला. कबीरांची भाषा ही ‘सधुकड्डी’ म्हणून ओळखली जाते

श्री विश्वनाथ मुखर्जी याचा बनारस शहराचा सखोल अभ्यास आहे बनारसच्या साहित्यविषयक परपरेविषयी बोलताना श्री विश्वनाथ मुकर्जी म्हणाले, “बनारसची मातीच अशी आहे की येथे आलेले पडितच नव्हे, तर डाकू, दरोडेखोर, चांडाल, चांभार, सन्यासी, धनिक अशा सर्व प्रकारच्या लोकानी साहित्यात

भर घातली आहे आदिकवी वाल्मीकी हे प्रथम डाकू होते आद्य शकराचार्यांना ब्रह्मज्ञान देणारा चाडाल बनारसच्या स्मशानात होता महाराज देवीदास यानी आयुर्वेदाचा पाया घातला व्याकरणकार पतजली यानी याच शहरात नागकूपाजवळ राहून व्याकरणाची रचना केली सत कवीर याच्या काव्याने रवींद्रनाथ टागोर आणि महादेवी वर्मा अशा आधुनिक काळातील ज्येष्ठ साहित्यिकांना प्रेरणा दिली रोहिदास या चाभाराला याच नगरीने कवी केले आधुनिक आतरराष्ट्रीय राजकारणात चर्चिलना जेवढे महत्त्व तेवढेच हिंदी भाषेत महाकवी भारतेंदु याना महत्त्व आहे तेही बनारसचेच त्याशिवाय दिनदयाळ गिरी, सरदार कवी, लच्छीराम कवी, प दुर्गादत्त, प ईश्वरदत्त, राजा शिवप्रसाद, चैतन्यदेव, रामकृष्ण वर्मा, महामहोपाध्याय सुधाकर द्विवेदी अशा थोर साहित्यिकांनी हिंदी साहित्यात मोलाची भर घातली आहे गद्य साहित्यिकात किशोरीलाल गोस्वामी, रामदास गौड, बाबू शामसुदर दास, प रामनारायण मिश्र, बाबू देवकीनंदन खत्री अशा बनारसवासीय लेखकांचे स्थान हिंदी साहित्यात फार श्रेष्ठ आहे 'उसने कहा था' ही हिंदीतील सर्वप्रथम कहाणी बनारसची देणगी आहे

श्री मुखर्जी पुढे म्हणाले, " हिंदीतील तीन सर्वश्रेष्ठ कथाकार म्हणजे बलदेव प्रसाद मिश्र, द्विजेद्रप्रसाद मिश्र 'निर्गुणा' आणि राधाकृष्ण. त्यापैकी पहिले दोन कथाकार हे बनारसचे आहेत अलीकडच्या काळातील व सध्या हयात असलेल्या बनारसच्या कथाकारांत श्री विनोदशंकर व्यास, रुद्र काशीकेय, मोहनलाल गुप्त, शिवप्रसाद सिंह, हरिमोहन, कमला त्रिवेणी शंकर, गिरिजाशकर पाडये, कांचनकुमार, कामता प्रसाद गुप्त (केशर) याचा आवर्जून उल्लेख करावा लागेल हिंदी समीक्षेत जनक आचार्य रामचद्र शुक्ल हे बनारसचेच

अलीकडच्या काळातील बनारसचे कथाकार म्हणजे श्री विनोदशंकर व्यास, रुद्र काशिकेय, मोहनलाल गुप्त, हरिमोहन, कमला त्रिवेदी शकर, शिवप्रसाद सिह, गिरिजाशकर पांडेय, उदीयमान कचनकुमार आणि हरीश हे होते श्री कामता प्रसाद कुशवाह कात याचा खास शैलीकार लेखक म्हणून वेगळा उल्लेख केला पाहिजे बनारसचे विख्यात कादबरीकार श्री ज्वालाप्रसाद गुप्त 'केशर', गोविंदसिह आणि ब्रह्मदेव मधुर यांनीही या शहराची साहित्य परपरा उजळ केली आहे हिंदी समीक्षेचे जनक म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो ते आचार्य रामचद्र शुक्ल हेही बनारसचेच याच क्षेत्रात बनारसचे आचार्य केशव मिश्र आणि लाला भगवान यांनी मोठीच भर घातली आहे

# हिंदीतील विनोदी साहित्य व ' ठलुआ क्लब '

उत्तर प्रदेशच्या दौऱ्यावर असताना हिंदी विनोदाशी संबंधित असणाऱ्या कोणाला तरी भेटावे असे मला वाटत होते ती संधी अगदी अनपेक्षितपणे मिळाली बनारसला एकदा वृत्तपत्राच्या स्टॉलवर मी ' फटीचर ' नावाचे विनोदी नियतकालिक पाहिले तो त्याचा होळी अंक होता तो अंक घेऊन मी संपादक कोण आहे ते पाहिले तर त्याचे नाव होते विश्वनाथ मुखर्जी त्याचा पत्ता होता सिद्धगिरी बाग, बनारस १० दुसऱ्या दिवशी मी बनारसच्या चौक भागात विश्वविद्यालय प्रकाशन संस्थेच्या कचेरीत काही पुस्तके घेण्यासाठी गेलो होतो, तेव्हा तेथील विक्रेत्याला सिद्धगिरी या भागात कसे जायचे हे विचारले आणि तेथे मला विश्वनाथ मुखर्जी याना भेटायचे आहे असे सांगितले त्यावर त्याने मला एक नकाशा काढून दाखविला आणि तेथे कसे जायचे याबद्दल मार्गदर्शन केले मी लगेच रिक्षा केली आणि तेथे गेलो ' मानवी हॉटेल'च्या समोरच्या गल्लीत पानपट्टीच्या दुकानासमोर श्री मुखर्जी राहत होते मी मुंबईचा लेखक असून त्यांना भेटायचे आहे असा निरोप पाठविताच ते आले आणि त्यांनी मला आपल्या बैठकीच्या खोलीत नेले. उत्तर प्रदेशच्या पद्धतीप्रमाणे ' नास्ता आणि चहा ' आणायला सांगून ते म्हणाले, " तुम्ही बनारसमध्ये आला आहात असे कालच मला कळले तुमचा पत्ता काढून तुम्हाला आमच्या ठलुआ क्लबमध्ये बोलवावे असा विचार मी करीत होतो "

या ठलुआ क्लबचे अनेक उल्लेख ' फटीचर 'मध्ये होतेच त्यामुळे मला त्याची साधारण कल्पना होती मी माझे त्रोटक चरित्र मुखर्जी यांना दिले. ते वाचून ते म्हणाले, " वा ! तुम्हीही माझ्याच विनोदी क्षेत्रातले आहात हे पाहून मला अधिकच आनंद झाला बोला, मी आपली काय सेवा करू "

मी म्हटले, " मला आपली माहिती हवी आहे आणि हिंदी विनोदाबद्दलही

आपण काही सांगितले तर त्याचा मला उपयोग होईल" श्री मुखर्जी म्हणाले, "हिंदीमध्ये काही चांगले विनोदी लेखक आहेत त्यातील काही बनारसचेच आहेत पण सर्वसाधारणपणे पाहता मराठी विनोद हा हिंदीपेक्षा किती तरी उच्च प्रकारचा आहे आचार्य अत्रे, पु ल देशपांडे यांच्या तोडीचा एकही हिंदी विनोदी लेखक नाही आचार्य अत्रे आणि पु ल देशपांडे यांची सूक्ष्म निरीक्षण शक्ती, उपहास व विडबन यांची विनतोड हातोटी व खेळकर जीवनदृष्टी हे मला विनोदी साहित्याचे आदर्श गुण वाटतात, मराठी विनोद हिंदी विनोदाच्या तुलनेने फार प्रगत आहे"

केवळ विनोदाला वाहिलेले 'फटीचर' हे वार्षिक आपण दर वर्षी 'होळी' च्या वेळी प्रसिद्ध करतो आणि त्याला बऱ्यापैकी जाहिराती मिळत असल्याने या १०४ पानी अकाची किंमत केवळ एक रुपया ठेवणे आपल्याला परवडते असे सांगून श्री मुखर्जी म्हणाले," या अकाच्या मी तीन हजार प्रती काढतो गेली आठ वर्षे हा अक मी प्रसिद्ध करीत आहे"

हिंदीमध्ये विनोदी लेखाना मानधन किती मिळते ? असे मी विचारले तेव्हा ते म्हणाले, "वृत्तपत्राच्या रविवारच्या आवृत्त्या मानधन अगदीच कमी म्हणजे पंचवीस ते पन्नास रुपयांपर्यंत देतात हिंदुस्थान, धर्मयुग अशी साखळी वृत्तपत्राची साप्ताहिके मात्र लेखाला शभर ते दीडशे रुपये देतात" इतक्यात नास्ता आणि चहा आला नास्त्याची एकच बशी आली ती माझ्यापुढे करून श्री विश्वनाथ मुखर्जी म्हणाले, "मला घशाचा कॅन्सर झाला होता त्यावर ऑपरेशन केल्यापासून मला खाता येत नाही मी फक्त चहा किंवा इतर पातळ पदार्थ पिऊ शकतो म्हणून ही एकच खाण्याच्या पदार्थाची बशी आली आहे" अशा शारीरिक मर्यादेबरोबर झगडणारा लेखक स्वत विनोदी लिहून इतरांना आनद देतो, याचे मला विशेष कौतुक वाटले

हिंदीतील पुस्तकांच्या मानधनाविषयी श्री मुखर्जी म्हणाले, "माझ्या पुस्तकाच्या एक हजार प्रती काढण्यात येतात व मला त्याची दहा टक्के रॉयल्टी मिळते चांगल्या अभिप्रायामुळे पुस्तक खपते असाही अनुभव नाही सरकारी मदतीमुळे ग्रथालये प्रती घेतात, तेच हिंदी ग्रथाचे मुख्य गिऱ्हाईक आहे हजारापैकी सहा-सातशे प्रती सरकारी मदत घेणारी ग्रथालयेच खरेदी करतात प्रकाशन आम्हा लेखकाना बरा पैसा देत नाहीत आमच्या हक्काचा पैसा देतानाही विलब लावतात आणि चलाख्या करतात त्यामुळे केवळ लेखनावर जगणे हिंदी लेखकाला कठीण आहे 'आपका स्वास्थ्य' या नियतकालिकाचा सहाय्यक सपादक म्हणून मी काम करतो व ते करून मिळालेल्या वेळात लेखन करतो"

स्वत बद्दल माहिती देताना श्री मुखर्जी पुढे म्हणाले, "माझा जन्म १९२४ मध्ये बनारसमध्ये झाला, प्रतिकूल आर्थिक परिस्थितीमुळे मला शिक्षण मध्येच सोडून

काम करावे लागले बुक बाईंडर, रामलीलामधील नट, गृहशिक्षक, सेल्समन अशा अनेक नोकऱ्या करीत असतानाही मी वाचन आणि लेखन सोडले नाही माझा पहिला लेख १९४२ मध्ये 'तरंग'मध्ये प्रसिद्ध झाला मग मी 'सूर्य', 'अजगर', 'सतार', 'तरंग' इत्यादी नियतकालिकातून लिहू लागलो. 'अभिसारिका' हा माझा पहिला कथासंग्रह प्रसिद्ध झाला त्यानंतर 'राजनीती और साहित्य', 'विवेकानंद', 'काशी अतीत और वर्तमान', 'बना रहे बनारस', 'वन्दे मातरम् का इतिहास', 'चित्र और चरित्र', 'न भुलूँ, न भुलाँ सकूँ', अशी माझी पुस्तके प्रसिद्ध झाली 'वंदे मातरम्' या माझ्या पुस्तकाचा मराठी अनुवादही झाला आहे मी पधरावर पुस्तके परभाषातून हिंदीत अनुवादित केली आहेत तसेच बाराहून अधिक पुस्तकांचे संपादनही केले आहे जोधपूर विद्यापीठात माझ्या साहित्यावर प्रबंध लिहिला गेला आहे 'यह बनारस है' हे माझे अगदी अलीकडचे पुस्तक आहे बनारस शहराचे हलक्या फुलक्या शैलीत मी या पुस्तकात वर्णन केले आहे बनारसी पान, बनारसी साडी, मंदिरे, साहित्य, कला यांच्याविषयी मी विनोदी दृष्टिकोनातून या ग्रंथात लिहिले आहे बनारस हे इतर अनेक गोष्टींबद्दल प्रसिद्ध आहे पण पक्ष्यांची निर्यात करणारे हे भारतातील एक मोठे केंद्र आहे, याची सर्वसामान्य वाचकाना कल्पना नाही तितर पक्ष्यांचे प्रसिद्ध चाहते मजीद खाँ यानी सोन्याच्या पिंजऱ्यात ठेवलेल्या तितर पक्ष्याची किंमत तीस हजार रुपये होती आज या काशीत माणसालाही एवढी किंमत राहिली नाही !"

कॅन्सरसारख्या दुर्धर रोगाशी झुजूनही विश्वनाथ मुकर्जी याचे व्यक्तिमत्त्व प्रसन्न आणि गुणग्राहक आहे सुप्रसिद्ध बंगाली कादंबरीकार श्री विमल मित्र याचे 'सही पते पर' हे पुस्तक त्यांनी मला दाखविले ते पुस्तक श्री विश्वनाथ मुखर्जी यांनाच अर्पण करण्यात आले होते त्यावर मी म्हटले "मी माझे एक पुस्तक विमल मित्र याना अर्पण केले आहे" त्यामुळे आमच्यात आणखी एक समान दुवा निर्माण झाला आपल्या 'ठलुआ क्लब'ची माहिती देताना ते म्हणाले, "ठलुआ म्हणजे निरुद्योगी, आळशी स्वत शिवाय साऱ्या जगाला मूर्ख समजणारा कोणीही या क्लबचा सभासद होऊ शकतो अशा लोकाची बनारसमध्ये फार मोठी संस्था आहे ! ठलुआ हा शब्द कसा आला तर 'ठ' म्हणजे ठग लुटेरा मधला 'लु' आणि 'आळशी' मधला 'आ' घेऊन 'ठलुआ' हा शब्द बनवला आहे ज्याला लोक आळशी म्हणतात त्याला आम्ही 'निष्काम कर्मयोगी' म्हणतो. या 'ठलुआ क्लब'ची स्थापना १९६१ च्या एक मे रोजी देवानंद शर्मा, केशवलाल भट्ट, वीरेश्वर भट्टाचार्य आणि मी अशा मित्रांनी माझ्याच घरी केली लेखक, संगीतकार, चित्रकार वगैरेना या क्लबमध्ये बोलावून त्यांना एक पदवी देणे आणि त्यांच्याशी गप्पागोष्टी करणे हे या ठलुआ क्लबचे मुख्य कार्य आहे आजपर्यंत

आम्ही बेधडक बनारसी, विमल मित्र, डॉ. शिवप्रसाद सिंह, बनारसीदास चतुर्वेदी, अशुतोष भट्टाचार्य, शभुनाथ मिश्र, प्रबोधकुमार बॅनर्जी, बिस्मिल्ला खाँ, ज्ञानानद नागर अशा शभरावर ज्येष्ठ व्यक्तींना ठलुआ क्लबमध्ये बोलावून त्यांचे सत्कार केले आहेत आणि त्याना पदव्या दिल्या आहेत 'हातिमताई' कोणाला 'चिकित्सक गणपती' तर कोणाला 'ठलुआ नारायण' अशा गमतीच्या पदव्या आम्ही देतो महादेवी वर्मा, सुमित्रानदन पत अशा ज्येष्ठ साहित्यिकांनीही आमच्या विनोदी पदव्या स्वीकारण्यासाठी ठलुआ क्लबला भेटी दिल्या आहेत आपण येथे आहात याची पूर्वसूचना असती, तर आपली भेट घडवून आणण्यास आम्हाला आनद वाटला असता मात्र पुढील वेळी बनारसला याल तेव्हा आधी कृपया कळवा आणि आमच्या क्लबसाठी थोडा वेळ राखून ठेवा "

'ठलुआ' क्लबच्या कार्यावर दोन विद्यार्थ्यांनी प्रबध लिहून एम् ए पदव्या घेतल्या आहेत, असेही श्री मुखर्जी यांनी मला सागितले हे विद्यार्थी जोधपूर विद्यापीठाचे आहेत 'ठलुआ' क्लबची कल्पना मला आवडली मुखर्जी याचा निरोप घेऊन परत येताना मी विचार करू लागलो की मुबईला असा क्लब स्थापन केला, तर कोणत्या साहित्यिकाला कोणती पदवी देता येईल ? आणि अशा थट्टेच्या पदव्या दिल्याच तर आमचे लेखक त्याचा खिलाडूपणे स्वीकार करतील काय ?

बनारसच्या विनोदी लेखन-परपरेविषयी बोलताना श्री विश्वनाथ मुखर्जी म्हणाले, " बनारसचे श्रेष्ठ विनोदी लेखक म्हणजे बाबू अन्नपूर्णानद आजच्या हिंदी विनोदी लेखकात अनेक बनारसी आहेत त्यांत बेढब बनारसी, भैय्याजी बनारसी, बेधडक बनारसी आणि चकाचक बनारसी याचा समावेश आहे लक्ष्मीशकर व्यास हे 'आज'चे सहसपादक आजच्या हिंदी विनोदकारांत आघाडीवर आहेत प शिवप्रसाद मिश्र हे गुरु बनारसी या नावाने उत्तम विनोदी लेखन करतात तेच रुद्र काशिकेय या नावाने गभीर लिखाणही करतात पं सीताराम चतुर्वेदी हे प्रकाड पडित आहेत, पण त्यांचे विनोदी लेखनही अत्यत लोकप्रिय आहे डॉ भानुशकर मेहता हे खास ढगाचे विनोदी लेखक आहेत कै बलदेव प्रसाद मिश्र हे विनोदी लेखक म्हणजे बनारसचे भूषण होते कै इद्रशंकर मिश्र कै केदार शर्मा आणि कै भपसरराय बनारसी यानीही हिंदी विनोदी साहित्याची शान वाढविली आहे. सध्या हिंदी वृत्तपत्रातील बहुतेक विनोदी स्तभ बनारसचे लेखक चालवितात "

बनारसच्या मुक्कामात मी आणखी काही विनोदी लेखकांना भेटलो त्यापैकी चकाचक बनारसी हे एक ते मुख्यत हिंदी हास्यकाव्य लिहितात 'ये राजा काशी हो' हा त्याचा काव्यसग्रह प्रसिद्ध झाला असून दुसरा सग्रह प्रसिद्धीच्या मार्गावर होता पूर्वी ते जलनिगम विभागात काम करीत होते पण हिंदी व्यगकाव्य लेखन व काव्यवाचनावर आता त्याना चांगली प्राप्ती होत असल्याने नोकरी सोडून त्यांनी

विनोद हाच आपला मुख्य व्यवसाय केला आहे गेली वीस वर्षे ते विनोदी कविता लिहीत आहेत व वाचन करीत आहेत हिंदीमध्ये काव्यगायनासाठी एका बैठकीला एक हजार रुपये मिळतात असे त्यांनी मला सांगितले (पूर्वी एकदा मला काका हाथरसी भेटले होते ते विनोदी काव्यवाचनासाठी साडेतीन हजार रुपये मानधन व विमानाने जाण्यायेण्याचा खर्च घेतात ) श्री लक्ष्मी शकर व्यास यांचे विनोदी साहित्य मी पूर्वी ' धर्मयुग ' व इतर नियतकालिकांतून वाचले होते बनारसच्या सुप्रसिद्ध ' आज ' दैनिकाच्या ' अवकाश ' या साप्ताहिकाचे ते सहसपादक आहेत श्री बाबुराव पराडकर यांच्याबरोबर त्यांनी काम केले असल्याने महाराष्ट्राबद्दल श्री. व्यास यांना विशेष आपुलकी आहे श्री व्यास हे गेली ४० वर्षे लेखन करीत आहेत श्री व्यास सध्या हिंदी वृत्तपत्रव्यवसायाचा इतिहास लिहीत आहेत ' चौलुक्य कुमार पाल ' या त्यांच्या पुस्तकाला राज्य पुरस्कार मिळाला आहे ' पराडकरजी और पत्रकारिता ', ' स्त्रीतीकी त्रिवेणिका ', ' विश्व के युगनिर्माता साहित्यकार ', ' आध्यामिक संदेशवाहिका ' इत्यादी त्यांचे ग्रथ हिंदी भाषेत मान्यता पावलेले आहेत इतिहास, सस्कृती आणि अध्यात्म या विषयावर प्रभुत्व असणारे श्री लक्ष्मी-शकर व्यास उत्तम विनोदी लेखकही आहेत, हे त्यांचे वैशिष्ट्य आहे त्यांना राष्ट्र-भाषा सघटनेचे अनेक सन्मान मिळाले आहेत

# दोन हजार वर्षे जळणारा घाट

बनारसच्या स्मशानाविषयी मला अतिशय कुतुहल होते हे जगातील सर्वांत मोठे आणि सर्वांत जुने स्मशान. गेली दोन हजार वर्षे इथे प्रेते जळत आहेत या स्मशानाचा प्रमुख डोंब सांगतो की राजा हरिश्चद्राच्या काळापासून त्याच्या पूर्वजाना या स्मशानाची सनद मिळाली आहे स्वप्नात आपले राज्य ऋषींना दान केल्याने देशोधडीला लागलेला राजा हरिश्चद्र ज्या स्मशानात डोंब म्हणून काम करीत होता, त्या जागेला हरिश्चद्र डोंब घाट हे नाव असून तेथे अद्याप प्रेते जाळण्यात येतात मात्र बनारसचे मुख्य स्मशान मनकर्णिका घाटावर आहे हरिश्चद्र घाटावर आपला मृत पुत्र रोहिदास याचे प्रेत आपली पत्नी तारामती हिच्याकडून जाळण्यासाठी घेण्याचे अग्निदिव्य राजा हरिश्चद्राला करावे लागले मनकर्णिका घाट हा काशीतील एक अत्यत महत्त्वाचा घाट असून पचतीर्थांपैकी तो एक आहे ' दृश्यो विश्वेवर नित्यम् स्नानव्य मनकर्णिका ', म्हणजे दररोज काशीविश्वेश्वराचे दर्शन घ्यावे आणि मनकर्णिका घाटावर स्नान करावे, ही काशीतील नागरिकाची आचारसहिता आहे. शिवपुराणातील कथेनुसार या ठिकाणी विष्णूने दीर्घकाल तप केले आचमनासाठी विष्णूने येथे कुंड तयार केले त्याच्या तपश्चर्येवर प्रसन्न होऊन शिव आणि पार्वती या ठिकाणी आले आणि त्यांनी या कुडात स्नान केले त्या वेळी शकराचा मणी व पार्वतीचे कर्णकुडल या कुडात पडले, म्हणून त्याचे नाव मनकर्णिका पडले ही कथा व्रज व हिंदी अशा मिश्र भाषेत कुडाजवळील भितीवर लिहिण्यात आली असून त्या कथेस अनुरूप अशी चित्रेही काढण्यात आली आहेत विष्णूच्या तपावर प्रसन्न होऊन जेव्हा शिवाने वर मागण्यास सांगितले, तेव्हा विष्णूने ' काशी हे आत्म्यास मुक्ती मिळण्याचे तीर्थ होऊ दे असा वर मागितला व शकराने तो दिला, अशी काशीखडात कथा आहे

मी जेव्हा सारनाथला जात होतो, तेव्हाच मला काही विचित्र दृश्ये दिसली ती म्हणजे पांढऱ्या कपड्यात गुंडाळलेली प्रेते लाकडाच्या ओंडक्याप्रमाणे, सायकल-रिक्षातून, टांग्यातून, मोटारीच्या टपावरून काशीकडे नेण्यात येत होती मृत माणसे एवढ्या मोठ्या प्रमाणावर प्रवास करण्याचा दाखला जगात इतरत्र कोठेही नाही काशीत म्हणजेच मनकर्णिका घाटावर दहन झाले तर मुक्ती मिळते, अशी श्रद्धा असल्याने लोक आपल्या नातेवाइकाची प्रेते मनकर्णिका घाटाकडे नेत होते शितला घाटाच्या तीरावरून गंगानदीकडे तोंड केले, तर अर्धा किलोमीटर अंतरावर मनकर्णिका घाट आहे मधले दोन घाट ओलांडून नदीच्या काठाने तेथे जाता येते एका सायंकाळी पाचच्या सुमाराला मी तेथे गेलो, तेव्हा निदान वीस-बावीस प्रेते तेथे होती काही चितेवर जळत होती, काही चितेजवळ जमिनीवर ठेवण्यात आली होती आणि स्मशानातील ब्राह्मण दहनापूर्वीचे धार्मिक संस्कार करीत होते या प्रेतांना ओलांडून मी घाटावर गेलो, तेव्हा मला दिसले की, घाटाच्या पायऱ्यावर सात आठ प्रेते एका मागे एक अशी ठेवण्यात आली होती अखेरच्या प्रेताचे पाय गंगेच्या पाण्यात होते त्या मयताचे नातेवाईक ओंजळीतून गंगेचे पाणी आणून प्रेताच्या तोंडात घालीत होते बराच वेळ ही क्रिया चाललेली पाहून प्रेताच्या रांगेतील नातेवाईक भांडू लागले, "अरे, तुमारा मुरदा कितना टाईम गंगाजल पियेगा ? जल्दी करो " सार्वजनिक नळावर पाण्यासाठी भांडणे चालतात, तशी इथे मृतदेहाला गंगाजल पाजण्यावरून भांडणे चालली होती ते दृश्य भीषणच होते बहुतेक प्रेते भय्याची होती. लांबलचक, पाय सोडलेली प्रेते संपूर्ण शरीर पांढऱ्या किंवा लालभडक कपड्यात गुंडाळलेले चेहरा तेवढा दिसण्यासारखा होता वरच्या पायऱ्यावर न्हावी रांगा लावून बसले होते दहनानंतर श्मश्रू करून घेणारे लोक त्यांच्यापुढे खाली माना घालून बसले होते

पायऱ्यावरून मी परत आलो जवळच एक मनोरा होता तिथे काही परकीय लोक प्रेतदहन पाहत आणि त्या दृश्याची छायाचित्रे घेत उभे होते त्यांच्याशी गप्पा माराव्यात म्हणून मी तिकडे निघालो होतो वाटेत जळणाऱ्या प्रेतांच्या अगदी जवळून जावे लागत होते दणकट शरीराचे उंचेपुरे डोंब हातात लांब काठी घेऊन चिता ढोसत होते व न जळणाऱ्या लाकडांना पुरेसा अग्नी मिळेल अशी व्यवस्था करीत होते इतक्यात मला एक चमत्कारिक दृश्य दिसले दहा-बारा वर्षांचा एक आणि सात-आठ वर्षांचा दुसरा अशी दोन मुले जळणाऱ्या एका चितेतील मोठा पेटता ओंडका एका लांब लोखंडी चिमट्याने ओढून चितेबाहेर काढीत होती मी पाहत राहिलो जवळच डोंब उभा होता, पण त्याने त्या मुलांना अटकाव केला नाही मुलांनी जळता ओंडका बाहेर काढला आणि कुत्र्याला फरफटत न्यावे तसा त्यांनी तो ओंडका रस्त्यावरून ओढत न्यायला सुरुवात केली मी त्यांच्याजवळ

जाऊन विचारले, "हे लाकूड कुठे नेता?" मोठ्या मुलाने अगदी सहजपणे सांगितले, "घरात." मी विचारले, "कशासाठी?" तो म्हणाला, "घरात स्वयंपाक करण्यासाठी, रोज आम्ही याच लाकडावर सकाळ-संध्याकाळ अन्न शिजवतो माझा बाबा इथं चितेवरचा डोंब आहे कोळसा महाग झाला आहे आम्हाला परवडत नाही आम्ही रोज असे जळते ओंडके आणतो मग आई त्यावर जेवण तयार करते" चितेतील अग्नीवर स्वयंपाक करण्याच्या त्या कल्पनेने मी शहारलो, पण ते जगातील सर्वांत मोठ्या स्मशानातील सत्य होते मुलांना किंवा त्यांच्या आई-बापांना त्यात काहीच वावगे वाटत नव्हते

मी जवळच्या दगडी टॉवरवर गेलो तिथे दोन पाश्चात्य तरुणी आणि एक तरुण स्मशानाची छायाचित्रे घेत होते. ती घेऊन झाल्यावर तीन-चार स्थानिक तरुण त्यांच्याजवळ आले आणि "काही विकायचे आहे काय?" असे त्यांनी त्यांना विचारले मी जवळच उभा राहून पाहत होतो त्या तरुणींनी आपल्या पर्समधून सात-आठ कॉम्प्युटर्स, चार घड्याळे आणि तीन-चार पेन्स बाहेर काढली मग अगदी बाजारातल्यासारखा सौदा सुरू झाला गणकयंत्राची किंमत दीडशेवरून ऐंशीवर आली घड्याळे तर पंचवीस रुपयांना सांगून अखेर प्रत्येकी पंधरा रुपयांना विकली गेली पेनची किंमत चाळीस रुपये सांगितली ती पेन्स अशी वैशिष्ट्यपूर्ण होती की, त्यांनी लिहिता तर येत होतेच, पण त्यात अगदी लहान घड्याळेही बसवली होती ती पेन्स प्रत्येकी अठरा रुपयांना म्हणजे खूपच स्वस्त विकली गेली. हा विकत माल घेणारे आणि विकणारे असे दोघेही अगदी सराईत असावेत हे उघड होते सौदा पटून पैशांची देवाण-घेवाण झाल्यावर मी भारतीय तरुणांना विचारले, "हा माल इतका स्वस्त कसा मिळतो?' ते हिंदीतून म्हणाले, "हे लबाड लोक असतात. हे नेपाळमध्ये चोरून जातात तिथे हा माल कचऱ्यासारखा स्वस्त मिळतो डिजिटल घड्याळ तिथं पाच रुपयांना मिळतं! हे लोक हाच धंदा करतात गादीतून एकावेळी दोनदोनशे घड्याळे आणतात मग इथं स्मशानात येऊन गांजा, चरस, अफू चढवून तासन्‌तास तंद्रीत घालवतात आमची नेहमीची गिऱ्हाईकं आहेत कधी कधी आम्ही यांना रोखीच्या ऐवजी गांजा-चरससुद्धा देतो."

ते भारतीय तरुण माल घेऊन गेल्यावर मी त्या परकीय पाहुण्यांशी बोलू लागलो त्यांपैकी एक अमेरिकन तरुणी होती मी पूर्वी अमेरिकन सरकारमध्ये नोकरी केली आहे आणि अनेकदा अमेरिकेला जाऊन आल्याचे सांगितल्यावर ती अनौपचारिकपणे बोलू लागली, "मी कॅलिफोर्नियातील माझं नाव लिलियन फे. मी आणि माझी ही मैत्रीण नि तिचा मित्र यांनी वर्षभर भटकंती करायचं ठरवून निघालो आम्ही गेले दोन महिने भारतात आहोत जवळजवळ सर्व देश आम्ही फिरून पाहिला"

" भारतातील लोक तुम्हाला कसे वाटले ?" मी विचारले

त्यावर ती म्हणाली, "आम्ही कामापुरताच त्यांच्याशी सबंध ठेवतो आम्ही हिप्पीसारखे भटकतो त्यामुळे उच्चशिक्षित खानदानी भारतीयांचा व आमचा संबध येत नाही आम्हाला त्याचे काही वाटत नाही कारण आम्ही सर्व-सामान्य लोकातच राहतो पण त्या वर्गात दोन प्रकारचे लोक मुख्यत भेटतात आम्ही खूप श्रीमंत आहोत, या कल्पनेने आमच्याकडून देणगीच्या मार्गाने किंवा आम्हाला फसवून पैसे मिळतील या अपेक्षेने आमच्याशी वागणारा एक वर्ग आहे दुसऱ्या वर्गातील लोकाना वाटते की आम्ही त्याना अमेरिकेत नेऊ आणि आमच्या घरी ठेवून घेऊ या अपेक्षेने ते आमच्या भोवती घोटाळतात आणि आम्हाला चहा-पाणी देण्याचा प्रयत्न करतात पण पुढे काय मागणी येणार याची कल्पना असल्याने आम्ही त्या आदरातिथ्याचा स्वीकार करीत नाही "

बनारसच्या स्मशानात मी सतत सहा दिवस रोज सध्याकाळी दीड दोन तास घालवीत असे तेव्हा मला अनेक पाश्चात्य हिप्पी घाटावर बसून सिगारेट्स किंवा चिलमी ओढताना दिसले ते कोण, कुठले याची चौकशी करण्याचा प्रयत्न केला तर बहुधा ते 'जग सर्व एकच आहे मी जगाचा नागरिक आहे मला हिंदुधर्माचा अभ्यास करावयाचा आहे,' अशी संदिग्ध उत्तरे देत असत क्वचित कोणी काहीसे आत्मनिवेदन करीत एक जर्मन युवती भेटली तिने आपली दुख'द कहाणी सांगितली, " मी लखनौहून एकटीच बायकांच्या दुसऱ्या वर्गाच्या डब्यातून प्रवास करीत होते गाडीत चोऱ्या होतात असे ऐकले म्हणून मी माझ्या सामानाला एक दोरी बांधून ती माझ्या कमरेभोवती घट्ट बाधली होती. रात्री गाडीत मला झोप लागली पहाटे जाग आली, तेव्हा माझ्या कमरेभोतीची दोरी तशीच होती पण सामानाला बांधलेली दोरी चोरट्यांनी कापून सामान लपास केले होते तरी माझ्या पासपोर्ट आणि रोख रक्कम मी गळ्यात बाधलेल्या पिशवीत ठेवली होती म्हणून ती तेवढी बचावली मला जर्मनीला फोन करून पैसे मागवावे लागले हिंदू धर्मातील या श्रेष्ठ सास्कृतिक शहरात असा विपरीत अनुभव यावा याची मला अतिशय खत वाटते चोरी झाल्याची तक्रार करण्यासाठी मी पोलिस स्टेशनवर गेले तेव्हा पोलिसांनीही मला सहकार्य दिले नाही पोलिस अधिकारी त्याबद्दल पूर्णपणे उदासीन होते "

या स्मशानात धार्मिक कृत्ये करणारा एक ब्राह्मण म्हणाला, " येथे प्राप्ती बरी होते पण दिवसभर या मर्तिकाच्या वातावरणात राहावे लागते एकेकाच्या नशिबी असते ते चुकत नाही मनकर्णिका कुड प्रथम विष्णूने उकरून काढले पण आम्हाला ते दरवर्षी उकरावे लागते कारण पावसाळ्यात पूर येऊन देऊळ व मनकर्णिका कुड पाण्याखाली जाते पाण्याबरोबर नदीचा गाळ येतो व कुंडात

रतून बसतो पाणी ओसरून गेल्यावर चार–आठ दिवस गाळ काढण्याचे किचकट काम करावे लागते पावसाळ्यात प्रेतांची नीट व्यवस्था नसते धार्मिक कार्ये करण्यासाठी आडोसाही नसतो प्रेतांचे दहन पूर्ण होण्यासही वेळ लागतो लाकडे ओली असतात त्यातही पाऊस ते आमचे अगदी दुर्दिन असतात ”

ज्या डोंबाकडे प्रेताचे दहन करण्याचे काम असते, त्यांच्यापैकी एकजण म्हणाला, “ माणशी साधारण चाळीस ते पन्नास रुपयाचे लाकूड लागते हे लाकूड आसाम आणि उत्तर प्रदेश यांतील जगलातून येते काही दानशूर धनिकांनी गरीब, निराश्रित हिंदूच्या प्रेताचे मोफत दहन करण्यासाठी मोठमोठे निधी दिली आहेत. काही बडे रईस आपल्या नातेवाइकाच्याकरिता चदनाची चिता करतात किंवा अर्धी लाकडे चदनाची टाकतात अशा चितेला दीड ते अडीच हजार रुपयापर्यंत खर्च येतो कुभमेळा, जत्रा अशा प्रसगी आमच्या क्षमतेबाहेर प्रेते येतात त्याना चार-चार सहा-सहा तास थांबावे लागते ”

बनारस हे शिवाचे अधिष्ठान, पण मनकर्णिका घाटावर प्रेते आणण्यात येतात तेव्हा ‘ रामनाम सत्य है ’ असा रामाचाच गजर होत असतो काशीतच नव्हे तर सर्व उत्तर भारतीय हे अत्ययात्रेच्या वेळी हाच जप करीत असतात मनकर्णिका घाटावर जळणाऱ्या चितेच्या धुराने कोंडल्यासारखे होते आणि जळणाऱ्या मासाच्या दर्पाने अस्वस्थ वाटू लागते नदीतून लहान-मोठ्या नावा लाकडे भरून येतात हे ओंडके उतरून घेण्याचे काम सतत चालू असते धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चार पुरुषार्थांपैकी अखेरचा म्हणजे मोक्ष देणारे हे ठिकाण ‘ काश्याम् मरणम् मुक्ती ’ हे वचन प्रसिद्धच आहे पण ज्यांना काशीत मरण येत नाही, त्यांचे निदान दहन तरी तेथे व्हावे अशी मृताच्या नातेवाइकांची इच्छा असते त्यामुळे सायकल रिक्षा, टेंपो, मोटार, आगगाडी, विमान अशा अनेक वाहनातून दूरदूरच्या ठिकाणाहून या ठिकाणी मृतदेह आणण्यात येतात मनकर्णिका घाटाचा उल्लेख इग्रजी लेखातून व पुस्तकातून ‘ बर्निंग घाट ’ असाच करण्यात येतो मणकर्णिका घाटावर विष्णू, शिव आणि देवी यांच्या मूर्ती आहेत कुडातील लहान मदिरात विष्णूची मूर्ती आहे ती मूर्ती उत्तरेकडील भिंतीत आहे घाटावर विष्णूच्या पादुकाही आहेत त्या ठिकाणी विष्णूने तप केले होते ‘ बनारसमधील सर्वांत पवित्र ठिकाण ’ असा या जागेचा उल्लेख अनेक विद्वानानी केला आहे बनारसच्या राजघराण्यातील सर्व महाराजाचे अत्यविधी या पादुकाच्याजवळ झाले यावरून त्यांचे महत्त्व सहजच लक्षात येते मनकर्णिका घाटावरील शिवलिंगाचे नाव तारकेश्वर लिंग असे आहे मृत्यूनतर माणसाला तारून नेणारा शिव अशा अर्थी त्याला हे नाव पडले आहे या घाटावर ज्याचे दहन करण्यात येते अशा मृताच्या कानात शिव तारक मन्त्र सांगतो, असे भक्त मानतात याच घाटावर मनकर्णिकेश्वर मदिर आहे. या

मंदिरातील शिवलिंग जमिनीत खोलवर आहे या घाटावर जे आणखी एक मंदिर आहे, त्याला मनकर्णिका देवीचे मंदिर म्हणतात या देवीची पूजा करण्यापूर्वी जे स्नान केले जाते, ते नेहमीचे स्नान असते देवीची पूजा केल्यानंतर पुजारी जे स्नान करतात, ते शिवाचा प्रतिनिधी म्हणून कुंडात स्नान करतात मंदिरात देवीची मूर्ती असून भिंतीवर दरसाल देवीचे नवे चित्र काढण्यात येते

बनारसचे स्मशान हे एक अत्यंत उद्‌बोधक असे ठिकाण आहे स्मशान हे शिवाचे निवासस्थान आणि बनारस हे तर शिवाचे आवडते ठिकाण ज्याला भीषण सौंदर्य म्हणतात, त्याचा साक्षात्कार मनकर्णिका घाटावर जसा होतो, तसा इतरत्र क्वचितच होत असेल या स्मशानात सतत काम करणारे डोंब, भटजी, लाकडाची वाहतूक करणारे, स्मगलिंग करून आणलेला माल विकणारे व विकत घेणारे लोक आणि तेथील कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय यांना जळणाऱ्या प्रेताची आणि त्यासाठी येणाऱ्या नव्या मृतदेहांची इतकी सवय झाली होती की ते सर्व लोक अगदी सहज-पणे वावरत असत परकीयांना काशी-विश्वेश्वराच्या मंदिरात प्रवेश नसे त्यामुळे ते मंदिर एकदा बाहेरून पाहून झाले की मग स्मशानात वेळ घालविणे हा त्यांचा मुख्य उद्योग असतो त्यापैकी बरेचजण हिप्पी किंवा हिप्पींच्यासारखे असतात. खाली घाटावर प्रेत जळत असताना वर पायऱ्यावर किंवा टॉवरवर गांजा अगर इतर अमली पदार्थांच्या तारेत ते तासन्‌तास बसून राहतात याच स्मशानात मला एक स्विस तरुण भेटला तो कथ्थक नृत्याचे शिक्षण घेण्यासाठी बनारसला आला होता ‘ स्वित्झर्लंडमध्ये या नृत्याचा उपयोग काय ?” असे मी त्याला विचारले तेव्हा तो म्हणाला, ‘ उपयोग काहीच नाही पण बनारसमध्ये मला सहा महिने राहायचे होते नुसतेच रिकामटेकडे भटकण्यापेक्षा येथे काही तरी शिकावे म्हणून मी कथ्थक शिकत आहे.” संगीताची साधना करणारे एक अमेरिकन पती-पत्नीही मला याच स्मशानात भेटले

दशाश्वमेध घाटाजवळ मी एक फलक पाहिला ‘श्रीमंत तनपुरे महाराज धर्मशाळा ’ मी आत गेलो बनारसमध्ये गंगाकिनारी मराठी लोकांची धर्मशाळा असावी याचा मला आनंद व अभिमान वाटला तेथील कारभाऱ्यांनी सांगितले की, पंढरपूर येथील श्री संत तनपुरे महाराज विश्वस्त निधीतर्फे १९५८ मध्ये ही धर्म-शाळा बांधली धर्मशाळेत एक विठ्ठल मंदिर आहे. त्याला ‘ काच विठ्ठल मंदिर ’ म्हणतात कारण त्याच्या बांधणीत बरेच काच सामान व आरसे आहेत शंभर लोकांची येथे राहण्याची सोय होऊ शकते पण यात्रेच्यावेळी अडीचशे ते तीनशे लोकही राहू शकतात राहण्यासाठी आकार घेतला जात नाही पण ज्यांना काही देण्याची इच्छा व ऐपत आहे, त्यांनी जाताना स्वेच्छेने काहीही द्यावे अशी येथे पद्धत आहे या मंदिरात ज्ञानेश्वर, तुकाराम, शिवाजी महाराज यांच्या तसबिरी

पाहून आनंद झाला मी गेलो, तेव्हा तेथे चाळीस-पन्नास वारकरी राहत होते या इमारतीजवळच 'नॉर्दन इंडिया पत्रिका' या दैनिकाची कचेरी होती तेथे श्री मनोहर खाडीलकर हे मराठी पत्रकार आहेत त्याना भेटा, असे मला श्री राम मुकुंद पाठक यांनी सांगितले होते त्याप्रमाणे मी श्री. खाडीलकर याना भेटलो ते अनेक वर्षे बनारसमध्येच स्थायिक झाले आहेत बनारसमध्ये महाराष्ट्रीयन किती आहेत असे मी त्यांना विचारले, तेव्हा श्री खाडीलकर म्हणाले, "१९७६ मध्ये येथे बृहन्महाराष्ट्र परिषद झाली, तेव्हा केलेल्या गणतीत येथे पाचशे मराठी कुटुंबे आहेत असे आढळून आले होते त्यात आता पन्नास पाऊणशे कुटुंबाची भर पडली असेल संस्कृत पंडित, शास्त्री, घाटावर धार्मिक कृत्ये करणारे ब्राह्मण आणि बनारस हिंदू विश्वविद्यालयातील प्राध्यापक वर्ग हे प्रामुख्याने महाराष्ट्रीय कुटुंबात समाविष्ट आहेत राणी अहिल्याबाई होळकर यानी बनारसवर खोलवर अशी मराठी संस्कृतीची छाप ठेवली आहे भारताच्या निरनिराळ्या भागांतून आलेले लोक स्वत:च्या अशा कोणत्या ना कोणत्या विभागात येथे राहत आहेत बंगाली लोकांची वस्ती मुख्यत बंगाली टोलामध्ये आहे मराठी लोक रामघाट आणि पंच-गंगा घाट या भागात राहतात तर दक्षिण भारतीय लोक हनुमान घाटाच्या आस-पास वस्ती करून राहिले आहेत बनारस हे मुख्यत धार्मिक शहर असल्याने येथील जीवन तसे शांत असते फक्त महाशिवरात्र किंवा कुंभमेळा अशा यात्रेच्या वेळी गर्दी अनावर होते एरवी तेथे जातीय तणाव नाहीत"

या मुक्कामात मी एकदा जौनपूरला गेलो जौनपूर हे ठिकाण बनारसपासून ५४ किलोमीटरवर गोमती नदीच्या किनारी आहे चौदाव्या शतकात शर्की बाद-शहाच्या अमलात जौनपूर ही या भागाची राजधानी होती शर्की बादशहा हे उत्तम व भव्य वास्तू बांधण्यात अग्रेसर होते त्यामुळे जौनपूरला व आसपास अफगाण पद्धतीच्या अनेक मशिदी आणि भव्य कमानी आहेत. कनौजी अत्तरा-बद्दलही जौनपूर प्रसिद्ध आहे अशी ही वैशिष्टयपूर्ण माजी राजधानी पाहावी म्हणून मी एक दिवस सकाळीच बनारसहून जौनपूरला निघालो बसमध्ये माझ्या समोरच्या इसमाने जौनपूरचे तिकीट काढले. मी त्याला विचारले, "तुम्ही तेथे राहता की काय?" "होय जौनपूर हे माझे गाव आहे" मी विचारले, "तेथे पाहण्यासारखे काय काय आहे?" तो म्हणाला, "तुम्ही मुद्दाम जौनपूरला जात असाल तर तुमचा वेळ फुकट जाईल आमच्या गावात मोडक्या-तोडक्या कमानी आणि मशीद याशिवाय काहीही पाहण्यासारखे नाही" मला आश्चर्य वाटले पण मी त्याचे मत ग्राह्य मानले नाही आपल्या गावात कोणत्या महत्त्वाच्या गोष्टी असतात ते प्रत्येकाला माहीत असतेच असे नाही

जौनपूरचा बसस्टँड अगदीच लहान आहे. मात्र रिक्षांची चांगली सोय आहे

गाव दाखविण्यासाठी दहा रुपयांना एक रिक्षा ठरविली. रिक्षावाला म्हणाला, " इथे पाहण्यासारखी खूप ठिकाण आहेत जहांगीर मशीद, जौनपूर किल्ला, अकबराने बांधलेली कमान, अताला मशीद, नवा पूल. त्याने मोठ्या उत्साहाने मला प्रथम किल्ल्यावर नेले किल्ल्यावर एक मार्गदर्शक होता त्याने काही फोटो दिले आणि माझ्याबरोबर येऊन किल्ला दाखविला हा किल्ला भारतातील एक अत्यंत जुन्या किल्ल्यांपैकी आहे. तो तेराव्या शतकातला आहे अकबर बादशहाने येथे बांधलेल्या भव्य कमानीचा काही भाग आता पडला असला तरी मूळ वास्तूची कल्पना सध्याच्या अवशेषावरून येते. अताला मशीद ही उत्तर प्रदेशातील एक अत्यंत जुन्यापैकी मशीद आहे. या मशिदीपुढे जी प्रचंड कमान आहे, तीवरील नक्षी व शिल्प पूर्णपणे हिंदू पद्धतीचे आहे त्यावरून पूर्वी या ठिकाणी हिंदू मंदिर असावे व त्या मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावरची ही कमान तशीच ठेवून मुस्लिम बाद-शहाने देऊळ पाडून तेथे ही मशीद बांधली असावी हे उघड दिसते झाजरी मशीद ही पंधराव्या शतकातली आहे पण तिचा बराच भाग आता पडला आहे लाल दरवाजा मशीद, किल्ला मशीद, जामी मशीद अशा इतर अनेक नामांकित मशिदी जौनपूरमध्ये आहेत झांजरी मशिदीपुढील कमान अगदी स्पष्टपणे हिंदू शिल्प-कलेची साक्ष देते अकबरी पूल हाही प्रेक्षणीय आहे त्याच्या खांबावर जसे मनोरे आहेत तसे सहसा इतरत्र कोठे पुलावर दिसत नाहीत. जौनपूर हे धड खेडेही नाही किंवा शहरही नाही अशा मध्यम अवस्थेतील गाव आहे. तेथील अत्तर, धूप, उद-बत्त्या यांची कीर्ती ऐकून मी जौनपूरला अत्तर बाजारात गेलो. पण माझी काहीशी निराशाच झाली. कारण उत्तरेतील ही अत्तरे उग्र व आक्रमक असतात पाश्चात्य सेंट्स्च्या मंद सुवासाच्या तुलनेने ही अत्तरे बटबटीत वाटतात तरीही मी पाच रुपयाला एक कुपी घेतली आणि दोन तासांच्या मुक्कामानंतर बनारसला परत जाण्यासाठी निघालो

आता बनारसमधील माझा सुखद आणि ज्ञानदायी मुक्काम संपत आला होता पर्यायाने उत्तर प्रदेशमधील दीर्घ प्रवासाचीही सांगता होत होती अलाहा-बाद, लखनौ, अयोध्या आणि बनारस या केवळ उत्तर प्रदेशातील नव्हे, तर भारता-तील अत्यंत महत्त्वाच्या स्थळांची यात्रा संपवून आता सांगतेच्या आसपास मी आलो होतो यापूर्वीच मी बद्रीनाथ आणि केदारनाथाचा प्रवास केला होता आग्रा, मथुरा आणि झाशी ही उत्तर प्रदेशातील इतर महत्त्वाची स्थळे मी दिल्लीच्या वारीत करणार होतो. कारण ती शहरे दिल्लीच्या मार्गावरच आहेत लखनौ, अलाहाबाद, अयोध्या आणि बनारस ही गावे धर्म, इतिहास, ज्ञान इत्यादी कला-क्षेत्रांत धुरंधर असली तरी लखनौचा नवा भाग वगळला तर या शहराला स्वच्छ

व सुंदर म्हणता येणार नाही हे प्रवास-वर्णन वाचणाऱ्या काही स्नेह्यांनी मला म्हटले होते की, " तुम्ही केलेले वर्णन चांगले असले तरी आम्हाला उत्तर प्रदेशात स्वच्छता आढळली नाही " त्यांचे हे मत खरेच आहे केरळ आणि गोवा ही उत्तर प्रदेशाच्या तुलनेने सुंदर व स्वच्छ राज्ये आहेत स्वच्छता हा फार मोठा गुण असला तरी स्वच्छता हेच सर्वस्व नव्हे, विशेषत बनारस आणि अलाहाबाद अशा लहान शहरी येणारे लाखो यात्रेकरू हे गरीब स्थितीतले असतात व मुख्यत धार्मिक कार्यासाठी येतात. त्यांच्याकडून स्वच्छतेची मोठी अपेक्षा करण्यात अर्थ नाही सारनाथ आणि बनारस हिंदू विश्वविद्यालय हे भाग सोडले तर बाकीचे बनारस अस्वच्छ आणि गबाळेच आहे अमृतराय आणि श्रीमती महादेवी वर्मा ज्या भागात राहतात तो अलाहाबादचा भाग सुंदर व खानदानी आहे पण जुने अलाहाबाद घाणेरडे आणि गर्दीचे आहे बद्रीनाथ, केदारनाथ, हृषिकेश अशा उत्तरेकडील काही क्षेत्रांना मद्यपान बंदी लागू आहे अयोध्या, अलाहाबाद व बनारसला ती लागू नाही बनारसला तर काशीविश्वेश्वर मंदिरापासून फार दूर नसलेल्या गदौलियावर मद्यविक्रीचे दुकान आहे ते धार्मिक भावनेच्या यात्रेकरूंना प्रशस्त वाटत नाही

स्वच्छता आणि कर्तव्य ही दोन्ही असतील तर अधिकच चांगले अनेक देशाच्या प्रवासात मला याबाबत गैरमेळ वाटला उदाहरणार्थ, ' स्वित्झर्लंड हा जगातील एक अत्यंत सुंदर व स्वच्छ टापटिपीचा देश, पण कर्तृत्वात जवळपास शून्यच याउलट अस्वच्छ व गबाळ्या इटलीने गेल्या दोन हजार वर्षांत जगातील श्रेष्ठ चित्रकार, संशोधक, महाकवी, संगीतकार दिले आहेत फ्लारेन्स या इटलीतील लहानशा गावाने सबंध युरोपचे सांस्कृतिक पुनरुत्थान केले मायकेल अँजेलो, गॅलिलीओ, डांटे, लिओनार्डो द व्हिन्सी ही अमर नावे इटलीसारख्या छोट्या व अस्वच्छ देशाने जगाला दिली अगदी आपल्याकडचेच उदाहरण घेतले तर संत तुकारामाचे देहू गाव स्वच्छतेबाबत स्पृहणीय आहे असे म्हणता येणार नाही

लखनौ, अलाहाबाद, अयोध्या आणि बनारस ही एकाच राज्यातील आणि एकमेकांपासून फार दूर नसलेली शहरे पण त्यांच्या प्रकृतीत व वैशिष्ट्यात खूपच फरक आहे अलाहाबाद हे भारतीय राजकारणाचे प्रमुख केंद्र, तर लखनौ म्हणजे राजविलासाचे आगर अयोध्या ही मर्यादापुरुषोत्तम राम व एकनिष्ठतेची परिसीमा हनुमान यांची पवित्र नगरी बनारस हे भारतीय विद्वत्तेचे माहेरघर लखनौचे ऐश्वर्य व विलास बनारसला कधी मिळाला नाही आणि बनारसने त्याची कधी अपेक्षाही केली नाही 'लखनौला नबाब होण्यापेक्षा काशीच्या पंडिताकडे पाणक्या होणे अधिक सुखकर ' अशी दूरदूरच्या ठिकाणांहून काशीला येणाऱ्या मुमुक्षूंची धारणा होती व आहे स्वातंत्र्यपूर्व काळातही अलाहाबादचे राजकीय चळवळीचे केंद्र आता नवी दिल्ली येथे गेले अलाहाबादला ऐतिहासिक महत्त्व तेवढे उरले.

लखनौ ही राज्याची राजधानी असली तरी गतवैभवाच्या मानाने आजची समृद्धी काहीच नाही अयोध्या हे काहीसे एकसुरी गाव राहिले आणि उद्योगधंदे किंवा व्यापार यात मागे पडले मात्र बनारसने आपले बहुरगी व्यक्तिमत्त्व टिकवून धरले आहे परकीय प्रवाशाना आग्रा आणि बनारस ही भारतातील दोन सर्वात महत्त्वाची आकर्षणे आजही वाटतात विलास या बाबतीत जागतिक विक्रम करणारे लखनौ आणि त्यागाच्या क्षेत्रातही जागतिक विक्रम करणाऱ्या भगवान बुद्धाची कर्मभूमी सारनाथ ही एकाच राज्यात, जवळजवळ असावीत हा विलक्षण योगायोग नव्हे काय ?

प बगाल, केरळ तामिळनाडू या राज्याच्या तुलनेने उत्तर प्रदेशातील प्रवास एका दृष्टीने सुखकर आहे कारण दक्षिणेकडील व प बगालमधील भाषा आपल्याला अपरिचित मात्र हिंदी आपल्याला सहज समजते त्यामुळे तेथील जनतेशी सुसवाद स्थापणे सहज शक्य असते शिवाय उत्तर प्रदेशातील लोक आतिथ्य, सौजन्य व इतरांना साहृच करण्यास तत्पर असल्याने या भागातील प्रवास म्हणजे एक आनददायक अनुभव असतो बहुतेक मोठ्या शहरी मराठी भाषिकांची विपुल वस्ती आहे आणि ' महाराष्ट्र मंडळे 'ही आहेत या प्रवासात मला प्रात स्मरणीय महादेवी वर्मा, अमृतराय, अमृतलाल नागर, शिवानी, शिवकुमार मगल अशा अनेक साहित्यिकाच्या भेटी मिळाल्या त्याच्याबरोबर मनसोक्त गप्पा मारता आल्या. श्री राम, भगवान बुद्ध, वाल्मिकी, सत तुलसीदास, सत कबीर अशा देवांच्या आणि देवासमान महामानवांच्या भूमीवर भरपूर सचार करण्याची सधी मिळाली, हीच या उत्तर खडाची सांगता आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
६६२
५५५१८६
शाखा

## रमेश मंत्री यांची आम्ही प्रकाशित केलेली पुस्तके

| | | |
|---|---|---|
| हास्यरुचिरा | विनोदी लेख | ३०–०० |
| गमत काय झाली | ,, कथा | ३०–०० |
| खसखशीचा मळा | ,, ,, | १२–०० |
| जॅकपाट | ,, ,, | २०–०० |
| बोल बोल म्हणता | नाटक | १५–०० |
| पॅरिसमध्ये जनू बांडे | कादबरी | २०–०० |
| जपानमध्ये जनू बांडे | ,, | २०–०० |
| ओ कलकत्ता | प्रवासवर्णन | १२–०० |
| वाघाचा पुलावा | विनोदी कथा | २२–०० |
| सागरकन्या | प्रवास वर्णन | २५–०० |
| साप्ताहिकी | विनोदी लेख | ३०–०० |
| स्वप्नसुदरी | कादबरी | २५–०० |
| उत्तरकाड | प्रवास वर्णन | ४०–०० |

इद्रायणी साहित्य
२७३, शनवार पेठ, पुणे ३०

REFBK-0024938